पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास

खंड पहिला

(इ.स.५१८ ते इ.स.१५१२)

संकलनकार, संशोधक व लेखक :

श्री. गजानन गोविंद ऊर्फ काका नाईक

क्षात्रैक्य समाज, मुंबई

मूल्य अडीच रुपये

क्षात्रैक्य समाज

[स्थापना १ जानेवारी १८८५]

समाजाचे आद्य संस्थापक

कै. जनार्दन राघोबा वनमाळी



जन्म दि. ५ सप्टेंबर १८४३
मृत्यु दि. ११ ऑगस्ट १९१४


कै. विनायक बळवंत परळकर



जन्म दि. १०–२–१८४०
मृत्यु दि. १३ सप्टेंबर १९१३

"The Panchayat organisation has existed in our community from time immemorial. It existed under our own Prince Raja Bimb, under the Portuguese Government and the Maratha Sovereignty of Poona and it has also continued its existence under the British Governmenit."

—**Janardan Raghoba Vanamali**, 1890 A.D.



श्री. गजानन गोविंद ऊर्फ काका नाईक

प्रस्तुत ग्रंथाचे लेखक व ठाणे जिल्ह्यांतील सुप्रसिद्ध कार्यकर्ते.

"History is but a recalling of man's doings, his struggles, achievements and failures in the past that they might instruct his present, and bear fruit in future."

—'Brief Survey of the World',
by *Prof. Sharma.*

पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास

खंड पहिला

(इ.स.५१८ ते इ.स.१५१२)

संकलनकार, संशोधक व लेखक :

श्री. गजानन गोविंद ऊर्फ काका नाईक

क्षात्रैक्य समाज, मुंबई

मूल्य अडीच रुपये

प्रकाशक :
श्री. आनंदराव रामचंद्र परळकर,
कार्यवाह, इतिहास-लेखन-समिति,
क्षात्रैक्यसमाज, वनमाळी सभागृह,
७०-डी, छबिलदास रस्ता,
दादर-मुंबई, नं. २८.

• • •

• • •

दिनांक १ जानेवारी १९६०.

• • •

मुद्रक :—
श्री. आत्माराम बळवंत दांडेकर,
प्रगतिपथ प्रिंटिंग प्रेस,
रानडे रोड, दादर-मुंबई, नं. २८

पाठारे क्षत्रिय ज्ञातीला
उत्कर्षाच्या शिखरावर
आणण्यासाठीं ज्यांनीं ज्यांनीं
आजवर तन-मन-धनानें
पण निःस्वार्थबुद्धीनें
प्रयत्न केले नि आज
करीत आहेत,
अशा सर्व दिवंगत नि हयात
बंधूंच्या चरणीं मी
ही अल्पकृति
प्रेमादरानें अर्पण करतों.

—ग्रंथकर्ता.

— शुद्धिपत्र —

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
अनुक्रमणिका	३	आठ	सात
आठ	११	आखिल	अखिल
चौदा	६	रामदेव राजा	मुरारदेव राजा
पंधरा	१३	त्याचा मुलगा	जनार्दन प्रधानाचा मुलगा
सोळा	११	ज्ञातीचा हा इ. स. ५१७ पासून सुरु होऊन सन ११२८ पर्यंत आलेल्या ह्या कुळांत	ज्ञातीच्या ह्या इ. स. ५१७ पासून सुरु होऊन सन ११२८ पर्यंत आलेल्या काळांत
एकोणीस	२६	सन १९३२ साली	सन १९३५ सालीं
एकोणीस	२७	सन १९४७ सालीं	सन १९४९ सालीं
एकोणीस	२९	व समाजाने त्या प्रकाशित केल्या	व समाजानें त्यापैकीं ‘ समालोचन व दिग्दर्शन ’ ही पुस्तिका छापून प्रकाशित केली व ‘ इतिहासाची रुपरेखा ’ वरळी गोपचार व भोयें संस्थाननें छापून प्रकाशित केली
एकवीस	२	सन १९३४ सालीं	सन १९३५ सालीं
बावीस	४	इ. स. १५१३ ते १७६० व १७६१ ते १९५९	इ. स. १५१३ ते १७८४ व १७८४ ते १९६०
तेवीस	६	व्यहार	व्यवहार
तेवीस	६	नाडगौडी	नारगौडी
१	११	याशी पुत्र जाहला. राजा बहुत हर्षित झाला. नांव महिपाळदेव राणा ठेविलें. मग पुत्र नाहीं तर सैंवर करावें हें सर्वांस मानलें मग सर्वांही विचार करून कन्या पाहून सैंवर केलें राजाच्या राणीचें नांव तारा-	नाहीं तर राजाचें सैंवर करावे मग हें सर्वांस मानलें मग सर्वांहि विचार करून कन्या पाहून राजाचें सैंवर केले राजाच्या राणीचें नांव ताराईजी राणी नंतर त्यास पुत्र झाला मग राजानें धर्म बहुत केला पुत्राचें

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
		ईजी राणी नंतर त्यास पुत्र झाला मग राजानें धर्म बहुत केला पुत्राचें नांव बिंबदेव ठवलें मग दुसरा पुत्र गोराईजी राणी	नांव बिंबदेव ठेविलें मग दुसरा पुत्र गोराइजी राणी यासीं जाहला राजा बहुत हार्षित झाला नांव महिपालदेव राणा ठेविलें मग पुत्र
३	१५	राव अंकुशदेव राणे	राव व अंकुशदेव राणे
३	२८	शके १२१५	संवत् १२१५
३	३१	शके १२२०	संवत् १२२०
४	८	यांत एकेका	यांत दर एकेका
४	११	चौगडे कड या लावण्य अधिकारी व कर्णीक यांही यापाशीं बाळगावे	चौगले कड याला वण्य अधिकारी व कर्णिक यांहीं या पाशीं वोळगावे
४	१४	शके १२२०	संवत् १२२०
५	२१	वोळगोला गेले	वोळगों लागले.
५	२७	श्रींगापूर	श्रीगारपूर
६	२	कोळांब्र कालाई	कोलंब्रका कुळीचे
६	२	शिलाइका कुळीच्च	शिलांब्रका कुळीचे
७	१५	महाराड	महाराज
७ टीप १ ओळ		येथील ज सुप्रसिद्ध	येथील सुप्रसिद्ध
८ शेवटची ओळ		एकसारखा	एकसारचा
९	३	हें दत्त	हें देणें
९	९	देरगिरीचे	देवगिरीचे
९	१०	हजार १०००	हजार १०,०००
९	२४	आवाणे	बाणें
१०	३	मोहारी	मोहरी
१०	४	येकस्तरकरास	येकसार करास
१०	७	मेकसारकराला	येकसार करास
१०	९	समसस्त	समस्त
१०	१३	यांणी	याशीं

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१०	१७	सुखा	सुरवा
१०	१८	नामगिरीचा	रामनगरीचा
१०	२५	मग सर्व राजांनीं मिळोन महाराज ठाणीयास आले.	मग सर्व राजांनीं मिळून राया केशवदेवा राणीयाचे आमरण राजाज्ञा देखोनी फार मानियले मग महाराज ठाणीयास आले
११	१०	खंडी	खाडी
११	१७	घोडे हजार	घोडे दोन हजार
१२	२	नवासरी ठेविले घोडे १२०० हत्तीं १० सजणीस ठेविले	नवसरीस ठेविले घोडे १२०० हत्ती १० व सजणीस ठेविले
१२	४	१५०	१५००
१२	५	माहिमानरामा नागदासाचे घोडे शाळेस ठेविले उत्तम २०००. हत्ती तेरा १३. हें दळ रामा नगरासाचे	महिमानराया नागरसाचे घोडशाळेस ठेविले घोडे उत्तम २००० हत्ती १३ तेरा हें दळ राया नागरसाचे
१२	१८	त्रिपुरकराया	त्रिपुरकर राया
१२	२६	कनोजला	कनोजहून
१२	३०	असलेला	आलेला
१३	६	व दिधी सोमठाकूर देशाया रायानें सलागीं हेंदुराव नांव दिधलें.	व सोनठाकूर देशायालागीं हेंदुराव नांव दिधलें
१३	२२	उल्लेख इतरत्र कोठाह	उल्लेख नंतर इतरत्र कोठेंही
१४	७	मग देवगिरीचे अहिनलवाड्याचा	मग अहिनल वाड्याचा
१४	११	तो उसाळवर ठेविला	तो वेसावेवर ठेविला
१४	१२	सिंघाळ	सिधान
१४	१३	मगदो	मग ते
१५	१२	जमनाम	जयनाम
१६	२	प्रणाम	प्रयाण

पृष्ट	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१७	४	ख्यात	साल
१७	१४	भागरियाचे	भादरीयाचे
१८	२६	शिपागापुरीचे	सिनगारपुरीचे
१९	९	पाईसकरास	पोईस करास
१९	२२	साणे (खाणे)	ब्राणें
२०	२९	भात	भान
२०	३१	रामा	राया
२१	२	अभिसाण	हबीसाण
२१	८	राजकब्रशाहा	राजकवजशाह
२१	१२	केशवरामास	केशवरायास
२१	१६	हिजरी संवत्	विजरथ (हिजरी) संवत्
२१	२०	देखिलविला ईथ	देखिल बिलाईथ
२१	२१	सोमेसंवत्सरी राज्य अहमदाबाज रचिली. राज्य अहमदाबाजेस करूं लागले. मग डफरखानें माहिमास राज्य पालटलें. भोगळान मोडले. डफरखान राज्य करूं लागला. मग सुलतानानें	सोमे संवत्सरा राज्य पालटले. भोगळान मोडले. डफरखान राज्य करूं लागला. मग सुलतानानें राज्य अहमदाबाज रचिली राज्य अहमदाबाजेस करूं लागले राज्य मग डफरखानाने माहिमास
२१	२७	१३४२	१३३२
२२	८	जरमज मागें	जर मजमागें
२२	१२	दिवातबाहादुर	दिवाण बाहादुर
२३	५	तल बकेली	तलब केली
२३	११	वारिसामी आहे	वारीसा मी आहे
२३	१९	साईरा	सोईरा
२३	२१	मनास आले	मनास न आले
२४	१२	मादो गांवीची	या दोन गावांची
२४	१३	खान	श्वान
२४	१६	हर दुजण	हरदु जण

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२४	१८	असा मुन्हा	आगा मुन्हा
२५	२१	मरगखान खाना	मग श्वान खाना
२५	२३	हे हर दुजण	हे हरदुजण
२५	२९	कान नाईक	कान नाक
२५	३०	भाई नेरकर	भाईनेरकर (भायंदरकर)
२६	१७	बतान	तान
२८	१०	देशनार दगवडे	देशनारगौडे
२८	१६	गलीव	गनीम
२९	६	फिरविला	करविला
३१	टीप	दहा महिने	वीस महिने
३५	३	बाव	बाळ
५०	११	इ. स. १४९५	इ. स. १२९५
८०	१८	संगति लावावी	संगति कशी लावावी
८२	११	तोंच बिंब मावळला.	तोंच बिंब मानवला.
८५	१७	मांडलें आहे. ज्ञातींतील कांहीं	मांडले आहे पण ज्ञातींतील इतर कांहीं
८८	२६	वगट	लगट
८८	२७	चातेना	पातेणा
९८	१४	मुरक	मुख्य
९८	१५	कुमाहिका	कुमारिका
९९	११	हिग्बामा	हरिबा
१००	२५	१२२५	१२३५
१०१	२६	१२२५	१२३५
१०३	७	११७०	१२७०
१०४	२	महिकावतींतील बिंब	साष्टीचे बखरीचे पूर्वार्धातील बिंब
१०४	९	बिकाने	बिंबानें
१०५	१३	रानव	रांजण
१०५	१५	ठकमताच्चे	एक मताचे
१०५	२३	हंबीरखला	हंबीरखान

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१०५	३०	शके १३६५	शके १४२१
१०६	३	पूर्वाधांत	पूर्वार्धाची
१०६	२२	तीन बिंब एकच आहेत.	तीन बिंब व पूर्वार्धातील एक बिंब एकच आहेत असें शोधाअंतीं आढळून आले
१०७	९	व दहा (१०) महिन्यांचे	व वीस (२०) महिन्याचे
१०९	१८	तो नुकणि किंवा	तो तुर्की किंवा
११०	८	व केशवराव हरींचें	व केशवराव 'पाध्ये व हरी रामचंद्र आचार्य यांचे
११२	११	रामजी सुखा सीनागारचा	रामजी सुखा शिणगारपुरीचा
११२	१२	शके १३२५	शके १२८५
११२	२०	थुजार आली	थुजार आला
११२	३०	शके १४११ सोमेश्वर संवत्सरे	संवत १४८९ सोमेश्वर संवत्सरे
११३	५	शके १३२५	शके १२८५
११३	७	हें राज्य १४११ संवत्सरे	हें राज्य १४८९ संवत्सरे
११६	१४	शके १०३४	शके १७३४ (?)
१२०	१०	हत्येवरी	हत्तीवरी
१२०	१६	रामाचा	रायाचा
१२१	११	कमालीचे	कंग्राजीचे
१२३	१९	१२१६ शके हा	१२१६ शकेंत हा
१२४	७	राजप्रतापी हा	राजप्रतापी. हा
१२५	१५	कालगणना केलेली आहे	कालगणना संवताने केली आहे
१२७	१०	हकिकत एक स्थानांत दिसते	हकिकत एकत्र पाहता दिसते.
१२७	२५	जसवंद्या जाधव, तसेंच त्यांना	जसवंध्या जाधव, जसगदेवराणा याना तसेंच अहिनल वाड्याच्या
१२७	२६	तुदानशा	नागरशा
१३०	९	नागरशानें त्याचा	नागरशहानें आणि त्याची
१३०	१०	हा	ह्या
१३२	२३	पांचकळी	पांचकळशी

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१३३	९	सुख्याला	सुरव्याला
१३३	१३	करून ठेवावें	करून ठेवले
१३५	२२	व कारकून	व चार कारकून
१३६	१०	भयवार	सभवार
१३७	१६	पांच वर्षाचा होता राणीचा	पांच वर्षांचा होता. त्यावेळीं सोमेश्वर राणा वारला राणीचा
१३७	२०	भोज मेला	भोज गेला
१३८	५	नागशाचे	नागरशहाचे
१३८	१६	१३२५	१२८५
१३८	२१	१३२५	१२८५
१३८	२५	शके १४११	संवत् १४८९
१३९	२३	चिंबा	किंवा
१४३	१८	रामचंद्राकडून मागितली	रामचंद्राकडून कुमक मागितली
१४९	१५	मुखा	सुरवा

*

अनुक्रमणिका

● ● ●

लेखकाचें निवेदन

"It is the past that makes the present and that what goes before, is the key to what comes after".

—By *Robinson.*

पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या इतिहासामागें १४०० वर्षांची ऐतिहासिक परंपरा आहे.

महाराष्ट्रांतील ह्या कर्तृत्वान ज्ञातीचा इतिहास यापूर्वींच उजेडांत यावयास पाहिजे होता; पण ह्या योगायोगाच्या गोष्टी आहेत!

ज्ञातीच्या अस्तित्वाबद्दल, तिच्या मूळ ठिकाणाबद्दल, नांवाबद्दल मागें कांहीं व्यक्तींनीं व संस्थांनीं तुरळक प्रयत्न केले; पण त्याला 'ज्ञातीचा इतिहास' म्हणतां येणार नाहीं. पुण्यश्लोक प. वा. जनार्दन राघोबा वनमाळी व प. वा. विनायक बळवंत परळकर यांनीं स्थापन केलेल्या क्षात्रैक्य समाजाच्या अमृतमहोत्सव प्रसंगीं ज्ञातीचा इतिहास लिहिला जावा, असा निर्णय समाजाच्या व्यवस्थापक मंडळानें घेतला, हें त्यांना खास भूषणावह आहे.

आधीं सिद्धान्त आणि मग संशोधन

अशा तऱ्हेच्या तऱ्हेवाईक व दूषित दृष्टिकोनांतून बाहेर पडलेले सारे इतिहास कुचकामी ठरले आहेत. मिळतील तितक्या ऐतिहासिक साधनांचा प्रामाणिकपणें अभ्यास करून पूर्वग्रहरहित दृष्टीनें व निर्विकार बुद्धीनें लिहिलेले व लिहिले जाणारे इतिहास हेच खरे विश्वसनीय इतिहास-ग्रंथ होत.

ऐतिहासिक प्रामाण्य हें सत्यसंशोधनाच्या कसोटीवर घांसून घेतल्यावर गेल्या ४०-५० वर्षांत मी अभ्यासिलेलें नि संशोधिलेलें ऐतिहासिक वाङ्मय सुज्ञ आणि विचारी जनतेपुढें ठेवीत आहें. हा खंड 'पाठारे क्षत्रिय' ज्ञातीपुरताच मर्यादित नसून तो साऱ्या मराठ्यांकरितां लिहिण्यांत आलेला आहे, असें मला आर्जवून म्हणावेंसें वाटतें; कारण, इस्लामियांची आणि फिरंग्यांचीं आक्रमणें आणि स्वजनांच्या अंतर्गत कलहांचीं आंदोळनें ह्यांचा साकल्यानें विचार केला असतां असें म्हणावें लागेल कीं, प्रस्तुतच्या खंडावर एकट्या 'पाठारे क्षत्रिय' ज्ञातीचाच वारसा हक्क नसून त्यावर पाठारे क्षत्रियां-

प्रमाणेंच पाठारे प्रभु, शेषवंशी (भंडारी) असें म्हणविणाऱ्या इतर क्षत्रिय ज्ञातींचाहि हक्क आहे.

पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या इतिहासाची ही कल्पना माझ्या मनांत फार वर्षांपूर्वीपासून घर करून राहिली होती. माझ्या विद्यार्थीदशेपासून मी बाळगिलेल्या तीन इच्छांपैकीं (१) ज्ञातीची परिषद भरविणें, (२) ज्ञातीच्या इतिहासाचीं साधनें जुळवून तीं प्रसिद्ध करणें, (३) ज्ञातीच्या विद्यार्थ्यांकरितां बौद्धिक, औद्योगिक व धार्मिक शिक्षण देणारा आश्रम स्थापन करणें. ज्ञातीचा इतिहास लिहिण्याची माझी इच्छा, अंशतः कां होईना, आज फलद्रूप होत आहे. जातीची परिषद जरी आजवर भरविली गेली नाहीं, तरी पाठारे क्षत्रिय वक्तृत्वोत्तेजक समाजाच्या विद्यमानें भरविण्यांत आलेल्या '**अखिल पाठारे क्षत्रिय शिक्षण परिषदें**'त प्रामुख्यानें भाग घेतां आला.

मी प्रथमतः १९०७ सालीं 'क्षात्रदूत' ह्या मासिकांतून इतिहासाचीं साधनें जमविण्याबद्दलची सूचना केली होती. सन १९१२ सालीं दादर येथील "इतिहास संशोधक मंडळांत"त सभासद म्हणून भाग घेतला. सन १९१४ मध्यें 'माधवदास' ह्या सहीनें इतिहासाची योजना लोकांपुढें मांडली. सन १९१७ मध्यें ठाणें येथील 'पाठारे क्षत्रिय ज्ञातिसेवक समाजा'च्या अध्यक्षांच्या सहीनें इतिहासासाठीं दोन हजार रुपयांचा फंड जमविण्यासाठीं पत्रक छापून तें लोकांना वाटलें होतें. ज्ञातींतील सभा आणि महासभा हा इतिहासाचा एक मोठा भाग आहे. त्यांची साद्यंत रूपरेखा मी 'परळकरांचा अव्यापारेषु व्यापार' (परळ ग्रामस्थांचा) ह्या पुस्तिकेंत स्पष्ट दिलेली आहे. बं. श्री. माधवराव केशवराव चेंबूरकर, बं. भगवंतराव जनार्दन म्हात्रे आणि 'क्षात्रवृत्त'कार बं. शांताराम जनार्दन पाठारे यांच्या माझ्यावरील निरपेक्ष पण अमर्याद प्रेमामुळेंच ही पुस्तिका मी प्रसिद्ध करूं शकलों.

सन १९२७ सालीं बं. श्री. भगवंतराव जनार्दन म्हात्रे व माधवराव केशवराव चेंबूरकर ह्यांनीं संपादिलेली माझी "साष्टीची बखर" (उत्तरार्ध) छापण्यास दिली; पण तो छापखानाच जप्त झाल्यानें तो प्रयत्न फुकट गेला. पुढें १९३५ सालीं मी सदर 'बखर' छापून प्रसिद्ध करण्याबाबत गोपचार व भोयें संस्थानकडे प्रयत्न केला. वरळी गोपचारचे तत्कालीन विश्वस्त बं. श्री. भगवंतराव जनार्दन म्हात्रे, बं. श्री. वसंतराव दामोदर रावते बं. श्री. वसंतराव दामोदर म्हात्रे आदींच्या मजवरील प्रेमामुळें "आपल्या ज्ञातीच्या इतिहासाची रूपरेखा" व "साष्टीची बखर (उत्तरार्ध) अर्थात् वसईचा दुर्धर रणसंग्राम" ही माझीं दोन पुस्तकें वरळी गोपचार व भोयें संस्थानच्या कृपेनें प्रकाशित झालीं.

"वसईच्या दुर्धर धर्मसंग्रामाची पार्श्वभूमि" व "पाठारे क्षत्रिय ज्ञातीनें घडवून आणलेली सार्वत्रिक संघटना" हे माझे दोन निबंध एकत्र छापून मी गोपचारमुळेंच प्रसिद्ध करूं शकलों व 'इतिहासाचीं साधनें,' 'ऐतिहासिक लेखमाला' हीं 'क्षात्रवृत्तां'त प्रसिद्ध करतां आलीं. अणजूर गणेश मंडळाच्या कृपेनें 'वीर गंगाजी नाईकांचें चरित्र' मला प्रसिद्ध करतां आलें. केवळ वरळो गोपचार व भोयें संस्थानमुळेंच मला पुणें येथें भरलेल्या 'अखिल भारतीय इतिहासतज्ज्ञांच्या परिषदे'स उपस्थित राहून, मी लिहिलेला—'Epic of Gangaji Naik' हा इंग्रजी प्रबंध वाचण्याची संधि मला मिळाली. ह्या प्रबंधवाचनामुळें बऱ्याचजणांचें लक्ष कोंकणच्या ऐतिहासिक काळाकडे वळलें, हें येथें प्रामुख्यानें नमूद करण्यासारखें आहे.

ह्याच म्हणजे १९३५ सालीं मी 'पाठारे क्षत्रिय वक्तृत्वोत्तेजक समाजा'पुढें 'ज्ञातीच्या इतिहासा'वर दोन व्याख्यानें दिलीं. १९३५ मध्यें क्षात्रैक्य समाजाच्या सुवर्णमहोत्सव प्रसंगीं 'साष्टीच्या बखरी'ची हस्तलिखित प्रत व छापील 'रूपरेखा' गोपचारनें अध्यक्षांस अर्पण केली. 'ज्ञातिबांधवांना विनंति' म्हणून मी एक पत्रक 'क्षात्रवृत्तां'तून प्रसिद्ध करून इतिहासाचें काम हातीं घेण्यासाठीं ज्ञातीनें दहा हजार रुपयांचा फंड जमा करावा, अशी मी त्या पत्रकांतून विनंति केली होती.

वरील सर्व वेळीं माझे प्रिय मित्र व मार्गदर्शक बं. श्री. शांताराम जनार्दन पाठारे 'क्षात्रवृत्त'कर्ते ह्यांनीं इतिहासाबद्दलचे माझे विचार व धोरण वेळोवेळीं उचलून धरून मला प्रोत्साहन दिलें नसतें, तर माझ्या हातून आजवरचें कार्य होऊं शकलें असतें कीं नाहीं, याची शंका आहे. त्यांची प्रेरकशक्ति माझ्यामागें होती; त्याचप्रमाणें माझे दुसरे अभिमानी मित्र बं. श्री. भगवंतराव जनार्दन म्हात्रे यांच्या माझ्यावरील अकृत्रिम प्रेमामुळेंच माझ्या दप्तरांतील उपरोक्त ऐतिहासिक वाङ्मय प्रकाशांत येऊं शकलें, असें म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. वरील माझ्या दोघां मित्रांच्या भरपूर पाठिंब्यामुळें व उत्तेजनानेंच ज्ञातीच्या इतिहासशाखेंतील थोडी तरी उणीव मी भरून काढूं शकलों. माझ्यापेक्षां त्यांचे हे उपकार ज्ञातिसमाजावर आहेत असें स्पष्ट म्हणावें लागतें.

सन १९०६ सालीं क्षात्रैक्यसमाजानें एक 'इतिहास कमिटी' नेमून ज्ञातीचा इतिहास लिहिण्याचें काम सदर कमिटीवर सोंपविलें. कै. बं. रामचंद्र सखाराम नाईक, विनायक राघोबा गोरक्ष, आत्माराम नारोबा देसाई व कृष्णराव हरिश्चंद्र पाटारे, असे त्या कमिटीचे सदस्य होते. सदर कमिटीनें कांहीं कागदपत्र जमविले पण इतिहास लिहीण्यास ते पुरेसें नसल्यानें इतिहास लिहून झाला नाहीं.

दहा : पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास

माझ्या विनंतीला मान देऊन क्षात्रैक्यसमाजानें पा. क्ष. इतिहास संशोधक समिति स्थापन (१९४७) केली. सदर समितीनें मी लिहिलेली 'ज्ञातीच्या इतिहासाचें समालोचन व दिग्दर्शन' ही पुस्तिका सन १९४९ सालीं प्रसिद्ध केली. पण पुढें माझ्या मानसिक अस्वस्थतेमुळें मी ह्या समितीला कांहींच मदत करूं शकलों नाहीं. दहा वर्षांपूर्वी क्षात्रैक्यसमाजानें प्रगट केलेली इच्छा आज मूर्तस्वरूपांत येत आहे याबद्दल मला कितीहि आनंद वाटत असला, तरी दहा वर्षांपूर्वी मला प्रोत्साहन देणारे क्षात्रैक्यसमाजाचे माजी अध्यक्ष व माझे सन्मित्र कै. बं. विठ्ठल नारायण पुरव व कै. बं. रामकृष्ण यशवंत नाईक हे आज हयात नाहींत याबद्दल मला फार दुःख वाटतें.

पाठारे क्षत्रिय ज्ञातींतील अन्य संस्था व व्यक्ती ह्यांनीं हतिहासाबाबत केलेल्या तुरळक प्रयत्नांचा नामनिर्देश करणें, हें मी माझें कर्तव्य समजतों.

कै. रघुनाथ पुतळाजी राणे ह्यांनीं परिश्रमपूर्वक इ. स. १८७७ मध्यें 'बिंबा-ख्यान' अथात् 'इतिहास साधनांचा खंड' छापून प्रसिद्ध केला. हाच खंड आजच्या इतिहासाचा पाया होय.

इतिहासनिर्मितीच्या कार्यांत 'क्षात्रदूत', 'क्षात्रवृत्त', 'क्षात्रदीप' ह्या ज्ञातींतील मासिकांनीं आपापल्या काळांत अनेक पत्रें, लेख, जुनी माहिती व हस्तलिखितें प्रसिद्ध करून मोठेंच कार्य केलें आहे. 'बिंबाख्याना'चें परीक्षण, कै. प्रो. ताकखाव ह्यांचे लेख व भाषणें, ठाण्याचे रा. ब. कै. सिताराम दामोदर ओवळेकर ह्यांचे लेख आणि कै. पांडुरंग जसवंत चेंबूरकर ह्यांचा 'जागे व्हा' हा लेख, वगैरे अनेक लिखाण 'क्षात्र-दूता'नें प्रसिद्ध केलें आहे. 'क्षात्रवृत्त' मासिकाचे संपादक क. भू. श्री. शांताराम जनार्दन पाठारे म्हणजे पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या अर्वाचीन इतिहासाचा चालताबोलता 'एन्सायक्लोपीडीया'च आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांनीं 'क्षात्रवृत्तां'तून अनेक ऐतिहासिक लेखांना प्रसिद्धी दिली.

प. वा. तपस्वी रामजी लक्ष्मण घरत व बं. श्री. कृष्णराव हरिश्चंद्र गोरेगांवकर, सॉलिसिटर, यांनींहि ज्ञातिविषयक व चरित्रात्मक असे लेख लिहून आणि त्यांतील कांहीं प्रसिद्ध करून ज्ञातीच्या ऐतिहासिक साधनसामग्रींत भर घातलेली आहे.

१९१२ सालीं बं. श्री. बाळाभाई हरिश्चंद्र देसाई, शाळिग्राम पांडुरंग पाठारे व कै. रामचंद्र तुकाराम चेंबूरकर ह्यांनीं दादर–मुंबई येथें 'पा. क्ष. ज्ञातीचें इतिहास संशोधक मंडळ' स्थापिलें पण ज्ञातीची 'खानेसुमारी' तयार करण्यापलीकडे ह्या मंडळाच्या हातून कोणतेंहि ऐतिहासिक कार्य झालें नाहीं.

कै. रा. ब. यशवंतराव हरिश्चंद्र देसाई यांनीं 'दहा वर्षांपूर्वीचें आम्ही' हा निबंध लिहून पाठारे क्षत्रिय वक्तृत्वोत्तेजक समाजापुढें वाचला होता. समाजानें १९२४ सालीं पुस्तकरूपानें तो प्रसिद्ध केला.

श्री. भगवंतराव जनार्दन म्हात्रे ह्यांनीं इतिहासावर अनेक ठिकाणीं माहितीपूर्ण व्याख्यानें देऊन 'ज्ञातीच्या इतिहासाबाबत' जिज्ञासा निर्माण केली आहे.

क्षात्रैक्यसमाजांत वार्षिक समारंभाचे प्रसंगीं अनेक अध्यक्षांनीं ज्ञातीच्या इतिहासावर उद्‌बोधक व्याख्यानें दिलीं आहेत. शिवाय, पुण्यश्लोक जनार्दन राघोबा वनमाळी, कै. विनायक बळवंत परळकर, कै. पांडुरंग जसवंत चेंबूरकर, कै. कृष्णराव हरिश्चंद्र पाठारे, कै. भगवंतराव गंगाधर परळकर ह्यांनीं ज्ञातीच्या इतिहासासंबंधीं केलेल्या प्रयत्नांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें अवश्य आहे.

क्षात्रैक्य समाजानें सन १९५१ ते १९५८ ह्या काळांत "पाठारे क्षत्रिय ज्ञातीची नामदर्शिका" (१९५५) व पुरवणी (१९५८) मध्यें छापून फार मोठें कार्य केलें आहे. सदर समितीचे खालील सभासद होते.

(१) बं. केसरीनाथ बाबूराव भट्टे, (अध्यक्ष)
(२) कै. बं. रामकृष्ण यशवंत नाईक,
(३) बं. गोविंद कृष्णनाथ चेंबूरकर,
(४) बं. नारायण हरिशंकर मंत्री,
(५) बं. खंडेराव सदाशिव सहानी,
(६) बं. एकनाथ बाळाराम महंत,
(७) बं. आनंदराव रामचंद्र परळकर,
(८) बं. निळकंठ बळवंत दांडेकर,
(९) बं. भालचंद्र बाळाराम रावते
(शेवटले तिघे सं. कार्यवाह.)

त्याचप्रमाणें पा. क्ष. वक्तृत्वोत्तेजक समाजानें सन १९५३ सालीं त्या समाजाच्या हीरकमहोत्सव प्रसंगीं 'हीरकमहोत्सव ग्रंथ' छापला आहे. हा ग्रंथ म्हणजे ज्ञातीच्या अर्वाचीन इतिहासाचाच एक उपक्रम समजण्याइतका महत्त्वाच्या माहितीनें भरलेला आहे. बं. श्री. गोविंद कृष्णनाथ चेंबूरकर, बं. श्री. आनंदराव रामचंद्र परळकर व बं. श्री. दामोदर चिंतामण ठाकूर ह्यांच्या परिश्रमानेंच हा माहितीपूर्ण ग्रंथ तयार झाल्याचा उल्लेख ग्रंथांतरीं आढळतो.

क्षात्रैक्य समाजाच्या अमृतमहोत्सवप्रसंगीं

समाजानें नेमलेल्या अमृतमहोत्सव प्रधान समितीनें पा. क्ष. ज्ञातीचा संपूर्ण इतिहास लिहून प्रसिद्ध करण्याच्या हेतूनें १३-४-१९५९ च्या सभेंत खालील सद्‌गृहस्थांची 'इतिहास-लेखन-कार्यकारी समिति' स्थापन केली.

(१) बं. श्री. गोविंद कृष्णनाथ चेंबूरकर (अध्यक्ष) (४) बं. श्री. गजानन दिवाकर नाईक,
(२) बं. श्री. शांताराम लक्ष्मण पुरव, (५) बं. श्री. वसंत मुकुंद देसाई
(३) बं. श्री. खंडेराव भास्कर वाघोळकर, (६) बं. श्री. आनंदराव रामचंद्र परळकर (कार्यवाह)

सदर समितीनें दि. २-८-१९५९ रोजीं भरलेल्या त्यांच्या सभेंत खालील ठराव करून इतिहासलेखनाचें कार्य माझेवर सोंपवून मला समितीचे सभासद करून घेतलें. ठरावः—

"दि. २ ऑगस्ट १९५९ रोजीं भरलेली इतिहास–लेखन–समितीची सभा श्री. गजानन गोविंद नाईक यांस ह्या समितीवर स्वीकृत करून घ्यावें असें ठरवीत आहे. बं. श्री. गजानन गोविंद नाईक यांजकडे इतिहासलेखन व संशोधन हीं कामें सोंपवावींत व त्याप्रमाणें त्यांना विनंति करण्यांत यावी."

माझें ऐतिहासिक कागदपत्रांचे दप्तर तयार होतें. सदर समितीनें माझ्या मार्गांतील अडचणी दूर करण्याचें आश्वासन देऊन मला कार्यप्रवृत्त केलें, अर्थात् माझ्या जीवनाचें एक स्वप्न साकार करण्याची जी संधि मला क्षात्रैक्य समाजानें दिली, त्याबद्दल मी क्षात्रैक्य समाजाचा फारच ऋणी आहें.

प्रा. डॉ. हेरवाडकर आपल्या ग्रंथांत बखरवाङ्मयाच्या मौलिकतेविषयीं म्हणतात कीं, "संगतवार इतिहास हा बखरींचा एक गुण आहे. कोणतीहि बखर घेतली तरी तींत इतिहासाची एक संगति असते. बखरींत अनेक घटनांची एक सलग साखळी असल्यानें त्यांतील घटनांचा क्रम चटकन् लक्षांत येतो." त्याचप्रमाणें "बखरींचें वैशिष्ट्य हेंच कीं, त्यांतील कोठल्याहि घटकाकडे नजर टाकली, तर त्यांत सहजता असल्याचा प्रत्यय येतो. कौटुंबिक व राष्ट्रीय अभिमान यांच्या समाधानार्थ बखरी लिहिल्या गेल्या हें ध्यानांत घेतल्यास बखरींतील कल्पकता समर्थनीय ठरते. इतिहासाच्या आधुनिक शास्त्रीय दृष्टीच्या अभावीं कालविपर्यास, प्रसंगविपर्यास इत्यादि दोष त्यांत निर्माण झाले आहेत. हे दोष मान्य करूनहि इतिहाससंशोधक राजवाडे म्हणतात कीं, ह्या सर्व बखरींत व हकिकतींत असा एक मोठा अद्वितीय गुण आहे कीं, प्रायः झाल्या प्रसंगांची हकिकत सांगतांना सत्याचा अपलाप जाणूनबुजून कोठेंहि केलेला नाहीं."

वरील दृष्टीनें मी बखरींचें महत्त्व जाणून, बखरींचें, कागदपत्रांचें व उपलब्ध अशा ग्रंथांचें प्रामाणिकपणें आणि ऐतिहासिक दृष्टिकोनानें सत्यशोधन करून तें वाचकां-पुढें ह्या खंडांत ठेवीत आहें. आज मी केलेलें सत्यशोधन हें कांहीं कालानें, नवीन

साधनें कोणास उपलब्ध झालींच, तर मी घेतलेले निर्णय मागें पडून माझ्या सिद्धांतावर व प्रमेयांवर कदाचित् कोणी नवा इतिहासलेखक नवा प्रकाश पाडूंहि शकेल.

पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा बिंब राजा

म्हणजे तो एकच होता पण पूर्वींच्या लेखकांनीं एका ब्रिंबाचे तीनचार बिंब सजवून त्यांना खुशाल इतिहासाच्या रंगभूमीवर नाचविण्याचा प्रयत्न केला, याचें नवल वाटतें! एखादा साधासीधा (Layman) माणूस सहज शंका काढील कीं, "काय हो, पूर्वींच्या इतिहासावरून दिसतें, कीं तुम्ही तीनचार बिंब राजांचे वंशज आहांत! हें कसें?" तर त्याच्या रास्त शंकेला ब्रिंबाचा आजचा पाठारे क्षत्रिय वंशज हा काय बरें उत्तर देणार? एवढ्यासाठीं मला एकमेव अशा 'आपल्या ब्रिंबाचें' सत्यशोधन करावें लागलें! तें थोडक्यांत ह्या निवेदनास जोडलें आहे.

असो. ज्या विद्वानांच्या ग्रंथांचा, साहित्याचा मी ह्या खंडांत उपयोग करून घेतला आहे, त्यांना माझे कृतज्ञतापूर्वक प्रणिपात. प्रस्तुतच्या खंडाची रचना करतांना मला सुप्रसिद्ध लेखक व नाटककार श्री. विनायक आत्माराम ऊर्फ बाबुराव पाठारे ह्यांचें बहुमोल साहाय्य झालें आहे व तें मी इथें कृतज्ञतापूर्वक नमूद करीत आहें.

पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या इतिहासाचा हा पहिला खंड मी आज जनताजनार्दनाच्या चरणीं नम्रतापूर्वक सादर करीत आहें. त्याचें कौतुक करणें त्यांच्याच हातीं आहे.

"यदक्षरं पदभ्रष्टं मात्राहीनं तु यद्भवेत् ।
तत्सर्वं क्षम्यतां देव नारायण नमोस्तुते ॥
यादृशं पुस्तकं दृष्ट्वा तादृशं लिखितं मया ।
यदि शुद्धमशुद्धं वा मम दोषो न विद्यते ॥
ॐ शान्तिः । शान्तिः ॥ शान्तिः ॥।

मु. व पो.—अणजूर,
जि. ठाणें, (म. रेल्वे,)
१ जानेवारी १९६०.

सर्वांचा नम्र सेवक,
गजानन गोविंद नाईक

पाठारे क्षत्रियांचे पूर्वज

गोत्र भारद्वाज, देवी प्रभावती, ज्ञात पाठारे, त्रिप्रवर, शाखा कात्यायनि, उपनांव राणे, सूर्यवंशी असा हा पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा राजा बिंबदेव याचा बाप रामदेवराव हा शके १०५० (इ. स. ११२८) च्या सुमारास कनोज येथें राज्य करीत होता. त्याच-वेळीं अल्लाउद्दिनानें सोरटी (सौराष्ट्र) येथें हल्ला करून तेथला राजा मुरारराज ह्याला पळविलें. त्याच सुमारास तो मुरार कनोज येथें आला. रामदेव राजा कांहीं दिवसांनीं मेला. त्याचा मुलगा बाळाराव हा रामदेवराजाजवळ होता. रामदेवराजावर अल्ला-उद्दिनानें कनोज येथें स्वारी करून युद्ध केलें. रामदेवराव राजाचा पराभव झाला. त्यावेळीं रामदेवराव हा आपले तीन पुत्र व बाळाराव ह्यांसह पैठणास शके १०६० (इ. स. ११३८) च्या सुमारास आला. त्यावेळीं रामदेवरावानें आपला मोठा मुलगा केशवदेव राणा ह्यास देवगिरीच्या राज्यावर बसविलें. दुसरा मुलगा बिंबदेव ह्याला उदेपुरास (उदयपुरीस) गादीवर बसविलें; व तिसरा मुलगा प्रतापशा ह्यास आळंदा-पुरास (अहमदाबादेस) गादीवर बसविलें. बाळाराव ह्यास अहिनलवाड्याजवळील चांपानेर येथील राज्य दिलें. ह्याच वेळीं रामदेवरावाबरोबर सहासष्ट (६६) क्षत्रिय कुळें व हेमाद्रि पंडित कुळगुरु मिळून निघून आले होते. असें चाललें असतांना अल्ला-उद्दिनानें शके १०७५ (इ. स. ११५३) मध्यें पैठणावर स्वारी केली. रामदेवराव राजाचा पराभव केला. बाळाराव हा युद्धांत मेला. केशवदेव देवगिरीहून मदतीस आला नाहीं. बिंबदेव उदेपुराहून येण्याच्या आधींच अल्लाउद्दिन येऊन गेला. तेव्हां बिंबदेवानें प्रतापशास बरोबर घेतलें व सासष्ट कुळें व शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे ब्राह्मण उपाध्याय यांना बरोबर घेऊन बिंबदेव निघाला.

शके १०८० (इ. स. ११५८) त बिंबदेवानें गुजराथ घेतली. अहिनलवाडा काबीज केला. पुरपट्टण दक्षिण प्रांतांत आला. सालेरमालेर त्यांनीं घेतलें. नंदनबार दाहिटेसह प्रांत मिळाला. मग केशवपूर वडनगरपावेतों आपले ठाणेदार त्यानें बसविले. असा तो बिंबदेव गुजराथेंत राज्यकारभार करूं लागला.

नंतर बिंबदेवानें दक्षिणेंत चाल केली व दवणें घेतलें. शके १०८५ (इ. स. ११६३) त ठाणें येथें सोरटीच्या अनुरोधाचा पराभव करून त्याचें राज्य घेतलें. अशा तऱ्हेनें महिकावती (माहीम-मुंबई)च्या राज्याची मुहूर्तमेढ स्थापन केली. अशा रीतीनें हा एकच बिंब कनोजमधून निघाला तो थांबत थांबत शके १०८५ (इ. स. ११६३) त कोंकणांत आला. त्याच्याबरोबर आपण पाठारे क्षत्रिय आलों आहोंत.

अर्थात् बिंबदेवाचा येण्याचा काल, निघाल्याचें ठिकाण, त्याचा सामाजिक दर्जा (राजपद), वगैरे सर्व वृत्तांत वरीलप्रमाणें जुळत आहे. आपलीं सर्व कुळें; अर्थात् ग्रंथांत इतरत्र सिद्ध केल्याप्रमाणे, पुढें ह्या कुळांच्या झालेल्या ज्ञाती—पांचकळशी, चौकळशी, पाठारे प्रभू, वाडवळ, मळेकर, शेषवंशी ('भंडारी')—ह्या सर्व बिंबदेवाबरोबर उत्तर प्रांतांतून आल्या. कनोज, अहिनलवाडा व तेथून गुजराथमध्यें आल्या. पुढें कोंकण मार्गें (समुद्र किनाऱ्यानें) त्या बिंबस्थानांत आल्या, हें सिद्धच झालें आहे. ह्याचा पुढला वृत्तांत साष्टीच्या बखरीच्या पूर्वार्धात दिलेला आहे, तसेंच इतर बखरींतहि ह्याच वृत्तांत आहे.

बिंबदेवाचा मुलगा महिद्रणा, त्याचा मुलगा विकादेवराणा (एकदेव), त्याचा मुलगा रामदेव राणा, त्याचा मुलगा जयदेवराणा (ह्याची राजधानी ठाणें येथें होती,) त्याचा मुलगा सोमेश्वर, त्याचा मुलगा केशवदेव राणा (याला पुत्र नसल्यानें जनार्दनपंत प्रधान ह्यास गादीवर बसविलें;) त्याचा मुलगा नागरशा याचें राज्य शके १२५६ (इ. स. १३३४) त तुर्कांनीं घेतलें व तुर्काण झालें. त्यानंतर निकामलिकानें तें राज्य लाहूरशाहास दिलें; नंतर कोंडीअननें शके १२७६ (इ. स. १३५४) पर्यंत राज्य केलें.

आऊ सावंत (नाखवा) नें शके १२८५ (इ. स. १३६३) पर्यंत राज्य केलें; आऊनाखवाचे वंशजांनीं १२८५ (इ. स. १३६३) नंतर शके १३३४ पर्यंत (इ. स. १४१२) पर्यंत राज्य केलें इ. स. १४१२ थुंजारनें १० महिने राज्य केलें व त्यानंतर गुजराथचे बादशहांनीं तें राज्य घेतलें. नंतर इ. स. १४१२ मध्यें. सुर्काण झालें. नंतर गुजराथचे बादशहा स्वतः राज्य करूं लागले.

नंतर इ. स. १४९८ त वास्को–दि–गामा आला व दोन वर्षांनंतर वसईस राहणारा गुजराथचा बादशहा बहाद्दूरशहा याला वास्को–दि–गामाच्या सरदारानें दर्यांत भेटीस बोलावून त्याला व त्याच्याबरोबर असलेल्या सरदारांना दर्यांत बुडविलें व महिकावतीचें (माहीम–मुंबईचें) राज्य फिरंग्यांनीं घेतलें. येथून पुढें इ. स. १५०१ नंतर फिरंगी यांचा अंमल सर्वत्र गाजूं लागला.

इत्यलम्

अणजूर—ठाणें
ता. १–१–६०.

ग. गो. ऊर्फ काका नाईक

दुसऱ्या खंडाची वाटचाल

इ. स. १५१२ पर्यंतचा प्रथम खंड आज वाचकांपुढें ठेवतांना पुढील खंडाची वाटचाल मी वाचकांपुढें मांडीत आहें.

पहिला खंड इ. स. १५१२ पर्यंत आला आहे. संवत् ५७४ म्हणजे इ. स. ५१७ सालापासून ह्या खंडास सुरुवात झाली आहे. या काळांत पाठारे क्षत्रिय ज्ञात कनोज अयोध्ये जवळील गोरखपूर इत्यादि ठिकाणीं रहात होती. ज्ञातीला पाठारे हें नामाभिधान दिलेले होतें; तरी ही जात म्हणजे क्षत्रिय कुळांचा तो एकसंघ होता. त्यावेळीं ज्ञात अशा संज्ञेनें विशेष प्रकारें संबोधिलें जाण्यापेक्षां क्षत्रिय कुळें ह्याच संज्ञेनें आपण समाजांत ओळखले जात होतों. ह्या संघांत, सूर्यवंशी, सोमवंशी व शेषवंशी अशीं हीं कुळें होतीं. स्वतः त्यावेळचे राजेहि ह्याच कुळांच्या संघांतले होतें हें खंडांत आलेलें आहे. ज्ञातीचा हा इ. स. ५१७ पासून सुरू होऊन सन ११२८ पर्यंत आलेल्या ह्या कुळांत संघपणानें निरनिराळ्या स्वकीयांच्या अंतर्गत कलहाला व परकीयांच्या आक्रमणाला तोंड देत कुळांचा हा संघ त्या प्रांतांत टिकला होता. सन ११२८ म्हणजे १०५० शकापर्यंत ह्या कुळांना किंवा ह्या ज्ञातीला स्थलांतर करण्याचा प्रसंग आला नव्हता. पण परकीयांच्या आक्रमणाला कंटाळून शके १०५० च्या सुमारास कनोजच्या रामराजानें स्थलांतर केलें. त्याच्याबरोबर ६६ कुळें निघालीं. पाठारे ज्ञातीनें प्रयाण सुरू केलें. ह्या सासष्ट कुळांच्या संख्येइतकीच पाठारे ज्ञात उत्तर प्रदेशांत होती व ती सर्वच्या सर्व ज्ञात निघाली असें कुणीही समजूं नये. पाठारे ज्ञात कनोज गोरखपूर प्रांतांत तशीच राहिली. त्या ज्ञातीचा एक भाग म्हणजे हीं सासष्ट कुळें व त्यांचा राजा रामराजा कनोजहून निघाला. तो हा भाग उतरत उतरत कोंकणांत माहीम-महिकावतीस स्थिर झाला व त्या भागानें लोकशाही तत्त्वावर आधारलेलें समाजवादी राज्य बिंबस्थानांत स्थापन केलें. ह्या राज्याचा शेवट निकामलीकानें केला, पण तरी सुद्धां लोकशाही समाजवादी राज्याचीं सर्व तत्त्वें इस्लामी राज्यकर्त्यांनीं जोपासून त्यांच्याच आधारानें महिकावतीचे समाजवादी राज्य चालविलें. पण पोर्तुगीजांनीं हें राज्य इस्लामियांच्या हातून घेतल्यामुळें व घेतल्यानंतर महिकावतीच्या ह्या लोकशाहीच्या राज्याचा शेवट केला. त्या लोकांनीं पोर्तुगालच्या राजाचे नांवानें हुकुमशाही सुरू केली. ही सर्व घटना इ. स. १५०२ पर्यंत घडून आली. क्रान्तीच्या ह्या टप्प्यावर आधारून मी ही पाठारे ज्ञात येण्याच्या काळाचा, राज्य केल्याच्या काळाचा व त्या राज्याच्या शेवट झाला त्या काळाचा एक खंड पाडला.

कोंकणांतल्या ह्या भागांत पोर्तुगीजाचें उच्चाटन १७३९ मध्यें झाल्यावेळीं पुढची राज्यक्रांति झाली. फिरंगी गेले. मराठे आले. इ. स. १७८४ च्या सालच्याचे तहानें मराठी राजविटीचा अंत होण्याचा प्रसंग आला, ह्या सुमारास इंग्रजांनीं साष्टी घेतली. त्यामुळें झालेल्या ह्या राज्यक्रांतीपर्यंत मी दुसरा खंड समजतों. कदाचित् त्या खंडाची मर्यादा सन १८०२ च्या वसईच्या तहापर्यंत नेतां येईल; कारण खरें पाहतांना खरी आंग्रेजी राजवट ह्या बिंबस्थानांतच (मुंबई–माहिम) इत्यादि ठिकाणीं त्याच वेळीं सुरू झाली.

त्यानंतरचा काळ म्हणजे आंग्रजी राजवटीचा काळ होय. म्हणून मी १९६० पर्यंतचा तिसरा खंड योजला आहे. ह्या खंडाच्या मर्यादा पाडतांना एक तत्त्व माझे डोळ्यापुढें आहे, तें हें कीं प्रत्येक क्रान्तीनंतर नवीन राजवट आलेली असते. त्या राजवटींत कांहीं तरी नवीन असतें. ह्या नाविन्याला त्या त्या काळीं पाठारे क्षत्रिय ज्ञातीनें कसें आपलेसें केलें व ह्या प्रसंगीं आपलें ज्ञातिवैशिष्ट्य कसें दाखविलें; तसेंच लोकशाही समाजवादाला मुरड न घालतां आपल्या ज्ञातिसंस्थांतून कसा ज्ञातीनें जोपासला, हें त्या त्या क्रान्तीच्या अनुरोधानें दाखवितां येईल. आपलें जुनें वैशिष्ट्य न सोडतां नवें नाविन्य आत्मसात् करण्यांत जें कौशल्य पाठारे क्षत्रिय ज्ञातीनें दाखविलें ते अभिमानास्पद आहे.

असे तीन कालखंड पडत असतां माझ्या अनेक मित्रांच्या आग्रहावरून मी दुसऱ्या खंडाचे दोन भाग पाडून पहिल्या भागांत मराठे राज्याचा कोंकणांतून शेवट होईपर्यंतचा ज्ञातीचा इतिहास देण्याचा व दुसऱ्या भागांत आंग्रेजी राजवटींतला सन १८८४ पर्यंतचा ज्ञातीचा इतिहास देण्याचा निर्णय घेतला आहे. पुढें सन १८८४ च्या नंतर म्हणजे क्षात्रैक्य समाजाच्या काळांतला इतिहास अनेक मार्गांनीं आज आपण पहात आलों आहोंत.

इ. स. १५१२ त लोकशाहीचा अंत कोंकणांत झाला. लोकशाहीच्या काळांत फोफावलेल्या सर्व ग्रामसंस्था निराधार झाल्या; त्यांचे क्षेत्रांतील लोकसंग्रही प्रगतिवाद देणें आवश्यक आहे.

राज्यकर्त्या फिरंग्यांचे छळण, त्यामुळें समाजाची विस्कटलेली घडी, धार्मिक अत्याचारांना तोंड देऊन फिरंग्यांना धक्के देण्याची व मराठी राज्य टिकविण्याची, त्यांत समरस होण्याचे प्रयत्न इत्यादि गोष्टींचा त्या काळांत समावेश करावा लागेल. इतकेंच नव्हे, तर राजकीय, धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक वगैरे सर्व प्रश्नांच्या दृष्टीनें पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या सर्वांगीण इतिहासाचा विचार उपरोक्त दुसऱ्या खंडांत विस्तारानें करावा लागेल. दुसऱ्या खंडाची इतकीच रूपरेषा मी प्रस्तुत स्थळीं वाचकांसाठीं देत आहे.

गजानन गो. ऊर्फ काका नाईक

वाचकांच्या माहितीकरितां

संवत्, शक व इसवी सन यांतील वर्षांतरांचें फरकः—

संवत्— यांतून उणीं १३४ वर्षें म्हणजे **शक** होतो.
संवत्— ,, ,, ५७ ,, ,, **सन** ,,
शक—यांत ७८ वर्षें मिळविलीं म्हणजे **सन** ,,

क्षात्रैक्य समाज
इतिहास-लेखन-समिति

अध्यक्ष :

बं. गोविंद कृष्णनाथ चेंबूरकर

कार्यवाह :

बं. आनंदराव रामचंद्र परळकर

सभासद :

बं. शांताराम लक्ष्मण पुरव
,, **खंडेराव भास्कर वाघोळकर, बी. ई. (मेक्या.)**
,, **गजानन दिवाकर नाईक** *
,, **वसंत मुकुंद देसाई** †
,, **गजानन गोविंद नाईक**
,, **शामराव यशवंतराव म्हात्रे** ¶

---

* श्रवणदोषामुळें सभासदत्वाचा ता. १५-९-१९५९ रोजीं राजीनामा दिला.
† नेमणूक झाल्यावर वार्धक्यामुळें सभासदत्व नाकारलें.
¶ अमृतमहोत्सव प्रधान समितीच्या ता. १४-१२-५९ च्या पत्रकान्वयें.

इतिहास-लेखन-समितीचें निवेदन

क्षात्रैक्यसमाजास दिनांक १ जानेवारी १९६० रोजीं ७५ वर्षें पूर्ण होत असल्यानें 'दिनांक १ जानेवारी १९५९ ते १ जानेवारी १९६०' हें **'अमृत महोत्सव वर्ष'** समजून ह्या वर्षांत होणारे सर्व नैमित्तिक व विशेष कार्यक्रम समाजाच्या वैभवास साजेशा थाटानें साजरे केले जावेत, असा निर्णय दि. २३ नोव्हेंबर १९५८ ह्या दिवशीं भरलेल्या क्षात्रैक्यसमाजाच्या सर्वसाधारण सभेनें घेतला. ह्याच सभेंत अमृत महोत्सव वर्षाच्या विविध कार्यक्रमांमध्यें, 'अमृत महोत्सव ग्रंथ' 'पाठारे क्षत्रिय पत्रिकेचा विशेषांक,' तसेंच शक्य झाल्यास 'समाजाच्या सभासदांचा परिचयग्रंथ' आणि **'ज्ञातिइतिहास ग्रंथाचा कांहीं भाग'** ह्या प्रकाशनांचा अंतर्भाव केला गेला.

ज्ञातीच्या इतिहासलेखनाचे आजवर जे लहानमोठे प्रयत्न झाले, त्यांची माहिती सदर ग्रंथाचे लेखक श्री. गजानन गोविंद ऊर्फ काका नाईक ह्यांच्या निवेदनांत विस्तारशः आल्यानें त्यांची द्विरुक्ति करण्याचें कारण नाहीं; तरी देखील "क्षात्रैक्यसमाज" ह्या संस्थेनें केलेल्या प्रयत्नांचा ओझरता उल्लेख करणें आम्ही आमचें कर्तव्य समजतों.

इ. स. १८८५, १ जानेवारीला "क्षात्रैक्यसमाज" ह्या संस्थेची स्थापना झाली. सन १८८६ मध्यें 'क्षात्रैक्यसमाजाचे' जे नियम करण्यांत आले, त्यांत **'आपल्या ज्ञातीच्या इतिहासाचीं साधनें जमा करणें व इतिहास लिहून काढणें'** ह्या उद्देशाचा उल्लेख असून तें काम 'विद्या व संसर्गोत्तेजक' शाखेकडे सोंपविण्यांत आलें होतें. "परंतु त्यावेळीं अशा इतिहासाचें महत्त्व लोकांस अवगत नसल्यामुळें किंवा त्याचें अगत्य त्यांस वाटत नसल्यामुळें समाजाच्या हातून तें काम तडीस गेलें नाहीं", असा पुण्यश्लोक वनमाळी यांनीं १९०६ सालीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत उल्लेख केला आहे. त्याच वर्षी हें काम समाजानें श्री. रामचंद्र सखाराम नाईक, श्री. विनायक राघोबा गोरक्ष व श्री. आत्माराम नारोबा देसाई ह्यांस ज्ञातीच्या इतिहासाचीं साधनें गोळा करण्यास व श्री. कृष्णराव हरिश्चंद्र पाठारे यांस त्यांचें संशोधन व वर्गीकरण करून इतिहास लिहिण्याची विनंती केली. सदर कमिटीनें जमविलेले कागदपत्र 'इतिहासलेखनास' पुरेसे नाहींत, असा श्री. कृष्णराव हरिश्चंद्र पाठारे ह्यांचा अभिप्राय पडला.

त्यानंतर सन १९३२ सालीं समाजाच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगीं 'पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या इतिहासाची रूपरेषा व सन १९४७ सालीं समाजाच्या हीरक महोत्सव प्रसंगीं 'पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या इतिहासाचें समालोचन व दिग्दर्शन' ह्या दोन पुस्तिका बंधु श्री. गजानन गोविंद नाईक ह्यांनीं संकलन केल्या व समाजानें त्या प्रकाशित केल्या.

वीस : **पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास**

दिनांक २४ मार्च १९५५ रोजीं समाजानें पाठारे क्षत्रिय ज्ञातीची 'नामदर्शिका' प्रसिद्ध करून, ज्ञातीची लोकसंख्या, शैक्षणिक, व्यावसायिक वगैरे सर्वसाधारण माहिती ज्ञातीसमोर मांडली. १९१४ सालीं कै. अनंता दादोबा वरळीकर ह्यांनीं ज्ञातीची नामदर्शिका प्रसिद्ध केल्यानंतर ज्ञातींत खानेसुमारीचे अनेक प्रयत्न झाले; परंतु ते सफल होऊं शकले नाहींत. जवळजवळ ४० वर्षांनीं हें अनेक वर्षे रेंगाळत पडलेलें कार्य क्षात्रैक्यसमाजानें यशस्वी करण्याचें श्रेय पदरांत पाडलें.

अमृतमहोत्सवाच्या निमित्तानें समाजाचे संस्थापक कै. जनार्दन राघोबा वनमाळी व कै. विनायक बळवंत परळकर ह्यांचें ७५ वर्षांचें स्वप्न साकार करण्याचा निश्चय करून क्षात्रैक्यसमाजाच्या अमृतमहोत्सव प्रधान समितीनें दि. १३ एप्रिल १९५९ रोजीं "इतिहासलेखन" समितीची योजना केली. इतिहासलेखनाला अवश्य असलेले कागदपत्र ज्ञातींतील कुणा संग्राहक वृत्तीच्या व्यक्तीजवळ असल्यास ते जमा करणें, त्यांचें संशोधन करणें, व संकलन करणें हें काम जिकीरीचें, श्रमाचें व लवकर न होणारें असलें तरी देखील समितीनें अनेक अडचणींना तोंड देऊन तसेंच श्री. अ. का. प्रियोळकर ह्यांसारखे अधिकारी संशोधक, श्री. कृष्णराव हरिश्चंद्र गोरेगांवकर सॉलिसिटर, श्री. अण्णासाहेब वाघोळकर इत्यादींच्या गांठीभेटी घेऊन कांहीं कागदपत्रें जमविण्याचा प्रयत्न केला. बंधु श्री. कृष्णराव हरिश्चंद्र गोरेगांवकर, बंधु श्री. भगवंतराव जनार्दन म्हात्रे, बंधु श्री. रामचंद्र जनार्दन म्हात्रे व बंधु श्री. माधवराव केशवराव चेंबूरकर ह्यांनीं आपल्या संग्रहांतील कागदपत्रें इतिहास लेखन समितीच्या स्वाधीन केलीं आहेत. ह्याचा पुढील खंडास निःसंशय उपयोग होईल. बंधु श्री. जनार्दन अनंता मंत्री ह्यांनीं आपल्या दप्तरीं असलेल्या कागदपत्रांच्या नकला करून घेण्यास परवानगी दिली आहे. कै. रामचंद्र तुकाराम चेंबूरकर ह्यांच्या चिरंजीवांनीं आपल्या संग्रहीं असलेले वडिलांचे कागदपत्र दाखविण्याचें कबूल केलें आहे.

इतिहास लेखनाचें काम हें सोपे नसल्यानें, त्याच्यासाठीं अनेक वर्षांच्या व्यासंगाची, तपश्चर्येची आवश्यकता असल्यानें इतिहास-लेखन-समितीला श्री. गजानन गोविंद नाईक ह्यांच्या सहकार्याची आवश्यकता वाटली. श्री. नाईक ह्यांचा इतिहास विषयाचा सखोल अभ्यास, पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या प्राचीन इतिहासाची माहिती व त्या इतिहास लेखनाकरितां जरूर त्या साधनांचा संग्रह असणारी व्यक्ति ह्या दृष्टीनें त्यांची निवड करण्यांत आली. सन १९०६ सालापासून सतत निष्ठेनें त्यांनीं ह्या विषयाचा अभ्यास केलेला आहे व जरूर तें संशोधन केलेलें आहे. पाठारे क्षत्रिय ज्ञातींतील इतिहास लेखनाचे गेल्या ३०/४० वर्षांत बंधु श्री. गजानन गोविंद

नाईक ह्यांनीं केलेले प्रयत्न आज ज्ञातीसमोर आहेत. शिवाय सन १९३४ सालीं वरळी गोपचार व भोयें संस्थाननें प्रकाशित केलेल्या त्यांच्या "साष्टीची बखर अर्थात् वसईचा दुर्धर संग्राम" ह्या पुस्तकानें केवळ पाठारे क्षत्रिय ज्ञातीचेंच नव्हे तर कै. सर जदुनाथ सरकार, कै. रिसायतकार सरदेसाई, कै. डॉ. सावरकर आणि श्री. यशवंत नरसिंह केळकरांसारख्या इतिहासतज्ञांचेंहि लक्ष त्यांनीं आपणांकडे वेधून घेतलें होतें. क्षात्रैक्यसमाजाच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगीं त्यांनीं "साष्टीच्या बखरी"ची हस्तलिखित प्रत "समाजास" भेट दिली होती. त्यांच्या त्या ग्रंथाबद्दल गुणग्राहकबुद्धीनें रा. ब. वाघोळकरांनीं त्यांना स्वतःचें सुवर्णपदक देऊन त्यांचा गौरव केला होता. त्यांच्या "साष्टीची बखर अर्थात् वसईचा दुर्धर संग्राम" ह्या ग्रंथाचें इंग्रजी भाषांतर कै. प्रा. निळकंठ सदाशिव ताकखाम एम्. ए. ह्यांच्यासारख्या इतिहास शास्त्राचा अभ्यास केलेल्या विद्वानानें केलें आहे, यावरूनच श्री. काका नाईक ह्यांच्या ग्रंथाची थोरवी आपल्या लक्षांत येईल. सदर भाषांतराची हस्तलिखित प्रत श्री. भगवंतराव जनार्दन म्हात्रे, बी. ए. ह्यांच्या संग्रहीं असून ते ती छापून प्रसिद्ध करण्याकरितां क्षात्रैक्यसमाजाच्या हवालीं करावयाला तयार आहेत असें समाजास त्यांनीं कळविलें आहे.

इतकेंच नव्हे तर १९४७ सालीं क्षात्रैक्य-समाजानें इतिहास संकलन करण्याकरितां एक समिति नेमली व ज्ञाति इतिहास लेखनाची जबाबदारी श्री. काका नाईक ह्यांचेवरच सोंपविली होती, त्यावेळींच हा ग्रंथ प्रसिद्ध व्हावयाचा. पण श्री. काका नाईक ह्यांच्या प्रकृति अस्वास्थ्यामुळें राहून गेलेलें तें कार्य १२ वर्षांनीं त्यांचेच हातून पूर्ण करण्याचा योग इतिहास-लेखन-समिति आज साधीत आहे. श्री. काका नाईक ह्यांचें ह्या समितीला सहकार्य मिळवून देण्याबाबत रा. ब. अण्णासाहेब वाघोळकरांनीं केलेल्या परिश्रमांचा उल्लेख करणें अस्थानीं होणार नाहीं. दिनांक १२ जुलै १९५९ रोजीं आम्ही ठाणें येथें श्री. काका नाईक यांची भेट घेऊन 'अमृत महोत्सवानिमित्त समाजानें ज्ञातीच्या इतिहास लेखनाचें कार्य हातीं घेण्याचा व शक्य तों ह्या वर्षींच तो छापून प्रसिद्ध करण्याचा ठराव केला असल्याचें' त्यांना सांगितलें. 'ज्ञातीचा इतिहास लिहिण्याचें हें काम आपण घ्यावें', अशी आम्ही त्यांना 'इतिहास-लेखन-समिती'च्या वतीनें विनंति केली. क्षात्रैक्यसमाजाच्या अमृत महोत्सवाचें महत्त्व व त्याच सुमारास ज्ञातीच्या इतिहास प्रकाशनाचें औचित्य ह्या दोन गोष्टी ध्यानांत घेऊन त्यांनीं कोणत्या प्रकारें आढेवेढे न घेतां आमच्या विनंतीस संमति दिली. तेव्हां हें कार्य ह्याच वर्षीं पुरें होणार, असा आत्मविश्वास आमचे ठायीं निर्माण झाला. दिनांक २ ऑगस्ट १९५९ रोजीं बं. श्री. गजानन गोविंद नाईक ह्यांना 'इतिहास-लेखन-समिती'चे सभासद म्हणून स्वीकृत करण्यांत आलें व त्यांच्याकडे इतिहासलेखनाचें काम सोंपविण्यांत आलें.

इतिहास-लेखन-समितीनें ह्या घडत असलेल्या घटनांची, इतिहासलेखनाच्या तयारीची आणि प्रगतीची माहिती अमृत महोत्सव प्रधान समितीस वेळोवेळीं दिलेली आहे.

इ. स. ५१८ ते १५१२, इ. स. १५१३ ते १७६० व १७६१ ते १९५९ अशा तीन खंडांत संपूर्ण इतिहास लिहून छापण्याची आपली योजना श्री. काका नाईक ह्यांनीं अमृत महोत्सव समिती व व्यवस्थापक मंडळ ह्यांना सांगितली. प्रथम खंडाची साधनसामग्री आपल्याजवळ संपूर्णतया तयार असून सप्टेंबर १९५९ अखेर सदर खंड छापण्याकरितां समाजाच्या स्वाधीन करण्याचें आश्वासनहि श्री. काकासाहेब ह्यांनीं आम्हांला दिलें. कामाचा व्याप, निकड व काकासाहेबांचें वार्धक्य हें ध्यानीं घेऊन त्यांना त्यांच्या कामांत मदतनीस घेण्याची समितीनें संमती दिली. श्री. काकासाहेब ह्यांनीं त्यांच्या कामांत स्थानिक मदतनीस म्हणून श्री. **विनायक आत्माराम पाठारे** ह्यांची निवड केली; व एखाद्या तरुणास लाजवील अशा उत्साहानें त्यांनीं कामास प्रारंभ केला. दिवसा आपल्या दप्तरांतील कागदपत्रांचा अभ्यास करून मजकुराची जुळवाजुळव करायची. रात्रौ ११ ते पहाटे ३ वाजेपर्यंत त्यांनीं लेखन करावयाचें व पहाटे त्यांचे मदतनीस श्री. विनायक आत्माराम पाठारे ह्यांनीं वाचून तें सुवाच्यपणें लिहून काढायचें, अशा नेटानें श्री. काकासाहेबांनीं हें काम केलें आहे आणि आश्वासन दिल्याप्रमाणें २६ सप्टेंबर १९५९ रोजीं ह्या ग्रंथाचें हस्तलिखित त्यांनीं इतिहास-लेखन-समितीच्या स्वाधीन केलें. इतिहास-लेखन-समितीच्या सूचनेवरून श्री. काकासाहेब ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यांत पुण्यास गेले व त्यांनीं भारत इतिहास संशोधक मंडळाच्या कांहीं सभासदांपुढें आपल्या ग्रंथाचा तपशील व आपण काढलेले निष्कर्ष मांडले. श्री. नाईक यांनीं मंडळाकडून मागविलेला उतारा खालीं दिल्याप्रमाणें आहे :—

भारत इतिहाससंशोधक मंडळ, पुणें.

पाक्षिक सभा ५/८१ (बुधवार, दि. २१-१०-५९.)
सभावृत्तांतील कामापुरता उतारा.

"त्यानंतर श्री. गजानन गोविंद नाईक (अणजूरकर) (१५) पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास : श्री. नाईक यांनीं 'पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास' या आपल्या आगामी पुस्तकाबद्दल माहिती सांगितली. या इतिहासाचा खंड १ ला (इ. स. ५१८ ते १५१२), त्यांना उपलब्ध झालेल्या साष्टीच्या बखरीचा पूर्वार्ध ते संपादन करून प्रसिद्ध करीत आहेत. कोंकणच्या इतिहासाचीं, वगैरे साधनें अत्यंत कमी असून त्या वेळची हकिकत सांगणाऱ्या बखरींची छाननी अजून व्हावयाची आहे. महिकावतीची बखर, राणे यांनीं प्रकाशित केलेलें बिंबाख्यान, आणि श्री. नाईक

संपादन करीत आहेत ती साष्टीची बखर, ह्यांतील आलेल्या बिंबराजाच्या इतिहासाची संगती लावण्यामध्यें श्री. नाईक यांना यश आलें असून त्या कामीं शक व संवत् यांचा झालेला एका ठिकाणचा गोंधळ दूर करून आपण संगती कशी साधली, हें त्यांनीं तपशिलवार सांगितलें. या बखरीच्या अभ्यासांतून समकालीन सामाजिक व आर्थिक व्यहार उलगडण्याला उपयोगी असे नाडगौंडी वगैरे उल्लेख आले आहेत, त्यांचा निर्देश आपण टीपांतून करणार आहों, असेंहि ते म्हणाले. या प्रश्नोत्तर चर्चेमध्यें श्री. ग. ह. खरे, श्री. शं. ना. जोशी, व अध्यक्ष श्री. आवळसकर यांनीं भाग घेतला."

ता. १९–११–१९५९ (सही)..................

अशा रीतीनें तयार झालेल्या पहिल्या खंडाचें हस्तलिखित समाजाच्या अमृतमहोत्सव प्रधान समितीच्या संयुक्त कार्यवाहांकडे देण्यांत आल्यावर कांहीं तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आणि त्यामुळें हा खंड दि. १ जानेवारी १९६० रोजीं प्रकाशित होतो कीं नाहीं याबद्दल जबरदस्त शंका निर्माण झाली. परंतु प्रगतिपथ प्रिंटिंग प्रेसच्या व्यवस्थापकांनीं अवघ्या १५ दिवसांत हा ग्रंथ छापून देण्याचें आश्वासन दिल्यानें व लगेच त्या प्रमाणें त्यांनीं व्यवस्था केल्यानें १ जानेवारीचा अमृत महोत्सवाचा सुमुहूर्त साधणें इतिहास-लेखन-समितीस शक्य झालें आहे. इतिहास-लेखन-समितीचे कार्यवाह **श्री. आनंदराव रामचंद्र परळकर** आणि श्री. काका नाईकांचे मदतनीस **श्री. विनायक आत्माराम पाठारे** ह्या दोघांनीं सदर ग्रंथाचीं मुद्रितें तपासण्याकरितां जे परिश्रम घेतले त्याचा येथें उल्लेख करणें जरूर आहे. सन १८८५ पासून पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास लिहून छापण्याचें जें ध्येय क्षात्रैक्य समाजाच्या चालकांनीं आजवर बाळगिलें होतें, पाठारे क्षत्रिय ज्ञातींतील अनेक थोरामोठ्यांनीं ह्या दृष्टीनें जे आजवर श्रम केले, त्याची सांगता आज ह्या प्रथम खंडानें होत आहे. आमच्या वाडवडिलांचें स्वप्न आज साकार होत आहे; आणि विशेष आनंदाची गोष्ट ही, कीं मुंबई राज्याचे मुख्य मंत्री **नामदार यशवंतराव चव्हाण** ह्यांच्या हस्तें ह्या ग्रंथाचें प्रकाशन आज होत आहे.

ह्या प्रथमखंडांत आपणाला केवळ पाठारे क्षत्रिय ज्ञातीचाच नव्हे तर उत्तर कोंकणचा फार प्राचीन इतिहास सांपडतो. त्याकाळीं 'ज्ञात' ह्या संज्ञेनें संबोधिलें जाण्याऐवजीं 'क्षत्रिय कुळें' ह्या संज्ञेनेंच आपला उल्लेख होई. ह्या 'क्षत्रिय कुळां' मध्यें सूर्यवंशी, सोमवंशी व शेषवंशी ह्यांचा समावेश होतो. त्यामुळें हा आपल्याच ज्ञातीचा इतिहास आहे काय, असा संभ्रम सामान्य वाचकाला पडेल; पण लेखकानें अनेक पुरावे देऊन 'बिंब' हा पाठारे क्षत्रिय ज्ञातीचाच होता, त्याच्याबरोबर आलेल्या क्षत्रिय कुळांत पाठारे क्षत्रियहि आले होते, हें सिद्ध केलें आहे. साष्टीच्या बखरीचा पूर्वार्ध प्रसिद्ध

करून लेखकांनीं हीं दुर्मिळ माहिती मराठी भाषिकांसमोर आणली आहे आणि ह्या बखरीच्या प्रकाशनानें ज्ञातीचा व पर्यायानें उत्तर कोंकणच्या अज्ञात इतिहासावर बराच प्रकाश पडेल अशी आम्हांला खात्री आहे. राजा बिंबाबद्दलचीं अनेकांचीं अनेक मतें उद्धृत करून त्यांचें परिशीलन केलें व आपलें निर्णायक मत बिनतोड पुराव्यांनीं मांडिलें आहे. ज्ञातीच्या नांवाबद्दलहि अनेकांच्या अनेक मतांचा उल्लेख करून आपल्या ज्ञातीचें नांव "पाठारे क्षत्रिय" हेंच होतें व आजहि आहे, हें त्यांनीं निर्विवादपणें सिद्ध केलें आहे.

ह्यापुढील खंडाची रूपरेषा श्री. काकासाहेबांनीं ह्याच ग्रंथांत अन्यत्र दिल्यानें पुढील खंडांत समाविष्ट होणाऱ्या ऐतिहासिक माहितीची कल्पना आपणांस येईल. तो खंड तयार करण्याकरितां परमेश्वर श्री. काका नाईक ह्यांना उदंड आयुरारोग्य देवो, ही विनंति. ह्या खंडानें श्री. काकासाहेबांनीं आपल्या आजवरच्या नांवलौकिकांत मोलाची भर घातली आहे, आणि पुढील खंड लिहून ते आपल्या यशोमंदिरावर सुवर्णकळस चढवितील अशी आम्हाला आशा आहे.

इतिहास-लेखन-समितीला अनेकांनीं अनेक प्रकारचें सहकार्य दिलें आहे व त्या सहकार्याबद्दल 'समिति' त्यांची आभारी आहे.

ह्या उतारवयांत श्री. काकासाहेब यांनीं मोठ्या उत्साहानें व केवळ इतिहासाच्या सेवेच्या दृष्टीनें हें काम केलें, त्यामुळेंच हा ग्रंथ प्रसिद्ध होऊं शकला. श्री काका नाईक ह्यांच्या सहकार्याखेरीज इतिहास-लेखन-समितीला ह्या ग्रंथाचें प्रकाशन करणें शक्य झालें नसतें. म्हणून सर्वांआधीं ह्या ग्रंथाचे लेखक श्री. गजानन गोविंद नाईक ह्यांचे 'समिति' ऋण मान्य करीत आहे.

श्री. विनायक आत्माराम पाठारे ह्यांनीं ह्या ग्रंथाच्या जुळणीला व मुद्रणप्रत तयार करण्याला आणि मुद्रितें तपासण्याला बहुमोल साहाय्य केलें आहे; त्यांनीं हें कार्य लेखकाइतक्याच आत्मीयतेनें केलें आहे, तेव्हां त्यांचे आभार इतिहास-लेखन-समिति अवश्य तऱ्हेनें मानीत आहे.

इतिहास-लेखन-समितीस प्रारंभीं केलेलें मार्गदर्शनच नव्हे तर श्री. गजानन गोविंद नाईक ह्यांचेंहि सहकार्य मिळविण्याच्या समितीच्या प्रयत्नास रा. ब. अण्णासाहेब वाघोळकर यांनीं जी मदत केली, त्याबद्दल समिति त्यांचीहि आभारी आहे.

प्रगतिपथ प्रिंटिंग प्रेसचे व्यवस्थापक ह्यांनीं अवघ्या १५ दिवसांत हा ग्रंथ छापून देण्याची जर व्यवस्था केली नसती, तर हा ग्रंथ समाजाच्या 'अमृतमहोत्सवदिनीं' प्रसिद्ध करण्याचें भाग्य आम्हांला लाभलें नसतें व एक औचित्यपूर्ण योगायोग हातचा

दवडावा लागला असता. केवळ धंदेवाईक दृष्टीपेक्षांहि अधिक अशी जी तळमळ व आत्मीयता दाखवून त्यांनीं हें काम इतक्या अल्गावधींत, इतकें निर्दोष करून दिलें त्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. इतिहास-लेखन-समितीचे कार्यवाह बंधु श्री. आनंदराव रामचंद्र परळकर ह्यांचे आभार मानण्याची आवश्यकता नसली, तरी त्यांनीं प्रकृति ठीक नसतांहि केलेल्या परिश्रमांची दखल घेणें आवश्यक आहे. त्यांच्या अभावीं इतिहास-लेखन-समितीचें दप्तर इतक्या निर्दोषपणें सांभाळलें गेलें असतें कीं नाहीं, याबद्दल आम्हांस शंका आहे. समितीच्या इतर सभासदांनीं आम्हाला वेळोवेळीं सहकार्य व सल्ला दिला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. शेवटीं क्षात्रैक्यसमाजाच्या अमृतमहोत्सवस समितीनें हें काम करायचें ठरवून तें करण्याची संधी आम्हांस दिल्या-बद्दल आम्ही अमृतमहोत्सव समितीचे फार आभारी आहोंत.

गोंविंद कृष्णनाथ चेंबूरकर,
अध्यक्ष, इतिहास लेखन-समिति
क्षात्रैक्यसमाज.

दादर
दि. १४-१२-१९५९

इतिहास वाचण्यापूर्वीं

क्षात्रैक्यसमाज, दादर, ही पाठारे क्षत्रिय ज्ञातींतील आद्य व लोकप्रिय संस्था दिनांक १ जानेवारी १८८५ ह्या दिवशीं स्थापन झाली. आज क्षात्रैक्यसमाजास पंचाहत्तर वर्षें पूर्ण होत आहेत. समाजाचा अमृतमहोत्सव थाटामाटानें, उत्साहानें व समाजाच्या वैभवास साजेसा असा साजरा केला जावा अशी समाजाच्या सभासदांनीं, हितचिंतकांनीं व कार्यकर्त्यांनीं आपली मनीषा प्रकट केली. ह्या महोत्सवाच्या निमित्तानें ज्या कांहीं विशेष योजनांचा विचार झाला, त्यांत पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास छापून प्रसिद्ध करणें ही एक महत्त्वाची योजना होती. अमृतमहोत्सव प्रधान समितीनें महोत्सवाचें कार्य करण्यासाठीं ज्या समित्या नेमल्या त्यांत इतिहासग्रंथ तयार करून प्रसिद्ध करण्यासाठीं एक समिति नेमिली होती. या समितीवर नेमण्यांत आलेल्या सदस्यांत जी मंडळी आहेत त्यांत समाजाचे माजी अध्यक्ष, निष्ठावंत व कळकळीचे कार्यकर्ते, इतिहासलेखनासाठीं लागणारीं साधनें संकलन करण्याचें अवघड व कष्टाचें कार्य करण्याची आवड असणारे कार्यकर्ते आहेत. त्यांचीं नांवें ह्या ग्रंथांत इतरत्र छापलीं आहेत. इतिहास लिहिणें हें अत्यंत जबाबदारीचें, जिकिरीचें व जोखमाचें काम आहे. तें काम करण्यास तशाच लायक माणसाची निवड करणें अवघड असतें. आमच्या सुदैवानें 'साष्टीची बखर' लिहिणारे श्री. गजानन गोविंद ऊर्फ काका नाईक ह्यांच्या सारख्या 'इतिहास-संशोधन व लेखन' क्षेत्रांत निष्णात असलेल्या व मान्यता पावलेल्या व्यक्तीनें हें काम आपणाकडे स्वेच्छेनें घेतलें व आमची काळजी दूर केली. श्री. काका नाईकांनीं मजकूर तयार केल्यानंतर तें सर्व लिखाण चिकित्सापूर्वक वाचून त्याची सुवाच्य अशी प्रत लिहून देण्याचें महत्त्वाचें काम श्री. विनायक आत्माराम पाठारे ह्यांनीं फार चिकाटीनें केलें.

पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा संपूर्ण इतिहास खंडशः प्रसिद्ध होणार आहे. आज फक्त त्या ग्रंथाचा पहिला खंड प्रसिद्ध होत आहे. इतर खंड क्रमशः विलंब न लावतां प्रसिद्ध होतील अशी आम्हांस आशा आहे. क्षात्रैक्य समाजानें १९५४–५५ मध्यें 'पाठारे क्षत्रिय ज्ञातीची नामदर्शिका' प्रसिद्ध करून ज्ञातीला एक अत्यंत उपयुक्त ग्रंथ अर्पण केला आहे. आज क्षात्रैक्यसमाजाच्या वतीनें अमृत महोत्सवानिमित्त आणखी एक उपयुक्त ग्रंथ ज्ञातिबांधवांच्या हातीं देण्यास आम्हांस आनंद होत आहे. आम्ही कोण ? आमचे पूर्वज कुठून आले ? आमच्या पूर्वजांनीं आमच्या मातृभूमीच्या दास्यविमोचनाच्या कार्यांत कोणते पराक्रम गाजविले ? आमचा भूतकाल किती उज्वल होता ?

वगैरे प्रश्नांची आम्हांस आत्मविश्वासानें इतके दिवस अचूक उत्तरें देतां येत नव्हतीं. आतां मात्र आपण त्या प्रश्नांचीं अभिमानानें उत्तरें देउं शकूं असा आम्हास विश्वास वाटतो. ज्ञातिबांधव ह्या ग्रंथाचें सहर्ष स्वागत करतील व हें ज्ञाति-इतिहासलेखनाचें अपुरें काम पूर्ण करण्यास सर्वतोपरी साहाय्य करतील अशी आशा बाळगतों.

दादर–मुंबई,
दिनांक १ जानेवारी १९६०

खंडेराव सदाशिव साहानी,
अध्यक्ष—क्षात्रैक्यसमाज.

क्षात्रैक्य समाज अमृतमहोत्सव प्रधानसमिती

श्री. खंडेराव सदाशिव साहानी—अध्यक्ष
,, भालचंद्र बाळाराम रावते—कार्याध्यक्ष
,, सुभाष रामकृष्ण नाईक,
,, जयवंत रामचंद्र ओवळेकर, } संयुक्त कार्यवाह
,, सच्चिदानंद कृष्णराव जीत
,, सदानंद मोरोबा ठाणेकर—कोषाधिकारी
,, मोरेश्वर गणपत सावटळे—गृहपाल

सभासद :

श्री. मंगेश दामोदर कोवारकर
,, वसंत आनंदराव गोरक्ष
,, पंढरीनाथ गजानन गोरेगांवकर
,, त्रिंबक आत्माराम घरत
,, गोविंद कृष्णनाथ चेंबूरकर
,, शामराव शिवराम चोगले
,, दामोदर चिंतामण ठाकूर
,, आत्माराम बळवंत दांडेकर
सौ. तारा निळकंठ दांडेकर
श्री. हरिहर अनंत दांडेकर
डॉ. आनंदराव भगवंतराव परळकर

श्री. आनंदराव रामचंद्र परळकर
,, चंद्रकांत शांताराम पाटील
,, भिकोबा वामन पाठारे
,, माणिक रामचंद्र पाठारे
,, हरिश्चंद्र खंडेराव पाठारे
,, शांताराम लक्ष्मण पुरव
,, भालचंद्र हरिशंकर म्हात्रे
,, रामचंद्र जनार्दन म्हात्रे
सौ. लीला रामचंद्र म्हात्रे
श्री. गजानन जगन्नाथ साहानी

क्षात्रैक्य समाज व्यवस्थापक मंडळ

श्री. खंडेराव सदाशिव साहानी—अध्यक्ष
,, भालचंद्र बाळाराम रावते—उपाध्यक्ष
,, सुभाष रामकृष्ण नाईक—प्रमुख कार्यवाह
,, सदानंद मोरोबा ठाणेकर—कोषाधिकारी
,, मोरेश्वर गणपतराव सावटले—गृहपाल
,, दत्ता शंकर पाटील—कार्यवाह, शिक्षण समिती
,, नंदकुमार कृष्णराव पाठारे—कार्यवाह, सामाजिक समिती
,, हेमचंद्र शामराव परळकर—कार्यवाह, कलाक्रीडा समिती
,, रमेश दत्तात्रय पाटील—कार्यवाह, कुमार समिती


सभासद :

श्री. जयवंत रामचंद्र आवळेकर
,, मंगेश दामोदर कोवारकर
,, वसंत आनंदराव गोरक्ष
,, पंढरीनाथ गजानन गोरेगांवकर
,, त्रिंबक आत्माराम घरत
,, प्रमोद भाऊराव चेंबूरकर
,, शामराव शिवराम चागले
,, सच्चिदानंद कृष्णराव जीत

श्री. नानाभाई शिवशंकर नाईक
,, विजय लक्ष्मण नाईक
डॉ. आनंदराव भगवंतराव परळकर
श्री. चंद्रकांत शांताराम पाटील
,, शशिकांत गोविंद पाठारे
,, प्रभाकर रामचंद्र पाणसारे
,, भालचंद्र हरिशंकर म्हात्रे
सौ. लीला रामचंद्र म्हात्रे

हरिसीव ठुनन कराससिराणे दिधलें ॥ वगो शाइकरांस विरगांदिवये कसारकरांस मोहरित्मिग ॥ ऐसिं चिंते दिधलि ॥ मग कोंकोंकिफारमा जला ॥ येउन आपलि विलाय मारून दंगा केला ॥ मग राजाने आपले आगीकट कार्ड केलि ॥ तेथे कोकड वस्त्र झुंज जालें ॥ कोळी सातहजार च्यारसे मारिले ॥ मग महाराजाने चोच्यासि वाणि दिधली ॥ वेसावकरास का हाळा ॥ ये कसारकराला बाणवीर ॥ ऐसे वाणे दिधले ॥ मग महाराज ढाणियास आले ॥ मग आपले आगलग देशाई व देशप्रधान समस्त मेळउन विचार केला जर आपण को हि धर्मकार्य करू मग सर्वांचा विचार घेउन ॥ लघुयाग आरंभिला ॥ मग वसई सजाउन सिंधुतिरि वैतरणी संगमी विमळाचे पश्चिम पाळीं सभवार गांवि लघुयाग आरंभिला ॥ चहुं वेदिचे ब्राह्मण आणुन महाराजाने यज्ञकंकण बांधून राणिसहित राजा दिक्षित जाला ॥ मग कारभार आपले प्रधान व देशाई व देशचौगुलेया सिसांगितला ॥ अवघ्या रायांस मुळे पाठविलिं ॥ सेनासिद्ध असोयावि ॥ तो कारभार गणपति देशवबीरस्माचेच दिधियात्मिचे राउतां ससांगितला ॥ मग राजा समुळे पाठविली होति ॥ ते राजे आले ॥ थावेचा भोजराज आला ॥ देवगिरिचा जसगराज आला ॥ जुनरिचा रघुनाथराव आला ॥ पैठणीचा केशवराव आला ॥ वाईचा कर्णराव आला ॥ श्रृंगारपुरिचा मकुंदराव सुखा आला ॥ सावद्याचा हरिचंद्रराव आला चवकीचा जसगदेवराज आला ॥ नामनगरिचा रामराव राणा आला ॥ कल्याणचा अंकुशराव आपले साहित्यासि गणपत देशाजवळ असे ॥ मग सर्व राजांचें आगतस्वागत गणपतिने केले अवघे कोंकणकर

श्रीबिंब वंशांतल्या केशवदेव राणे यानें महिकावतीच्या राज्याचा विस्तार सर्व कोंकणांत केला. त्या निमित्य त्यानें वैतरणीचे संगमीं विमळाचे पश्चिम पाळीं सभवार गांवीं लघुयाग आरंभिला. कोंकणांतले सर्व राजे आले होते. अश्वमेधाचाच तो एक प्रकार होता. गणपतिदेश सर्व राजांचे दिमतीस होता. वगैरे वृत्तांत वरील छायाचित्रांत आहे.



लेखकाजवळ पूर्वार्धाच्या तीन प्रती आहेत. त्यांतल्या अगदीं जुन्या लिपींत लिहि-लेल्या प्रतीच्या पहिल्या पानाचें हें छायाचित्र आहे. यांत श्रीबिंबदेवाची वंशावळ आहे. उपरोक्त तिन्ही प्रती एकरूपच आहेत.

येथील ठीकाण बोबळ माळ — कुरस ठाकुर गोईद
ठाकुर गोत्र वणी प्रभु मुणी कुळदेवता साहाबाई ठी
काणचा पाणे येथील ठीकाण कळव माळ
राज्याच्या रखीस मतदार ह्मनुजनीच — हासराउ
त गोदराउत ठीकाण मुहीली — साहीकवळी
माईकवळी राज्याचपतराव कीकारणार ह्मानु
णठीकान बरबण सीवराउत भाणराउत भाडा
तार राज्याचे रखीसमदार ह्मण ठीकाण मागाठण
देवकोठ अमलकोठ ठीकाण तळोजा
गोईदपकाडा सुसपटळाउ
सीमाजी भाणजक राज्याचा परेटखुद यास गोत्र
कैसीक कुळदेवता येबीका — पाकह्माळी
देदगह्माळी राज्याचे खुदवणकर मारह्मास राज्यान
उतीमकरूणवर्तईलाअसे गोत्र साइले कुळदेवता
मरजाई ठीकाण पाईगाव रामजी तावजी चौ
सेले राज्याचे अबदागीर धरणार यास उतीमक
रुण ठीकाण दीले सीव गोत्र खईम वक्षे कुळदेव
ता जीराणी भाणवैईती कस्वबेईती राज्याचेक

या छायाचित्रांत श्रीबिंबदेवाचे परिवारांतील सेवकजनांचें वर्णन आहे. उपाध्याय, दासदासी, परीट, नापित, वगैरेंचीं कामें खातेवार वाटून देऊन त्यावर नेमलेल्या प्रमुखास श्रीबिंबदेवानें गोत्र व देवी दिल्या आहेत.

भाग पहिला

साष्टीच्या बखरीचा पूर्वार्ध

(इ. सन ५१८ ते इ. सन १५१२)

॥ श्री ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ श्रीवेदव्यासायनमः ॥

पूर्वी ठाणें कोंकण सिंधुतीर येथें राज्य वर्तलें त्यांची संख्या. कानोज देश[1] विद्यापूर पाटणचा राजा. शंकरदेव राणा. सोळंकी सूर्यवंशी. विद्यापूरीं राज्य करीत असतां पोटीं पुत्र फल नाहीं म्हणोन पुत्रयाग केला. धर्म बहुत वाटिला. परंतु पुत्र फळ होत नाहीं. मग राणी गोराईसे त्यांही राज्या आभरण ज्योतिषि गणित प्रधान पुरोहित पाचारिले. मग गोराईसे राणी त्यास बोलली जर आमचे वंशीं पुत्र फळ याशी पुत्र जाहला. राजा बहुत हर्षित झाला. नांव महिपाळदेव राणा ठेविलें. मग पुत्र नाहीं. तर राजाचे सैंवर करावें. मग हें सर्वांस मानलें. मग सर्वांही विचार करून कन्या

१. आपला बिंब कनोजहून आला, ह्याचा एक पुरावा खालीलप्रमाणें आहे. डॉ. आनंदराव भगवंतराव परळकर (परळ) यांची देवी नारायणी ही आहे; व त्यांचें आडनांव रुथ आहे. प्रस्तुत बखरींत रुथ नांवाचें एक घराणें आहे. नारायणी देवीचें ठिकाण हस्तिनापूर आहे. अर्थात् बिंबाबरोबर आलेले रुथ हे कनोजचे राहणारे ठरतात. "नीळकंठराव काळदुर्गास ठेविले," असा उल्लेख प्रस्तुतच्या बखरींत आहे. आपण कनोजहून आलें, हेंच या उल्लेखावरून सिद्ध होतें.

पाहून राजाचें सैंवर केलें. राजाचें राणीचे नांव ताराईजी राणी. नंतर त्यास पुत्र झाला. मग राजानें धर्म बहुत केला. पुत्राचें नांव बिंबदेव ठेवलें. मग दुसरा पुत्र गोराईजी राणी दोघेही प्रौढ झाले. त्यांचीं सैंवरें केलीं. ताराईजी राणी हिचा पुत्र बिंबदेव राणा. त्याची राणी तिचें नांव माणकाईसे व गोराईजी पहिली राणी तिचा पुत्र महिपाळदेव. त्याची राणी कमळाईसे. राजपुत्र महिपाळदेव राणा. मग राजा शंकरदेव राणा महाराज आपले पुरोहित प्रधान पंडीत समस्त आभारणा पाचारिलें. मुहूर्त पाहून महिपाळदेव राणा राजीं बसविला. बिंबदेव राणा धाकटे राणीचा पुत्र प्रथम झाला होता तो रुसला. धाकटे भावाची सेवा न करावी. आपले पराक्रमानें राज्य मेळविन तर तुझा पुत्र. ऐसें बोलोन निघाला. सेवेस माणकाईसे राणी. तिचा भाऊ भास्करशिंग हेदुरावसवें निघाले. व सोरटदेश महिमानपुरचा राव. अंकुशदेव राणा साळोंखी सूर्यवंशी. महाराजाचे बाळगेस होता. तो बिंबासवें निघाला. मग डेरे बाहेर दिल्हे. नंतर अंकुशदेव राणे यांहीच भास्कररावाही आपल्या सर्व आभारणीच्या क्षेत्रीयांसी खबर जाणवली. जर आपला महाराज परदेशास जातो त्यास सामर्थ्य होईल त्याणें सवें चलावें. मग सत्तावीस कुळींचे सासष्ट सरदार क्षत्री राजपुत्र आपल्या साहित्येसीं राजाबरोबर निघाले व गोविंद-राव प्रभु प्रधान माडोगडाहुन आले ते रायासवें निघाले. गोपाळ नाईक व गोविंद नाईक यजुर्वेदी ब्राह्मण कुळगुरु उपाध्ये रायासंगे निघाले. मग आपले राजाचे पर शिवें जाऊनी छत्र उभें केलें. मग राजाधिराज बिंबदेव राणा ऐसे बाणे भाट बोलिला. मग तेथून देवगिरीस आले. सर्वे सैन्य बारा हजार १२००० व बोडणे पाईक हजार १२०००. देवगिरीचा रामदेवराव भेटला. त्यास वृत्तांत सांगितला. मग त्याणें आपलें पैठण नगर दिधलें. मग महाराज पैठणास आले. पैठणीं असतां एक दिवस राजा बिंबदेव राणे व माणकाईजी राणी बैसली होती. मग राणी बोलीली. राम देव रायाचे दिधलें आम्ही खात असो. मग राजा मनीं खोचला मग भास्करराव अंकुशदेव राणा व प्रधान व सरदार व समस्त पाचारून मजालस केली. मग महाराज बोलिले. ऐसा विचार करून जर आपण आपलेच बळें राज्य सोडऊं म्हणोन बोलिले हे तो राज्य रामदेव रायानें आपलीयास दिधलें. आपण सोडविलें नाहीं. मग सर्वही खरेंच बोलिले. ऐसा विचार करून हेर देशोदेशीचे ठेविले. मग महाराज आपण सप्तशृंगास जाऊन श्रीभवानीचें अनुष्ठान केलें. मग आदिमाया प्रसन्न झाली. वर दिधला. पश्चिम तीरीं रामखंड सिंधुतीरचें राज्य प्राप्त होईल ऐसा वर दिधला. मग राजा घरीं आला. मग हेर आले. त्यांही राज्याचा वृत्तांत सांगितला. ठाणें कोंकण सिंधुतीर राज्य थोडेसें आहे. अरण्य आहे. तेथील राजा दुबळाच आहे. मग महाराज त्यास पुसे राजा पुर्वापार आहे कीं उपरी आहे. मग हेर बोलिले तेथें पूर्वीं राजा

वीरभद्र रुपाईसे राणी सोमेश्वर प्रधान राज्य करितां सोरट देशीचा अनुरोध आला. वीरभद्र रायाचें राज्य त्यानें घेतलें. वीरभद्र कुळी कुटुंबसमवेत मारिला. तें राज्य अनुरोध सोरटीं करीत आहे. मग तो राजा अन्याय पाहून हैबतराव अंकुशदेव राणे व गोविंदराव प्रधान व पुरोहित व सासष्ट सरदार सर्व पाचारून वृत्तांत सांगितला. मग तेथोन चाल केली. कळव्यास येऊन कटक घेऊन राहिले. मग त्या रायास खबर जाऊन सांगितलें. मग तेणें तयारी करून युध्धास आला. मग नाऊरल्यास तोंड लागले. मग अनुरोध जीत धरिला. संवत् ८६४[१] श्री शालिवाहन शके ७२९ सर्व जित संवत्सरीं वैशाख शुध त्रयोदशी ते दिवशीं अनुरोधाचें राज्य घेतलें. अनुरोध गेला. मग सारा मुलुख न्याहाळिला. चवदा परगणे विलाथ असे परंतु उजाड झाले असे. मग मालाड प्रगणीं यांत नेवाळी याग केला. मग महाराज बिंबदेव राणे छत्रपती राजाधिराज सिंव्हासनीं बैसले. मग भास्करराव अंकुशदेव राणे व गोविंदराव प्रधान व पंडीत उपाध्ये गुरु व सासष्ट सरदार सर्व राजाभरण पाचारिले. मग महाराज व माणकाईसे राणी बैसली. मग सासष्ट सरदार व अंगलग व प्रधान व भास्करराव अंकुशदेव राणे व पुरोहित व गुरु उपाध्ये समस्तांशीं बोलाविलें. मग उंची तेलें व उटणीं आणून अभ्यंग करविलें. मग राजा याणीं आपले हातीं सर्वांस भूषणें वस्त्रें वाहिलीं. मग भोजनें जालीं. मग उचित्तं व वृत्ति दिधली ऐसी वाणी दिधलीं. मग सासष्ट सरदारांस सासष्ट गांव दिले. भास्कररावास दोन गांव दिधले. मालाड १ व मरोळ १ व अंकुशदेव राणे यांसी गांव दोन वांदरें १ व अणजूर १ व गोविंदराव प्रधान यांशी बोरलें गांव दिधला. ब्राह्मण पंडित उपाध्ये व गुरु पुरोहित यांशी गांव पाहाडी १ व पोसपाळी १ हे दोन गांव ब्राह्मणास दिधले व कृष्णराव यांशी गांव साहार १ व गोविंदराव प्रधान यांशी प्रधानकी दिधली व गोपाळ नाईक यांशी उपाध्येपण दिधलें व अनंत नाईक यांशी कुळ गुरुत्व दिधलें व अंकुदेव राणे यांस देश नारगौडी वृत्त दिधली व भास्करराव सोमवंशी यांशी देसाय दिधली व गोविंदराव रश्मिक यांशी पालवणपण दिधलें. निळकंठराव साळोखे यांशी कुडवपण दिधलें. कृष्णाजी पिंगळे यांस चौगुलेपण दिधलें व महिमानशिंग हैबतराव यांशी ठाणेंपण दिधलें व सत्ताविसा कुळीचे क्षेत्री सर्वे आले. त्यांशी आपले छत्रसिंहासन लग्नकाळीं वरासवें

---

१. बिंबानें शके १२१५ त गुजराथ घेतलें. तेथून तो दक्षिणेकडे येण्यास निघाला. शके १२२० त ठाण्याच्या अनुरोध सोरटीस मारून तें राज्य बिंबानें घेतलें. संवत् ८६४ त कोणताहि बिंब दक्षिणेंत आलेला नाहीं. तेव्हां बखरीच्या नकलकारानें हा संवत् अगदीं चुकून लिहिलेला आहे. अनुरोधाचा अंत शके १२२० तच झालेला आहे. (पहा—'बिंबाख्यान' पा. १४५)

नावळेस[१] दिधलीं. हें देणें सर्वांस वंशपरंपरेनें चालवावें व क्षत्रीकुळवंत आले आहेत त्यांचा मान महिमान कुळीं जो होईल त्याणें चालवावा व भास्करराव देसाई व अंकुशदेव देश नारगौडी याशी वृत्त चवदा प्रगणे यामध्यें राजभागप्रमाणें शंभर दामास पांच दाम यथा विभाग उभयताही घ्यावें व चवदा प्रगण्यांत भात दर मुडी परे दोन २ दोघांही विभागून घ्यावें. विठल नाईक उपाध्ये व अनंत नाईक कुळगुरु यांशी वृत्त लग्न घटिका व अंतरपाट चवदा प्रगण्यात दिधली व अनंत नाईक यास चवदा प्रगणे यांत एकेका एक्या मुड्याचें शेत दिल्हे व सर्वांस सांगितलें जर चवदा अधिकारी थापावे चवदा कर्णीक थापावे चवदा प्रगणी याचेवर सचणीचा कारभार अंकुशदेव देश व भास्करराव देसाई यांचे वंशपरंपरेनें करावा. वृत्त वेतन भोगावें व चौगडे कड या लावण्य अधिकारी व कर्णीक यांही यापाशीं बाळगावे व सोळा शाखाचे येजुर्वेदी ब्राम्हण महाराजासवें आले त्यांस चवदा प्रगणी याची ज्योतिष वृत्ति दिधली. हें देणें बिंबराजदेव राजेमहाराजाहि दिधलें. मग सर्वांस वासणी उचीत्तें वस्त्रें

१. शके १२२० मध्यें बिंबानें ठाणें घेतल्यानंतर एक समारंभ घेतला. त्या वेळीं ६६ सरदारांना वस्त्रें आभरणें दिलीं. शिवाय, लग्नसमारंभाच्या वेळीं नावळे (वराच्या मिरवणुकी) करतां छत्रसिहासनें चामरें हीं वापरण्याचा हक्क क्षत्रियांनाच दिला. ही एकच गोष्ट दर्शविते, कीं ६६ कुळें हीं क्षत्रियांचींच होतीं. लग्नाचे वरातीचे वेळीं सिंहासन वापरण्याचा हक्क क्षत्रियांना होता, याचें प्रत्यंतर म्हणून मी इथें त्याबद्दलची स्पष्ट नोंद करीत आहें, कीं अशा तऱ्हेचीं दोन सिंहासनें एक अणजूर येथें व दुसरें ठाणें चरई येथें कै. मदन पुरुषोत्तमजी म्हात्रे यांच्या घरीं पाहिलेलीं आहेत. या सिंहासनास पांच कळस होते. 'बिंबाख्यान' पान ८ व ९ यावर क्षात्रधर्म सांगितलेला आहे. लग्नसोहाळा चार ते सहा दिवस सर्व विधींनीं युक्त असा करावा, असें त्यांत सांगितलें आहे. "व्रतबंध एकादश वर्षी. विवाह उपवरि राजसीं, रजस्वला चतुर्थ दिवशीं. शुद्ध वर्ण. ४८. सिंहासन पंचकळशी. मुकुटमंजिरी घोसी. छत्रचामरें शोभेसी वधुवराकारणें. ४९. वीरकंकण बाहुबंध. तोडर तैसेंचि प्रसिद्ध. बाहुट पीत शुद्ध नाना वाद्यें." ५०. ह्यावरून लक्षांत येतें, कीं क्षत्रियांना निदान लग्नांत तरी सिंहासनावर बसण्याचा व छत्रचामरें वापरण्याचा हक्क होता. तो क्षत्रियत्वाचा हक्क आपणास मिळालेला होता; तोच हक्क आपण चालवीत असतांना केव्हां तरी व कुणी तरी पांच कळस वापरणारे ते पांचकळशी असें संबोधिलेलें असावें. कालाच्या ओघांत केव्हां तरी 'पांचकळशी' हा ज्ञातिवाचक शब्द बनला. आपल्या हिन्दवासी जनांना 'जा' म्हणण्याची कला उत्तम रीतीनें अवगत होती. त्या अनुरोधानें केव्हां तरी कोणा तरी कुळांना अपंक्त ठरवून जातीबाहेर घ लविलेलें असावें. जातीबाहेर काढलेल्या अशा क्षत्रियांना चौकळशी म्हटलें जात असावें. आपल्याच ज्ञातीची एक शाखा वेगळी होऊन 'चौकळशी' ही ज्ञाती झालेली आहे. मूळ ठिकाणाहून आपण सर्व 'पाठारे' म्हणूनच आलों.

आभरणें देऊन संतुष्ट करून चवदा प्रगणियात चवदा अधिकारी व चवदा कर्णीक सेणवैया दिधलें. चवदा अभयें दिधलीं. प्रजा आणाव्यात त्यांचेकडून शेतें करावीं म्हणून अभयें दिधलीं. जे बारा वर्षं प्रजेनें राजभाग न द्यावा. ऐशीं अभयें दिधलीं. मग महाराज दांड्या बंदरीं उतरोन तेथें विमळ निर्मळ अनेक तीर्थे शोधिलीं. तीर्थविधी केले. माणकाईसे राणी सुश्रात झाली. मग देश देसाई व प्रधान व सरदार सुश्रात झाले. मग वैतरणी तीरीं भैवार गांवीं वैतरणी आणि सिंधु मध्य भागीं महाराजानें सोमयोग आरंभिला. मग चोहो वेदाचे ब्राम्हण आणिले. याग संपूर्ण केला. मग सुरपार क्षेत्रीचे महा निकते श्री भार्गवचे स्छापित त्यास अश्वासन दिधलें. जर तुम्ही नारळी फोफळी केळीं उंस वाडियामुळें संपूर्ण करावे. या मुलखास पंचम भाग घेऊन तुम्हांपासून दहावा उसास राज्यभाग घेऊन ऐसें अभय देऊन संतोषी केलें. मग महाराज श्रीवैतरणीं पार गेले. मग महाकापुरास गेले. तेथें मातृशक्ति पुजीली. मग तारकापुरास गेले. तेथें तारकेश्वर लींग पुजीलें. मग बाणगंगेस गेले. सुश्रात जाले. मग बारडिया दुर्गास गेले. मग भूपाळ गड बसविला. बारडा दुर्ग बांधायास आरंभ केला. काम लाविलें. तेथें कुशदेव हैबतराव ठेविलें. नवसारीस गेले. मोहोरे रान बहुत. मग काळदुर्गास गेले. तेथें निळकंठराव कनोजे ठेविले. मग आसेर महास बसविला. तेथें प्रतापराव ठेविले. मग तेथें चांदवडी बसविली. तेथें मानशिंगराव हैबतराव ठेविले. हैबतराव यास सा आढाण्याचीं ठाणें बंदराची ठाणपती सांगितली. मग कामण दुर्ग बसविला. मग महाराज व देश देसाई प्रधान सेना नायक व चवगुले कडू पालण सर्वांसहित राजधानीस आले. देश देसाई चवगुले कडू पालवण पंडित पुरोहित क्षेत्री सरदार महाराजासहित वोळगोला गेले. मग माणकाईसे राणी यास पुत्र जाला. नांव महिनंदनु ठेवलें. महाराज हर्षीत होऊन धर्म बहूत केला. अन्नक्षेत्रें घातलीं. मग बिंबराज प्रमादले. मग महिनंदनुदेव राणे राजी बैसले. मग महिनंदनुनें राज्य जंजीरे यास नेलें व नांव माहीम ठेविलें. महिनंदनु राज्य करितां आपले अंगलग प्रधान देश देसाई पंडीत पाचारून विचार केला. जर आपला मुलूख सिंधुतीर आपणास आंबेनें दिधला. यास जाहाजें करावीं. ऐसा विचार केला. ते जाहाजाचे कारिगर आणावे. मग तलास माणसें धाडिलीं. सवदे श्रींगापूर पाहिलें. कारिगर न मिळे म्हणोन चेउलचा राजा जसगदेव व त्याणें कारिगर २ दिधले. नांव रणसोड वाडिया व नारायण वाडिया. हे दोघेही महाराज महिनंदनुदेवराण्या या जवळीं आणिलें. मग महाराज त्यास बोले जरी मोटी मोटी जाहाजें आम्हास द्या. मग वाडिया बोलले. आम्ही दोन कारिगर काय करूं. दहा कारिगर पाहिजेत. मग राजा बोलिला आम्ही आपआपले लोकांतील दहा माणसें तुम्हास देऊं. मग महाराज व प्रधान व देश देसाई

समस्त मिळोन आठजण निवडिले. ते कोळांत्र कालाई देवी चार शिलाईका कुळींचे चार. ऐसे आठजण काढिले. मग देश देसाई बोलिले तुम्हां आठजणास महाराज जाहाज करावयाची विद्या शिकण्यास आज्ञा केली असे. मग ते बोलले आम्ही क्षत्रीय कुळवंत तुझीया छायेस आलों. आम्हांस पांचाळाचीं कर्मे सांगता. पुढें आम्हांस संतानवृद्धि होईल. त्यांस मूंजीदिक्षा कोण सांगेल. आम्ही पांचाळ जालों म्हणजे आमचा स्पर्श कांहीं करणार नाहीं. मग जे आठहीजण रुधायासी लागले. मग महाराज महिनंदनुदेव राणे त्यास बोलिले. जर तुम्ही सिल्पिक कर्मे शिकलेत तरी तुमचा क्षात्रधर्म जात नाहीं. आपले सत्ताविसा कुळीयांत सासष्ट सरदार देश देसाई आम्हीं तुमचे संबंधाचा व पंक्ती भोजनाचा निषेध कोणी करणार नाहीं. तुमची रुद्र गायत्री व मुंजी दीक्षा तुमची तुम्हास चालेल. आपला बंदरी मुलूख. तारवें असावीत म्हणोन तुम्हास सेवा सांगितली आहे. मग आठजणास शिकावयास घातलें. मग देश देसाई पुरोहित उपाध्ये यांजपाशीं भाक त्यास आठजणास देवविली. जर तुमचें कर्म पुर्वापार पद्धत चालत आली आहे ती चालेल. तुम्ही पंचाळ न व्हाल. मग महिनंदनु रायानें मुलखाचा चवदा प्रगणे यांचा सिधाव केला. देशांयांवर व देशावर निरोधिला. त्याचा पुत्र एकदेव राणा त्यास कृपाळ देश नारगौडी[1] याची कन्या सगुणाबाईचें सैंवर केलें. मग एकदेव राणा राज्यीं बैसले. राज्य करितां वेसाव्याच्या बंदरीं चांचे येऊन उतरले. मग झुंज जालें. चांचे मारून हाकिले. तेथें कृपाळदेश पडिला. कृपाळदेशीयाचा पुत्र महादेव देशाई कारभार करू लागला. मग महाराजानें महाकाळास काम लाविलें. व अनंतराव देसाई त्याणें जोगेश्वरीचे[2] देवळाचें काम लाविलें. व महादेवदेश त्याणी महाडीं हरबा देवीचे देवळास काम लाविलें. मग एकदेव राणे प्रमादले. त्याचा पुत्र रामदेव राज्यीं बसले. मग महाराज रामदेव राणे देश व देसाई व समस्त सासष्ट पैकीं सरदार व प्रधान व समस्त आपले आंगलग घेऊन आपला मुलुख पाहावयासी निघाले. वाडिवा बंदरांत उतरून वसईस गेले. मग

१. भास्करसिंग हेदुराव देसायी यांची बहीण माणकाईसे ही बिंबाची पत्नी; व बिंबाचा नातू एकदेव राणे याला कृपाळदेश नारगौडी ह्यांची मुलगी दिली होती; ह्या दोन्ही लग्नसंबंधांवरून हें स्पष्ट होत आहे, कीं बिंबाची जात 'पाठारे' हीच होती; व त्याच्या क्षत्रिय कुळांतल्या सोम व सूर्यवंशी सरदारांची जात 'पाठारे' हीच होती.

२. एकदेव राण्याच्या कारकीर्दीत अनंत देसायी यानें जोगेश्वरीचें देवालय बांधलें. व महादेव देश यानें आपल्या कारकीर्दीत मढच्या हरबाई देवीचें देऊळ बांधलें. याच देवीचें दुसरें एक देऊळ विरारच्या दक्षिणेस बांधलेलें आहे. विरारची हरबाई ही विशेषेंकरून शुक्लयजुर्वेदीय ब्राम्हणांची देवी आहे. मढची हरबाई देवी ही पाठारे क्षत्रियांची आहे.

मुळगांवी ताम्र तीर्थास काम लाविलें व खदीर तीर्थास काम लाविलें. मग श्री वैतरणी पैलाड गेले. मग महाराजें आपला मुलूख न्याहाळिला. आपले प्रजेस आश्वासन दिधलें. आपले दुर्ग माहिले. मग बारडिया दुर्गास बारा वरुषें राहिले. मग राजे राजधानी आणिलें मग महाराज प्रमादिले. त्याचा पुत्र जयदेव राणे राजीं बैसला. मग माहिमाहून ठाण्यास आले. आता गोविंदराव प्रधान त्याचा पुत्र भास्करराव प्रधान त्याचा पुत्र प्रल्हादराव प्रधान त्याचा पुत्र गोविंदराव नाईक प्रभु ठाणीयाला आले व अंकुशदेव राणे देश याचा पुत्र कृपाळ देश त्याचा पुत्र महादेव देश त्याचा पुत्र गणपत देश ठाणियास आले व भास्करराव देसाई त्याचा पुत्र अनंत देसला त्याचा पुत्र उद्धव देसला देसाई त्याचा पुत्र जनक देसाई त्याचा पुत्र बारव देसाई ठाणियास आले. व गोपाळ नाईक उपाध्ये त्याचा पुत्र देव नाईक त्याचा पुत्र राम नाईक त्याचा पुत्र गोविंद नाईक ठाणियास आले. अनंत नाईक गुरु त्याचा पुत्र प्रल्हाद नाईक त्याचा पुत्र हरजी नाईक त्याचा पुत्र केशव नाईक ठाणियासी आले. अवघे कोकणचे म्हातारे व पाटील व कर्णिक अधिकारी व पुरोहित व उपाध्ये व ज्योतिषी व देसाई देश चवघुले. व कडु पालवण प्रधान मिळोन मुहूर्त पाहोन महाराड जयदेवराज राजीं बैसला. मग ठाणीयास एक एकानें तळें बांधो आरंभिलें व एक एक शिवालय[1] बांधों आरंभिलें. मग जयदेव प्रमादले. त्याचा पुत्र सोमेश्वर राणा राजीं बैसला. त्याची कमाविसे राणी. त्याचा केशवदेव राणा त्याचा जान नाईक प्रधान. मग जान नाईक राणीचा व राज्याचा अभिलाष करूं पाहे, तो केशवदेव पांच वर्षांचा होता. मग कामाईसे आपुल्या देशास व देसायास शरण गेली. बहुत विश्वास आपुले देशाचा व सासष्ट पैकीं सरदारांचा. मग कामाईसे राणी व केशवदेव राणीचा पुत्र व गणपत देश व नारायण देसाई बैसोन दिधी पालीच्या राउतास खबर धाडिली. व सोमवंशीचे क्षत्री आपले वळखिचे पाचारिलें. मंडण घातलें. मग समर्थ देश व देसाई व दिधी पालीचे राऊत व सोमवंशाचे क्षत्री घोडणे मिळविले. वाडिया राहण्याचा पव घातला. सैन्य मोजवे नाहीं. दहा वाडिया भरोन सैन्य मिळविलें. राजा आभरण जान नाईका सवें होते. राजाचा परिवार जान नाईका सवें होता तंव पाहिले. मग देसाई व देश व दिधी पालीचे राऊत म्हातारे व शिवकर चौधरी याही पुढार घेतला. युध्ध झालें. जान नाईक मारिला. मग राउतानी व देश देसायांनीं प्रधान पुरोहित मिळोन केशवदेव राजीं बैसविला. जान नाईकाचा पुत्र पांडुरंग प्रभु त्यास त्याचे बापाची प्रधानकी दिधली. मग कमाईसे राणी व महाराज

१. ठाणें येथाल ज सुप्रसिद्ध श्रीकौपिनेश्वराचें देवालय व त्याच्या मागील तलाव हीं दोन्ही जयदेव-राज याच्या राजवटींत बांधण्यांत आलेलीं आहेत.

केशवदेव राणे याही उच्चीतें सर्वांसी दिधलीं. गणपत देश नारगौडा यासी चवदा प्रगणी यांत दर एकेका गांवास एका मुड्याचें शेत दिधलें व नाईक ऐसे नांव दिधलें. व नारायणराव देसाई यांस दरएक गांवास एका मुड्याचें शेत दिधलें व ठाकूर असें पद दिधलें व दिधि पालीच्या राऊतास पांचा सहस्त्र दामाचें शेत दिधलें व म्हात्रे माहिमकरास सातशाचें व शिंवकर चौधरी यांस सातशाचें. व माहिमकर चौधरी यांस पंचराशाचें. व मालाडकर खंडाणी पाईकांस बाविसांचे. व मरोळकरास तेविशांचे. त्यांचा खंडाणी पाईकास बाविशाचे. इतके देसाई क्षत्री आले होते. त्यास सहाशाचे त्याचे पालवण पोईसरकरास तेविशाचे. कडु येकसारकर यास तेविशाचे. खापणे मरोळकर खंडाणी पाईक आले होते त्यांस साहारकर व कावकर सातशांचे हे देणें. केशवदेव राणे महाराज यांचे. मग महाराज केशवदेव राणा ठाणीयास राज्य करितां बारा वर्षे जालीं. मग रायाचे भाट धारेस गेला. तेथें रायाचे बाणे पितामह ऐसें बोलीला हे पादवाणे ऐकोन धारेचा भोजराजा कोपला. मग मेळावा करून धारेचे भोजराजाने चाली केली. सैन्य सकळ कळव्या जवळी कटक बैसले. मग महाराजानें आपले सासष्ट सरदारासी बोलाविलें. क्षत्रीय ज्योतिषी वारिले. मग देसायासी व देशास सांगितलें. जे कवण्या विराचे हातीं द्वंद आहे. यश कोणास येईल जसें पहा. मग माहीमचे वीर म्हात्रे त्याचे राशीस द्वंद नाहीं. व गणपत देश नारगौडे त्याचा पुत्र गणपतीराव त्याचे राशीस द्वंद नाहीं. ऐसें नावाजिले. वीर पहिले परंतु कोणाचे राशीस द्वंद नाहीं. मग एकसारची पाखाडी मोडिली तैचा पौमदे पाईक यांचे राशीस द्वंद आहे. यश येईल. व देवनेरचा पाईक सोई म्हात्रा याचे राशिस द्वंद आहे. यश होईल ऐसा निर्धार केला. मग देश व देसाई सर्व सरदार रायाजवळ आले. मग रायास वृत्तांत सांगितला. मग ते दोघे वीर उभे केले. मग त्या दोघां-जणास वस्त्रें भूषणें दिधलीं. मग त्या वीरांवर चवरी ढाळिली. मग देसाई देश क्षत्री व सरदार वोडणें पाईक आपापल्या दळ भारेसी उठवला. दळ भार त्या दोघां पाईकाचे चालीले. मग भोज राज्याचें सैन्य उठावलें. मदाकच्या मग केळव्यास झुंज झालें. माणसें बहुत मेलीं. श्री. मग पोमदे पाईकानें धनुष्याची आढी काढून राया भोजाची दांडी मग छत्राची वेधली. दुसऱ्या तीरें सीरचा मुगुट वेधिला. मग भोजराजा हत्तीवर मूर्छित पडला. मग भोज राजाचे सैन्यानें काढावा काढिला. म्हसीया दुर्गांचा रामराव तो भोजाचे साह्यास आला होता तो देवनेरच्या सोय म्हाताऱ्यानें धरून आणिला. मग भोजराज येकले माणसाशीं राहिला. मग राया केशवदेव राणीयाचे भेटीस आला. मग राया महाराजानें ठाणीयास जागा दिधली. ठाणीयासी भोगाईत रचिले. मग एक सारखा पोमदे पाईक यासी वाहत्या वज्राचा आमला ऐसे बाणे दिधले. वो देव नेरच्या

सोय म्हातरीयास विरभद्र ऐसे बाणे दिधले. मग भोज राजा सहा महिने राहिला. आपले धारेस गेला. हें दत्त राया केशवदेव राणे याचे मग भोजरायें केशवदेव रायास आंवे धाडिले. ते देवगिरीचें जसगदेव रायानें बळेंच घेतले. तो वृत्तांत परिसोन महाराज केशवदेव याणें आपला भाट धाडिला. मग जसगदेवराव बोलिला. जर कोपला केशवदेव राया होईल तर आम्हांस वेसण फोडील. हें ऐकून भाट आला. रायास वृत्तांत सांगितला. मग महाराजानें आपले देश देसाई प्रधान समस्त सरदार लोक मेळवोन कटकाई केली. मग जाऊन म्हशियागड वेढिला. खालीं बैसले. मग खबर देवगिरीस गेली. मग देरगिरीचें जसगदेवें चाल केली. कटक गणपतीस आले. पाईक हजार १००० अश्वस्वार ५००० व हत्ती ९ ऐसे कटक आले. मग राया केशवदेव राणे यांचें सैन्य मोहोरें जालें. बदलापूरीं झुंज जाहलें. मग जसगदेव हरले. झुझांत गणपत देश नारगौडे पडले. नादरेचे पडले. मग केशवराव उठावले. मग महाराज केशवदेव राणे याहिं चाल केली. मग सांवरे गांवीं झुंज जालें. मग जसगदेव हारला. केशवदेव जिंकला. मग ते झुंजी पडले. कांधोवलीचे बाराजण १२ येकसारचे नवजण ९ मरोळचे ११ जण. दिधी पालीचे ३० जण. माहिमचे ३ जण. मालाडचे १२ जण. गोराईचे ७ जण. वांद्र्याचे ४५ जण. ठाण्याचे ३० जण. बारड्या दुर्गाचे ५ जण चांदवाडीचे ४ वसईचे ३ ऐसीं तीनशें बारा मनुष्यें पडलीं. व घोडे ४० पडले. मग महाराज केशवदेव राणे यानीं आपले कटकास संभाळिलें. जसगदेव आपले देवगिरीस गेले. मग बारा वर्षें वेढा घातला. परंतु गड हातीं न ये. आंवे खोदले त्यांस आंबे आले. परंतु गड न ये. मग आंधेरीचा म्हात्रा राऊत याची वृत्त खडाईली होती. म्हणोनच जसगदेव रायाजवळ गेले होते. ते भाऊ पांचजण ते म्हशा दुर्गास ठेविले होते. राया केशवदेव राणे यांस देश देसाई यांणीं विनवून आणिलें होते. त्याची याद करून कटकातें आणिलें. मग त्यांही म्हशा दुर्ग घेतला. मग वेसणी फोडिल्या. मग महाराज केशवराव रायानें त्यावरील २ पाईकास आवाणे सरनागत वज्र पंजर ऐसें दिधलें. मग जुनरीचा रघुराज आसेरमाली सवें घ्यावयासी आला होता. त्यावर केशवरायानें कटकाई केली. तेथें माहिमकर वीर म्हात्रा धाडिला. तो आपले भागनशी झुंजला. रघुनाथ रायानें आपला पुरुषार्थ दाखविला. मग गणपतीराव देश नारगौडा भारेंसहित धाविंनला. मग नवसरीवर झुंज्र झालें. रघुनाथराव जिंकला. मग पिलवण गिरीवर गेले. मग पिलवण गड घेतला. मग महाराजास खबर धाडली. केशवदेव राणे महाराज यांही गडाच्या पाईकांस वस्त्रें भूषणें देउन तो गड ज्याचा त्यास दिल्हा. मग देश व वीर म्हात्रे आपले महाराजांचे दर्शनास आले. मग महाराजें उचित्तें दिधलीं. वीर म्हात्रे यास सासष्ट पागदार ऐसें नांव दिधलें. वांदरे-

करांस नाईक नांव दिलें. पोईसरकरांस दोन काहाला व दोन सुरति दिधल्या. साहारकरास जुनरिच्या झुंजास मोहारी शिव व उत्तनकरास विराणे दिधले. व गोराईकरांस वीरगांठि व येकस्तरकरांस मोहरिसिंग ऐसीं उचित्तें दिधलीं. मग कोळी फार फार माजला. येऊन आपली विलाय मारून दंगा केला. मग रायानें आपले आंगीं कटकाई केली. तेथें कोकडवस्त झुंज जालें. कोळीं सात हजार चारशे मारिले. मग महाराजानें चौऱ्यासि वाणि दिधली. वेसावकरास काहाळा. मेकसारकराला वाणवीर. ऐसे वाणे दिधले. मग महाराज ठाणियास आले. मग आपले आंगलग देसाई व देश प्रधान समसस्त मेळवून विचार केला. आपण कांहीं धर्मकर्म करूं. मग सर्वांचा विचार घेऊन लघुयाग आरंभिला. मग वसईस जाऊन सिंधुतिरी वैतरणी संगमीं विमळाचे पश्चिम पाळीं सभवार गांवीं लघुयाग आरंभिला. चहू वेदींचे ब्राह्मण आणून महाराजानें यज्ञकंकण बांधोन राणीसहीत राजा दिक्षित जाहाला. मग कारभार आपले प्रधान व देसाई व देश चौगुले यांणी सांगितलें. अवघ्या रायास मुळें पाठविली सेना सिद्ध असो द्यावी. तो कारभार गणपती देश व वीर म्हात्रे व दिधी पालीचे राऊतास सांगितला. राजास मुळें पाठविलीं होतीं ते राजे आले. धारेचा भोजराजा आला. देवगिरीचा जसगराज आला. जुनरीचा रघुनाथराव आला. पैठणीचा केशवराव आला. वाईचा कर्णराव आला. शृंगारपुरिचा मुकुंदराव सुखा आला. सावद्याचा हरिश्चंद्रराव आला. चेऊलचा जसदेवराव आला. नामगिरीचा रामराव राणा आला. कल्याणचा आंकुशराव आपले साहित्येसी गणपतराव देशाजवळ आला. मग सर्व राजांचें गणपतीनें आगत स्वागत केलें. अवघे कोंकण कटकमई झालें. मग सर्व राजाहि राया केशवदेव राणा याचें राज्य देखोन परम समाधान पावले. समुद्राचीं स्नानें केलीं. याग समाप्त जाला. मग सर्व राजाहि अहेर केले. मग महाराज केशवदेव राणे याहि सर्व राजास नमिलें. मग सर्वांस आभरणें वस्त्रें भूषणें वाहिलीं. मग धर्म बहुत केला. ब्राह्मण संतोषी केले. भाट बंदिजन तोषविले. मग महाराज केशवदेव राणे अवघ्या राजाच्या बिऱ्हाडास गेले. मग सर्व राजांनीं मिळोन महाराज ठाणीयास आले. मग केशवराव देव प्रमादले. राज्य करावयास राज्यकुळीं कोणी नाहीं. मग समस्त देश देसाई व चवगुले व मुख्य सरदार व उपाध्ये व राजगुरु व चवदा खापन्याचे म्हातारे पाटील बोलावून प्रधान राजीं बैसविले. त्याचें नांव जनार्दन. जनार्दनाचे पुत्र नऊजण. वडील पुत्र नागरस[1] तो माहिमास राजा जाहाला. माहिमाचा अधिकारी वीर म्हात्रा

१. बिंबाख्यानांतील निरनिराळ्या हकिकतींत नागरशा हा घणदेवीचा राजा होता, व तो जातीनें वैश्य होता, असा उल्लेख आहे. घणदेवीच्या नागरशाहानें जनार्दन प्रधानास

प्रमादिला. त्याचा पुत्र बाळ म्हात्रा. याणें अधिकार सांभाळिला. रायाचा दुसरा पुत्र प्रतापसत्त प्रतापपुरी स्थापिली. तिसरा कान्हेर देव कान्हेरीस राहिला. चवथा उत्तानचंद उतनास राहिला. पांचवा हरपाळदेव मढास राहिला. साहावा बाळसेनबाज टेंभीस राहिला. सातवा नानोजी ठाणेंचे चरईस राहिला. आठवा विकोजी चरईसच राहिला. नववा पाल्होजी पाचपालीस राहिला. मग माहिमचे राजानें नागरसेनानें बाप पडिल्यावर उखेड काढून नवलक्षदिव गेला. तेथें पाईक वोडणे युद्धीं पडले. पोईसरकराचे पांचजण. कांधोलकराचे चारजण. एकसारकराचे सातजण. उतनकराचे सातजण. या चहूं गांवास वृत्ति दिधल्या. पोईसरकरास उचित भाग चार सेत वोहण. कांदवलकरास वोहण भाग चार. एकसरकरास खाड्या चार. खंडी सेरी एक १ खाडी पाहानी २ खाडी वाहोली ३ खाडी कदली ४ व उतनकरास वसईस जातां दांडेचे बंदरीं सुख नाहीं. मग राजानाग माहिमास आला. रायास पुत्र जाला. नांव त्रिपुरकर ठेविलें. मग धर्मरायानें माहिमास लक्ष दामाचा. मग चेऊलिचा राजा केशवदेव राणे आपलें राज्य चेऊलचे राया नागरशास दिल्हें. नागरसाचा पुत्र त्रिपुरकर त्यास आपली कन्या दिधली. त्यास चेऊलीचें राज्य देऊन राजा काशीवासास गेला. राजा केशवदेव चंद्रप्रभा राणी दोघ जाता आपला बुद्धिसेन प्रधान राया नागरसाचे हातिं दिधला. मग राया नागरसें सैन्य ठेविलें. घोडे हजार व हत्ती चार

मारून त्याचें राज्य घेतलें, असें या सर्व हकीकतींत लिहिललें आहे. प्रस्तुत बखरींतच फक्त नागरशा हा जनार्दनचा मोठा मुलगा, असा उल्लेख केलेला आहे. हा नागरशा जनार्दन मेल्यानंतर माहिमच्या राज्यावर वसला. नागरशा हा जनार्दनचा पुत्र होता. एवढ्यावरूनच तो जातीनें वैश्य नसून क्षत्रिय होता, हें सिद्ध होत आहे. याला पोषक म्हणून त्याचा मुलगा त्रिपुरकर यास चेऊलचे क्षत्रिय राणे केशवदेव यानें आपली मुलगी दिली, यावरून स्पष्टच होत आहे. केशवदेव राणे हे क्षत्रिय होते; त्यांनीं आपली मुलगी वैश्याला देणें शक्य नव्हतें. नागरशा हा क्षत्रिय होता, या विधानास खालील दोन गोष्टी पोषक आहेत. नागरशानें पहाड गांवच्या ब्राह्मणाची मुलगी स्वतःच्या घरांत घातली होती, तिला दोन मुलगे झाले, त्यांना ब्रह्मविद्या, संध्या, क्षत्रियाची रुद्र गायत्री, वगैरे शिकविलें होतें; पण 'पाठारे' क्षत्रियांनीं त्यांना आपल्या ज्ञातींत घेण्याचें नाकारलें. स्वतः नागरशा 'पाठारे' ज्ञातिच्या क्षत्रिय कुळांतलाच असल्यामुळें 'पाठारे' क्षत्रिय ज्ञातीकडे ह्या दोन मुलांना ज्ञातींत घेण्याची मागणी केली होती. दुसरें, नागरशा हा युद्धांत पडल्यानंतर त्याची राणी गोराईसे ही सती गेली. सती जातांना तिनें "क्षात्रकुळीं म्लेंच्छांची सेवा न करावी," असा संदेश देऊन तिनें अग्निप्रवेश केला. ह्यावरून स्पष्टच होतें, कीं नागरशा हा वैश्य नव्हता म्हणजे तो घणदेवीचा नव्हता, व तो क्षत्रियच होता, म्हणजेच तो जनार्दन प्रधानाचा मुलगा होता.

व नवासरीं ठेविले घोडे १२०० हत्ती १० सजणीस ठेविले घोडे ९०० व हत्ती १०. चिसलीस ठेविले घोडे ५०० व हत्ती ५ सेलारीं ठेवले घोडे २०० व हत्ती ५. व प्रतापपुरीं ठेविले घोडे ९००. मुळ गांवीं ठेविले पंधराशें व मालाडी ठेविले १५० व ठाणियास ठेविले ६०० माहिमानरामा नागदासाचे घोडे शाळेस ठेविले उत्तम २०००. हत्ती तेरा १३. हें दळ रामा नगरासाचे व पाईक वोडणे १२००० व हत्ती ७० हें दळ राया नागरसाचें. आंब्रवलींत सासष्ट तालुके मरोळ गांव सहारहरवली पाखाडी तेथीचा चवदा पदिक त्याची कन्या दाविली होती. तिचें नांव जानकाई. सुंदर होती. नागरसें घरांत घातली. तिचे पोटीं कुमार २ दोन. वडील नानोजी. धाकटा कुंवर कान्होजी. ब्राह्मणाचे कुळीं जन्म जाले. मग ब्रह्मविधी संध्या सुत्र क्षेत्रीयाची रुद्र गायत्री त्यांस दिधली. मग पाठारे क्षत्री त्यांस समंध नेदित. मग प्रभु कुळांत घातले. नांवे पाताणे जाहाले. मग नानोजी राया नागरसाजवळ चेंभूर व मांडली मागत होता, ते नेदीच. मग रुसोन देवगिरीस गेला. रामदेव रायापांशीं कटक मागितलें. मग बाज ठेंभीकर बाळसेन. व नानोजी ठाणेंकर व विकोजी हे तिचे भाऊ मिळोन वडीया जायनायक मदत आणोन रामदेवरायाची आण वाहिली. हें नागरसें ऐकोनी कटकाई केली. भालवलियें भार केला. त्रिपुरकर नागरसाचा कुंवर गणपत नाईकदेश व सोना ठाकूर देसाई सासष्टपैकीं. सरदार क्षेत्री वीर सारे जमा करून कटक भालवलीय मळीकार केला. मग त्रिपुरकराया नागरसाचा पुत्र याणें आपले कटकाईशीं चाल केली. मग माहोली येथें झुंज जाहलें राया रामदेवाचा प्रधान हेमा पंडित आला होता. झुंज मोठें जालें. हेमा[1] हा पंडित हाकिला. त्रिपुरकर जिंकला.

१. देवगिरीच्या रामदेवरावानें नानोजीच्याबरोबर पाठविलेल्या सैन्याचा मोड त्रिपुरकरानें माहुली येथें एकदां केला. त्यानंतर रामदेवरावानें अहिनलवाड्याहून रजपूत आनंदराव राणा यास बोलाविलें. त्यावेळीं रामदेवरावाचा पुत्र व प्रधान हेमाद्रिपंत नागरशावर चाल करून आले. त्रिपुरकुमारानें अंधेरी येथें त्यांचा पुन्हां एकदां पराभव केला. आनंदराव राणा हा लढाईंत पडला. त्याच्या बारा राण्या सती गेल्या. हेमाद्रीचा उल्लेख प्रथमत: शके १०६० तें (इ. स. ११३८) कनोजला निघालेल्या बिंबाच्या सहकाऱ्यांमधें उल्लेख केलेला आढळतो. 'महाराष्ट्र सारस्वत' कार कै. विनायक लक्ष्मण भावे हे पान ११९ वर निर्वाळा देतात कीं "हेमाद्रि" हा संवत् ११४५ (शके १०१०) मध्यें कार्तिक वद्य पंचमीस जन्मला; व संवत् १२२९ (शके १०९४ मध्यें ८४ वर्षांचा होऊन मेला, असें रॉयल एशिआटिक सोसायटीचें जर्नल कॉलम ९ ते २६ पृष्ठ २३४ वर आहे. म्हणजे बखरींतल्या बिंबाबरोबर असलेला हेमाद्रि व नागरशानें पराभूत केलेला हेमाद्रि अशा या दोन व्यक्ती अगदीं निराळ्या व स्वतंत्र आहेत. शके १२०९ मध्यें ज्ञानदेव व त्यांच्या भावाबहिणींना हेमाद्रीनें शुद्धिपत्र

रामदेवरायाचा परिवार मोडला. नानोजी व विकोजी व बाळसेन हे तिघे भाऊ हारीस आले. नागरस जिंकले. ते वेळेस माहिमकर म्हातारियास. पाटेकर नवला वाट असे वाणें दिधलें. सहाबाज ठाणें दिधलें. आणिक बहूत झुंझले. गणपत नाईक देश नारगौडे यास महिमानराव नांव दिधलें. देसाई कडू चौगुले पालवण चौगुले सरदार पाईक वोडणे यास रायानें बहुत उचित्तें वाणी दिधलीं. व दिधी सोमठाकूर देशया रायानें सलागीं हेंदुराव नांव दिधलें. व दिधी पालीचा नरसिंगराव यांसी प्रचीतराव नांव दिधलें. व चांदवडीचा गोपाळजी हैब्रत रायासी ठाकूर नांव दिधलें. व गोराईकरास विराणे दिधलें. नाऊरकरास काहाळ दिधलिया. माजासकराला काहाळ. व माजगांवकराला काहाला दिधल्या. व पासपोलीकराला काहाला. कांधोलीकरास घोडा दिधला. साहार-करास पटाब्रीद हें देणें राया नागरसाचें. मग देवगिरीचा रामदेव रायानें अहीनळ पान्हेरचा नसगदेवराय यासी खबर धाडिली. जर हे तिघे भाऊ नानोजी व विकोजी व बाळसेन. नागरसानें गांजिले याचा सूड घ्यावयास आम्ही मदत दिधली होती. तिघे भाऊ हरिस आले. नागरस जिंकला तर ते तुम्हास शरण आहेत. तर तुम्ही जसग राजानें याचा सूड घेइजे. उकक्षेड वेसावचे बंदरिं धाडून प्रतापपुरीचे राजागण लुटिजे. आम्हीं

दिलें; व शके ११९८ मध्यें हेमाद्रीनें वर्गणी दिल्याची नोंद ठाण्याच्या ताम्रपटांत आहे. बिंबदेवाबरोबर आलेला हेमाद्रि हा शके १०९४ मध्यें मेला असतांना, हा हेमाद्रि कोण, असा प्रश्न मनापुढें सहज उभा रहातो. तसेंच देवगिरीच्या रामदेवरावाच्या हेमाद्रिपंताचा पराभव नागरशाच्या त्रिपुरकरानें केला. तो हेमाद्रि कोण (?) याचाहि उलगडा होणें अत्यंत आव-श्यक आहे. बिंबदेवाचा हेमाद्रि बिंबाबरोबर निघाला, इतकाच त्या हकिकतींत त्याचा उल्लेख आहे. बिंब हा कनोजहून अनाहिलवाडा, चांपानेर, पैठण, गुजराथ या मार्गांनीं दक्षिणेंत आला. त्या संबंधीचा उल्लेख इतरत्र कोठेंहि नसल्याकारणानें तो हेमाद्रि पैठणहून बिंबाला सोडून देवगिरीस गेला असेल, किंवा पैंठणासच राहिला असेल, असें मानण्याला भरपूर आधार आहे. हेमाद्रि याचा जन्मकाल व मरणकाल हें महानुभावपंथीयांच्या ग्रंथांतून घेतले आहेत. तो ग्रंथ इतिहास संशोधनाच्यां कांटेकोर दृष्टीनें अभ्यासितां मलाच काय पण इतर कोणालाहि असेंच दिसून येईल, कीं महानुभावपंथीय हा जनसमूह पूर्वापारपासून पैठण येथेंच कायमचा राहिलेला आहे. त्यांच्या ग्रंथाचें नांव 'भानुविजय' असें आहे. सदरचा ग्रंथ हा सर्व इतिहासकारांनीं अगदीं प्रमाणभूत असा मानलेला आहे. अशा ग्रंथाची महती नि महत्त्व लक्षांत घेतां मला स्पष्टपणें असेंच म्हणावें लागतें, कीं बिंबाचा हेमाद्रि हा मुत्यु पावल्या-नंतर त्याचा कोणी तरी एक वंशीय रामचंद्रदेव याच्याकडे राहिला असावा. ज्या हेमाद्रीच्या बद्दल तो करणाधिप असावा अशा प्रकारची त्याची महती अनेक ग्रंथकार नमूद करीत आहेत. तो हेमाद्रि, तसेंच ज्ञानेश्वरादिकांना शुद्धिपत्र देणारा हेमाद्रि बिंबदेवाबरोबर आलेल्या हेमाद्रीचा नातू, पणतू, वंशज असावा, असें मी येथें स्पष्ट करीत आहें.

रामराजा व केसव पंडीत धाडितों. ऐसें लिहून विकोजी अहिनलवाडियास धाडिला. मग अहिनलवाडियाचा भार वेसावीं बंदरीं उतरून प्रतापपुरीं जात होता. मग आंधेरीस झुंज जाहलें. अहिनलवाडीयाचा परिवार मोडला. मग नागरस बहूत मानवला. उचितें दिधलीं. देशायास छत्रि व पोवसरकरास पालवणा हातसाकळिया सोनियाच्या. सारकरांलागी हातकडागी व पालवणास हातसांकळिया. व कोडीवटिकरास कडु वा हातकडागीं व बांदरकरांस व गडियांस छत्रिया. काळीनकरास सूर्यापान. मग देवगिरीचे अहिनलवाडियाचा रजपुताचे राणीया आंधेरी सतीया निघाल्या. १२ व सोम ठाकूर देश त्याचा पुत्र माधवराव देसला सोम ठाकुराचा भाऊ कान ठाकूर त्याचा पुत्र पाल ठाकूर देशला तेथें मरोळास गेला. मग राया नागरसाची बटिक तिचे पोटीं पुत्र जाला तो उसाळवर ठेविला. यास मादपुरो अधिकारी याचे रक्षेची कन्या दिधली. त्याचें नांव जैत चौधरी.[1] मग वसईचा सिंघाळ माहिमास जात होता. तो जैत चौधरी याणें घेतला. मगदो वेसावें याचे बंदरीं राखावयाचे कारणे नाईकवडी दिधली. आतां वंशावळी. देव नाईक त्याचा पुत्ररण सोड नाईक. त्याचा विठल नाईक. त्याचा राम नाईक. कुळगुरु त्याचा गोविंद नाईक व गोविंद नाईक उपाध्ये. त्याचे नारायण नाईक. त्याचे कृष्ण नाईक. त्याचे गोज नाईक. हे वंशावळ उपाध्याची. महिमानराव गणपत देश त्याचा बाप महादेव देश राणा. त्यास संतान नव्हतें. त्याचा कुळदेव सिद्धिविनायक. त्याचें आराधन केलें. पुत्र जाहाला. त्याचें नांव गणपति ठेविलें. त्यापासून एकामागें एक गणपत नांवाचे पांच वर्तले. मागील गणपत देश पुत्र हर नाईक देश जाला. हे राजे वर्तितां. दिलीमध्यें अल्लाचा अवतार[2] जाला. बरा आरवसी अरसि फकिर होऊन आला. गुरें राखो लागला. त्यास गुजराथचा वाणी भेटला. मालही दिधला. मग त्याणें आपलें सैन्य मिळविलें. तुरकान झालें. मग हत्या करूं लागले. मग क्षत्री राजे यांही कंटाळा घेतला. जर याचे हातें मृत्यु

---

१. हा नागरशाच्या बटकीचा मुलगा (रखलीचा) होता. म्हणून याला मादपुरो याच्या रक्षेची कन्या दिली. विशेषत: या दोन्ही हकिकतींवरून नागरशा ह्यास जातिबहिष्कृत केलें होतें. (पहा ‘ बिंबाख्यान ’ पान १२०)

२. दंतकथा अशी आहे, कीं दिल्लीमधें एका मुसलमानाचा मुलगा गुराखी होता. तो बत्तीस गुणी छत्तीस लक्षणी होता. तो राजपदीं बसेल, हें गुजराथच्या विठ्ठलदास वाण्यानें ओळखून त्याला अगणित द्रव्य दिलें. त्या द्रव्याच्या मोबदल्यांत त्या गुराखी मुलाजवळून लिहून घेतलें, कीं स्वतः त्यानें द्वारकेस बांधत असलेलें देवाचें मंदिर पूर्ण झाल्यावर त्याचा विध्वंस मी बादशाहा झाल्यावर करणार नाहीं. वचन देणारा हा अल्लाचा अवतार म्हणजे अल्लाउद्दिन खिलजी होय.

होई तो अधःपातास जाईल. त्यास गती नाहीं. म्हणोन त्याजसमोर झुंजावयास उभे न रहात. व मग दिल्लीचें राज्य घेतलें. सुलतान अल्लाउद्दीन पादशाहा राजीं बैसला. मग काठि भवंडीली. क्षत्री राजे आपलीं राज्यें सोडून पळाले. मग सुलतानानें आपलीं ठाणीं मांडलीं. मग सोरटी सोमनाथास आले. तें राज्य घेतलें. मग अहिनळवाडा. पैठणास आले. जसगदेव रायाचें राज्य घेतलें. मग देवगिरीस आला. मग दोवे वजीर कोंकणांत धाडिले. निकामलिक कोकणावर आला. कलवणी ठाणें मोडिलें. प्रतापपुरीं झुंज जालें. तेथें हरनाईक देश पडला. महालिंगराव पालीकर पडला. साष्टीचे वीर तीनशे पडले. मग शिवचे बंदर माहिम घेतलें. तेथें युद्ध जालें. राया नागरसाचा पुत्र त्रिपुरकर पडला. राजा नागरस वालकेश्वरीं बाणगंगेस गेला होता तेथोन राज्य चाललें. मग भायखळियावर युद्ध जालें.. राजा नागरस पडला. संवत् १३५१ तेरासे एकावन्न. शालिवाहन शके १२१६ बारासे सोळा. जमनाम संवत्सर माघ शुद्ध १ प्रतिपदा. ते दिवसी राजा नागरस मारिला. निकामलिक प्रतापपुरीं बैसला. महाराष्ट्र भंगलें. तुरकाण जालें. रायाची राणी गौराईसे अग्नि रिघायास सिद्ध जाली. मग निकामलियाजवळ भाट धाडिला. जर आम्हास अग्नि रिघायास जागा देईजें. मग मलिक बोले जर आमचे घोडयाचा पाय न लागे तेथें जागा दिधली. मग हरनाईक देश याची राणी कमळाईसें व त्याचा लेक माधवराव देश व गोराईसें राजपत्नि मालाडास आली. तेथें देसाई व चौगुले व सासष्टपैकीं लोक. क्षत्री जमा जाले. मग समस्त मिळोन त्या सतिया घेवोन भोमावर गेले. अग्निकुंडें सिद्ध केलीं. मग अग्नि निघतां गोराई सती बोलली. जर हे क्षत्रिकुळीं म्लेंछाची सेवा न करावी. सेवा करितां अंकित जाला. मोहरें महादेवी राज्य होईल. या कुळींचा त्यांस शरण जाईल. तो साह्य करील. भले खान मोडेल. महाराष्ट्र होईल. देव देवालयें क्षेत्रें मुक्त होतील. तेव्हां तुमचा उद्धार होईल. ऐसें बोलोन अग्निप्रवेश केला. मग समस्त घरोघर गेले. मग निकामलिकचा भाऊ मलिक आलावदिन नवसारीस ठाणें मांडून बैसला. मग सुलतान अलावदिन पातशहानें देवगिरीचें ठाणें मोडिलें. राजे बंदरास गेले. मग निकामलिक वजीर याणें कोंकणचे मुख्य सोमठाकूर देसाई व माधव नाईक देश व सर्व अधिकारी व कर्णिक व चवगुले व कुडव पालवण चवदा खापऱ्याचे म्हातारे व पाटील व उदमी व्यापारी व वर्तक बोलाविले. मग चवदा महालांचा सिधाव केला. मग सवेदरास गेले. मग सुलतान अनलवादिन पातशाहास निकामलिकानें भेटविला. मग पातशाहा खुशाल जाले. मग त्यास म्हणे तुम्ही पातशाही नोकर हा (आहा). मग ते बोलिले आम्ही सेरकर आहो. नोकर न होऊ. मलिकास सर्व वृत्तांत सांगितला. मग पातशाहा कुशाल जाले. मग बोलिले जर ज्याचें वतन त्यास बाहाल. मग

प्रणाम झाले. मग शिरपा व कपडे दिधले. मग निकामलिक व जमिनदार व देशक समस्त आपले मुलकास आले. मग सुलतान अलवादि न पातशाहा गुजरले. त्याचा बेटा सुलतान मोगल जाला. तो राज्य करितां नामदेव सिंपी[1] काशियात्रेस जात होता सर्वे पोहा होता. तो मोगलें आणविला. त्यास बोले तूं भूतखाना पुजितोस. मग कंदोरी आणविली. नाम्यास खायास बैसविलें. वरला रुमाल काढितां फुलें जालीं. मग पातशाहा अजब करी. मग त्यास सिरपाव देऊन जावयासी रजा दिल्ही. मग तो सुलतान मोंगल व यजु ब्राह्मण व राघो चैतन्य व रामदेवराव हे चौघे पूर्व जाती स्मरून देवगिरीचे भुयारांत निघाले. त्याचा अंतपार कळत नाहीं. मग सुलतान मोगल त्याचा सुलतान फरोजशाहा राजीं बैसला. मग ठाणें कोंकणचा सिधाव केला. नवसारीस जावें. मग प्रतापपुरीचे दिवाणानें भायनेरकरास राखलें होतें. चांदवाडीच्या धनाचा दावा दिधला होता. ते सोमठाकूर अधिकारी यांही बत्तीस हजार ससगानी देऊन सोडविला. मग निकामलिक बोलिला. तूं माझा देशाई होशी. देशिक करशि. मग भागड चुरी बोले सोमठाकूर देशाई बोले. तूं पाप करून जीव मारिशी. तेथें मीं देशाईकी करीन. मग निकामलिकानें मलिक अलवादिनास कागद लिहिला. जर सोमठाकूर देसाई व पोईसरकर कडु व येकसारकर पालवण बोलाउन नेऊन मारावे. ऐसें वडील भावास लिहिलें. मग अलवादिनें तलक केली. देसाई व अधिकारी व कड्ड पालवण धरून नेले. मग भागड चुरियानें अडीच हजार दाम लाच धाडिला. त्यास माराया कारणें. हें वाटेस देसायास कळलें. मग कड्ड

---

१. शके १२१६ मध्यें देवगिरीच्या रामचंद्र देवरायाचें राज्य अल्लाउद्दिनानें घेतलें. त्याच वर्षी निकामलिकानें कोंकणांत नागरशाला मारून त्याचें राज्य खालसा केलें. अल्लाउद्दिनाचे मरणानन्तर मोंगल हा पातशहा झाला. त्याच्या कारकीर्दींत नामदेव शिंपी हा काशियात्रेस जात असतांना त्यास बोलावून त्याच्यापुढें गोमासाचें ताट वाढून त्यास खाण्यास सांगितलें; पण ताटावरलें झांकण काढतांच ताटांत सर्वत्र फुलें आहेत असें दृश्य सर्वांच्या नजरेस आलें, हीच हकिकत महानुभावपंथीयांच्या ग्रंथांत दिलेली आहे. नामदेवाचा मृत्यु शके १२७२ त झाला. यावरून वरील हकिकत खरी दिसते, कारण, शके १२१६ ते १२७२ या काळांत नामदेव हा होता. पण 'महाराष्ट्र सारस्वत'कार पान १६१ व २५० वर नामदेवाचा काळ शके ११९२ ते १२७२ हा देतात. तसेंच कै. आजगांवकर हेहि नामदेवाचा काळ शके ११९२ ते १२७२ हाच देतात. कै. आजगांवकर हे त्यांनीं लिहिलेल्या नामदेवाच्या चरित्रांत गुजराथेंतील नरसी मेहेताचें दोहरे देऊन वरील हकिकतीस पुष्टि देतात; पण 'नामदेवानें मेलेली गाय उठविली' असें लिहिलें आहे. गाय उठविल्याची ही हकिकत 'बिंबाख्यान' पान १२५ वर दिलेली आहे.

संजाणाहून परतविला. जर आमचीं माणसें काढावीं. नाहीं तर भागड चुरी मारील. कारण मग नवसरीस गेले. निकामलिकास भेट होतांच पोईसरकर पालवण न मारिला. मग देसायापासीं जमीन पुसतां देसायाची ख्यात काढिली. मग पापरुत बहुल्या चिणिला. मग देसायाचे भाटांनीं देसायाचें रक्ताचें तेल केलें. व आतड्याचें वातरें करून दिवटी उजळली. मग सुलतान नामाहारें नादरूखीच्या वृक्षाखालीं उभा राहोन देसायाचे वानी बोलिला. मग मलिकास विचार पडिला. जर हे जमीनदार खरेंच जिवें गेले परी सत्य धरिलें आहे. आम्ही नाहाक यांसी मारिलें. मग भाटापाशीं परवाण दिधलें. जरी देसायाचा कोणी असेल त्यानें देशलीक करावी. मग मलिकानें देसायालागीं वाणें दिधले. देसायाचा कुळदीपक असेल ऐसे वाणे भाटापासून वाखाणिले. मग माधव देश भागड चुरियानें निकामलिकाजवळ नेऊन त्याचें खत लिहिवलें. मग मलिकानें देशलिकीचा विडा भागड चुरियास देउन आदरिला. मग चहु गांवीचे उभे राहिले. ते पाईसरकर व कांधोलीकर व येकसारकर व उतवनकर हे बोलिले. आम्ही देसायाचे पैरीखालीं उभे राहूं पण या भागरियाचें घरीं न बैसों. ऐसा घोष करोन घरोबर गेले. मग निकामलिकानें भागड चुरी यास देशलिकीचा विडा दिधला. मग मलिक बोलिला. घोणीला बत्तीस पाय. त्यास चहू पायावीण लंगडी न होय. तुला चहू गांवाहून खोटी काय. तुला समर्थ देस माफिक असे. आणिक माझे दिवाणाची मदत असे. मी सारा मुलुक चवदा महालीं तुजखालीं आणीन. तूं देशलिकीचा कारभार मजजवळ करसी. ऐसें सांगोन भागड चुरी घरीं पाठविला. मग भागड चुरीयाणें पोईसरकरास बोलाविलें जे तुम्ही मजखालें वोळगावें. नाहीं तर तुमचें पिलवणपण काढून वालणेकरास देईन. व साहरकाराचें कडुपण मालवणकरास देईन. मग पोईसरकर व येकसारकर बोलिले जर आमचें वतन देईवेई ऐसा कोणही नाहीं. मग ते चहू गांवीचे मिळोन वांद्र्यास देसायाजवळ गेले. मग देश बोलिले जर मजला ठकऊन माझा कागद लिहून घेतला आहे. आपण समस्तानें बळें धरून मारिलें त्याचा सूड घेऊन मग सर्वांहि विचार केला. मग दादरुते अदकारिठाणियाहून आणिला तो देसायाचा मामा. मग पहाडीस आंब्र नाईक व हर नाईकाचे घरीं राहिले. मग भागड चुरियाचा भाऊ कमळ चुरी विराणे वाजत दिवानांत प्रतापपुरीं जात होता. मग दादरुते विराणे पाहाडकर ब्राम्हण धाडून फोडविले. मग सिण ठाकूर देशला याचा पुत्र सोम ठाकूर व सिव ठाकूर लहान होता. ते ठाणियास ठेविले. मग दादरुत मालाडास आला. चार गांव मिळोन काहाळा वाजविल्या. मग सोळासे वोडणि आडाउ मेळाले. मग मुल्कात लुटु लागले. मग पाहाडकर आंब्र नाईक बोलले. जें तुम्हास खायास लागतें आम्ही देउ. लुटाव न करणें. भागड चुरियाचा मेढा मोडायास गेले.

भागड चुरी पाचव्रादेवीस गेला होता. मग भागड चुरियास पाहाडकर ब्राह्मणें बोलउ धाडले. जरदाडिये सुखासनीं न बैसावें. देसाई गांवीं आला आहे. मग सिमल म्हात्रे यानें पांढरा बाहुटा उभारिला. आणि सारियांस सांगितलें जो ज्या गांवीं उभा राहील तो गांव सारा लुट्ट. मग मालवणीच्या तळियावर चखिया करीत होते. त्याही आइकोन भागड चुरी सोडिला. मग मालवणकराचा खर्च व्यर्थ गेला. दरारा आइकोन भागड चुरी सोडिला. मग देसया कटक माजलें. मग चाल केली होती. तव भागड चुरिया-जवळ त्याचे पाईक १२२ होते. मग पांचवा देवीस आले. मग देश देसाई सोळासे आडावाहीं आड घातले. मग हादरुत माचळीवर बैसला. पासीं सिमळ म्हात्रा वाडण खाडे घेऊन उभा असे. सिमळ म्हात्रा आपले आडावास बोले अरे तूं आणि मी दोघे वेगळेच झुंजू. मग सिमळ म्हात्रा आपले आडावास बोले मजला पडलेसें देखाल. मग तुम्ही भागड चुरियासी मारून देसायास वोंळगावें. मग दोघे वीर भांडले. पूर्व पश्चिमे उभे राहिले. दोघांचें वोडणें दोघांचे पाठीस उभे राहिले. मग सिमळ म्हात्रा याणें वाडेकर घातली. तव सिमळ म्हात्रा याणें उडाण केलें. खाडे भुईस लागले. खाडे मोडून गेले. मग निहातेरी जाले. मग सिमळ म्हात्रा याणें मात्र एक घाय केला. खांदियावर, भागड चुरियाणें आंग काढिलें. मग भागड चुरियाणें हात टाकिला. थोडासा लागला. मग दोन्हीं दळें मिळालीं. भागड चुरियाचें सैन्य मारिलें. मग सिमळ म्हात्रा भागड चुरिया याचा मुर्दा पाहूं लागला. तव त्याणें कांडोळे (कान डोळे) वटारिले. ते पाहून सिमळ म्हात्रा आला. तव त्या डोहास तारू येक आलें होतें. त्या तारवावर सवदागर येक आले होते. सिंगणापुराहून, त्यास सिमळ म्हात्रा बोले. अरे हाच वेळ आहे त्यास मारशील तर तू जें मागशील तें तुजला देसायापासून देववीन. मग कोळी येक गराविस होता त्याकरणे पालकोयतीनें मारविला. मग सारें कटक येक जालें. देसाई व देथ चवगुले व कडु पालवण व अधिकारी सारे मालाडास आले. मग सोम ठाकूर चवकीवर बैसविला. सिव ठाकूर त्याचा भाऊ जवळ असे. मग सिमळ म्हात्र्यानें तो सवदागर उभा केला. सर्व वृत्तांत सांगितला. मग त्यास पुसिलें जर. तुमचें ठिकाण कोण व कोठून आलेत. मग तो म्हणे माझें नांव रामजी सुरवा.[1] आम्ही शिपागापुरीचे क्षेत्री. आम्ही

१. भागड चुरीला रामजी सुरवा यानें पाल कोयतीनें मारल्यानंतर त्यास सर्वांनीं समारंभ करून जातींत घेतलें. ही हकिकत असें दर्शविते, कीं त्या पुरातन कालींहि कांहीं शुद्धिसमारंभ करून कोणासहि ज्ञातींत घेतां येत असे. नागरशाहाच्या बटिकपुत्रास मादपुरोनें आपली कन्या दिली. तसेंच नागरशहास ब्राह्मण स्त्रीपासून झालेल्या दोन पुत्रांस गायत्रीधर्म व क्षात्रधर्म शिकवून एका स्वतंत्र ज्ञातींत प्रविष्ट केलें. इतकेंच नव्हे, तर क्षात्र

व्यापारास आलों आहों. मग देश देसाई अदकारी (अधिकारी) चवगुले कर्णीक व पालवण कडु सर्व बहूत मिळोन विचार करून मग त्या सुख्यास आपले पंक्तीस भोजन दिधलें. सनमान दिधला. तांडेल नांव दिधलें. मग रामजी सुरवा बोले मज वृत्त द्यावी. मग वलित मालाड पाखाडी वेलवलिसेत केवटिया खादवडी २ दिधली. मग पाहाडीचा ब्राम्हण सोळा दिवस खर्च चालविला होता त्या अब्र नाईकास चवदा प्रगणीयांत देशपांडेपण दिधलें व पातशाहाचे परवाणे करून दिधले. व सेत गळवद व पानखाय. व नव जाले. व उबखलिया व आखुप इतकें देणें ब्राम्हणास दिधलें. वृत्ती करून दिधल्या. ब्राम्हण सुखी केले. व पाईसकरास सिमळ म्हात्रीयास दाडी सुखासन दिधलें. मग देश व देसाई चऊगुले कडु पालवण अदिकारी व देशपांडे व कर्णीक सर्व मिळोन प्रतापपुरीं दिवाणास भेटले. मग दिवाणानें देसायास कपडे दिधले. समस्तास पानें दिधलीं. मग आपापल्या स्थळास गेले. मग सोम ठाकूर व शिव ठाकूर देशलीक चालवूं लागले. तैं पाइसरकर पालवण व येकसारकर कडु यास पालवण न चालवे म्हणून नातवास दिधलें. तैं पासून वृत्त आवलीस जाली. आकुलवलि येकडपण जालें. मग अहमद पातशाहाचे पातशाहींत दक्षिणचा राजा कानडा रामराजा. त्याणें तीन वजीर उत्तरेस धाडिले. बहिरी निजामशहा देवखडकीस पातशहा जाला. अलिद्विदलशाहा विजापूरचा पातशहा जाला. शाहा शिकंदर भागनगरचे पातशाहा जाले. मग उत्तरेस जितके राजे मंडलीक होते तितके मंडलीक पातशाहा जाले. मग जो राजा म्लेंछाची सेवा अंगिकारील ते आपले राजीं राहिले. मग ठाणें कोंकण शाहासन माहिम मुलूख बिंबस्थान तेथें कोटे येऊन धामधूम करूं लागले. बंदरगांव उजाड पडलें. मग देश व देसाई मिळोन त्या मलवाऱ्यासी तह केला. तिहावरुषाचा सिधाव केला. हरियास दिधला. मग देश व देसाई मिळाले. अवनाखवा भोगळा बंदरास गेला. मग पातशाही. साणे (खाणे)

धर्मीयाप्रमाणें रामजी सुरवा यास राजानें वृत्ति सुद्धां दिली. पण ‘बिंबाख्यानां’त भागडेचुरीला मारणारा इसम **गोम तांडेल** होता, असें पान ७३ वर लिहिलें आहे. रामजी सुरवा (गोम तांडेल) याच्याबरोबर जेऊन ज्या लोकांनीं त्याला आपल्या ज्ञातींत समाविष्ट करून घेतलें, त्या सर्वांना ज्ञातींतल्या इतरांनीं अपंक्त ठरविलें. त्यामुळें ज्ञातीबाहेर टाकलेल्या लोकांची एक स्वतंत्रच जात निर्माण झाली. त्यांचा समावेश पाताण प्रभूंमध्यें करण्यांत आला, असें ‘बिंबाख्यानां’त पान १५५ वर कै. राणे हे म्हणतात. सारांश, ‘अपंक्तपणाच्या भ्रामक समजुतीमुळें ‘पाठारे क्षत्रिय’ या पुरातन ज्ञातींतून उपजाती म्हणून ज्या ठिणग्या बाहेर पडल्या, त्या पुन्हां त्याच मूळच्या ज्ञातिसमूहांत समाविष्ट करण्याचें ‘या’ चें (आमच्यांत ‘या’ असें) धोरण आम्ही न ठेविल्यामुळें आमच्या एकजात एकजिनसी एका गटाच्या अनेक उपजाती झाल्या हें माझ्या उपरोक्त निवेदनावरून मला स्पष्ट म्हणावेंसें वाटतें.

अवनाखवास जालें. मग कपडे घेऊन मुलकास आले. मग शके १३२५ सुभानुसंवत्सरीं भाद्रपद शुद्ध दशमीस अवघे राजे अवनाखवास आले. मग सारेजण मिळोन अवनाखवास राजीं बैसविलें. मग तुरकाण मोडलें. मग भोगळाण जाले. अवनाखवाचा पाणिसावंत तो राजा जाहला. त्याणें माहिमास कोट बांधो आदरिला. कोटाखालीं म्हातारपणाची वृत्त सांपडली. म्हणोन त्यास वाड्या पांच दिधल्या. वाडी देवळी १ वाडी सोमेश्वरी २ दोन वाडी घोडभाटाची तिसरी वाडी सिरसाल्याची. चवथी वाडी कोल्हवडीची. पाचवी बैसावाडी. या पाच दिधल्या मग म्हातारियास व कडुवास झगडा लागला. मग ते दोन्ही वर्ग वांद्र्यास राम नाईक देश याजपाशीं राहिले. वांद्र्याहून दोन वर्षें फोफळी ओढल्या. मग देसाई व अधिकारी व देशपांडे व चौगुले व कडु पालवण सर्व वांद्यास आले. बाणटेकर म्हाताऱ्याचा वेवाद खंडला. म्हाताऱ्यापैकीं वृत्त अदकाराची भोगावी. कडुपैकीं त्यापुढें बोळगावें. वाद खांडला. आतां देसायाची वंशावळ. सोग (सोम) ठाकुराचा शिव ठाकूर देसला. त्याचा कान ठाकूर देसला देशलीक कान ठाकूर चालवूं लागला. मग कान ठाकुरास दोन पुत्र जाले. अकरा पुरुषापर्यंत एकाचा एक चालत आला. मग कान ठाकुरास दोन पुत्र जाले. वडील देव देशला धाकटा पाल देशला. मग दोघा भावाची वंशावळ चालत आली. आतां देव देशले याची माये केमाईसे. बाण देसला धाकटा पुत्र जाला. मग धाकला पाल देशला जाला. तिचा पहिल्या नवऱ्याचा ठायांचा. त्याचें नांव नाग म्हात्रा. मग देसायांचे घरीं नांव नाग टाकूर जालें. ऐसा त्याचा पूर्वार्ध जाला. बाण देसलियाचा शिव ठाकुर देसला तो दिगाब देसलियाचा प्रसाद हिव वंशावळ वाडा देव देशलिया वाडा भावाची दुसऱ्या धाकल्या भावाची वंशावळी. पाल देशलीयाचा कान ठाकूर देसला. त्याचा हरपाल देसला त्याचा कान ठाकूर देसला. त्याचा पाल देसला हे वंशावळ धाकल्या भावाची. वाडाचा शिव ठाकूर देसला त्याचा बाळ देसला. त्याचा कान देसला. त्याचा गणपत देसला. देशलीक हरदेशले चालवीत होते. मग वांद्रेकर देश नारगवडे याची वंशावळ. रामनाईक देश त्याचा रणसोड नाईक देश त्याचा विटल नाईक देश त्याचा पांडुरंग नाईक देश. पांडुरंग नाईक देश नारगौडी चालवीत असत व दादरुत अदिकारी याची वंशावळ पहिला. वासुदेव अदकारी त्याचा वेटराऊत अदकारी. त्याचा पापा राऊत. त्याचा दाद राऊत अदकारी. आतां केळवेंमाहिमकराची वंशावळी. सोम ठाकूर आदिकारी. त्याचा जैत ठाकूर त्याचा भात ठाकूर हैबतराव त्याचा भिव ठाकूर हैबतराव त्याचा जैत ठाकूर अधिकारी. त्याचा बेट ठाकूर अधिकारी वर्तत असे. आतां सूर्यवंशी माहाडिक राणे बेदरिसी आले. त्यास रामा नागरसाचें घर बनावर बोधोन दिधले. माहिमांत वर्तो लागले. मग अवनाखवाची वंशावळ. अवनाखवाचा

पाण सावंत त्यानें राज्य केलें वर्षें १३ तेरा. त्याचा पुत्र हा अभिसाण त्याचा पुत्र नरसिंगराव त्याचा पुत्र सुलतानराव. आतां पातशाहाच्या पिढ्या. प्रथम सुलतान आलवादिन. त्याचा सुलतान तोगलख त्याचा सुलतान परोजशाहा. त्याचा सुलतान म्याजदिन त्याचा सुलतान बहादुर. त्याचा सुलतान बहादुर. त्याचा सुलतान महमदशहा गजणी त्याचा सुलतान महमू बेगडी त्याचा सुलतान मुदाफरशाहा त्याचे पुत्र पांचजण. वाड (वाद) शाहा शिकंदर दुसरा बहादुर तिसरा महमूद चवथा चादखा पांचवा सुलतान अहमदशाहा. राजकबशाहा सिकंदर. आतां सुलतानराव भोगला पडला. त्याचा पुत्र नरसिंगराव. त्याची आई आसीबाई राणी. मग येक सवदागर मलिक थुजार नांवाचा आला. माल तीन तारवें भरून मोटीं वेसाव्याचे बंदरीं आला. मग तो सावकार म्हणे मी राणीस करीन. मग ते गोष्ट पुकार जाली. सवदागराचीं तारवें लुटलीं. तो सवदागर मुलखांतून बाहेर घातला. मग तो थुजा वर घाटावर जाऊन केशवरामास माल देऊन मदत मागितली. मग कटक येऊन शाहाबाजेस बैसलें. तेथें थुंजारानें कोट बांधला. तळियास काम लाविलें. मग दुसरी फौज नामजाद घाटावरून आणिली. मग चाल केली. कळवणीचें ठाणें घेतलें. राज पालटलें. मग माहिम घेतलें. हिजरी संवत् ८३१[१] एकतीस माहे तेरीख २३ भाद्रपद मास विरोधिया संवत्सर. मग माहिमचा नरसिंगराव सुलतान गुजराथेस महमद सुलतान शाहापाशीं गेला. वृत्तांत सांगितला. मग सुलतानानें आपला लेक कडफरखान नामजाद धाडिला. तो येउन राज्य घेतलें. भुजोर राज्य केलें महिने २० मग थुजार उठविला. मग तो सुलतान अहमदशाहा राज्य कबज अहिनलवाडाच्या पारनेर तखत देखिलविला ईथ नाईते या राजापैकीं ठाणें कोंकण बिंबस्थान राज्य कबज शके १४११ सोमेसंवत्सरीं राज्य अहमदाबाज रचिली. राज्य अमदाबाजेस करूं लागले. मग डफरखानें माहिमास राज्य पालटलें. भोगळान मोडलें. डफरखान राज्य करूं लागला. मग सुलतानानें

१. भुजारतें घाटावरून रामदेवरावाचा मुलगा केशवदेव याच्याकडून मदत आणून महिकावतीचें राज्य घेतलें असें वर दिले आहे. हीच हकिकत ' बिंबाख्यानां 'त पान १४६ वर दिलेली आहे. त्यांतहि ८३१ हा वर्षकाल दिलेला आहे; व तो हिजरी सनाचा आहे तेव्हां ह्या भुजारचें राज्य शके १३४२ मध्यें डफरखानानें घेतलें.

आनंदाश्रमांतील ६२४३ नंबरच्या 'रमलरहस्या 'च्या पोथीच्या ६३५ पानावर श्लोक आहे, तो:—
"सवत्सर: पंचगुणेंदुहीन: १३५ शाकोभवेद्विक्रमराज्ययाशाकोविहीते कुकु पंच ५११ शेष मोहम्मीदो हिजरीती सन: ॥ १ ॥"

अर्थ:—विक्रम शतकांत १३५ वजा केले म्हणजे शालिवाहन शक येतो, शालिवाहन शकांत ५११ वजा केले म्हणजे हिजरी सन होतो, असा या श्लोकाचा अर्थ आहे.

व ठाणियास कोट बांधो आदरिलें. मग सुलतानाजवळ कोण्ही चाहाडी केली. जर तुमचा लेक तुमशी बदलला. मग विखार्चीं लुगडीं धाडिलीं. मग डफरखान मेला. राज्य गुजरातीयास जालें. मग शिकंदर वजीर मारिला. हज करू गेला होता. बहादुरशाहा फकिरांत गेला होता. भिराचे विलातेस होते. मग परमान आलें. मग बहादुर आपल्या राज्यांत आले. मग बागुलाणपैकीं वजीर उमराव व बागुलाणपैकीं मामे मिळोन बाहादुर तर्क्तीं बैसले. सुलतान बाहादुर नाम ठेविलें. मग सर्वांही पातशाहीस सलाम केले. दोन्ने बंद असती तिसरा महमुदलाजवळ पालि जरमज मागें राजमहमुदर्चें. मग चादखान दक्षणच्या पातशाहापाशीं गेला. निजाम मुलकापाशीं राहिला. मग सुलतान बाहादुरें हेजीब्र मागूं धाडिला पण तो नेदीच. मग सुलतानें दक्षणेवर चाल केली. वजीर उमराव चालिले. बाहात्तर उमराव त्र्याहत्तर पाणिज्याचे ऐसी चाल केली. दिवातबाहादुर निघाला. दळाचें गणित केलें. नऊ लक्ष चार हजार ऐसा बाहादुर चालिला. मग निजामल मुलकें आपलें राज्य सोडिलें. दक्षिणेची पातशाही काबीज केली. मग निजामल मुलुक भेटीस आला. सुलतान खुशी जाहला. मेघडंबर सूर्यमान छत्रि विहिरी निशाण सिंहासन ऐसे वाणे बोलविले. मग दिवाणाचे मनास आलें. बहिरी निजामशा हा ऐसे बोलिले. मग खेपे भरोन चादखान घेऊन माघारे अमदाबाजेस आले. मग ठाणें कोंकण येथें अमलदार खान अजमफरखान अमलदार अमल वसईखालीं जाले. खान वसईस राहिले. मग चौदा माहाले देखील विलाईत भोगळिया रायापैकीं ठाणें कोंकण बिंबस्थान विलाथ न वसई विलायते वसई खालीं वोढो लागली. देश व देसाई सर्व वसईखालीं ओढो बाळगूं लागले. मग देशलीक देशले चालवीत होते ते पातशहा राजकबज सुलतान महमूद बेगडी व अमलदार शिराज मलिकच्या अमलात हरदेशलियाचें म्हातारपण जालें. देशलीक पुत्राचेनी न चालवे. मग लखेम देशला व वाण देशला दोघा पुत्रांचा विचार घेऊन देशलीकीचा कारभार गणपत देशली यास द्यावा असें केलें. मग सुदिन पाहोन चौगुले देश देशपांडे व कडु पालवण पाचारिले. मग गणपतीचे घरीं गेले. मग गणपत देशला घरीं नव्हता पाहाडीस गेला होता त्यास बोलाउन आणिलें. आणि सांगितलें कीं आज सुदिन पाहोन तुझ्या घरास आलों. तूं देशलीकीचा कारभार करावा. माझेनी दिवाणांत जाववत नाहीं. वृद्धपण जालें. मग ब्राम्हण गुरु उपाध्ये यांहीं पाट मांडोन गणपतीस पाटावर बैसविला. आपण हरदेशले याहीं आपले हातीं देशलिकीचा टिळा लाविला. सेला खादी वाहिला. गळां सिकें घातलें. मग सर्वांस सांगितलें आजपासून गणपत देशला म्हणावें. मग सर्वांही मिळोन आपण हरदेशला याणें जोहार केला. भाटानें देशल्याचे वाणे बोलोन उभे राहिले. मग आपल्या घरीं गेले. मग सर्व गणपत देशले

याचे घरीं वोळगो लागले. मग त्या कुंड पुरोस न देखवे. तो जाऊन शिरादमलिका-जवळ फिर्याद जाला. जर गणपत देशला दिवाणाचे परवानगीनें देशलीक करितो. हर-देशला जिवंत असतां दिवाणाचे आज्ञेव्रगर पुड (पुढें) होऊन देशलीक करतो. मग मलिकानें गणपत देशल्यास तल बकेली. मग हर देशले व गणपत देशले दिवाणांत निघाले. मागून कुंड पुरोस गेला. मग मलिकानें त्या देशलियास बोलिलें तूं ब्रिगर दिवाणाचे हुकमानें देशलीक करितोस. तूं दिवाणास मानीत नाहीं. मग हर देशले बोलिलेजे साहेब मी बुढा जाहालों. माझेनें दिवाणची चाकरी करवत नाहीं. माझे भाइका बेटा काकाविल आहे त्यास चाकरी मी करायास सांगितली. मग कुंड पुरो बोलिलेजे साहेब मी भाऊ असतां बेटा देशलीक कैशी करील. चौदा माहालांत तिजाई वीरिसामी आहे. माझा वाटा मी करीन. मग देशला बोलिला. जर तूं आमुचा भाऊ नव्हेस. मग कुंड पुरो बोलिला मी भाऊ खरा. या बोलास हर देशले बोलिले जर साहेब मालक तुम्ही हा इन्साफ करावयाची हद केली पाहिजे. मलिकानें देश व देशपांडे व चौगुले कडु पालवण व म्हातारे वर्तक पाचारिले. मग हर देशले याणीं हदीस घातली. जर माझी व गणपतीची आंगोळीं काटोन लोहि काढावें व या कुंड पुरोचें लोही काढावें. आमुच्या रक्तास हा मिळाला तर आमचा भाऊ खरा वतन पावेल. मग दिवाणानें मनसुबीला सराई दिधली. ठाणियास काजीपाशीं आले. मग काजीबाबू बसून कज्या चालविते जाहले. मग कुंड पुरोपासून ग्वाही आणविले. ग्वाही मालवणीचा १ कांधोलीचा चांभार येक १ आणि कांधोलीकर साईरा व तळवणी च्यार ४ व आकुलवलीचा वैलकरी ५ मागटणाचा ६ व कान्हेरीचा ७ व येकसारचा ८. आठजण निवडून आणिले हे हजरतीच्या मनास आले. सोईरे ग्वाही कामास न येत. मग मनसुबीस केळवें माहीमचे म्हातारे व आगरचे वर्तक प्रगणीयाचे पाटील व म्हातारे व राणेपैकीं हर नाईक देश व गोपाळ नाईक देशपाडे व पोसपुरो व कमळपुरो व बाळपुरो म्हातारे व सोइपुरो पोइसरक हे कर्णीक अधिकारी या सर्वांवर काजीनें मनसुबी घातली. मग हद देशले व कुंड पुरोलागीं सर्वांही बोलिले जर मनसुबी पांचजण करितील त्यास तुम्ही तिघे राजी आहा कीं नाहीं. मग ते कबूल जाले. मग प्रणाम केल्यावर तिघांच्या सया घेतल्या. काजीची मोहोर घेतली. मग माहिमचे म्हातारे वर्तक बोलिले जर याचा आचार कोण चालवितो. मग पोस नाईक उपाध्यास बोलाउन त्यापासून आंघोळ करवून तुळशीच्या वृंदावनीं उभे करून त्यास सांगितलें जर तुम्ही याचे श्राद्धीं संकल्पीं व लग्नीमुहूर्तीं याचे गोत्राच्या पिढीचा उच्चार करीत असाल त्याप्रमाणें आपलें सत्य स्मरोन उच्चार करावा. मग पोसनाईक उच्चार करूं लागले. हर देशले याचे बाप कान देशले त्याचे बाप हरपाळ देशले त्याचा कान

ठाकूर देशला त्याचा बाप बाळ देशला तेथून उच्चार ५ मग गणपत देशला याचा बाप कान देशला त्याचा बाप बाळ देशला त्याचा बाप शिव देशला त्याचा बाप बाण देशला त्याचा बाप देव देशला त्याचा बाप कानदेशला ही वडील भावाची वंशावळ हे दोघे येका पुरुषास मिळाले. मग तिसरा कुंड पुरोचा बाप कोय ठाकूर त्याचा बाप तुंग ठाकूर त्याचा बाप कोय ठाकूर त्याचा बाप नाग ठाकूर याजवर उच्चार राहिला. मग समस्त बोलिले कुंड पुरो तुम्ही याचे वंशास मिळत नाहीं. याचें वतनास पावत नाहीं. याशी तुमशी संबंध नाहीं. कान देशले याचे पुत्र दोघेजण वाडदेव देशला धाकटा पाल देशला तुमचा वाडणाउरचा म्हातारा त्याशी तुमशीं संबंध नाहीं. मग कुंड पुरो निवांत राहिला. देशलीक गणपत देशला चालऊं लागला. मग पातशाही फिरली. मग शिराज मलिक गेले. अमलखान खान अजमफरखान याचे अमलांत मलबारी येऊन गांव दोन जाळिले. गांव आगाशी येक गांव बराणपूर दोन मादो गांवीची रयत व सवदागर बहुत नागविले. मग जमीतदार खान खानाशीं बोलिलेजे तुम्ही अमल करावा मुलूख राखावा तर मुलुख राखीत नाहीं ही खबर आम्ही हुजूर लिहूं मग तो हट धरिला पातशाहास परमाण लिहिला जर तुम्ही आम्हास अमलावर ठेविलें येथें गणपत देसाई व हर नाईक देश हे हर दुजण पातशाहाची जमीन विकितात पातशाहा जमिनीबद्दल जुंझतात आणि हे जमीतदार व म्हातारे मिळोन जमीन विकितात. ऐसें लिहिलें. मग दिवाण सुलतानास गुसा आला. जमीतदारास तलब केली असा मुऱ्हा वजीरखान केला आगा मुऱ्हा वसईस येऊन बैसला. मग चवदा माहालचे म्हातारे पाटील कर्णिक अधिकारी देशपांड्ये देश देसाई तमाम आणून बंद केले. मग जमीतदारें पुसलें कीं जर साहेबीं आम्हास बंद काय सबब केलें. मग आगामुरा बोले तुम्ही पातशाहाचे हरामखोर. मग हर नाईक देश बोलिलेजे आम्ही कोण्हे बाबेनें हरामखोर. मग सुऱ्हा बोले तुम्ही पातशाहाची जमीन विकतां म्हणून हरामखोर. मग हर नाईक देश बोलिले आगामुऱ्हा साहेब तुम्ही पातशाही वजीर दाणे लोक. आम्ही जमीतदार सेरीकर. तुम्ही इन्साफ खरा करा. जमीन खेडलीचा महसूल घ्याल कीं उजाडीचा घ्याल. मग मुऱ्हा बोले आम्ही खेडली जमिनीचा वसूल घेऊं. मग जमीनदार बोलले जर साहेब ऐका आम्ही जमीन विकीत नाहीं. खेडायास देतों. जर खेडण्याचे अवलादे अफलादे खेडावें. म्हाताऱ्याचे अवलादे अफलादे पाळावे. ऐसा कागद लिहून देतों. विलाईत प्रजाहीन जाली प्रजा विकत घेतों. विलात खेडतो. सिधाव पातशाहास देतो ऐसा बोल आम्हास कैसा लविता. आम्ही हें काम करितों यांत हरामखोर असलों तर गुन्हेगार. मग आगा मुऱ्हाच्या मनास आलें. मग मुऱ्हा म्हणे माझा गणपत देसाई व हर नाईक देश तुम्ही परवाण आणिला आहे. "जर तुमचे विक्रीत भुमिकेवर बुबुळण आहे त्यावर माझें

आगामुऱ्हाचे जुलमानें वसेल तें सोनाग काढावे ऐसीं चवदा माहालें प्रभाविलीं. आगामुऱ्हानें पाहिलीं. शिळोत्तरें व वृत्ति निवडिल्या. कागद जुने पाहिले. ग्वाही पाहिल्या. मग आगामुऱ्हानें सिधाव केला. चवदा माहाले विलाथ डागिली. मग आगामुऱ्हा खुषी जाहला. मग तबकें भरून विडे आणिले. मग पहिला विडा घेतला. मग आगाशीचा नाचणसावा याणें विडियास हात वोडविला. मग माहीमकर हर पुरो बोलिला तुम्हास आधीं विडा काय होय. मग आगाशीचे वर्तक नाचणसावा व अर्जुन सावा यांही वेवाद मांडिला. मग मुऱ्हानें सर्व मजलसीकडे पाहिलें. मग राम ठाकूर आदिकारी बोलिले जर साहेबी दप्तरें सोधून पाहावीं. मग दप्तरें पाहिलीं तव सिका माहीम आलवरें माहीम व रोजनामे माहीम डावाणे माहीम मग तलवे माहीम. मग दिवाणखान बोलिले बडा तो माहीम. मग आगा मुऱ्हानें विडा घेतला. माहीमकर सोइ म्हात्रे याशीं विडा दिधला. मग दुसरा विडा आगाशीचा नाचणसावा यास दिधला. तिसरा वाणटेककर पोसपुरो याशी दिधला. चवथा विडा मरोळकर कानदेशली-यास दिधला. मग अंतसालियास दिधला. मग चौगुले कडु पालवण यासी दिधला. मग सेट्ये महाजन वर्तक गावगन्ना अधिकारी कर्णिक म्हातारे पाटील यांसी दिधले. मग वर्तक बंडारी कोळी मोकादम यांशी दिधले. मग देशपांडे यास दिधला. मग देश व देसाई यांही घेतले. मग शिरपाव जाले. मग दिवाण आगामुऱ्हा अमदाबाजेस बहादूर पातशाहापाशीं गेले. सर्व वृत्तांत सांगितला. मुलखाची रचना सांगितली. मग पातशाहा खुशाल जाले. मग बहादूर वसईस आले मग जमीतदार व रयत देखून व मुलूख देखून खुशी जाहले. मग सर्व जमीतदार व प्रजा पातशहास वोळंगो लागले. मरगखान खाना वजीर याणें पातशाहास जागा मालूल गांवीं दिधली तेथें पुरा वसविला. नांव बाहादूरपुरा ठेविलें. मग अलमखान खानाचे स्वाधीन केला. अमल करीत असतां मग हर नाईक व गोपाळ नाईक व ढोलार हे हर दुजण भाऊ मिळोन अज अजमखान खानास होन अडीच हजार लाच देऊन फिर्याद जाहले. जर हर नाईक देश आपले भाव चवदा माहालांचे देश नारगौडीचे वतनदार सेकडी होन दोन व दर मुड्यास भात एक फरा खातात. आम्ही भाऊबंद आम्हास कांहीं देत नाहीं तर साहेबीं आमचा वाटणी हिस्सा देविवला पाहिजे. मग खान खानपातशाहास समजाविलें. मग पातशहानें मनसुबी पंचाइतीवर घातली. अमीनखान खाना अमलदार दिधले. मग खान खान आगाशीकर नाचण सावा व सोपाळकर कान नाईक व मुळगांवकर राम सावा व बाब्र घरत व भाई नेरकर कान ठाकूर हैबतराव व माहीमकर शाम म्हात्रा व चवगुले व कडु पालवण म्हातारे व देशपांडे व देसाई व हर नाईक देशनार गौडे सर्व पाचारिले. वसईस सर्व जमा जाहले. तेथें गोपाळ नाईक व हर नाईक उभे राहिले.

मग खान खानअमलानें बोलिले जर हे दोघेजण देश नारगौडे याचा वारसा मागतात तर हे नाईक सारे भाऊबंद याशीं तुम्ही साऱ्यांही वतनाचा वारिसा हर नाईकापासून देवावा. खान वेसावकराचे पल्यावर आहेत. मग कोण्ही न बोलत. मग आगाशीचे वर्तन बोलिले जे साहेब्र हे मनसुबी वतनाची आहे. आम्ही मनसुबी करून देणार व देविणार साहेब आहेत. मग खान बोलिले जर मनसुबी हजूर दरबारीं करावी. मग बहुती वेसावकर नाईकांस सांगितलें वांदरेकर नाईकास सांगितले जर तुम्ही आपापले उपाध्ये आणावे. मग त्यांचे उपाध्ये आणवून उभे करून त्यांस गायत्रीची क्रिया देऊन पुसलें कीं मग शिवपंडितानें उच्चार केलाजे हे हर नाईक याचें वसिष्ट गोत्र हरबाई कुळस्वामिणी हे हर नाईक देश सूर्यवंश साळोखे या रायापैकीं हर नाईक देश याचा बाप मुकुंद नाईक त्याचा बाप पांडुरंग नाईक त्याचा बाप विठल नाईक देश त्याचा बाप राम नाईक देश नारगौडा. ही वंशावळ वांदरकर नाईकांची उच्चारविली. मग वेसावकर नाईकांस सांगितलें जर तुमचा उपाध्या उभा करावा. मग गोपाळ नाईक ब्राह्मण उठविला स्नान करून सूर्यासन्मुख उभा केला आण घातली. मग पुशिलें कीं जर वेसावकर नाईक याचे कुळगोत्राचा उच्चार करावा. मग त्याणें उच्चार केला. हर नाईक याचें गोत्र बाल व एकविरा कुळस्वामीणी. हे हर नाईक याचे बाप शिव नाईक त्याचे बाप बतान नाईक त्याचे बाप कणिक नाईक त्याचे बाप गोविंद नाईक त्याचे बाप राम म्हातारे ही वंशावळ. माहिमास गेली. मग समस्त बोलिले साहेब खान खानसाहेब या हरदुजणांची कळकट पाहिली हर नाईक देश साळोख्या रायापैकीं व गोपाळ नाईक व हरनाईक हे माहीमकर म्हाताऱ्यांपैकीं. त्यांस व यांस माहीमकरांस कांहीं समंध नाहीं. आतां तुम्ही अमलदार लोक आहा. वांदरकर नाईकाचे वतनाचा वारिसा वेसांवकरास ढोळारा नाईकास द्यावा ऐसें बोलवत नाहीं. तुम्ही दाणे लोक खुदाकडे पाहोन इनसाफ केला पाहिजे. मग खान खान ढोळारांस व सर्वांस रजा दिधली. मग बाहादुर सुलतान पातशाहा अमल गुजथ अनलवाडा चापानेर तक्त अमदाबाद देखील विलायत भोगळी. रायापैकीं ठाणें कोंकण बिंबस्थान कबज सिका वसईखाले जाले. सुलतान बाहादुर वसईस बहादुरपुरास राहिले. सात वरुषें जालीं. मग वास्कुदेगाम[1] नांवाचा फिरंगी

१ वास्को-दि-गामा हा सन १४९८ मे २२ रोजीं मलबार किनाऱ्यावर कालिकत येथें आला. सन १५०० मध्यें तो उत्तर कोंकणांत आला. सन १५०९ मध्यें गुजरातच्या महमूद बेगडानें त्याला पराभूत केलें; पण सन १५१२ मध्यें (शके १४३४ मध्यें) पोर्तुगीजांनीं वेसावें येथें वास्तव्य करणाऱ्या पातशहा बहाद्दूरशहा याला समुद्रांत बुडवून त्यानें कोंकणचें राज्य घेतलें. कै. सरदेसाई हे आपल्या रियासतींत लिहितात, कीं पोर्तुगीज हे सन

आला. त्याणें आरमार बाहेर दर्यांत ठेविला. मग सावकारी वेष धरून पढावावर बसून दांडीयाचे बंदरीं उतरला. बाहादुर पातशाहासी भेटला. सवे भेट बहुत आणिली होती ती नाना प्रकारची पातशाहास दिधली. खान खानासी व आगमुऱ्हाशीं व उमरावाशीं दिधली. व योभधाडप्रभु पातशाही दिवाणास दिधली. मग सुलतान बहादुर पातशाहा त्या फिरंगीयास बोलले तुं बडा सवदागर आमचे बंदरीं येत जावें. आतां आम्हाजवळ कांहीं माग तुजला पातशाहा मेहेरबानी. मग वास्कुदेगांव बोले आम्हासी गाईच्या चामड्यायेवढी जमीन द्यावी तेथें आम्ही राहून वखार घालून तुमचे बंदरीं माल उपसूं. मग पातशाहानें जमीन दिधली व कागद शिका करून दिल्हा. मग फिरंगी याणें गाईचें चामडें आणून वत्रीलें. बारीक वादी काढिली. मग पातशाहास खबर कळली. पातशाहा विचारीं पडला. मग आपले वजीर उमराव जमीणदार व अमलदार बोलाउन विचार केला कीं यास जागा कोठें द्यावी. मग जमीनदारें म्हणीतलें जागा येक चेउलचे बंदरावर खोचादाडा वाडला आहे त्याजवर जागा द्यावी. मग सर्वांच्या मनास आलें. मग चेऊलचे बंदरीं दांड्यावर जागा दिधली. मग फिरंगी तेथें उतरला. माल उपसिला. मग वसई ठाणा माजगांव माहीम वेसावें बंदरीं लहान तारवावर माल भरून आणून विकूं लागला. माल सकलाद शाला पितांबर घडिया सोनें रूपें मोतीं पोवळी आणून सवंग विकूं लागला वजिरा उमरावास माल बहुत दिधला. अवघे उमराव वजीर व सारे लोक खुशाल जाहाले ऐसे सवदागर असावे. अशीं तीन वर्षें माल आणून सरकारांत वजिराउमरावांस सवंग उधार बहुत दिधला. मग सर्वांस वाटलें जर फिरंगी सवदागर असा मुलखांत असावा. मग तिसरें वर्षीं आला. आरमार बाहेर दर्यांत ठेविलें. दांडीयाचे बंदरीं उतरोन बहादुर पातशाहास खबर जाणविली. आमुचा फिरंगी पातशहा आरमारावर आला आहे. मग सुलतान बोलिले कीं फिरंगी पातशाहा आम्हांस भेटावयासी आणावा. मग मनवेल घोसाळ बोले जर फिरंगी पातशाहा जमिनीवर पाय देत नाहीं दर्यांत पातशाई करितो या बोलावरून सुलतान म्हणे जर आम्हीं दर्यांत जाऊन भेटून येऊं. मग वजीर उमरावानें मना केलें परंतु जावयास निघाले. मग वजिराही विचार केला कीं आपलें आरमार करून भेटावें. मग फिरंगी याणें लहान तारू श्रृंगारिलें. काम सोन्यारुप्याचें केलें. तकटी रेशमी झगझगीत करून मग बहादुर आपले वजीर उमराव व सरदार भले लोक ऐसे जहाजें सात भरून काश्या

१५०७ मध्यें गुजराथेंत आले. (बाँबे गॅझेटीअर भाग २.) ठाणें जिल्ह्याचें वर्णन पान ४४८ मध्यें दिलें आहे, कीं महमद बेगडानें त्याला सन १५०७ व १५०९ मध्यें पराभूत केलें; पण बहादूर शहानें वेसावें येथें त्यांना जागा दिल्यामुळें त्यांनीं कोंकणाचें राज्य घेतलें.

पाहाणाखालीं गेले. मग फिरंगी याचीं तारवें लहान सजऊन काश्या पाहाणाखालीं आले. मग फिरंगी मनवेल सोज नांवाचा सिंगारिला. धाकट्या जहाजावर उभा केला. दोघांचे तारवांचे काठासी काठ लागले. खेमेशी निघाले. मग फिरंगी याणें आपलें तारू माघारें काढून दोन्ही पातशाहा दर्यांत बुडविले. मग बहादुर पातशाचीं तारवें सात गेलीं होतीं तीं कैद केलीं. वजीर उमराव सरदार सारेच सांपडले. बहादुर पातशाहा बुडविला. मग त्याचे लोक कैद करून मोठ्या जहाजावर चढविले मग विजुरेल दांडियास उतरला. मग सुलतान बहादुराची सेना पळोन गेली शके १४३४. अंगिरासंवत्सरीं तुरकाचें राज्य बदललें तेव्हां पाल ठाकूर देसाई व पाल नाईक देशनार दगवडे व देशपांडे व अधिकारी व कुळकर्णी व म्हातारे व पाटील व वर्तक व सवदागर पाई आपले अवघे चौगुले कडु पालवण सर्व जमा जाले. विचार करूं लागले. जर हाभाउकर ठकवून बहादुरशाहा बुडविला. मग मनवेललोप फिरंगी जमीतदारांजवळ गेला. मग अवघे मंडपेश्वरास जमा जाहाले. मग त्यास उचिते व वस्त्रें व आंगठ्या पदकें मोतीं पोवळीं सोनीरुपीं देऊन खुशाल केलें विजुरेलचे भेटीस आणिलें. मग विजुरेल त्यास बोले तुमच्या मुलखांत याचा कारभार तुम्हीच करावा. आमची जमीन वाहामि मुलकांत गलीव येईल तो आम्ही मारूं. तुम्हासी फिकीर नाहीं. तुमची अमिरी सत्ता साहेबीं तुम्हीच करावी. तुमचा मुलुख तुम्हीच खावा. मग जमीनदार बोलिले जर आमचा पातशाहा तुम्ही बुडविला मुलूख तुम्हास देवानें दिधला तर तुम्ही आपला कारभार तुम्हीच करा. आम्ही जमीनदार आम्हांस मुलकाची अमिरी न लगे. हे जमीन आमची मायभुई. इजवर आम्ही अमिरी साहेबी न करूं. आम्ही जमीनदारीची चाकरी करून मुलखाची सुतिसचणी करून तुम्हास सिधाव देऊन सवदागर व्यापारी येतील त्यांची जकात तुम्हास देऊन आमचा जमीनदारीचा हक्क जो येईल तो आम्ही घेऊन मुलखांत शिळोत्रे वृत्ति ज्या पूर्वापार आहेत त्याच घेऊं. आपण राजधानी ठाण्यास अथवा माहिमास करावी. मग या बोलास वास्कुदेगाव विजुरेल खुशी जाला. मग दिवाण विजुरेल जमीनदार बहुत नावाजिले. माल ऐवज बहुत दिधले. मग दिवाण मंडपेश्वरास गेले. मग जमीतदारांस चवदा माहाले विलायत ठाणें कोंकण विलायत सुलतान बाहादुर ठाणें कोंकण विंबस्थान फिरंग्याखालें आलें. मग नून देखून विजेर आला. मग दांड्याचे बंदरीं कोटास काम लाविलें. तेच संवत्सरीं चेऊलचे कोटासी काम लाविलें. मग चेऊलचा मोगल सुलतानखान त्यास सलुख करून देवलोप कपतान याणें चेऊलचा कोट बांधला. मग दोन कोस तिसरे बरगास याणें दवणेस जाऊन कोटाचें काम लाविलें. तेथें मीर महमद मोगल आला. त्याशीं मोटें भांडण जाहलें. मग मीरमहमद पळविला. दवणेचा कोट पुरा केला. मग दांड्याचा कोट

पुरा जाला. मग फिरंगी याणें मुलकाचे जमीनदार बोलावोन त्यास बोले तुम्ही पातशहाचे चाकर व्हावें. मग जमीनदार बोलिले जर आम्ही जमिनीची चाकरी करूं. तुमची चाकरी न करूं. मग फिरंगी याणें कुडा भाव धरिला. पुरतकालास लिहिलें पुरत कालाचें रेणोल १४०० चवदासे आणविले. मग कोडो रामजी प्रभु याजपासून फितवा फिरविला. देसायासी व देशाशी कथला लाविला. अवघी फाटाफूट जाली. मग वाल नाईक देश व पाल ठाकूर देसाई भांडले. मग खटला मोठा जाहला. मग पुरत कालचेरनोल आले व आरमार आलें. फिरंगी याणें आपला जमाव करून प्रथम वांद्रें धरिलें. नारगवडे याचें घर वेढिलें. सतराशें माणूस लहान मोठीं मिळोन त्यांत तिघे भाऊ वाल नाईक व भिव नाईक व पोस नाईक आपलें हातेरे धरून निघाले. मग ठाणें आदि ठिकाण धरिलें. तेथें चार हजार माणसास बाटविलेल्यामधोन कोण्ही कोण्ही पळोन पैलाड गेले. मग मरोळ धरिलें. मग मालाडावर गेले. मालाडचा देसाई आपले लोक घेऊन डोंगरास गेले. मग वसईपासून माजगांव पावतों तारवांचा वेढा घातला. गावोगांवीं धराधर मांडिली. लोक धरून बहुत बाटविले. मग लोक चार महिने डोंगरांत राहिले. मग कोळी आगरी भंडारी यांशीं कौल जालें. मग मऱ्हाठे लोक होते त्यांहीं जानवीं तोडून कुळंबी होऊन घरोघर आले. याप्रमाणें फिरंगी याणें वहिवाट केली.

बखरीचा पूर्वार्ध समाप्त.

● ● ●

छापत असलेल्या साष्टीच्या पूर्वार्धाच्या हस्तलिखित ३ प्रती मजजवळ आहेत. ताडून पहातांना त्या तिन्ही प्रती एकरूपच आहेत. त्यांपैकीं एक प्रत कै. गोविंद यशवंत राणे यांजकडून मला मिळाली. दुसरी प्रत नवीनच नक्कल केली असलेली कै. रामचंद्र सखाराम नाईक ह्यांच्या दप्तरांतून मला मिळाली. तिसरी प्रत अत्यंत जुन्या ज्ञानेश्वरीच्या भाषेंत व जुन्या लिपींत लिहिलेली माझे वडील कै. गोविंद विनायक नाईक ह्यांच्या दप्तरांतून मिळाली. राणे ह्यांची बखर ही ह्या ग्रंथाचें मूळ धरून मी संशोधिलेली आहे. त्याच्या एका पानाचें छायाचित्र आज मी येथें प्रसिद्ध करीत आहें. तसेंच जुन्या लिपीमध्यें लिहिलेल्या माझ्या वडिलांच्या पहिल्या प्रतीच्या पहिल्या पानाचें छायाचित्र मी प्रसिद्ध करीत आहें. त्याच वेळीं वडिलांच्या दप्तरांतील बिंब-राजाच्या परिवाराचें असलेल्या लिखाणांतून त्याच्या एका पानाचें छायाचित्र मी आज प्रस्तुत ग्रंथांत इतरत्र प्रसिद्ध करीत आहें.

—लेखक.

भाग दुसरा

निरनिराळ्या वंशावळी

(१) अहमदाबादच्या पादशहांची वंशावळ :—

डफरखान (ठाण्यास व माहिमास राहिला.)

|

बादशहा सिकंदर | बहादर | महंमूद | चांदरखान | सुलतान अहमशा { (ह्यांनीं अहमदाबाद वसविलें. राज्य कब्जांत घेतलें)

|

सुलतान मुदाफर

|

सुलतान वेगडा

|

गझनी सुलतान महंमदशहा

|

सुलतान बहादुर

|

सुलतान म्याजदिन

|

सुलतान परोज

|

सुलतान तोगलख

|

सुलतान अल्लाउद्दिन { गुजराथ घेणारा पहिला बादशहा

---

* १ ते १० त्या वंशावळींतील मूळ पुरुष हा खालीं असून त्याचा वंशविस्तार वरल्या भागीं गेल्याचें दाखविलें आहे. खालून वर अशी रचना त्या वंशावळीची आहे.

साष्टीच्या बखरीच्या पूर्वार्धांतील वंशावळ :—

(२) राऊत अधिकारी यांची वंशावळ:—

दादरराऊत (अधिकारी)
|
पापा राऊत
|
नेत राऊत (अधिकारी)
|
वासुदेव राऊत (अधिकारी)
|
दाद राऊत (अधिकारी)
(भागडचुरीच्या वेळचा.)

(३) केळवें माहिमाच्या अधिकाऱ्यांची वंशावळ:—

केशव ठाकूर हैबतराव
|
जैत ठाकूर हैबतराव
|
भिव ठाकूर हैबतराव
|
भान ठाकूर हैबतराव
|
जैत ठाकूर
|
सोम ठाकूर (अधिकारी)

(४) नायते कुटुंबाची–आवू ऊर्फ आऊ घराण्याची वंशावळ :—

*नरसिंगराव (आई आसीबाई राणी)
|
सुलतानराव
|
नरसिंगराव
|
पणि सावंत (यानें १३ वर्षें राज्य केलें.)
|
आऊ नाखवा
|
हन्निसाणा नाखवा

* ह्याचेनंतर थुंजारनें दहा महिने राज्य केलें. त्यानंतर महिकावतीचें राज्य संपलें व तें राज्य गुजराथच्या राज्यास सुलतान अल्लाउद्दिन ह्या बादशहानें जोडलें.

(५) बिंबाचे कुळगुरु उपाध्याय यजुर्वेदी ब्राह्मण यांची वंशावळ:–

गोविंद नाईक
|
राम नाईक (कुळगुरु)
|
विठ्ठल नाईक
|
रणछोड नाईक
|
देव नाईक
| (ह्या ठिकाणीं निराळी वंशावळ सुरू.)
गोविंद नाईक (ठाण्यास आले.)
|
राम नाईक
|
देव नाईक
|
गोपाळ नाईक (कुळगुरु उपाध्याय)

ह्यास पाहाड व पळसवली (पळसौळी) हीं गांवें इनाम दिलीं.

(६) बिंबाचे कुळगुरु उपाध्याय गोविंद नाईक, यजुर्वेदी ब्राह्मण त्याची वंशावळ :—

गोज नाईक
|
कृष्ण नाईक
|
नारायण नाईक
|
गोविंद नाईक (येथें निराळी वंशावळ सुरू
|
केशव नाईक (ठाण्यास आले.)
|
हरजी नाईक
|
प्रल्हाद नाईक (कुळगुरु)
|
अनंत नाईक
|
गोविंद नाईक (कुळगुरू उपाध्याय.)
(मांडव गडाहून आले.)

(७) बिंबाच्या प्रधानांची वंशावळ :—

पाडुरंग नाईक प्रभू
|
जान नाईक प्रभू
|
गोविंदराव नाईक प्रभू
|
प्रल्हादराव प्रधान

भास्करराव प्रधान
|
गोविंदराव प्रभू प्रधान

(८) मालाडच्या देशायांची वंशावळ:—

हर देशला
|
गणपत देशला — पाल देशला
|
कान देशला — कान ठाकूर
|
बाळ देशला — हरपाळ ठाकूर
|
शिव ठाकूर — कान ठाकूर
|
वाण ठाकूर — देव ठाकूर — पाल देशला
|
कान ठाकूर
|
शिव ठाकूर
|
सोम ठाकूर (भागडचुरीच्या वेळचा)
|
शिवा ठाकूर (देशायाचा मुलगा)
|
माधव देशाई — पाल देशसाई
|
सोन देशाई (हेदुराव) — कान देशाई
|
नारायण देशाई (ठाकूर नांव)
|
वारण देशाई
|
जनक देशाई
|
उद्धव देशला देसाई
|
अनंत देसाई
|
भास्करराव हेदुराव (माणकाईसे राणीचा भाऊ ह्याला बिंबानें मालाड व मरोळ हें गांव बक्षिस दिलें.

९. **बिंबराजाची वंशावळ केशवदेव राण्यापर्यंतच आहे:—**

लाहूरशा (ह्यांचें राज्य आऊनाखवानें घेतलें.
(वंशावळ नं. ४ पाहा.)

|

कोंडीअन

|

निकामलिक

|

त्रिपुरकुवर (नागरशाचें राज्य निकामलिकानें घेतलें)

|

नागरशा–प्रतापशा-कान्हेरदेव-उत्तनचंद-हरपाळदेव-बाळसेन-नानोजी-विकोजी-पालोजी

|

केशवदेव राणा (हा निपुत्रिक. **जनार्दन** प्रधान राज्यावर बसला.)

|

सोमेश्वर

|

ही बिंबाची वंशावळ

जयदेव राणा (ठाण्यास आला.)

|

रामदेव राणा

|

एकदेव राणा

|

महीदरणा (महीनंदनु याचा पुत्र.)

|

बिंबदेव राणा. *

|

शंकरदेव (सूर्यवंशी सोळोंखी; विद्यापूर पाटण.)

---

* बिंबाची महिकावतीच्या राज्याची पहिली वंशावळ केशवदेव राण्याचे ठिकाणीं संपली; दुसरी वंशावळ जनार्दन ते नागरशाचे ठिकाणीं संपली; तिसरी वंशावळ निकामलिक, कोंडीअन व लाहूरशाचे ठिकाणीं संपली; व मागील दिलेली नंबर ४ च्या वंशावळींतील अऊनाखवानें राज्य घेतल.

१०. **वांद्रेकर देशायांची म्हणजे—अणजूरकर नाईक घराण्याची वंशावळः—**

§ **बावनाईक भिवनाईक पोसनाईक** (म्हणजे अणजूरकर)

हरनाईक

मुकुंद नाईक

पांडुरंग नाईक (देश नारगौडे)

विठ्ठल नाईक

रणछोड नाईक

राम नाईक देश

माधव देश (गोराईसे राणीनें अग्निप्रवेश केला.)

हरनाईक (लढाईत पडला. कमळाईसे राणी सती गेली.)

गणपत नाईक देशगौडे (महिमानराव नांव ठेवलें.)

गणपति देसाई (नांव नाईक दिलें.)

गणपत देश (नांव नाईक दिलें; हे ठाण्यास आले.)

महादेव देश

कृपाळ देश राणा

अंकुशदेव राणा (महिमानपुरचा राव, सोळोंखी सूर्यवंशी ह्यास **वांद्रें** व **अणजूर** हीं गांवें इनाम दिलीं व **देशनारगौडीची वृत्ति** दिली.

§ हे तिघेहि नाईक आपलीं मुलेबाळें घेऊन अणजुरास राहिले. याच वेळीं ह्यांची एक शाखा अष्टागरांत किहिम येथें गेली.

भाग तिसरा

राजा बिंब

कोण—कुठला नि केव्हां ?

"Of all the Watches Those Go Just Alike, Everyone Believes his own." अशी स्थिति बहुतेक इतिहासलेखकांच्या बाबतींत घडून आली आहे. नुसते तर्क चालवून आपलेंच मत खरें, असें प्रत्येकजण म्हणूं लागला, तर इतिहासाच्या वाचकांपुढें ठाम सिद्धांताची बाजू कधींच मांडली जावयाची नाहीं, इतकेंच नव्हे, तर प्रामाणिक वाचकांच्या मनाचा त्यामुळें गोंधळ उडून इतिहासाबद्दल त्यांचा आदर नि प्रेम हीं कमी होत असतात, असा आजवरचा तज्ञांचा अनुभव आहे. बखरी, कागदपत्र नि पुरावे वगैरेंच्या आधारानें करावयाचें संशोधन हें सत्यस्वरूपाच्या मार्गानें व्हावयास पाहिजे.

आधीं सिद्धांत नि मग संशोधन या दृष्टीनें इतिहासलेखन करणाराचें लेखन प्रमाणभूत कधींच ठरत नसतें. नुसत्या तर्कवितर्कांनीं नि पदरच्या पाल्हाळीक वर्णनांनीं सजविलेला इतिहास अखेर कुचकामी ठरत असतो. सत्यसंशोधनानें थोडक्यांत लिहिलेला इतिहास वाचकाच्या आदराला केव्हांहि पात्र होत असतो.

एका इतिहासलेखकानें दुसऱ्या इतिहासलेखकांचीं मतें छातीठोकपणें खोडून टाकण्याचा प्रयत्न अवश्य करावा. पण त्या बाबतींत स्वतःचीं विधानें हीं सत्याच्या पायावर आधारलेलीं असावींत.

राजा बिंबाविषयींची कांहीं इतिहास-लेखकांचीं मतें

कोंकण प्रांताच्या इतिहासाचा विशेषतः ह्या प्रांताच्या अहद् पारनेर तहद् चंपावती ह्या टापूंतील मुलखाचा विचार करूं लागलों असतां प्राचीन इतिहासाचा धागा जुळवावयास लागल्यावर राजा बिंबाचा विचार करणें जरूर आहे. मुंबई बेट, माहिम (महिकावती)ची रचना बिंबाच्या व त्याच्या वंशजांच्या राजवटींत झाली असें इतिहासावरून दिसतें. पण राजा बिंबाच्या कोंकणांतील येण्यासंबंधानें अजून एकमत दिसून येत नाहीं. राजा बिंब कोणत्या ठिकाणाहून आला, त्याचें मूळ ठिकाण कोणतें, येण्याचा मार्ग कोणता, कोणत्या सनांत तो आला, कोणत्या वंशांतला तो होता, ह्या प्रत्येक बाबीसंबंधानें इतिहासलेखकांचें एकमत नाहीं. कांहींच्या मतें राजा बिंब ही एक काल्पनिक व्यक्ति होती.

या सर्व गोष्टींचा एक निश्चित सिद्धांत ठरविण्यासारखा ऐतिहासिक पुरावा आज असावा तितका उपलब्ध नाहीं. अनेक ग्रंथकारांनीं अनेक तऱ्हेचीं मतें व्यक्त करून, राजा बिंबाचें कूळ, स्थान, त्याच्या येण्याचा काल व मार्ग याबद्दल दोन मतें कांहीं लेखकांकडून मांडलीं जातात. राजा बिंब हा मुळीं झालेलाच नाहीं, या मताचा विचार तूर्त मी करीत नाहीं. अमकेंच एक मत हें सत्य असलेंच पाहिजे असें हटातटानें म्हणण्याइतका पुरावा उपलब्ध झालेला नाहीं. राजा बिंबाबद्दल शोध लागला असेल असें सकृतदर्शनीं कोणाला वाटेल. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. दोन तपांपूर्वीं माझ्या हातीं बिंबासंबंधींचें जें साहित्य लागलें, त्यावरूनच मला बिंबासंबंधीं यथामति माझें मत प्रकट करतां आलें.

उपरोक्त दोन मतांपेक्षां आणखी कांहीं मतमतांतरांचा विचार करावा लागेल. मुंबई हायकोर्टाचे माजी जज्ज कै. नामदार मोरोबा कान्होबा यांनीं इ. स. १८६९ मध्यें प्रभू वंशाचा संस्थापक भीमराजा या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें. प्रभू हे दुसरा भीमदेव याच्याबरोबर कोंकणांत आले, असें त्यांनीं आपलें मत व्यक्त केलें. गुजराथेंतील अनहिलवाड्याची संस्थापना वनराजा ह्या नांवाच्या चोवरा रजपूत राजानें इ. स. ७४७ किंवा ८१७ सनांत केली. त्या चोवरा घराण्यांतील एकंदर सात राजांनीं अनहिलवाडा पाटण येथें राज्य केल्यानंतर सोळंखी रजपूत राजघराण्यांकडे गादी गेली. सोळंखी घराण्यांतील एकंदर दहा राजांनीं अनहिलवाडा येथें राज्य केलें; त्यानंतर पांचवा पुरुष राजा भीमदेव हा होता. त्यानें बेचाळीस वर्षें राज्य केलें. नंतर सोळंखीवंश लखू मूलदेवाच्या नंतर नाहीसा होऊन आंगिला रजपूत गादीवर आला. ह्या राजवंशांतील सहा पुरुषानीं अनहिलवाडा येथें राज्य केलें. या वंशांतला तिसरा राजा भीम हा होता. विरानगर स्थापन करणाऱ्या राजा विसलादेवाच्या नंतर हा गादीवर आला. ह्या भीमदेवाच्या वेळीं पाठारे प्रभूंचीं इतर १२ सूर्यवंशीं राजकुळें ६४, सोमवंशी कुळें व

इतर असावेत. क्षत्रियवृत्तीचे अनुयायी कोंकणांत आले. या भीमदेवाचा पराभव कुतुबुद्दिनानें इ. स. ११९४ मध्यें केल्यानंतर हा गुजराथ सोडून वरीलप्रमाणें कोंकणांत आला. ही हकिकत व दिल्लीच्या पृथ्वीराजाचा महंमद घोरीनें पराभव केल्यानंतर कुतुबुद्दिनानें भीमदेवावर स्वारी केली; तसेंच पृथ्वीराजानें भीमदेवाचा पराभव केला होता, वगैरे हकिकत सदर लेखकानें दिली आहे. ही हकिकत त्यानें जवळ असलेल्या बखरीवरून (अर्थात् पाठारे प्रभूंच्या) दिली आहे, असें सदरच्या पुस्तकांत म्हटलें आहे. याला पुष्टि डॉ. जी. डी. कुन्हा हे देत आहेत. त्यांच्या मतें गझनीच्या महमुदानें गुजराथेवर स्वारी करून सोमनाथ पट्टण येथें चालुक्य ऊर्फ सोळंखी वंशांतल्या पहिल्या भीमदेवाचा पराभव केल्यानंतर तो भीमदेव दक्षिणेंत उतरला व त्यानें पैठण अथवा पाटणाहून (अनहिलवाडा पाटणाहून) माहीम येथें राज्य स्थापन करून वसाहत केली. या दोन हकिकतींत इतकेंच साम्य आहे, कीं हा भीमदेव गुजराथच्या अनहिल–पाटणाचा राजा होता. तो चालुक्य उर्फ सोळंखी कुळांतला होता, असें डॉ. कुन्हा म्हणतो. कै. मोरोबा कान्होबा हे तो भोगिला रजपूत होता असें म्हणतात. पण हा भोगिला वंश रुखू मूळदेव नांवाच्या सोळंखी वंशांतल्या शेवटल्या राजाला मुलगा नव्हता म्हणून तो गादीवर आला, असें सदरचे मोरोबा कान्होबा म्हणतात. ही हकिकत बखरींतली असल्यामुळें त्यांत कांहीं चूक होण्याचा संभवहि असावा. कै. मोरोबांचा हा दुसरा भीमदेव राजा सोळंखी घराण्यांतील होता, असें आपणास चौलुक्य ऊर्फ सोळंखी राजघराण्यांतील राजांची वंशावळ रावबहादुर वैद्य यांनीं आपल्या 'मध्ययुगीन भारत,' भाग ३ रा ह्या पुस्तकाच्या ३२० पानावर दिली आहे तिजवरून दिसून येतें. त्यांत दिलेला दुसरा भीम चालुक्यच आहे. डॉ. कुन्हा यांनीं दिलेल्या सनांत पहिला भीमदेव हा अनहिलवाड्याच्या चालुक्य घराण्यांतला असून इ. स. १०२४ त त्यांचा पराभव गझनीच्या महमदानें केला, ह्या विधानास पुष्टि रा. ब. वैद्य यांच्या वरील ग्रंथांतून मिळते. सदरहू वंशावळींत पहिल्या भीमदेवाचा राज्यकाल हा इ. स. १०२१–१०६३ दिला आहे. तसेंच कै. मोरोबा कान्होबा यांनीं दुसऱ्या भीमदेवाचा कुतुबुद्दिनानें केलेल्या पराभवाचा दिलेला ११९४ हा सन ही रा. ब. वैद्यांच्या अनहिलवाड्याच्या चौलुक्य राजांच्या वंशावळींतील दुसऱ्या भीमदेवाच्या राज्यकालाच्या (इ. स. ११७८–१२४३) या कालकक्षेंत येत आहे. ह्या एकंदर विवेचनावरून एवढें निश्चित होत आहे, कीं कोंकणांत प्रथम वसाहत करून बिंबस्थानाची स्थापना व माहिमच्या राजधानीची स्थापना कोणत्या तरी एका भीमदेवानेंच केल्याचें पुढें प्रसिद्ध झाल्यास त्या दोन्ही भीमदेवांच्या अस्तित्वाबद्दल, कालाबद्दल,

वंशाबद्दल, किंवा स्थानाबद्दल ऐतिहासिक पुरावा मिळत आहे. कै. मोरोबा कान्होबा यांनीं इ. स. ११९४ मध्यें कुतुबुद्दिनानें दुसऱ्या भीमदेवाचा पराभव केला, असें म्हटलें आहे. भीमदेवाचा पराभव कुतुबुद्दिनानें केला, ही गोष्ट रा. ब. वैद्य यांच्या ग्रंथावरून सिद्ध होत आहे. पण उपरोक्त भीमदेवाचा पराभव इ. स. ११९४ मध्यें झाला, किंवा इ. स. ११९९ मध्यें झाला, याबद्दलची मला स्वतःला तरी अनिश्चिति वाटते. कुतुबुद्दिनानें इ. स. ११९५ मध्यें अजमिराहून नहरवाल्यांवर (पाटणवाल्यांवर) पाठविलेली फौज परत आल्यावर गझनीहून फौज मागवून त्यानें इ. स. ११९७ मध्यें नरहरवाला (पाटण) काबीज करून उध्वस्त केलें असें ताज-उलमासर ह्या इस्लामी इतिहास-ग्रंथांत म्हटलें आहे; पण भीमदेवाचा इ. स. ११९९ मधला अनहिलवाड पाटणचा एक दानलेख आहे त्यावरून असें दिसतें, कीं कुतुबुद्दिनाला अनहिलवाड पाटण घेण्याकरितां इ. स. ११९९ हें साल उजाडलें.

इतिहासाचार्य कै. राजवाडे यांच्या ३ ऱ्या खंडांत चेऊलची बखर छापलेली आहे. सदरच्या बखरींत ओझरता उल्लेख आलेला आहे. सदरहू हकिकतींत दरणे नांवाच्या रजपूत राजांचा अंमल २०२ वर्षें चेऊल, देवगड, रायादि ठिकाणीं होता. त्यांच्या सरदारांनीं दिल्लीच्या पातशहाचा अंमल न मानल्यामुळें परसू भोंगळा कोळी हा कोळवण साष्टीकडे होता, त्यानें किहीमचें मैदानांत दरणेचा पराभव करून

रजपूत बिंब यांच्या अंमलाचा स्वीकार केला.

बिंबाचा अंमल शके १२०५ ते १२८० पर्यंत म्हणजे इ. स. १२८३ ते १३५८ पर्यंत होता. इ. स. १३५९ मध्यें भोंगळ्यानें बिंबाचा पराभव करून आपला अंमल चालू केला. या हकिकतीस आज तरी इतिहासाचा पुरावा हातीं नाहीं. कै. मोरोबा कान्होबा यांच्या विधानावरून ऐतिहासिक सत्याची संगति जुळत नाहीं. त्यांनीं बिंबाबद्दलचें एक तिसरेंच मत दिलें आहे.

बॉम्बे गॅझिटिअर व्हॉल्यूम १३ भाग २ रा पान ४३७ यांत दिलेल्या वर्णनाशीं मला आज मुळींच सहमत होतां येत नाहीं.[1]

---

१. निरनिराळे जिल्हे नि प्रांत यांच्या संबंधीं आंग्रेज सरकारनें एतद्देशीयांच्या तोंडाला पानें पुसण्याचे प्रयत्नांत ज्या नव्या नव्या शकली लढविल्या, त्यांपैकींच जिल्हा–प्रांतांचे गॅझिटिअर रचून तो एका तऱ्हेचा ताम्रपट करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. बहुजन-समाज थोडा शिकलेला असा; स्वदेशाचा पूर्ण इतिहास त्यांच्या हातीं नाहीं. रावसाहेब,

हा प्रतापबिंब कोण ?

सुमारें इ. स. ११३८ मध्यें हा अनहिलवाड पाटणहून पैठण येथें सहकुटुंब आल्याचा उल्लेख बिंबाख्यानांत आहे. त्यानंतर प्रतापबिंब हा दोन वर्षें पैठण येथें राहिलेला आहे. नंतर प्रतापबिंबानें पैठणहून तारापूर ते माहीम अशी मोहीम केल्याचें वर्णन आहे. त्यानंतर प्रतापबिंब पैठणास व अनहिलवाड पाटणास पत्रें लिहून बिंबदेवास व रयतेस ह्या प्रांतीं वसाहत करण्यास बोलाविलें. पुढें गोवर्धन बिंबाच्या सांगण्याप्रमाणें बिंबदेव ६६ (सासष्ट) कुळें घेऊन अनहिलवाड व पाटणाहून पैठणास आला. पैठणाहून ब्राह्मणसमुदाय घेऊन ठाण्यास आला; व नंतर वाळकेश्वरीं जाऊन प्रतापबिंबास भेटला. प्रतापबिंब इ. स. ११३८ त निघाला व बिंबदेव इ. स. ११५० मध्यें ह्या प्रांतीं आला. म्हणजे या दोन कालसंख्यांमध्यें बारा वर्षांचा काळ व्यतीत होत आहे.

प्रतापबिंब निघाल्यापासून तो बिंबदेव येईपर्यंत वरील सर्व हकिकत पडताळून पाहतां बारा वर्षांचा काळ गेला असें शक्य आहे. कारण बिंबाचा कोंकणांत आल्याचा काळ इ. स. ११५० हा दिला आहे तो त्या दृष्टीनें योग्य आहे.

बिंब सोळंखी कीं यादव याबद्दलचा निश्चित नि आधारभूत असा निर्णय आतांपर्यंत कोणीच दिलेला नाहीं. अंतःप्रामाण्या (Inner truthfulness) **या दृष्टीनें मी दोन तपापूर्वी मूळ बखरींच्या संशोधनाच्या दृष्टीनें गाभ्याला हात घातलेला नव्हता; पण त्या वेळीं माझी एक ठाम कल्पना अशी झालेली होती, कीं बिंबाख्यान व महिकावतीची बखर ह्या दोन्ही बखरी एकच आहेत.**

इतिहासाचार्य राजवाडे यांनीं असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे, कीं दोन्ही कालप्रसंगीं बिंब कोंकणांत आले (?) व दोन्ही प्रसंगीं इकडे वसाहती झाल्या. इ. स. ११३८ मध्यें बिंब या आडनांवाचे राजे गुजराथेंतून आले व त्यावेळीं प्रतापबिंब हा आला. हा प्रतापबिंब अनहिलवाड्याच्या चौलुक्यांचे जे मांडलिक राजे चांपानेरचे बिंब

रावबहादूरकीचीं आमिषें दाखवून अव्वल अमदानींतल्या कांहीं सुशिक्षितांना हाताशीं घेऊन त्यांच्या ज्ञानाच्या कुवतीप्रमाणें मिळेल ती माहिती घेऊन, त्या माहितीच्या आधारें आंग्रेज सरकारनें गॅझिटिअरांचे एक प्रकारचे ताम्रपट तयार करून ठेविले. संशोधनाच्या दृष्टीनें इतिहासावर जसजसा प्रकाश पडत चालला, तसतसें आंग्रेजांच्या या गॅझिटिअरांचें महत्त्व नि माहिती मागें पडूं लागली. पण अजून कांहींचा भ्रम असा आहे, कीं अर्धकच्च्या माहितीच्या जोरावर आंग्रेजांनीं तयार केलेल्या सर्व गॅझेटिअरमधील सर्वच माहिती शिलालेखाप्रमाणें शाश्वत आहे. आज तरी विचारी नि सुज्ञ माणसाला तें खरें मानतां यावयाचें नाहीं.

ह्या वंशांतला होता. इ. स. १२९४ मध्यें रामदेवाच्या पराभवानंतर यादव वंशांतल्या बिंबानें गुजराथेवर स्वारी करून समुद्रमार्गानें तो कोंकणांत उतरला. ही हकिकत महिकावतीच्या बखरींत आहे तशी ती बिंबाख्यानांतहि आहे. ह्या दोन्ही कालांची व बिंबाबद्दलची गल्लत गॅझेटिअरकारांनीं केली आहे. 'दोन बिंब व ते दोघेहि कोंकणांत येऊन स्थायिक झाले' असें फक्त राजवाड्यांनींच म्हटलें आहे.

डॉ. कुन्हा व मोरोबा कान्होबा यांनीं बिंबाचा उल्लेख न करतां भीमच मानला आहे. शिवाय, तो सोळंखी भीम होता कीं भोगिळा भीम होता, तसेंच तो पहिला कीं दुसरा होता; त्याचप्रमाणें तो १०२४ सनांतला कीं ११९४ सनांतला होता, इतकाच फरक त्या उभयतांत असल्याचें दिसून येतें. चेऊलच्या बखरींतल्या बिंबाचा उल्लेख फारसा महत्त्वाचा नाहीं. त्या बखरींत त्याला चेऊलचा राजा बनविलें आहे व नंतर एका कोळी राजाकडून त्याचा पराभव करविला आहे.

बिंब ह्या नांवाचा उच्चार

प्रथम कै. रघुनाथ पुतळाजी राणे यांनीं सन १८७७ मध्यें आपल्या बिंबाख्यानांत केला; व नंतर सन १८८४ मध्यें कै. निळकंठ पुरंदरे यांनीं बिंबाख्यानावरून आपल्या पुस्तकांत केला आहे.

अनहिलवाडा येथील राजवंशाचा कोंकण व कल्याणशीं फार निकटचा संबंध होता, या म्हणण्यास इतिहासकार टॉड यानें स्पष्ट दुजोरा दिलेला आहे; पण कोंकणांत कोणत्या भीमदेवानें वसाहत केली, हें तो निश्चितपणें सांगत नाहीं. तसेंच कोंकण कांहीं काळपर्यंत गुजराथेंतील अनहिलवाड्याच्या राजांच्या ताब्यांत होतें ह्याबद्दल सर्व इतिहासकारांचें एकमत होत असलें, तरी ह्या बिंबांनीं अथवा भीमदेवांनीं अनहिल-वाड्याहून वा गुजराथेंतून येऊन प्रस्तुत वाद असलेल्या

बिंबस्थानांत केव्हां वसाहत केली,

हें कोणीच निश्चितपणें प्रतिपादन करीत नाहीं. सर डब्ल्यू. इलिअट् हा तर देवगिरीच्या भीमदेवाला १४ व्या शतकाच्या आरंभीं देवगिरीचा राजा बनवितो व त्याचा भाऊ हरपाळदेव होता, असें म्हणतो. निरनिराळ्या ताम्रपटांतील यादवांच्या वंशावळी पाहिल्या तर असें दिसतें, कीं रामचंद्र ऊर्फ रामदेव यादव यानें देवगिरी येथें इ. स. १२७१ ते १३०९ पर्यंत राज्य केलें. त्याच्यानंतर त्याचा मुलगा शंकर ह्यानें इ. स. १३०९ ते १३१२ पर्यंत राज्य केलें. पण भीमदेवानें देवगिरी येथें राज्य केल्याचा

उल्लेख कोणत्याच ग्रंथांत नाहीं; किंवा ताम्रपटांतहि त्याच्या नांवापुढें राज्यकालाचा शक नाहीं. तसेंच हरपाळदेवानें रामदेवाच्यानंतर शंकरदेवाच्या अंमलाच्या शेवटीं व नंतर दिल्लीच्या पातशाहाचें मांडलिकत्व झुगारून दिलें व देवगिरीच्या यादवाचें हिंदु राज्य स्वतंत्र करून आपणास राजा म्हणून म्हणवूं लागला. पण त्याचा अत्यंत अमानुषपणें दिल्लीच्या पातशाहानें खून केला. पण हा हरपाळदेव भीमदेवाचा भाऊ नसून त्याच्या बहिणीचा नवरा—रामदेवाचा जांवई होता. अर्थात् सरसाहेब इलिअट हे त्याला भीमदेवाचा भाऊ कोणत्या आधारावर म्हणतात हें कळत नाहीं.

कै. नारायण विठ्ठल पुरंदरे हे आपल्या 'शुक्ल यजुर्वेदीय ब्राह्मण' या ग्रंथांत

राजा बिंबाची पूर्वपीठिका

देतात ती अशी:—संवत् ५७४ (इ. स. ५१८) मध्यें उदेपुरांतील सिंही येथें रामराजानें गादी स्थापन केली. **हा बिंबाचा मूळ पुरुष होय.** इ. स. ११ व्या शतकांत गिझनीकडून मुसलमान लोक हिंदुस्थानांत आले व त्यांनीं सूर्यवंशी व सोमवंशी हिंदु राजे पादाक्रांत केले त्या वेळीं सिंहाचा राजा रामदेव याजवर मुसलमानांनीं गदा फिरविल्यामुळें तो पैठणास आला व तेथें तो विक्रमभोज राजाच्या आश्रयानें राहिला. ह्या रामदेवास तीन मुलगे होते. वडील मुलगा **केशव** ह्यानें देवगिरी येथें राज्य स्थापिलें. दुसरा **बिंबदेव** हा उदेपुरासच राहिला. तिसरा **प्रतापशहा** ह्यानें अनहिलवाडा (कडीपाटण) येथें राज्य स्थापिलें. अल्लाउद्दीन खिलजी ह्यानें देवगिरीवर हल्ला करून तें शहर स्वाधीन घेतलें. त्यावेळीं रामदेव पैठणाहून मदत घेऊन देवगिरीस आला. प्रतापशहा अनहिलवाड्याहून आला. अल्लाउद्दिनाचेबरोबर झालेल्या लढाईत शंकरदेव-राणा इ. स. १२८८ त मारला गेला. प्रतापशहाहि पळतां पळतां मारला गेला. अनहिलवाडा व चांपानेर हीं स्थानें अल्लाउद्दिनाचे हस्तगत झालीं. बिंबदेव हा या धडामोडीनंतर देवगिरीवर आला; पण पैठणहि अल्लाउद्दिनानें घेतलेलें पाहून तो देवगिरीहून अनहिलवाड्यास आला. पण अल्लाउद्दिनानें अनहिलवाडा घेतलेलें पाहून तो समुद्रकिनाऱ्यानें आला. राणोजी शिरक्याजवळून दमण घेतलें. बालापार्डी, चिंचणी, व तारापूर, हीं गांवें घेऊन विनाजी घोडेळ याला पदच्युत करून त्याला बिंबस्थान हें नांव दिलें. अल्लाउद्दिनानें बिंबास बिंबशहा हा किताब दिला. पुढें बिंबानें इ. स. १२९५ मध्यें वसई (वत्सापूर) घेतली. ठाण्याचा यशवंतराव ह्यास ठार मारून ठाणें व साष्टी हीं घेतली. ठाण्याला बिंबानें अनहिलवाडापाटण हें नामाभिधान दिलें. इ. स. १२९७ त चेऊल (चम्पावती)चा राजा भोज ह्यानें ठाण्यावर स्वारी केली, त्यावेळीं बिंबानें त्याचा पराभव करून त्यास ठार मारून चेऊल जिंकलें. अष्टागर प्रांत जिंकल्यावर

बिंबानें माहीम घेतलें व मालाड हा गांव आपली राजधानी केली. त्यानें आणलेल्या अकरा उमरावांना प्रत्येकीं राज्यांतला एक एक भाग दिला. त्यानें पैठणहून हे लोक आणले होते. ६५ वर्षं राज्य केल्यानंतर तो मृत्यु पावला. त्याचा पुत्र केशवदेव यानें २०–२५ वर्षें राज्य केलें. त्यानें मरोळास प्रतापपूर हें नांव दिलें. पुढें बेदर येथील मुसलमानांनीं १३ व्या शतकाच्या अखेरीस ह्या राज्याची समाप्ति केली.

'बिंबाख्याना'च्या प्रस्तावनेंत कै. राणे लिहितात "बिंबाख्यानाचीं अनेक पुस्तकें आणून वाचून पाहिलीं. त्या वेळच्या लिहिलेल्या खऱ्या मजकुराच्या प्रती आम्ही दीर्घ प्रयत्नानें आणून आम्हीं हा ग्रंथ प्रसिद्धीस आणला आहे." यावरून स्पष्ट होतें कीं, कै. राणे यांनाहि बिंबाख्यानाच्या अनेक प्रती उपलब्ध होत्या. त्यांची छाननी करून खऱ्या मजकुरांच्या प्रतीवरूनच त्यांनीं हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे.

केशवाचार्य व नामदेवराव यांनीं म्हालजापूर ऊर्फ मालाड ठिकाणीं मजलस भरवून बिंबाख्यानाच्या ६६ प्रती केल्या व त्या अधिकाराप्रमाणें निरनिराळ्या कुळांना दिल्या होत्या; त्या प्रती कोठें तरी असण्याचा संभव आहे.

पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या राणे

यांनीं छापलेलें बिंबाख्यान व कै. राजवाडे यांनीं शेषवंशीय भंडारी ज्ञातीच्या हिरा हरी भंडारी याचे वंशाची म्हणून छापलेली महिकावतीची बखर ह्या दोनच प्रती उपलब्ध व प्रसिद्ध झालेल्या आहेत....राणेंच्या बिंबाख्यानावरूनच पुरंदरे यांनीं आपल्या पुस्तकांतील हकिकत दिलेली आहे.

राजवाडे यांची महिकावतीची बखर सन १९२४ मध्यें छापण्यांत आलेली आहे. सदरहू बखरीच्या पान ८८ वर बिंबाख्यानांतून उद्धृत केलेली हकिकत अक्षरशः तशीच्या तशीच दिलेली आहे. अर्थात् राणे यांनीं आपलें स्वतःचें म्हणून छापलेलें बिंबाख्यान व भंडारी मंडळींची बखर ह्या एकच होत.

अल्लाउद्दिनानें इ. स. १२८८ मध्यें पैठणास येऊन रामदेवराजाचा पराभव केला. याच्या आधीं रामदेवराजाचा वडील मुलगा केशवदेव हा देवगिरी येथें किल्ल्यावर राज्यारूढ झालेला होता. दुसरा मुलगा बिंब उदयपुराला स्थापन केलेला होता. तिसरा मुलगा प्रतापशा हा अलंदापूरपाटणीं राज्यावर बसलेला होता. पैठणच्या रामराजाच्या पराभवानंतर देवगिरीचा केशवदेव तेथेंच राहिला; पण बिंबदेवानें उदेपुराहून येऊन गुजराथ काबीज केली. नंतर केशवदेव मृत्यु पावल्यावर त्याचा मुलगा रामदेवराव देवगिरीस

राज्य करूं लागला. पण बिंबदेवानें इ. स. १२९४ त गुजराथ प्रान्तांतून अनहिलवाड्यापुर-पाटणाहून कोंकणांत ठाणें, माहीम येथें स्वारी केली व कोंकण जिंकलें.

कै. शामराव मोरोबा ह्यांनीं गोविंदराजाचा मुलगा कृष्णराजा असून त्याचे वंशांत रामराजा झाला, असें आपल्या ग्रंथांत म्हटलें असून रामराजास केशवराज, बिंबदेव आणि प्रतापशा असे तीन मुलगे असल्याचें म्हटलें आहे. केशवानें बापाजवळ रहावें, बिंबदेवानें उदयपुरास रहावें व प्रतापशानें आळंदापुरीं रहावें, असें होतें. सरदहू रामराजा हा पैठणास होता; त्याचा पराभव इ. स. १२८८ मध्यें महंमदशानें केला. त्या युद्धांत रामराजा अदृश्य झाला व बिंबदेवास व प्रतापशास महंमदशानें हाकलून लावलें, ही हकिकत त्यानें 'कौस्तुभ चिंतामणि' ह्या ग्रंथावरून घेतली आहे. त्याचवेळीं दुसरा एक राजा यदुवंशांतला रामराजा देवगिरीस राज्य करीत होता. त्याला शंकरदेव व भीमदेव असे दोन मुलगे होते व ते यादव होते, अशी ताम्रपट व शिलालेख यावरून दुसरी हकिकत शामराव मोराबा देतात. त्या रामराजाबरोबर इ. स. १२९४ मध्यें अल्लाउद्दिनानें युद्ध करून पराभव केला व त्याजपासून मोतीं, सोनें, वगैरे खंडणी घेतली. अशा रीतीनें दोन निरनिराळे रामराजे पैठण व देवगिरी येथें होते. दोघांच्या मुलांचीं नांवें भिन्न होतीं. पण दोघांच्या मधल्या मुलाचें नांव मात्र बिंब किंवा भीम हें एकच होतें. एक लढाई इ. स. १२८८ मध्यें व दुसरी इ. स. १२९४ मध्यें झाली, इतकी हकिकत देऊन 'कौस्तुभ चिंतामणि' ग्रंथ व बिंबाख्यान (लक्ष्मण प्रभूंचें बिंबाख्यान) ह्यांचा समन्वय करून पुढील हकिकत शामराव मोरोबा देतात, कीं बिंबदेवानें व प्रतापशहानें कांहीं दळभारासह पैठणहून गुर्जरदेशीं स्वारी केली. सालेर व मोलेर प्रांतीं गेले. तेथून केशवपूर वडनगर, दाहोटें यावरून आळंदापुरास आले. इकडे देवगिरीचा केशवदेव राजा मृत्यु पावला. इ. स. १२९३ मध्यें बिंबदेव व प्रतापशा हे आळंदापुराहून गुर्जरदेशीं गेले. तेथून अनहिलवाडा व पुरपाटण घेतलीं व दक्षिणेस उतरून कोकणांत सचीण, चिखली, कळवें, दाटें, श्रीवत्सापूर हीं घेतलीं. नारोजी सिरण्यास मारून व यशवंतरावजवळून साष्टी घेऊन वाळुकेश्वरीं व मुंबईस आले, व मरोळ येथें स्थायिक झाले.

वरील हकिकतींत व पूर्वीच्या हकिकतींत रामराजा हा गोविंदराजाचा वंशज होता, हें एक साम्य आहे. पण पैठणचा रामराजा हाच देवगिरीचा राजा होय, असें प्रथमच्या हकिकतींत असून शामराव मोरोबा दोन रामराजे व दोन मुसलमान राजे मानतात. पण शेवटीं एकाच रामराजावर येऊन पैठणच्या बिंबराजाचा व प्रतापशाचा उल्लेख करून पुढील इतिहास त्यांचा म्हणून देतात. पण देवगिरीच्या रामराजाचे मुलगे शंकर व

भीम ह्यांच्याबद्दल मुग्ध रहातात. दुसरा कोणताहि ग्रंथकार दोन रामराजे होते, असें देत नाहीं. पहिला रामराजा सूर्यवंशी होता व दुसरा रामराजा यदुवंशी होता, असें शामराव मोरोबांचें म्हणणें. अर्थात् तो दुसरा रामराजा यादव होता. शामराव नारायण प्रधान हे आपल्या कायस्थ प्रभूंच्या इतिहासांत म्हणतात, कीं "दिल्लीच्या अल्लाउद्दिनानें माळवा प्रांतांत स्वारी केली तेव्हां त्या प्रांतांत

सिंहीच्या बिंबराजाबरोबर

येऊन राहिलेलीं कांहीं क्षत्रिय कुळें मेवाड माळव्यांतून मुंगीपैठणाकडे इ. स. १३०० च्या सुमारास आलीं. पण लागलेंच पैठण शहर मुसलमानांनीं जिंकल्यानंतर बिंबराजानें केवळ माहीम येथें आपली राजधानी केली." ह्यावरून वरील हकिकतीस इतकाच पुरावा मिळतो, कीं

बिंबराजाचें मूळ सिंहीच्या राजघराण्यापर्यंत पोचतें.

तसेंच बिंबराजाची दक्षिणेकडील स्वारी, अल्लाउद्दिनाच्याकडून पैठण येथें पराभव पावल्यानंतर केव्हां तरी पुढें झाली आहे. म्हणजे देवगिरीच्या युद्धाच्या आधीं केव्हां तरी पैठणास अल्लाउद्दिनाबरोबर रामदेव वगैरेंचें युद्ध झालेलें होतें. 'कौस्तुभचिंतामणि' कर्ता विष्णुदास नामा ही हकिकत देतांना सांगतो, "देवगिरीचा रामदेव राणा सूर्यवंशी क्षत्रिय असून त्याचें गोत्र भारद्वाज व कुळदेवता प्रभावती होय. रामदेवावर महंमद तुर्कानें देवगिरी येथें चाल केली. रामदेव प्रभू सरदार मारले गेले. रामदेवास मुलगे तीन. केशव राजा, बिंबदेव व प्रतापशा. प्रभू सरदारांनीं केशवदेवास देवगिरीच्या गादीवर बसविलें. बिंबदेव सूर्यवंशी व सोमवंशी राजे बरोबर घेऊन पैठणास आला. व प्रतापशानें आळंदापुरास राज्य स्थापिलें. सुलतान अल्लाउद्दिनानें पैठणावर स्वारी केली, तेव्हां बिंबदेवानें गुजराथेंत सैन्य पाठवून केशवपूर व वडनगर घेतलें व कांहीं दिवस आळंदापुरास राहिला. इकडे केशवराय मरण पावल्यावर त्याचा मुलगा रामदेव-राजा देवगिरीस गादीवर बसला. बिंबदेवानें प्रतापशहासह कोंकणांत नारोजी सिरणास मारून संजाणचें राज्य घेतलें. केळवें माहीम व वसई घेतली ठाण्याच्या यशवंतरावास मारून पुढें माहीम घेऊन त्यास बिंबस्थान हें नांव दिलें." प्रथमच्या हकिकतींत व ह्या हकिकतींत साम्य हें आहे, कीं बिंब सूर्यवंशीय असून त्याची कुळदेवता व गोत्र हीं दोन्ही प्रथमच्या हकिकतींत दिलेलीं आहेत, तींच ह्या हकिकतींत आहेत. हा ग्रंथकर्ता एकच रामदेव देतो व त्याचे पुत्रांचीं नांवें व त्यांच्या राज्यांचीं पृथक् ठिकाणें देतो तींहि प्रथमच्या हकिकतीबरोबर जुळतीं आहेत; पण हा अल्लाउद्दिनाच्या दोन लढाया न देतां, पहिली लढाई देवगिरीची देतो व त्या वेळीं महंमद तुर्क हा मुसलमान

सरदार होता, असें म्हणतो; व पैठणची लढाई व देवगिरीची लढाई यांचा क्रम बदलून सांगतो. तसेंच बिंबाबरोबर प्रतापशा होता, असेंहि सांगतो. मात्र हा ग्रंथकर्ता एक नवीनच हकिकत सांगतो, कीं बिंबाबरोबर सूर्यवंशी व सोमवंशी राजेच फक्त होते, व प्रभू सरदार केशवदेवाबरोबर होते. म्हणजे बिंबाबरोबर कोंकणांत प्रभू सरदार आले नाहींत, असें ह्याचें म्हणणें आहे. लक्ष्मण प्रभूच्या बिंबाख्यानांत खालील हकिकत आहे. "सिंही गांवास निळअरीराय राजा होता. तो पाठारे प्रभू ज्ञातीचा असून त्याचें गोत्र भारद्वाज व कुळदेवता प्रभावती होती व तो सूर्यवंशी होता. त्याचें उपनांव राणे होतें. कमळादिनराज, अश्विनदेवराज, श्रीभानराज, गोविंदराज, कृष्णराज अशी वंशावळ असून रामदेव त्या वंशांतला होय. त्या रामदेवरावाला तीन मुलगे होते. वडील मुलगा देवगिरीचे गादीवर बसला. दुसरा बिंब हा सूर्यवंशी व सोमवंशी राजे घेऊन पैठणास राज्य करूं लागला. पण त्याचें राज्य त्याचवेळीं उदेपुरासहि होतें. तिसरा मुलगा प्रतापशा आळंदापुरास राज्य करूं लागला. देवगिरीच्या केशवदेवाचा मुलगा रामदेवराजा देवगिरीच्या गादीवर केशवदेवाचे मृत्यूनंतर बसला. बिंबदेव प्रतापशास बरोबर घेऊन

राजगुरु हेमाडपंतासह

गुजराथ देश वगैरे काबीज करीत गेला." आपल्या प्रथमच्या हकिकतीस या हकिकतीनें पुष्टि मिळते. आपण सूर्यवंशीय अरिरायाचा उल्लेख आपल्या प्रथमच्या हकिकतींत केलेला आहे. दोन्ही हकिकतींत गोत्र, कुळदेवता, वंश, उपनांव हीं जुळतच आहेत. फक्त लक्ष्मण प्रभू हा अरिरायाची जात पाठारे ही न देतां प्रभू जात देत आहे. लक्ष्मण प्रभू हा एक त्यास प्रभू म्हणतो. पण राणेंच्या बिंबाख्यानांत व राजवाडेंच्या महिकावतीच्या बखरींत त्याला पाठारा ज्ञातीचाच म्हटलें आहे. प्रथमतः इ. स. १२८८ मध्यें अल्लाउद्दिनानें पैठणावर चाल केली, ही हकिकत प्रथमच्या हकिकतीशीं जुळती आहे. मात्र बिंबदेवाबरोबर प्रतापशा व हेमाडपंत होते व सूर्यवंशी व सोमवंशी राजे त्याजबरोबर होते, ही हकिकत विशेष आहे. बिंब हा गोविंदराजाचा वंशज आहे, हें ह्यानेंहि सांगितलें आहे. मात्र मधल्या राजांचीं नांवें भिन्न आहेत. जनार्दन गणेश माहिमकर आपल्या बखरींत रामदेव हा क्षुद्र कुळांतला राजा होता, असें म्हणतो व त्याचें नांव जाधव होतें, असें तो स्वतःचें मत देत आहे. पण त्यास तो पुरावा देत नाहीं. त्यानें नकललेल्या बखरींत मात्र तो सूर्यवंशी क्षत्रिय होता व त्याचें आडनांव राणे होतें असें लिहिलें आहे. इ. स. १२९४ त अल्लाउद्दिनानें पैठणास रामदेवाचा पराभव केला असें म्हणतो. पण वरील सर्व हकिकतींत ही पैठणची लढाई इ. स. १२८८ त झाल्याचें म्हटलें आहे. "रामदेवानें भीमदेव नांवाच्या दुसऱ्या मुलास अनहिल-

वाड्याच्या गादीवर बसविलें व ह्या भीमदेवानें दक्षिणेंत व पश्चिमेंत मुसलमानांचें प्राबल्य झालेलें पाहून इ. स. १२९६ मध्यें सूर्यवंशी कुळें बारा व सोमवंशी कुळें चौसष्ट घेऊन दक्षिणेंत आला. नायक राजाचा पराभव केला व चिंचणी, तारापूर, इत्यादि स्थळें घेऊन मुंबई, माहीम येथें राज्य स्थापिलें," असें त्यानें आपल्या बखरींत म्हटलें आहे. पण पहिल्या हकिकतींतहि कोंकणांतील स्वारी इ. स. १२९४ मध्यें झाल्याचें नमूद असून हा बखरकार त्या स्वारीचें साल इ. स. १२९६ देत आहे. म्हणजे दोन्ही सालांत तफावत दिसून येते. सध्यां उपलब्ध अशा साऱ्या बखरींच्या हकिकतींचीच तुलना चाळली असल्यामुळें वर दिसून येणारी तफावत व साम्य दाखविण्यांत येत आहे. बाहेरच्या इतिहासाबरोबर तुलना करतांना ह्यांतील कोणती हकिकत खरी ठरणार आहे, हें त्या ठिकाणीं ठरलें जाईल. म्हणजे पैठण व देवगिरी अशा दोन ठिकाणीं अल्लाउद्दिनानें लढाया दोन निरनिराळ्या कालीं केल्याचें वरील एकंदरींत हकिकतींच्या निष्कर्षावरून म्हणतां येतें. आतां दोन वेळां अल्लाउद्दीन दक्षिणेंत आला होता का? हें इतर इतिहासावरून ताडलें पाहिजे. तसेंच शामराव मोरोबा म्हणतात, कीं रामचंद्र यादव पैठणच्या युद्धांत इ. स. १२८८ त मेला आहे. केशवदेवाचा मुलगाहि रामचंद्रच होता, असेंहि वरील हकिकतींत आलें आहे.

वर दिलेल्या हकिकती ह्या बिंबाख्यानाच्या पान १०७ व महिकावतीच्या पान ८८ वरील हकिकतीबरोबर कितपत जुळतात किंवा निराळ्या पडतात इतक्याच हेतूनें देण्यांत आलेल्या आहेत. ह्यावरून कोणता निर्णय ठरवावयाचा हें बाहेरील आणखी पुराव्यांच्या अभावीं आज ठरवितां येत नाहीं. बिंबाख्यानांतील ह्या हकिकतींत राजा बिंबाचें मूळ उदेपुरापर्यंत जात आहे, इतकेंच दिसून येतें. मध्यंतरीची सर्व हकिकत गाळून एकदम रामचंद्र यादवाचा अल्लाउद्दिनानें इ. स. १२८८ मध्यें पैठणास पराभव केला व त्यानंतर बिंबदेव कोंकणांत इ. स. १२९४ त आला, असें बिंबाख्यानांत म्हटलें आहे. ह्यांतील इ. स. १२८८ हें साल कै. राजवाडे यांना पटत नाहीं; त्यांचें म्हणणें असें आहे, कीं हें इ. स. १२९४ सालच आहे. पण बखरीच्या नकलकाराला न उमगल्यामुळें किंवा सहा (६ च्या) आकाडयाचे खालील वरील फरफाटे पुसले गेल्यामुळें त्यानें १२१६ च्या शकाबद्दल १२१० शक लिहिलेला आहे. कै. राजवाडे ह्यांचें म्हणणें खरें धरलें तर वरील एका आपत्तींतून आपण मोकळें होतों, व अल्लाउद्दिनानें दोन स्वाऱ्या केल्याचें उगाच गृहीत धरावें लागतें, तें न धरतां संगति जुळते. इ. स. १२९४ सालीं पैठणास लढाई झाल्याचें सिद्ध होतें. शामराव मोरोबा किंवा नारायण विठ्ठल पुरंदरे ह्यांनीं इ. स. १२८८ हेंच साल कायम धरल्यामुळें त्यांनीं ही लढाई १२८८ सनांत झाल्याचें म्हटलें आहे. त्यांचे मतानें रामदेवराणा त्या युद्धांत मरण पावला.

जनार्दन गणेश माहिमकर म्हणतात, कीं इ. स. १२९४ त रामदेव राण्याचा पराभव अल्ला-उद्दिनानें पैठणास केला व बिंबदेव १२९४ सनांत दक्षिणेंत आला. ह्या पैठणच्या युद्धाचा सन १२९४ वर म्हटल्याप्रमाणें कै. राजवाडे यांच्या म्हणण्याप्रमाणें गृहीत धरितां बरोबर येतो. लक्ष्मण प्रभूंच्या बिंबाख्यानांतहि इ. स. १२८८ दिलेला आहे, तोहि तसाच नक्कल करतांना घडलेला दोष आहे. ही लढाई पैठणास झाली, असें बखरकार म्हणतात; पण ही लढाई देवगिरीस झाल्याचें मुसलमान तवारीखकार म्हणतात; व ह्या लढाईचा सन १२९४ हाच ते तवारिखकार देतात. जनार्दन गणेश ह्यानें इ. स. १७३९ नंतर बखर लिहिली आहे; तींत तो ह्या तवारिखा किंवा इतर माहिती ताडून सन १२९४ मध्यें पैठणची लढाई झाल्याचें देतो.

जोंपर्यंत पैठण व देवगिरी येथें अल्लाउद्दिनानें दोनदां रामचंद्र यादवावर स्वाऱ्या केल्याचें इतर बहिःपुराव्यानिशीं किंवा तवारिखांच्या माहितीवरून सिद्ध होत नाहीं, तोंपर्यंत **ह्या दोन्ही स्वाऱ्या एकच होत्या व ही स्वारी सन १२९४ तच झाली होती, असें स्पष्ट मानावें लागतें.**

ह्या हकिकतीच्या प्रथमारंभीं भीम होता व तो इ. स. १०२४ त गुजराथेंतून दक्षिणेंत आला, असें सांगण्यांत आलें आहे. त्यानंतर आतांपर्यंत राजा बिंब हा यादव वंशीय राजा असून तो इ. स. १२९४ त देवगिरीच्या लढाईनंतर इ. स. १२९६ मध्यें दक्षिणेंत आल्याचें बखरींतील वर दिलेल्या अनेक हकिकतीवरून स्पष्ट झालें आहे. आतां बिंबाख्यानांत व महिकावतीच्या बखरींत अगदीं निराळी हकिकत देण्यांत आलेली आहे. त्याचे आधीं निरनिराळ्या बखरींतील वर दिलेल्या हकिकतीबरोबर इतर दुसऱ्या ग्रंथकारांच्या हकिकती ताडून पाहाणें जरूर आहे.

रा. ब. पी. बी. जोशी म्हणतात, कीं बिंबदेव किंवा भीमदेव, हा रामचंद्र यादवाचा दुसरा मुलगा व महादेव यादवाचा नातू होय. इ. स. १२६० मध्यें देवगिरीच्या ह्या महादेव यादवानें ठाण्याच्या सोमेश्वर शिलाहाराचा पराभव करून आपला अंमल कोंकणावर बसविला. इ. स. १२७२ सालीं अच्युत नायक व इ. स. १२९० त कृष्ण कावळे असे दोन ब्राह्मण कोंकणावर यादवातर्फे सुभेदार होते. इ. स. १२९४ त दिल्लीच्या बादशहाचा पुतण्या अल्लाउद्दिन यानें देवगिरी येथें रामदेवावर स्वारी केली. त्यावेळी रामदेवानें वंशरक्षणासाठीं पुरुषोत्तमपंत कावळे व इतर उमराव बरोबर देऊन भीमदेवास (बिंबदेवास) उत्तर कोंकणांत पाठविलें. इ. स. १२९४ मध्यें भीमदेवानें कोंकणचा सुभेदार कृष्ण कावळे याजकडून कारभार आपल्या हातीं घेतला. बिंबाख्यान व कौस्तुभचिंतामणि ह्या ग्रंथांवरूनहि बिंबदेवानें इ. स. १२९४ त कोंकण

घेतलें असें स्पष्ट दिसतें, असें उपरोक्त जोशी हे म्हणतात. त्यांचें हें म्हणणें आपण वर दिलेल्या हकिकतींशीं जुळतें. बखरींचा जो निष्कर्ष वर काढला आहे, त्यावरून इ. स. १२९४ मध्येंच बिंबदेव हा कोंकणांत आलेला स्पष्ट होतें.

कदाचित् असेंहि असू शकेल, कीं इ. स. १२९० मध्यें बिंबदेव हा एकदां आपल्या बापाचे सुभेदार काय कामें करतात हें पहावयास आला असावा, व कृष्ण कावळे याचें काम त्याला पसंत न पडून तो प्रान्त बिंबानें कांहीं काळपर्यंत आपल्याकडे घेतला असावा. त्यानंतर कांहीं काळानें बिंब परत गेला असेल, व पुन्हां देवगिरीच्या आपत्तीनंतर इ. स. १२९४ त कोंकणांत आला असावा, असें संगति जुळण्यासाठीं मानावें लागतें.

रामचंद्र यादव इ. स. १३०९ मध्यें मृत्यु पावला. त्यानंतर शंकर गादीवर बसला. त्याला इ. स. १३१२ मध्यें मलिक काफूर यानें ठार मारलें व आपण देवगिरी बळकावली. ह्या सर्व हकिकतींत बिंब किंवा भोम यांच्याबद्दल स्पष्ट माहिती डॉ. भांडारकर हे देत नाहींत. रामचंद्र यादवाचें राज्य कोंकणावर सुभेदारांचे मार्फत चालत होतें. देवगिरीची लढाई इ. स. १२९४ मध्येंच झाली व रामचंद्र यादवास शंकर नांवाचा मुलगा होता, ह्या तिन्ही बाबतींत मागील हकिकतींशीं जुळण्यासारख्या दिल्या आहेत. रामचंद्र यादवास दुसरा मुलगा होता, असा उल्लेखहि डॉ. भांडारकर करीत नाहींत. त्यांनीं दिलेल्या वंशावळींतहि रामचंद्र यादवास एकच मुलगा आहे, असें दाखविलें आहे.

राजा बिंब हा गुजराथेंतून इ. स. १०२४ मध्यें कोंकणांत आला, असें एक पक्ष म्हणतो. राजा बिंब देवगिरीहून कोंकणांत इ. स. १२९४ त आल्याचें दुसरा पक्ष म्हणतो. बिंब ह्या नांवाचे राजे इ. स. ११३८ मध्यें कोंकणांत गुजराथेंतून आले व पुन्हां बिंब नांवाचा राजा इ. स. १२९४ मध्यें देवगिरीहून आला, हें तिसरें म्हणणें. बिंबानें माहिम येथें राज्य स्थापिलें, त्याच्याबरोबर पाठारे क्षत्रिय, पाठारे प्रभू, पळशे ब्राह्मण, व शेषवंशी भंडारी ही मंडळी येऊन कोंकणांत म्हणजे विशेषतः बिंबस्थानांत स्थिर झाली.

बिंबाख्यानाची पोथी व महिकावतीची बखर ह्या दोन्ही बखरी एकच आहेत. त्या बखरींत त्या वेळचा सर्व इतिहास असून ह्या प्रांतांत स्थायिक झालेल्या सर्व ज्ञातींच्या कुळांचा महत्त्वाचा इतिहास आलेला आहे. त्यांत राजकीय, सामाजिक, धार्मिक या स्वरूपांच्या घडामोडी दिलेल्या आहेत. ह्या दोन्ही बखरी म्हणजे नायकोरावाचा काळ. अर्थात् ह्या बखरी सामान्य स्वरूपानें त्या वेळीं कोंकण प्रांतांत वसत असलेल्या सर्व कुळांचा व वंशाचा इतिहास होय.

(१) इ. स. १२९४ मध्यें दिल्लीच्या अल्लाउद्दिनानें देवगिरीवर स्वारी करून रामदेवराजा व त्याचा मुलगा शंकरदेव यांचा पराभव केल्यानंतर कोणी एक बिंब किंवा भीम राजा ह्यानें उत्तर कोंकणचा प्रदेश घेऊन मुंबई बेटांत राज्य केलें. या वेळीं तो अनहिलवाड्याहून आला त्याच्याबरोबर पैठण, चंपानेर व इतर ठिकाणांहून शुक्ल यजुर्वेदी (पळशे) ब्राह्मण व दुसरीं सहासष्ट कुटुंबें आलीं.

—'The Rise of Bombay', by S. M. Edwards, P. 22—23.

चालुक्य (सोळंखी) वंशांतील भीमदेव राजा गुजराथेंतील अनहिलवाडा येथें राज्य करीत होता. इ. स. १०२४ त सोमनाथ येथें गझनीच्या महमदानें त्याचा पराभव केल्यानंतर तो पाटणहून येऊन महिकावतीस (माहिमास) राहिला.

—Ibid. P. 23.

अल्लाउद्दिनानें देवगिरीच्या रामदेवाचा इ. स. १४९५ त पराभव केल्यानंतर त्याचा मुलगा बिंबशहा आपला राजगुरु पुरुषोत्तमपंत कावळे व अकरा उमराव यांचे समवेत समुद्रमार्गें माहिमास आला.

—Ibid. P. 25.

राजा भीमदेव देवगिरीच्या रामदेवाचा दुसरा मुलगा हा इ. स. १३०३ त वारला.

—Ibid P. 27.

असेंहि म्हणण्यांत येतें, कीं दिल्लीचा बादशहा अल्लाउद्दिन खिलजी यानें देवगिरीस वेढा दिल्यानंतर रामदेव राजाचा मुलगा भीमदेव याचेबरोबर प्रभू, पांचकळशी आणि त्यांचे गुरु पळशीकर ब्राह्मण हे सर्व पैठणाहून आले.

-- Ibid P. 31.

(२) रामचंद राजाचे दोन मुलगे. वडील मुलगा शंकरदेव व दुसरा भीमदेव. अल्लाउद्दिनाचे स्वारीच्या वेळीं ते बापाजवळ नव्हते. शंकरदेव हा तीर्थयात्रेस गेला होता. भीमदेवानें उत्तर कोकणांतील सुभेदार कृष्ण कावळे याचेपासून राज्यसूत्रें आपले हातीं घेऊन तो तेथें राजप्रतिनिधि म्हणून राज्य करीत होता. तर बिंब आपल्या बापाच्या उत्तर कोंकणप्रांतांत पहिल्यानें सुभेदार या नात्यानें ठाणें येथें राज्यसूत्रें चालवीत

होता व पुढें त्याच्या बापाच्या मृत्यूनंतर स्वतंत्र राजा बनला, असें मानणें सयुक्तिक होईल.

— डॉ. निळकंठ अनंत पुरंदरेकृत
'दक्षिणचे पूर्वीचे राजे,' पान ३८, ३९, ५७,
— पी. बी. जोशीकृत 'उत्तर कोंकणचा
प्राचीन इतिहास,' पान ३५.

इ. स. १०२४ त महमदानें पराभव केल्यानंतर गुजराथच्या राजा भीम हा अनहिलवाड्याहून माहिमास येऊन राहिला.

— 'Origin of Bombay' by Dr.
G. Da Cunha referred to in
'The History of the Pathare
Prabhus' by P. B. Joshi. P. 28.

पाठारे प्रभू हे गुजराथच्या भोगिला (वाघेला) राजा भीम याचे वंशज होत.

— Ibid. P. 29.

पत्तन प्रभूसंबंधीं एस्. एम्. नायक म्हणतात, कीं रामराजे हे दोन होते. पैकीं एक १३ व्या शतकाच्या अखेर देवगिरीस राज्य करीत होता.

— Ibid. P. 29.

यावरून असें दिसतें, कीं देवगिरीच्या यादव राजाचा दुसरा मुलगा भीमदेव याचेबरोबर पाठारे (प्रभू) व त्यांचे उपाध्ये कोकणांत येऊन राहिले.

—Ibid P. 30.

(३) इ. स. ११५० त गुजराथेंतल्या सोळंकी वंशांतले राजे समुद्रमार्गे येऊन मुंबई—माहिमास राहिले. अशा गोष्टी पुन्हां लिहिण्यांत येऊन मऱ्हाठा नांवांना साजेलशीं नांवें बदलण्यांत आलीं. सर्वसाधारणतः लोकांचा असा समज आहे, कीं अहमदनगरच्या जवळील पैठणचा राजपुत्र बिंब हा होता. गुजराथेंतील सोळंखी यांची राजधानी पैठण, पाटण किंवा अनहिलवाडा पाटण या नांवांचा गोंधळ उडालेला आहे. वसाहतीच्या प्रकरणांत असें सांगण्यांत येतें, कीं प्रभू, पान्चकळशी आणि पळशे ब्राह्मण हे मूळचे गुजराथ अगर त्या आसपासचे होत, हें संशयास्पद होय. कारण तेराव्या शतकाच्या अखेरीस म्हणजे इ. स. १२८६–१२९२ मध्यें देवगिरीचे यादव यांचें उत्तर

कोंकणवर स्वामित्व होतें. यावरून भिवंडीचें जुनें नांव बिंबस्थान हें दक्षिणच्या बिंबाच्या दृष्टीनें अनुरूप आहे.—'The Bombay Gazetteer,' Vol. XIII, Part II page 437.

(४) देवगिरीच्या याद्वांची वंशावळः—

मालुजी

भिलामा (११८७–११९१) जमीत्रपाळ (जैनुजी) (११९१–१२१०) सिंघणा (१२१०–१२४७)

कृष्ण (कानधारा) (१२४७–१२६०) महादेव (१२६०–१२७१)

रामचंद्र (रामदेव) (१२७१–१३०९) अमना

शामकुरा (१३०९–१३१२)

याचा मेव्हणा हरपाळ हा इ. स. १३१८ त मारला गेला.

—'The History of the Deccan,' by
Dr. R. G. Bhandarkar, P. 209.

(५) याद्वांच्या संबंधीं:—

कृष्णेच्या उत्तरेस भिलामानें आपलें स्वामित्व ठेविलें व देवगिरी ही आपली राजधानी केली. इ. स. ११८७.

पन्हाळ्याचा भोज हा शिलाहारांचा वंशज होता. त्याचा पराभव झाल्यानंतर कोल्हापूरचें राज्य यादवांच्या प्रांतास जोडण्यांत आलें. यादवांनीं हा प्रांत सोडला व उत्तर कोंकणावर राज्य केलें.

इ. स. १२९० त रामचंद्राचा भारद्वाज गोत्रांतला राजप्रतिनिधि म्हणून कृष्ण हा होता.

इ. स. १२९४ त अल्लाउद्दिन आठ हजार सैन्य घेऊन दक्षिणेकडे एलिचपुरापर्यंत येऊन अकस्मात् थोडक्याच वेळांत देवगिरीस टाकला. पण देवगिरीच्या राजानें त्यास मोलाची संपत्ति दिल्यानें तो परत गेला.

रामचंद्र राजा हा बरींच वर्षें दिल्लीच्या बादशहाला खंडणी देत नसे. बादशहानें मलिक कपूर नांवाच्या सेनापतीला मार्च १३०७ मध्यें देवगिरीस पाठविलें. पुन्हां

इ. स. १३०९ मध्यें दक्षिणेंतील तेलंगण काबीज करण्यास मलिक कपूरला बादशहानें पाठविलें होतें. जातांना तो देवगिरीस थांबला होता.

शंकरदेवहि खंडणी देत नसे. म्हणून बादशहानें इ. स. १३१२ त मलिक कपूरला देवगिरीस पाठविलें. त्यानें शंकरदेवाला ठार मारून त्याचें राज्य घेतलें व तो तेथेंच राहूं लागला.

इ. स. १३१८ त दक्षिणेंतील बंडाळी मोडण्यासाठीं मुबारीक हा आला. त्यानें हरपाळ याला कैद केलें व शेवटीं ठार मारलें.

—Ibid. P. 201–208.

शिलाहारांच्या संबंधीं:—

यांच्या वंशजानें उत्तर कोंकणांतील १४०० गांवांवर राज्य केलें. पुरी हा गांव राजधानी करण्यांत आला होता. शिलाहारांचें दुसरें कुटुंब दक्षिण कोंकणांत होतें. त्यांची राजधानी खारपाटणच्या आसपास असावी. तिसरें कुटुंब कोल्हापूर, मिरज व कऱ्हाड येथें व नंतर दक्षिण कोंकणांत राज्य करीत होतें. राष्ट्रकूट साम्राज्याचा पाडाव झाल्यावर शिलाहारांचीं कुटुंबें स्थिर झालीं होतीं.

गंदरादित्याच्या मागून त्याचा मुलगा विजयार्क इ. स. ११४३ ते ११५१ त गादीवर होता. त्यानें ठाण्याच्या आसपासच्या प्रांतावर आपल्या मुख्य अम्मलदारांची नेमणूक केली; आणि गोव्याच्या राजपुत्राला गादीवर बसविलें. विजयार्कांच्या नंतर दुसरा भोज यानें पन्हाळगडावर राज्य चालविलें; तें इ. स. ११७९ ते १२०५ पर्यंत. त्यानें कोंकणांतील खारेपाटणजवळील करोळी हें गांव इनाम म्हणून दिलें.

कलजना येथील नवा राजा विज्जना यानें भोजावर अम्मल गाजविण्याची हाव धरली. देवगिरीच्या यादवांच्या वर्चस्वामुळें भोज हा स्वतंत्रता मानूं लागला; पण सिंघणा यानें भोजाला नामोहरम करून त्याचा सर्व मुलुख यादवांच्या राज्यास जोडला.

—Ibid. P. 211–216.

मालव राज्याचे पूर्वेस हद्दीला हद्द भिडून चेदीचें राज्य होतें. उत्तरेस चितोडचें. पश्चिमेस अनहिलवाडयाच्या चालुक्यांचें; दक्षिणेस कल्याणच्या चालुक्यांचें होतें.... गुजराथेंत त्याचा प्रतिस्पर्धी भीम होता. त्यानें इ. स. १०२१ ते १०६३ पर्यंत राज्य केलें....दक्षिणेंत कल्याण येथें जयसिंह १०१८ ते १०४० व सोमेश्वर १०४० ते १०६९ हे भोजाचे समकालीन राजे होते.

इ. स. १०१९ च्या सुमारास भोजानें कोंकण जिंकलें...भीमानें कोंकण जिंकलें हें गूढ अजून उकललेलें नाहीं. कोंकणच्या स्वारीची उत्पत्ति बहुधा कल्याणच्या पांचव्या विक्रमादित्याच्या (१००९–१०१८) च्या लढाईतून झाली असावी.

भोजाच्या मृत्यूपूर्वी किंवा नंतर कर्णदेव व भीम यांजबरोबर झालेलें युद्ध... भीम व कर्ण यांनीं धारेवर स्वारी केली. त्यांतच भोज मृत्यु पावला, अशी हकिकत मेरूतुंगानें दिली आहे.

हा भोज प्रतिहार सार्वभौम घराण्यांतील भोज नव्हे;

कारण तो भोज (८४०–८९०) कधींच मृत झाला होता. हा भोज इ. स. १०५५ मध्यें मृत्यु पावलेला होता. हा माळव्याचा भोजच असला पाहिजे.

गुजराथच्या चालुक्यांचें (सोळंखींचें) गोत्र भारद्वाज दिल्याचें एका चेंदीच्या लेखांत आढळतें. हा लेख १० व्या शतकांतला आहे.

चालुक्यांचें हेंच गोत्र होतें व अजूनहि रेवाचे व गुजराथचे सोळंखी हे हेंच आपलें गोत्र देतात. अर्थात् दक्षिणचे चालुक्य व (गोत्र मानव्य) व गुजराथचें चालुक्य हे भिन्न होत.

नागराजाचा पुत्र भीम यानें इ. स. १०२२ ते १०६४ पर्यंत राज्य केलें. माळव्याचा भोज व चेंदीचा कर्ण यांच्याबरोबर तो समकालीन होता. यावेळीं गझनीच्या महमुदाची सोमनाथावर स्वारी झाली.......मूळराजाचे वेळीं महंमद घोरीनें गुजराथेवर स्वारी केली; पण त्याचाच पराभव झाला. ही लढाई इ. स. ११७८ त झाली.... त्याच्यानंतर भोळा भीम गादीवर आला....वाघेळे सरदार चालुक्य कुळाचीच एक शाखा असून त्यांचा संस्थापक अर्णोराज हा कुमारपालाच्या मावशीचा मुलगा होता. त्यानें कुमारपाळास गादी मिळवून देण्याच्या कामांत मदत केल्यामुळें कुमारपाळानें त्यास अनहिलवाड्याजवळील व्याघ्रपल्ली हा गांव इनाम दिला. ह्या गांवावरून वाघेळा हें कुळनांव उत्पन्न झालें...वीरधवलानें त्रिभुवनपाळास बाजूस सारून अनहिलवाडा येथें वाघेळा राजघराण्याची स्थापना केली. त्यानंतर हें घराणें चार पिढ्या चाललें. विसलदेव, अर्जुनदेव, सारंगदेव व कर्ण (इ. स. १२८६ ते १३०४).

...इ. स. ११९७ मध्यें कुतुबुद्दीन ऐबक यानें गुजराथेवर स्वारी केली. महमुदाच्या वेळीं जसा पहिला भीम निघून गेला, तसा दुसऱ्या भीमानेंहि कुतुबुद्दिनाच्या वेळीं अनहिलवाडा टाकून एखाद्या दूरच्या किल्ल्याचा आश्रय घेतला असावा...तो पाटणला आला व इ. स. १२४२ पर्यंत त्यानें राज्य केलें.

अहिनल वाड्याच्या चालुक्य राजांची वंशावळः—

- मूळराज (राजीचा पुत्र इ. स. ९६१ ते ९९६)
  - चोमुंड (इ. स. ९९७ ते १००९)
    - वल्लभ (१०१०)
    - दुर्लभ (१०१०–१०२१)
    - नागराज
      - भीम (पहिला) (१०२१–१०६३)
        - कर्ण (१०६३–१०९३)
          - जयसिंह सिद्धराज (१०९३–११४३)
        - खेमराज उर्फ हरिपाळ
          - त्रिभुवनपाळ
            - महीपाळ
              - अजयपाळ (११७३–११७६)
                - मूळराज (दुसरा) ११७६–११७८
                - भीम (दुसरा) (११७८ ते १२४१)
                  - त्रिभुवनपाळ
            - कुमारपाळ (११४३–११७३)

ऐतिहासिक काळांत इ. स. ४०० पासून इ. स. ११०० पर्यंत कनोज हें मौखरी, वर्धन व प्रतिहार इतक्या राजकुटुंबांच्या ताब्यांत होतें.

असेंहि असू शकेल, कीं ते राठोड प्रथम अयोध्येंतून कोंकणांत गेले व तेथून कर्नाटकांत व शेवटीं कनोजास आले.

(६) ठाण्याचे शिलाहारः—

...यांची राजधानी शूर्पारक (सोपारें) ही होती. त्यांचें राज्य इ. स. ८०० ते १३०० पर्यंत ठाणें जिल्ह्यांवर होतें. आरंभीं ते राष्ट्रकुटांचे मांडलीक होते. पुढें ते

स्वतंत्र झाले. ठाण्याच्या मल्लिकार्जुनावर गुजराथचा चालुक्य राजा कुमारपाळ यानें अंब्रा सेनापति पाठविला....शंभर वर्षानंतर मार्कोपोलो नांवाचा प्रवासी येथें आला त्यावेळीं कोंकण स्वतंत्र होतें....महाराष्ट्र इ. स. १३२८ मध्यें मलिक काफरानें जिंकल्यानंतर मुबारक याच्या सेनापतीनें १४ व्या शतकांत ठाणें जिंकलें. पाटणहून (सोमनाथ किंवा अनहिलवाडा) एक बिंब नांवाचा राजा व पैठणहून कांहीं क्षत्रिय आल्याची कथा बॉम्बे गॅझेटिअर व्हॉ. १ भाग २ ह्यांत दिली आहे; व राजवाडे यांनीं नुकतीच विस्तृत रीतीनें वर्णिली आहे. पण...शिलाहारांचें राज्य नष्ट झाल्यावर निदान इ. स. १२६० नंतर ते कोंकणांत आले असावेत.

ठाण्याच्या शिलाहारांची वंशावळः—

अपराजित (९९०–१०११)
- वज्जड (१०१०–१०१६)
- अहिकेसरी (१०१७–१०२५)
  - छित्तराज (१०२६)
  - नागाराज
    - अनंतदेव (१०८५–११२५)
      - अपरादित्य (पहिला) (११२५–११४५)
        - हरपाळ (११४९–११५५)
          - मल्लिकार्जुन (११५५–११७५)
            - अपरादित्य (दुसरा) (११७५–१२००)
              - केशीदेव (१२०३–१२३८)
                - सोमेश्वर (१२५९)
  - माणवाती राजे (१०५५–१०८५)

—'मध्ययुगीन भारत,' भाग ३ रा, कै. चिं. वि. वैद्यकृत पान २४४ व पुढें.

(७) शिलाहार ते पोर्तुगीज:—

(इ. स. १२ व्या शतकाचे अखेरीस इ. स. १५६०)

"On the decline of the Silahars, a new dynasty arose to rule over Bombay and surrounding North Konkan during the latter part of the thirteenth century. The name of the first is given as Bhimdev or Bhima Raja..is placed between the Yadavas of Devagiri and the Anahilvada kings of Gujarat.

The local traditions, embodied in a work called 'Bimbakhyan' or a history of Bimb, said to have been written in 1139, refer to a Bhima, without giving his exact date. He is said to have marched into the Northern Konkan and conquered it, after defeating the Nayak chiefs of the locality. He is, then, said to have founded a city called Bharatbet or desert village and now Mahim. He is also said to have divided the newly acquired territory into fifteen mahals or districts, to which he appointed as many Adhikaris or governors. On his arrival he founded Bombay, covered with Babul trees, with few straggling houses, mostly occupied by Kolis or fishermen. It contained only two temples, of Shri Walkeshwar at Malabar point, which I have already mentioned and of Mumbadevi on the Esplanade. He also encouraged the cultivation of the Coconut trees, and introduced many new fruit-bearing plants. Bhima again divided each district into twelve Pakhadis attaching a fiet or manor to each Pakhadi. This attracted Brahmins and traders to the island who built houses, temples to their Kuladevis and Dharmashalas at Bombay, Mahim and the surrounding villages ...Bhima's plantations, groves, gardens and houses had indeed made it by this time a place of recreation and amusement.

It seems that Bhima or Bhimdeva was a Chalukya prince of the house of Solankis, whose capital was Anahilavada or Anahilapura in Gujarat. He was a powerful prince, who reigned for fortytwo years from 1022 to 1064 A. D. The Solanki princes were *Sivaites* holding the Somanatha of

Prabhasa in great veneration and the country was a great maratime power in their time.

Hitherto, only two of his copperplates have been known and published, one dated 1030 and the other 1037 A. D. But I have found a third one to commemorate the happy reign of this old monarch of Bombay.

It appears, that the connection of the Solanki Bhima with Bombay brings the latter more within the domain of Gujarat than that of the Dekhan. These are the two great ethnological and political regions between which 'the city of good life' has been oscillating from the time this group of islands first came within sphere of their influence."

About the Advance of the Portuguese Power :—

"On the cession of Bassein and its dependencies to the Portuguese Crown on the 23rd of December 1534 by Bahadurshah, the whole territory was found to be divided into districts, the latter into villages, and these again sub-divided into smaller portions of land. This system of land division may perhaps be traced upto the time of Bhimadeva, who had the same teritory divided into mahals...the latter into villages and so on. These divisions naturally suffered some modification during the Mohomedan rule, and also under the Portuguese, owing to the new order gradually introduced into the land revenue of the province.....

The Praganas (Mahals) were named Anzor (Anjor), Cairana (Kairana) probably Khairene, eight miles North of Belapur, Panachana (Panchana) probably Panvel, Comao (Kaman), Era (Virar) and Solgnao (Salgaon). The Cacabes were of Bacaim (Bassein), Tana (Thana), Caranja (Karanja), Aguaçim (Agasi), Maym (Mahim) and Cupara (Sopara). Then there were the custom-houses of Bassein. Sabja, Talus, Virar, Kaman, Agasi, Thana, Karanja, Mahim, Mazagaon and

Bombay. Besides these, there was the revenue derived from towns such as Bassein, Agasi, Thana, Karanja and Mahim. There was also a seperate revenue drawn from the island of Salsette and other islands;—during the Governorship of Francisco Barreto (1555–1558) the Praganas of Asserium, Manora.

After 1560, when D. Constantino De Braganca conquered Daman, the whole coast of the North Konkan, from Daman to Karanja had become one continuous Portugese possession. It was then devided into two parts. Under Daman were placed four districts of Sanjan, Dahanu, Tarapur and Khalve Mahim. Under Bassein there were eight divisions, viz. Saibana or Bassein proper, the Kasba of Thana, the island of Salsette, the island of Karanja, the island of Belapur and Shahabag (close to Belapur), the Pragana of Monori, the Pragana of Asserium and lastly the island of Bombay with the island of Colaba, which was again sub-divided into two. These two islets at the North-West extremity of the island of Bombay were first called Candil then Cobo, then again old Woman's Island; from Kolwan and now to-gether they form the so-called Upper and Lower Colaba from Kolbhat, the root of the designation being always Koli, whose hamlet it was.

Thus Bassein, at the time of the cession of the island of Bombay consisted of Praganas, four (4) cacabes, fiftysix (56) Pakhadis, 324 villages, 18 gardens, 10 Sadetors, 4 Terras (lands reclaimed) and 3 ilhas or (islands) exclusive of Bombay. These three islands called Navem, Seneon and Elefante, that is the Hog Butcher, and Elephanta islands with the 'Terra de Bendolac,' probably some land about the Bendkhal creek near Uran belonged to the Cacaba of the island of Karanja."

—'The Origin of Bombay' by

G. Da. Cunha, Pages 34-37 & 181-183.

(८) 'क्षात्रदूत'कर्ते प. वा. मुकुंदराव जनार्दन गोरेगांवकर, गांवदेवी–मुंबई म्हणतात :—

मूळराजा सोळंखी (इ. स. ९४२–९९७)
|
चोमुंड (इ. स. ९९७–१०२६)
|
भीमदेव (१०२२–१०७२)
|
कर्णराज (१०७२–१०९४)
|
सिद्धराज (१०९४–११४३)
|
कुमारपाळ (११४३–११७४)
(हा भीमराजाचा दुसरा | मुलगा; क्षेमराज याचा वंशज.)
अजयपाळ (११७४–११७७)
|
मूळराज (११७७–११७९)
|
भीमदेव (भोळा) (११७९–१२१५)

इ. स. ११९४ त कुतुबुद्दिन अनहिलवाड पाटणवर आला. भीमदेव इ. स. १२१५ त वारला. त्याच्या पाठीमागें अनहिलवाड पाटणा येथें वाघेळ वंशानें गुजराथेवर राज्य केलें. या वाघेळ वंशांतला सहावा राजा कर्ण वाघेला याचा अल्लाउद्दिन खिलजीनें पराभव केला.

चालुक्य अर्थात् सोळंखी कुळांत भीमदेव दोन होऊन गेले. केव्हां झाले, हा प्रश्न आतां वादग्रस्त राहिलेला नाहीं. कांहीं असलें, तरी पाठारे क्षत्रियांचा बिंबदेवाच्या आगमनाशीं कांहीं संबंध नाहीं.

(ता. १८-११-१९३६)

* * * *

सन १८७४–७८ सालीं 'इन्दुप्रकाश'चे जे इंग्रजी बाजूचे संपादक होते, त्यांचें नांव जनार्दन सुंदरजी कीर्तिकर असें आहे. "पाठारे" हें आडनांव हल्लीं जरी प्रभु ज्ञातींत प्रचारांत नसलें, तरी शिवाजीच्या वेळीं "दादाजी पाठारे" या नांवाचा एक

किल्लेदार होता असा उल्लेख आढळतो. हा "पाठारे" प्रभु ज्ञातीचा होता, असें मला शोधांतीं आढळून आलें. कांहीं जरी असलें, तरी एक गोष्ट निर्विवाद आहे, ती हीः—**पाठारे प्रभु व पाठारे क्षत्रिय ह्या दोन ज्ञाती मूळच्या एकाच वृक्षाच्या शाखा आहेत.** बिंबाला बाबा बनविण्याचा मूर्खपणा आम्ही केला नसता, तर पाठारे ज्ञातीचीं मूळ कुळें इ. स. ५५० च्या सुमारास उत्तरेकडून येऊन त्यांनीं महाराष्ट्र देश काबीज केला, हें ऐतिहासिक सत्य आहे, तें दृष्टिआड झालें नसतें. 'बिंबाचा शोध' या माझ्या व्याख्यानाची तयारी करीत असतांना या तोतया बिंबाची तोतयेगिरी मला पूर्णपणें आढळून आली! शेवटीं हा चोर महानुभवाच्या वाङ्मयांत मला आढळला! देशद्रोही, स्वजनद्रोही! स्वतःच्या बंधूंचा मुसलमानांकडून वध करवून उत्तर कोंकणाची गादी बळकावणारा व देवगिरीचें स्वतःच्या वडिलांचें राज्य बुडविण्यास साहाय्य करणारा हा कृतघ्न म्हणे आमचा पूर्वज! शंकरदेवाचें वैर त्यानें पूर्णपणें साधलें! याचा मुख्य साथीदार म्हटला म्हणजे यादवांच्या पदरीं असणारा सुप्रसिद्ध प्रधान हेमाडपंत हा होय. हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत यानेंच मुसलमानांना मुद्दाम बोलावून यादवांचें राज्य नष्ट केलें, असा त्याच्यावर राजद्रोहाचा उघड आरोप महानुभवाच्या 'भानुविजय' या ग्रंथांत करण्यांत आला आहे. आमचे हल्लींचे पळशे ब्राह्मण याच हेमाद्रीचे ऊर्फ हेमाडपंताचे वंशज होत; आणि म्हणूनच कै. केशव आप्पा पाध्ये यांना आपल्या पूर्वजांचें चरित्र लिहिण्याची स्फूर्ति झाली. या हेमाद्रींच्या चरित्रांत 'बिंबाचें मूळ कुळ व रूप' उघडें होऊं नये म्हणून त्यांनीं आपल्या संशोधनाचा दुरुपयोग करण्याची हातचलाखी केली आहे! ही चलाखी माझ्यासारख्या तज्ञ माणसालाच कळणें शक्य आहे. आपल्या बंधूची भावी वधू—गुजराथच्या शेवटच्या कर्ण राजाची मुलगी—देवयानी—हिला फसवून अल्लाउद्दिन खिलजीच्या लोकांच्या स्वाधीन यानेंच केली! वाहवारे तुमचा पूर्वज! आणि धन्य तुम्ही बिंबाचे वंशज! या बिंबानें मला वेडें बनविलें आहे.

(9) The late Prof. N. S. Takakhav, M.A., I.E.S.,

in his report and comments on the subject of Raja Bimb, says as under :—(Nasik, 15-12-1936.)

The comulative effect is to show that Bimb came (1) from Anhilwada Patan or (2) that he came from Deogiri sometimes *varried* to Paithan near Deogiri or (3) that though he came from one of those places he had something to do with the other place. Many versions are spoiled by sub-communal

bias....(a) under सिंही mention various versions that make Bimb Raja as having come from सिंही (b) so under पैठण or (c) under देवगिरी (d) so for प्रतापशा as the son of Bimb or (e) for Bimb as the son of प्रतापशा (f) versions that make for one Ramraja (g) those that make for *two* Ramrajas, and so on.

I am inclined to accept Deogiri rather than Anhilwada Patan, as the place from which Bimb came.

I am quite sceptical about Sinhi near Udepur. Does such place exist or did it exist at all in the neighbourhood of Udepur. No Historian proper has ever referred to it !

We have to deal first with Bimb and the place he immediately came from. It does not matter whether he (i. e. he or his family) ultimately came from Udepur, Kanoj or Dwaraka.

Of course, Udepur did not exist at the time of Allauddin Khilji. Udepur was founded in Akabar's time. These versions that speak of Sinhi as being near Udepur really mean Chitod and not Udepur.

It is strange that none of the versions or Bhakhars actually refer to Udepur.

Is Sinhi at all a mistake for Sirohi (a state near Mount Abu, not very far from Udepur) or does it perhaps stand for सेण्ण देश or सेऊण देश or सेवण देश or सिंहण दश ? This सेवण or सेऊण देश was the original place in the Deccan belonging to the Yadavas of Deogiri. The first man in the line of Deogiri Yadav Kings was सेवण or सिंगण or सिंहण. In their inscriptions they described themselves as lords of Dwarakā and Mathura, but in the Deccan their chief country was near the sources of the Godavari, and the upper Godavari country. The name सेण्ण देश or सेवण देश is sometimes applied to Khandesh, but modern opinion veers round to Sinnar (Singhanar or Sinhanar = Sinhan Nagar or Singhan + nagar, i. e. the Nagar of Sinhan or Singan, the Mulapurusha of the later Yadavas of Deogiri.)

These kings (inscriptions give them 22 names) distinguished themselves five as the Mandaliks of the Rashtrakutas and the later Chalukyas or Solankhis of Kalyani (now in the Nizam's state). Bhillam was one of the greatest generals under Vikramaka (the greatest of the Chalukyas of Kalyani) and Bhillam is deseribed as having been "The glory of the Chalukya family of Kalyani and to have saved them from their foes." Bhillam made himself independent in 1187 A. D. and died in 1191 A. D. That shows that Yadavas were already in the Deccan before Shahubuddin Ghory's time. His grandson was another Singhan who reigned from 1210 to 1227 A. D. He was even stronger than his grand-father. He made Deogiri his capital, known to the ancients as तगरा. Periplus, the Greek writer on Geography referred to Tagara as one of the greatest commercial towns of India. The kings called themselves Nagaradhipatis. Singhana conquered the greater part of Karnatak and the Southern Maratha Country. He held 84 fortified towns in the Maratha and Karnatak countries. The Yadavas claimed to be Yaduvanshis and therefore were connected with the somavanshis.

In one of the Bhakhars the name Darane (दरणे) is mentioned. In Raghunath Putalaji's Bimbakhyan, there are many references to the Daranes. For example at page 146, Mahi Darna is described (very strangely!) as a son of Bimb and to have succeeded Bimb....throws light on the Darnes and the Prabhus being originally of one community, and the Darnes are found only among the Pathare Kshatriyas. Of all the surnames in the Pathare Kshatriya cummunity, this surname Darne has a peculiar value, for it connects us directly with Ramdevrao (Ramchandrarao) Yadav, the last independent king of Deogiri. For when Ramdevrao Yadav some years after his defeat by Allauddin Khilji in 1296 A. D., died, one of his wives was forced by the dead King's son Shankardeo to perform the rite of *sati* and she had to do it against her will and against her creed, for she had joined the new cult of

महानुभावी ...It is quite clear that the Raja Bimb who brought our ancestors down to the Bombay coast must have belonged to Deogiri, rather than to Anhilwada Patan, and I belive some of the accounts in these Bakhars state it as a fact. 'The Kaustubha Chintamani' seems to state that Bimb was the younger brother of Shankardeo referred to above. And Shankardeo and afterwards Harpaldeo are mentioned by the Mahomedan historians as having succeeded Ramdeorao at Deogiri. Shankardeo was defeated and killed by Mullick Kaffer in 1312 A.D. and Harpaldeo, a son-in-law of Ramdeorao Yadav, was defeated and flayed alive by Kutubuddin Mubarak Taghlak, for haviug failed to pay tribute in 1318 A.D. Bimb may have brought his followers to the Bombay coast any time between 1296 and 1318 A.D., but probably before the succession of Harpaldeo; but the Konkan country might have been conquered by the Yadavas even before 1296 A. D.

These Darnes (दरणे) seem to have been very influential people, perhaps Mandalik Rajas, under the Yadavas. They seem to have had power in Khandesh and probably also much farther south near Sinner itself, which as I have said above was the nucleus of the सेउण or सेवग or सिंहण देश. But so far as we are concerned with that Bimb who brought our ancestors to the Bombay Coast, it is clear we can trace his connection with Deogiri through the marriage relation of these Darnes Ramdeorao Yadav.

Kanoj is ruled out because it was the seat first of the Parihar or Pratihar Rajputs and afterwards of the Rahtors in the time of Shahabuddin Ghori. The late Mr. P. B. Joshi indeed derived *Pathare from the Pratiharas* of Kanoj, but there is as direct connection historically worth noting between the Yadavas and the Pratiharas, unless indeed the Pratiharas also came with the Yadavas among the *five kulas* from which he derived the word पांचकळशी (i.e. पंचकुळवंशी in Mr. P. B. Joshi's opinion). The Pratiharas, the Chauhans, the Chalukyas (or

Solankis) and the Pramaras or Pawars were the four Agni—Kulas clans who derived their descent from the fire or Homa at Mount Abu.—A favourite theory is that the Agni-kulas represent the later Indo-Scythians Kshatriyas (though now it is clear that the Indo-Scythians themselves were Aryans) and the other clans, the Sesodias, the Yadavas etc. would then be the earlier Kshatriyas from Vedic times.

As stated above the Yadavas of Deogiri connected themselves with Dwarka and what is more, the डोयसाल Yadavas of Mysore also connected themselves with Dwaraka, and further the Wodeyar family of the present ruling Rajas of Mysore, who came into existence about 1400 A. D. claim descent from these Doysala Yadavas and also a descent from Dwarka.

And what about Anhilvada Patan? The Yadavas had wars with Anhilvada Patan and in the last stage of the fall of both these Hindu States, there seems to have been some connection and this may account for some Bakhars confused by stating that Bimb came from Anhilvada Patan and others that he came from Deogiri, and also for the phenomenon of mixed versions connecting Bimb both with Deogiri and Anhilvada Patan.

...There was one Ramdeorao who was common ruler both of Paithan and of Deogiri. We know historically that he was a usurper, and in the end God sent him his punishment at the hands of Allauddin Khilji and Mallick Kafur! The Bakhar accounts are exceedingly incoherent and mixed up.

...The Chowara dynasty was चावाडा or चावारा or चौरा. This dynasty was founded by VAN-RAJA who was the real founder of Anhilvada Patan. Another name of the dynasty was चापोट काट! They came into power after the fall of the वल्लभीs and ruled from 746 to 935 A. D. There were about four great kings of the चावडाs and their capital Anhilvada Patan

became the chief city of Gujarath. The power then fell into the hands of Mulraj Solankhi. A good account of the Chalukya or Solankhi dynasty of Gujrath is given by the Jain writer HEMACHANDRA of the 11th century. He mentions *twelve Chalukya Kings.* The last of them was *Tribhuwan Malla* or *Tribhuwanpal.* Moroba Kanhoji's *Lakhu Muldeo* must be *Mulraj* the founder of the Chalukya power in Gujrath. *Bhimraj Solankhi* was King of *Anhilvada Patan,* when *Somnath Patan* was plundered by Mahamud Gazni in 1024 A. D.

...One branch of the *Vaghelas* ruled independently at Dholka while another ruled at Anhilvada Patan, which they conquered in 1242 A. D. from Tribhuwanmalla. In short, they were usurpers. *The last King of the Vaghela Dynasty was Karan* the second, or *Karan Deva Vaghela,* nick-named *Karan Vaghelo* or *Karan Ghelo* (i. e. Karan the Fool). He was overthrown by Allauddin Khilji in 1298 A. D. who married his wife queen *Kamala Devi,* and demanded the princess *Deval Devi* in marriage for his son.

These Chalukyas were of course distantly connected with the three distinct Chalukya dynasty of the Deccan, the Eastern Chalukyas, with their capital at *Badami* (Vatapi) in Bijapur District, the Western Chalukyas with their capital at *Vengi* (in the Nizam's State) and the later Chalukyas whose capital was *Kalyani* in the Nizam's state. In the same way, the Yadavas of Deogiri were probably connected with *the Rashtrakutas* who also called themselves *Yaduvanshis* who always had held power *in the Northern Deccan when in the early times of Ashoka.*

...In the time of the Yadavas there were wars between the Baghelas and Deogiri, not only on the Gujarat side, but also on the Malwa side, a large portion of Central India being then under the Baghelas and called Baghelkhand (the analogical name *Bundelkhand).* After *Karan* Vaghelo lost his

kingdom and wife, he took shelter in *Bagalana* under the protection of the Yadawas in 1298 A. D., though they had been once defeated by Allauddin Khilji in 1296 A. D. *Karan* had rejected the hand of Shankar Deo for *Deval Devi*, but when Allauddin Khilji persisted in his demand for *Deval Devi* he sent her under a small escort to be married to *Shankardeo*, but the princess was surprised on her way and captured at *Ellora*.

These last events show an *alliance between Yadavas and the Vaghelas*. Both these dynasties were swept off by the same thunder-storm of Khilji and remnants both of Deogiri and of Anhilvada Patan must have fled to *the Bombay coast* with the Raja Bimb. *And that is the reason why some Bakhars trace the origin of Bimb to Anhilvada Patan and others to Deogiri.* It is even possible that after the capture of Deogiri by the Mahomedans, Bimb might have first traced to go North to Anhilvada Patan, and tried to capture the Northern Konkan for a few years before he founded his capital at Mahikavati, as some of the Bakhars state. The Yadavas (Shankar Deo and Harpal Deo) continued to rule at Deogiri between 1296 to 1305 A. D. as tributaries of the Khilji's. Beside this, it is possible that Bimb might have conquered the Konkan country and brought it under the Yadav flag some fifteen or twenty years before the fall of Deogiri in 1296 A. D., and come to settle in it only after the loss of Deogiri and the fall of the Yadava Empire.

Not only did the remnants of the Yadavas come with Bimb, and the remnants of the Baghelas, but also those of Solankis and the Chavadas (Chauras) and some of the Rashtrakutas of old and their descendants might have come, flying with him from the Mahomedans. *As to the Shilaharas they had already intermarried freely with the Yadavas, the Chalukyas and Rastrakutas and all these motley bands might have constituted the पंचकुळाs, if the पंचकुळ theory of the term*

पंचकळशी *has any force.* But this very circumstance will be responsible for varying versions in the Bakhars.

All this is conjecture : the only definiteness is about *the last independent King of Deogiri having married a daughter of the* दरणे *family; and the* दरणे *family being a part of the* पाठारे क्षत्रिय *community at this day, proves that the Raja Bimb who brought them to the Bombay Coast was connected with the Yadava Family of Deogiri.*

.....The worst feature is that these Bakhars have been written by people whose only motive was to glorify a sub-section of the followers of Bimb. There is constantly to be seen a sub-communal bias.

* * *

Again Prof. Takakhav :—

In respect of the Ethnographical Survey of Bombay, Monograph No. 170, the late Prof. N. S. Takakhav, M.A., I.E.S. had expressed his following independent views regarding the community :—

PANCHAKALSHIS :

On 3-11-1913.

Panchkalshis are spread over numerous portions of the Town and Island of Bombay, but their strongholds are Salsette and the coast land Northward upto Daman and Southward upto Revdanda in the Alibag Taluka. The tolal population of the caste can with difficulty be ascertained from Census Reports. The difficulty is occasioned by the fact that the members go under very different names; under the name *Sutar* and *Vadval*, they may be numbered with other castes. The population of theSashtikar Sub-division of the caste may be put down separately at about 2000. A census of the Vadval division was taken by an independent agency in 1901 and the

number then returned was 7916 which may be taken to denote the correct figure even now.

Panchkalshis are also known by the name *Somavanshi Kshatriya Pathare* which is the racial or tribal name; but their different sub-castes are called by different names, such as Sutars and Vadvals. These two names indicate the occupation of the large number of the castemen, and are descriptive names. The name Panchakalshi may be considered generic, embracing all the divisions. The name Sutar is given by the outsiders to that division of the caste which originally resided in the Island of Salsette. The name Vadval is the title of the sub-division particularly found in the Bassein, Mahim and Dahanu Talukas of Thana District formerly known as the *Faringana* and literally means the managers of Wadis or orchards, viz., of coconut and palm groves. The (2) origin of the name Panchkalshis is a matter for speculation, but the explanation usually given is that this name arises from an old custom of the caste, by which *at the marriage ceremony the bridegroom sat upon a chain of state or Sinhasan decked with five kalashas or little cupolas.* Others advance an equally plausible derivation of this name from the pile of five Kalashas or earthen water-pots which are placed at either side of the main entrance from the verandah or Mandap on the occasion of the marriage.

Panchkalshis have the same tradition (3) about their origin as the Pathane or Pathare Prabhus of Bombay. They claim to have come (4) to these parts of Bombay, Salsette, Kalva-Mahim, the Ashtagar sea-coast-villages of Alibag

(2) Vide Gazetteer of Bombay City and Island
Vol. 1 p. 236.

(3) Vide Edwards' " The Rise of Bombay "
p. 31.

(4) Vide Transaction of the Bombay Geographical
Society, Vol. 1, 1844, pages 132, 133.

Taluka and the adjoining districts, with *Raja Bimba* or *Bhima* about the end of thirteenth century from Paithan on the Godavari, south of Deogiri. Hence their Kshatriya origin(1). There is another theory that King Bimba though descended from the Royal family of Deogiri had a principality at Anhilvada Patan in Gujarat proper whence he migrated on the overthrow of the Hindu principalities by the Mahomedans. This immigration was synchronous with Mahomedan occupation of the Deccan and of Gujarat, i. e. during the regime of the Khiljees. Raja (1) Bimba is said to have made Mahim or Mahikavati in the Island of Bombay his capital. Subsequently the kingdom of the descendants of Raja Bimba was itself overthrown by the Mahomedans under (2) the Portuguese who succeeded the Mahomedans, there was much persecution and this is said to have forced many members of the caste to fly to the outlying parts of the Southern Kokan and join those who were already settled in the Ashtagar.

(1) Vide Edwards' "The Rise of Bombay" pages 22, 83.

(2) Vide Edwards' "Gazetteer of the City of Bombay" Vol. 1. p. 237.

Many (2) were then converted to Roman Catholicism by force and their descendants may still be traced at Bassein and Salsette. They rendered material help to the Marathas during the seige of Bassein and the acquisition of adjoining country in 1739–40. In (2) consequence of this help the Naik family of the Anjore among others obtained the title of Sarpatil and received Inam lands from the Peshwa's court. To the seige of Bassein and other events of the great Maratha-Portuguese struggle are traced back the Patilships of many families of the Vadval division. The chief endogamous division of the caste are Vadvals on the one hand and Sasthikars and Ashtagarkars jointly on the other. These two divisions do not marry, it is believed that they separated under the Hindu Raja about the middle of fourteenth century.

Among the Sashtikars there once existed furthers of divisions viz. Sashtikars proper and Wasaikars i. e. from Bassein, and similarly among Ashtagarkars there once existed such sections as Cheulkars and Urankars. But all these sections can intermarry although alliance between Sashtikars and Ashtagarkars are rare.

(1) Vide Edwards' "The Rise of Bombay", p. 22,23.

(2) — do — Gazetteer of the city of Bombay, p. 237.

About a hundred years ago there arose from among the Ashtagarkars a sub-division called *Malekars* or *Malees.* They are mostly found in the Mala district of Cheul. The cleavage is said to have occurred because the women of these Malees, as they have been termed, sold flowers and fruits in the open market. Hence other sections refused to have any communication with them. They now form an endogamous division but do not much differ in their names and customs from the Ashtagarkars. Their numerical strength may be put down at 2000.

The Panchkalshis, described as inhabiting the Janjira State in the Kolaba Gazetteer of 1883 at page 412, have likewise been long since separated from the Ashtagarkar sub-division and have now no social intercourses with other Panchkalshis.

All divisions of Panchkalshis have *Gotras* pr Exo-gamous sub-divisions, the chief of which are Bharadwas, Bhargav, Gargya, Gautam, Harit, Jamadagni, Kashyap, Kaushik, Kaundanya, Nagrishi, Padmaksham, Shandilya, Trimbak, Vairakohya, Vashista and Vishwamitra.

These Gotras do not indicate descent from a common ancestor, but discipleship to a common religious preceptor or Guru.

(१०) 'ज्ञानकोश'कर्ते कै. डॉ. श्री. व्यं. केतकर—

'महाराष्ट्र ज्ञानकोश', (भाग १७ पान ६१.)

"पांचकळशी ही जात मुख्यत्वेंकरून ठाणें जिल्ह्यांत व मुंबई शहरांत आढळते. तिचें दुसरें नांव 'सोमवंशी क्षत्रिय पाठारे' हें आहे. ह्या लोकांत धंदेवाचक बरेच विभाग असून त्यांचीं नावें भिन्न आहेत. उ० सुतार, वाडवळ (वाडी म्हणजे बागाईत करणारे); पांचकळशी हा शब्द प्राचीन कालापासून अस्तित्वांत असून त्याचा अर्थ एवढाच कीं, यांच्या लग्नसमारंभीं सिंहासनासारख्या बोहल्यावर सभोंवार पांच कळस ठेवलेले असतात. वसई व माहीम तालुक्यांत शेतीवाडीचा धंदा करणारा पांचकळशी वर्ग आहे. त्या वर्गांत लग्नप्रसंगीं अद्यापिहि वराची मिरवणूक लाकडाच्या तयार केलेल्या सिंहासनावर काढतात. सिंहासन पुष्पमालांनीं सुशोभित करून त्यावर पांच कळस ठेवतात."

"पाठारे किंवा पाताणे प्रभूप्रमाणेंच यांचा इतिहास आहे. तेराव्या शतकांत गोदावरीच्या कांठीं असणाऱ्या पैठण नगराहून राजा बिंब किंवा भीम ज्या वेळीं मुंबईस व ठाण्यास आला, तेव्हां त्याच्याबरोबर हे लोक आले असा इतिहास मिळतो. मारवाड, काठेवाड, गुजराथच्या मार्गें अहिनलवाडा पट्टणच्या बिंबाबरोबर आम्ही आलों असें कांहीं म्हणतात. ह्याच्या पुष्टीस पुरावेहि देतात."

"पांच कळशांत (१) अष्टागरकर (अ) खुद्द (आ) (जंजिरा) व (इ) माळेकर माळी किंवा चेऊलकर, (२) साष्टीकर व (३) वाडवळ असे तीन वर्ग आहेत. ह्यावरून हें (वाडवळ) नांव धंदेवाचक असून परस्पर वर्गांचा भिन्नपणा दाखविण्यासाठीं पुढें रूढीनें प्रचारांत आलें असें दिसतें, इतर वर्गांपासून वाडवळ पांचकळशांची फारकत १४ व्या शतकांतली असावी असें दिसतें. ह्या वर्गाचा उल्लेख शंकराचार्य व पळशीकर ब्राह्मणांनीं 'पांचकळशे सोमवंशी क्षत्रिय पाठारे' असा केलेला आढळतो. प्रो. ताकखाव हे सर्व विभाग मूळ एकाच वंशाचे आहेत, असें मानतात."

कालान्तरानें सर्व विभाग एक होतील असें मानण्यास जागा आहे.

"ह्या जातींत प्रत्येकाला गोत्र आहे. लग्नविधि इतर उच्च वर्णीयांप्रमाणेंच आहेत. पुनर्विवाह संमत आहे. घटस्फोट संमत नाहीं. सगोत्र विवाह निषिद्ध मानला जातो. हा वर्ग मांसाहारी आहे. ब्राह्मणाविना हे दुसऱ्या कोणत्याहि जातीच्या हातचें खात नाहींत. प्रत्येक कुटुंबास कुळदेवता व गोत्र आहे. पांचकळशांमधील पंचायत संस्था पुष्कळ दिवसांपासून अस्तित्वांत असून ती टिकून आहे. सर्वांत खालची

सभा म्हणजे गांवसभा. सर्वांत शेवटची सभा म्हणजे मालाडची महासभा. मालाडचे देसाई हे मुख्य मानकरी आहेत. अष्टागर प्रांतांत-महासभा चेऊलला आहे. चेऊलचे अधिकारी हे मानकरी होत."

बिंब राजा कोठून आला, केव्हां आला याचा उल्लेख वरील 'ज्ञानकोशां'त केलेला असल्यामुळें बिंबाच्या आगमनाचा ह्या उताऱ्यांतल्या भागाचा विचार करण्याची जरुरी नाहीं. एकाच वंशाचे हे सर्व विभाग आहेत व ते एक होतील इत्यादि आपल्या निर्णयाची सुसंगत आहे. पण लेखकानें हे विभाग कोणते तें सांगतांना गल्लत केली. वाडवळ हे वाडवळ पांचकळशी आहेत असें 'सोमवंशी क्षत्रिय पाठारे' पांचकळशांना म्हटलें आहे, तें चूक आहे. विभाग आहेत ते :—

१. सोमवंशी क्षत्रिय पाठारे पांचकळशी

२. साष्टीकर अष्टागरस्थ पांचकळशी

३. मळेकर पांचकळशी

४. साष्टीकर वसईकर चौकळशी

५. अष्टागरस्थ चौकळशी

६. वाडवळ.

उपरोक्त उताऱ्यांतल्या पांचकळशी ह्या शब्दाचा खुलासा आपल्या खुलाशाला धरूनच आहे. लग्न व नावळी (वराती) च्या वेळच्या सिंहासनाचें पांच कळश होते.

१४ व्या शतकांत वाडवळ हे निराळे झाले असें कै. डॉ. केतकर म्हणतात; यामुळें आपल्या एका सिद्धांताला बळकटी येते, कीं हे विभाग मूळचे नसून अगदीं शेवटीं झालेले आहेत. त्याच्या आधीं आपण सर्वजण म्हणजे आपली कुळी योद्धे किंवा सैनिक म्हणून येथें आलों, असें वरील उताऱ्यावरून अगदीं स्पष्ट होतें.

* * *

(११) **तपस्वी कै. रामजी लक्ष्मण भरतः**—रविवार, ता. २ डिसेंबर १९२३ रोजीं क्षात्रैक्यसमाजाच्या वार्षिक समारंभाचे वेळीं त्यांच्या अध्यक्षीय भाषणांतील उतारा.

"बिंबाख्यानः सोमवंशीय क्षत्रिय पाठारे या नांवानें संबोधिले जाणारे आपण क्षत्रिय आहोंत याबद्दल अलीकडे कोणास ती विशेष टीका आहे असें वाटत नाहीं.

कलियुगाच्या अंतकालांत होणारा वर्णसंकर कलियुगाच्या सांप्रतच्या प्रथम चरणांतच झाला आहे असें मानणें असमंजसपणाचें आहे, असें पुष्कळांस वाटूं लागलें आहे. आपल्या क्षत्रियत्वाबद्दल इतिहासप्रसिद्धि प्रमाणें उपलब्ध आहेत. शके १७१९ सालीं कै. रघुनाथ पुतळाजी राणे, यांनीं पद्मपुराणांतर्गत ब्रह्मोत्तर खंड, भविष्योत्तर पुराण, सह्याद्रि खंड, चिंतामणि कौस्तुभ पुराण, इत्यादि ग्रंथ व अनेक हस्त लिखित बखरी, पत्रें सनदा, वगैरे साहित्याच्या आधाराने बिंबाख्यान नांवाचा एक अनेकविध माहितीनें भरलेला उपयुक्त ग्रंथ छापवून प्रसिद्ध केला. त्यांत सूर्यवंशी व सोमवंशी क्षत्रिय शके १०६० त अहिनलवाडे पाटणसमीप चांपानेर येथून कोंकण व देश यावर चढाई करून कसे आले व इकडेच स्थायिक कसे झाले, वगैरे गोष्टींचें सुरेस वर्णन आहे. सरकारी खात्यानें प्रसिद्ध केलेल्या इतिहासांत आपल्या ज्ञातीच्या धंद्यासंबंधानें पुढील आशयाचे उद्गार आहेत. 'पांचकळशी हे आरंभीं योद्धे होते. पुढें मुसलमानांच्या व पोर्तुगीजांच्या स्वाऱ्यामुळें त्यांस शस्त्रें खालीं ठेवून शेतीकडे वळावें लागलें. कित्येकांनीं सुतारकीचा धंदा पत्करला, व अलीकडे कांहीं कारकून, वैद्य, ग्रंथकार, कायदेपंडित इत्यादिहि झाले आहेत.'"

कै. धरत मास्तरांच्या भाषणांतील उपरोक्त उल्लेखावरून माझ्या प्रतिपादनास दुजोराच मिळत आहे. शके १०६० त कनोजहून अनेक स्थळीं वस्ती करून शेवटीं त्यानें दक्षिणेंत स्वारी केली, हें वाचकांच्या सहज ध्यानीं येइल. —(प्रस्तुत ग्रंथकर्ता.)

(१२) कै. शामराव मोरोजी यांचा 'श्री क्षत्रिय वंशोद्गममाला' ग्रंथ (शके १७७७):—

ह्या ग्रंथांत शामराव मोरोजी हे 'कौस्तुभचिंतामणी'च्या आधारें लिहितात:— "श्रीसूर्यवंशी व सोमवंशी क्षत्रियाचें राज्य भरतखंडीं होतें. त्यावेळीं श्रीबिंबदेवाचे वंशाचा आणि राज्याचा उगम झाला तो येणेंप्रमाणें. गोविंदराजाचा पुत्र कृष्णराज व त्याचा पुत्र वंशिक राजा श्रीरामराजा होय. तो पैठणपुरीचा राजा होता. त्यास तिघे पुत्र होते. नामें श्रीकेशवराज बिंबदेव आणि प्रतापशहा. केशवपुत्रानें बापापाशीं असावें. श्रीबिंबदेव हे उदयपुरास आणि प्रतापशानें आळंदापुरीं रहावें असें होतें. ह्यावेळीं पुढील कथेचे आधीं दुसरी एक कथा त्यावेळची निवेदितों."

"श्रीरामराजाचे वेळीं एक दुसरा राजा श्रीदेवगिरीचा यदुवंशी होय. नामें श्रीरामचंद्र यादव ऊर्फ जाधव. या रायाची नवयुगाची सकलपूर्वज वंशावळीं असी कोठेही नाहीं. ह्या राजास दोन पुत्र होते. एक शंकरदेव व दुसरा भीमदेव. त्या

राजासवें एक यवन रणशूर नामें अल्लाउद्दीन श्रीशालिवाहन शके १२१६ चे सालीं युद्धाकरितां आला त्यासवें तह झाला."

"श्रीरामराजा पैठणचा. ह्याचें निरुपण कौस्तुभचिंतामणि ग्रंथावरून सांगतों. शालिवाहन शके १२१० चे आदिपासून तुर्की म्लेंच्छ सुलतान अहमदशहा याचा बाप महमदशहा, हुसेन व त्याचा बंधु चादुसेन हे दळभारासह हिंदुस्थानांत उतरले. बहुतेक हिन्दु राज्यें घेतलीं व ते म्लेंच्छ पैठणास आले. नंतर श्रीरामराजा व तिघे पुत्र यांचें म्लेंच्छाबरावर युद्ध झालें. पराभव पावलेला रामराजा अदृश्य झाला. केशवदेव गुप्तपणें देवगिरीस गेला. महमदशहा सुल्तानानें श्रीबिंबदेव व प्रतापशा ह्यांना हाकून दिलें. ते गुर्जर देशी गेले. नंतर या उपरांत दक्षिण दिशेस मुरडून कोंकणांत शिरले. यशवंतराव (कोकाट्या) युद्ध न करिता शरण आला. श्रीमाहिमपुढें श्रीमरोळ गांवीं पोहोचले व तेथें राहिले. बिंबदेवाच्या दोन राण्या. नागरीबाई व गीरीजाबाई दोघीस पुत्र दोन श्रीप्रतापशा व श्रीपुरशा. श्रीबिंबदेवें १५ महाल ४४४ गांवांचे अधिकारी नेमले."

ह्या पुढील हकिकत मी प्रस्तुत ग्रंथांत लिहिल्याप्रमाणें आहे. ह्यावरून माझ्या सिद्धान्तास दुजोरा मिळतो. हा वंशिक रामराजा कनोजहून पराभव पावून आला होता, इतकें माझ्या शोधांत अधिक आहे. पुढील सर्व हकिकत, बिंबाचा जाण्याचा मार्ग, राज्य स्थापन केल्याचें स्थान, वगैरे माहिती मी दिलेलीच आहे. रामराजाला तीन मुलगे होते व त्यांचीं नांवेंहि माझ्या शोधनांतील आहेत. यादवांच्या रामदेवाला दोनच मुलगे होते; एक शंकरदेव व दुसरा बल्लाळ किंवा आतां भीमदेव; हा माझा शोध बरोबर आहे. रामदेवाच्या कोणत्याहि मुलानें कोंकणांत पाऊल ठेवलें नव्हतें, हें जें मी लिहिलें आहे, त्यालाहि उपरोक्त उल्लेखांत दुजोरा मिळत आहे. दिल्लीच्या अल्लाउद्दिनानें रामदेवाच्या राज्यावर हरपाळदेवास बसविलें. त्यास अप्रत्यक्ष पुरावाच आहे. कोंकणांत महिकावतीचें राज्य स्थापन करणारा बिंबराजा कनोजहून आला. देवगिरीच्या रामदेवाच्या मुलाचा हें राज्य स्थापण्यांत कांहींच संबंध नव्हता.

(१३) बिंबासंबंधींच्या अनेकांच्या अनेक मतांवर लेखकानें पाडलेला प्रकाश!

'बिंबाख्यान' ही एक भाकडकथा आहे व त्यांत विसंगति आहे; त्यांतील कथांचे शक संवत् एकमेकाशीं जुळत नाहींत, वगैरे आक्षेप बहुतेक सर्वच लेखकांनीं त्यावर घेतलेले आहेत. अशा आक्षेपकांत कै. प्रो. निळकंठ सदाशिव ताकखाव यांनीं विशेष प्रखरतेनें बिंबाख्यानांतला विसंवाद दाखविण्याचा प्रयत्न 'क्षात्रदूत', वर्ष ८ वें अंक ४ था (डिसेंबर १९१२) ह्या मासिकांत केला आहे. प्रथमपासूनच

मी म्हणत आलों आहें, कीं बिंबाख्यान हा ग्रंथ सत्यकथा आहे. त्या सर्वच लेखकांनीं बिंबाख्यानाचें अंतर्ज्ञान करून घेण्याचा कोणताहि प्रयत्न केलेला नाहीं. बिंबाची कथा वाचल्याबरोबर ह्या लेखकांनीं त्याचा शोध स्वतःकरतां न करतां तो त्या वेळच्या त्यांना ठाऊक असलेल्या कोणा तरी नांवाजलेल्या महाराष्ट्रांतल्या राज्यकर्त्यांच्या वंशांतलाच होता, असा हेका धरून त्याचा शोध ह्या राजवटींच्या त्रुटित इतिहासांत करूं लागले. ह्या राजवटींचाच इतिहास विश्वसनीयरीत्या जुळलेला नाहीं. शिलालेख, ताम्रपट, इत्यादि साधनांनीं एकत्रित केलेल्या व कोणाच्याहि कोणा इतराबरोबर न जुळलेल्या अशा स्वतः असंबद्ध असलेल्या इतिहासांत हा बिंब कसा सांपडला! ह्या सर्व राजवटींचा इतिहास असाच जुळलेला नाहीं. कथांच्या काळांतल्या संवत्सरादि नोंदी विभिन्न आहेत. स्थलें एक नाहींत. कोणतीं पट्टणें, कोणतीं पुरें व कोणत्या नगरी ह्यांचा मेळ नाहीं. मग कांहीं तरी करावयाचें म्हणून ह्या लेखकांनीं बिंबस्थानाच्या बिंबांना कोणत्या तरी राजवटींत दडपलेलें आहे. एकाच गोष्टीवरून माझें म्हणणें स्पष्ट होत आहे, कीं त्यापैकीं एकाहि लेखकाला कोणत्याहि राजवटींत बिंब दिसला नाहीं, तेव्हां त्यांनीं— प्रत्येकानें— कोणत्या तरी पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या 'भीमा'ला बिंब ठरवून आपलाच शोध खरा, असा आग्रह धरलेला आहे; व त्याप्रमाणें आपल्यांतल्या दिवंगत दोन इतिहास-लेखकांनीं 'बिंबाख्यान' ही एक भाकडकथा ठरवून बिंबाचा शोध बखरींच्या बाहेर पहाण्याचा प्रयत्न केला आहे. कै. प्रोफेसर ताकखाव व 'क्षात्रदूत'कर्ते कै. मुकुंदराव जनार्दन गोरेगांवकर ह्यांनींहि तेंच केलें. विशेषतः प्रो. ताकखावांनीं वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें गोरेगांवकरांच्या 'क्षात्रदूत' मासिकांतून 'बिंबाख्याना'विषयीं आपलें मत दिलें आहे, व त्या लेखांत बिंबाख्यानांतली विसंगति दर्शवून बिंबाख्यान हें अविश्वसनीय आहे, असें आपलें मत त्यांनीं जाहीर केलें आहे. गोरेगांवकरांचा सगळा रोंख यादव बिंबाविरुद्ध आहे, असें त्यांनीं एकदां नव्हे, तर अनेकदां प्रतिपादिलें आहे. एका पत्रांत त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे, कीं यादव रामदेवरावाच्या दुसऱ्या मुलानें म्हणजे त्यांच्या बिंबानें 'भानुविजय' ह्या महानुभव पंथांतल्या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें त्यांच्या मोठ्या शंकरदेव राण्याचा खून केला आहे. तें कांहींहि असलें, तरी उपरोक्त दोन्ही लेखकांनीं बिंबाख्यानांतला बिंब हा विश्वसनीय नाहीं, असें गृहीत धरल्यानंतर त्यांचा कोणता बिंब खरा किंवा इतर कोणाबरोबर आपण आलों, असें कोठेंहि स्पष्ट केलेलें नाहीं. 'हें तें नव्हे' असें त्यांनीं प्रतिपादन केलें; पण हें तें खरें असें त्यांनीं कोठेंहि म्हटलेलें नाहीं. अशा स्थितींत प्रो. ताकखावांच्या शंकांचा खुलासा प्रस्तुत लेखक करीत आहे व वाचकांना खुल्या दिलानें पण स्पष्टपणें बजावीत आहे, कीं आपल्या बिंबाचा शोध बिंबाख्यान व बखरी यांतच लागत आहे.

नायकोरावानें केशवाचार्यांच्या मदतीनें मोठा समारंभ करून त्या वेळीं एक ग्रंथ तयार केला व त्याच्या ६६ नकला करुन त्या ६६ कुळांना दिल्या. त्या ग्रंथाच्या इतरे जनांनींहि उपनकला केल्या. ह्या नकला निरनिराळ्या वेळीं केल्या गेल्या. अर्थात् त्या नकलांत कांहीं किरकोळ फरक पडणें शक्य आहे. ज्ञानेश्वरींत कांहीं प्रक्षिप्त भाग आहे व हीच रीत सर्व ग्रंथांची आहे. भगवद्गीतेंतहि कांहीं श्लोक प्रक्षिप्त आहेत असें म्हटलें जातें. तेव्हां निरनिराळ्या ठिकाणीं वाटलेल्या ह्या महजर नकलांत नकलकारांचे हातून त्यांत कांहीं अपपाठ शिरले जाणें साहजिकच आहे. अशा किरकोळ बाबतींतल्या विसंगतींत एकसूत्रीपणा कसा आहे, हें आपण पाहिलें पाहिजे. तसा प्रयत्न केला असतां, त्या विसंगतीवर आधारून ग्रंथच खोटा ठरविणें योग्य होणार नाहीं. निरनिराळ्या ज्ञातीकडे हे महजर ह्या नकला गेल्यामुळें त्या त्या ज्ञातींनींहि आपलें कांहीं तरी म्हणणें त्यांत बेधडकपणें घुसडलेलें असणार किंवा त्यांतून वगळलेलें तरी असणार. आपण संशोधन करतांना एकच पाहिलें पाहिजे, कीं ह्या सर्वांतले मुख्य सूत्र एकच आहे, किंवा नाहीं. मला ह्या सर्व बखरींत मुख्य सूत्र एकच, प्रमाणभूत व विश्वसनीय असें आढळून आलें. तेव्हां किरकोळ विसंगतिसंबंधानें व उत्पन्न केलेल्या शंकास्थानाबद्दल माझा खुलासा खालीलप्रमाणें यथाक्रम मी देत आहें.

'पाठारे क्षत्रिय' हें ज्ञातीचें नांव आहे, असें 'साष्टीच्या बखरी'च्या पूर्वार्धावरून दिसतें. त्याला बिंबाख्यानाचा आधार आहे. वर दिल्याप्रमाणें 'पाठारे' हें ज्ञातीचें नांव आहे, असे बिंबाख्यानांतले निरनिराळे उल्लेख पाहतां दिसून येतें. बिंबाख्यानांत ज्ञातीचें नांव पांचकळशी असें दिलेलें नाहीं, असें असतांना प्रो. ताकखाव हे तें नांव तेथें आहे, असें सिद्ध करण्याकरतां बिंबाख्यानाच्या पान ८ वरील ओवी—

> 'सिंहासन पंचकळशी। मुकुटमंजरी घोसीं॥
> छत्रें चामरें शोभेसी। वधुवराकारणें॥ ९॥'

देतात. ज्या ठिकाणीं ही ओवी आहे त्या ठिकाणीं क्षत्रियाचें क्षात्रधर्माचें विवेचन दिलें आहे, त्यांतला एक हक्क, मान किंवा त्या ओवींत दिलेला आहे. कोणत्याहि क्षत्रियास लग्नाच्या नावळेस म्हणजे मिरवणुकीच्या वेळीं आपल्या लग्नरथास म्हणजे सिंहासनास पांच कळस लावावेत व छत्रचामरेंचा भोग घ्यावा. क्षत्रियांनाच तो भोग घेतां येतो असेंहि ती ओवी स्पष्ट करते. तिच्यावरून बिंबाख्यानांत आपलें नांव पांचकळशी दिलेलें आहे हें सिद्ध होत नाहीं. त्यांचा दुसरा उल्लेख असा आहे, कीं, १५७ पानावर जो मथळा आहे तो असा:—

"कुळगुरु अनी॥ सोमवंशी ब्रह्म क्षत्रि पाठारे ऊर्फ पांचकळशी कुळें॥ २७॥

उपरोक्त पानावर व इतर पानांवर राणे यांनीं सर्व कुळांच्या नांवांची, गोत्रांची, वस्तीच्या गांवांची, वगैरे जंत्री दिली आहे, त्यावरील एका मथळ्यांत 'पांचेकळशी' हा शब्द 'पाठारे' ह्याचा पर्याय शब्द म्हणून दिला आहे. ही जंत्री म्हणजे बिंबाख्यानाचा कोणताहि भाग नाहीं. राणे यांनीं दिलेली जंत्री त्यांनीं स्वतः तयार करून दिली आहे, व राणेंनीं स्वतःचे म्हणून मथळ्यांतले 'पांचकळशी' हें नामाभिधान दिलेलें आहे, त्याचा कोणताहि संबंध बिंबाख्यानाबरोबर नाहीं. अर्थात् हें पांचकळशी नांव नंतरचें आहे. विवाद्य काळांतलें नाहीं. त्या ठिकाणीं सर्वत्र कुळें हेंच नामाभिधान आहे. ज्ञातिवाचक नामाभिधान नाहीं.

वाडवळ हेंहि एक ज्ञातीचें नांव आहे, असें बिंबाख्यानकार म्हणतात, असें दर्शविण्याकरतां प्रो. ताकखाव १८३ पानावरील खालील मजकूर देतात. "मागें जी एक मोठी सभा होऊन सर्व मानपान व निरनिराळी व्यवस्था केली, त्यापूर्वीं जीं कुळें कांहीं दोषांमुळें अपंक्त ठेवलीं होतीं, तीं व त्या वेळीं क्षत्रियोद्भव जीं कुळें होतीं, तीं मिळून एक वाडवळ समुदाय केला, म्हणून त्यास कित्येकांस गोत्रें देवी आहेत तींहि ह्या वरील सारखींच आहेत." ह्या वर उल्लेखिलेल्या जातीप्रमाणें ही दुसरी कुळ, गोत्र, देवीची जंत्री राणेंनीं दिली आहे; म्हणजे ही जंत्री बिंबाख्यानाचा भाग होत नाहीं. राणेंची ही जंत्री आहे, तींत कांहीं गोत्रें, देवी कां नाहींत, ह्या खुलाशाकरतां राणेंनीं पूर्वींच्या महासभेचा हवाला दिला आहे. तो हवाला राणेंचा आहे. बिंबाख्यानांत ज्ञातीचा उल्लेख नाहीं; कुळांचा उल्लेख आहे, हें सिद्ध होत आहे. वरील उताऱ्यांतल्या "कुळें कांहीं दोषांमुळें अपंक्त ठेविलें," ह्या शब्दांनीं खरें होत आहे.

प्रथमतः क्षत्रिय वर्ण, ब्राह्मण वर्ण, वैश्य वर्ण, शूद्र वर्ण, असे प्रकार लोकांत होते. नंतर ज्यांनीं जो धंदा पत्करला, त्यांची एक निराळीच संघटना झाली. हीच संघटना विभक्त झाल्यामुळें त्या संघटनेची ज्ञात बनली. वर लिहिलें आहे, कीं हा एक अपंक्त लोकांचा समुदाय केला गेला. त्याला पुढें केव्हां तरी ज्ञान व स्वरूप आलें. मागें मी प्रतिपादिल्याप्रमाणें 'पांचकळशी'चे क्षत्रिय अधिकारी, ते पांचकळशी ज्ञातीचे. ज्यांना हा पांचवा कळस मना केला असेल, ते चौकळशी क्षत्रिय स्वतंत्र चौकळशी ज्ञातीचे व ज्या क्षत्रिय कुळांना कांहीं अपराधामुळें अपंक्त ठेवलें असतील व ज्यांनीं वाडीचा धंदा उचलला असेल असे सर्व क्षत्रिय वाडवळ क्षत्रिय ज्ञातीचे, असे ह्या क्षत्रियांत कुळांचे तीन समूह झाले; व पुढें त्यांना तीन ज्ञातिवाचक नांवें मिळालीं व ते अशा ह्या बिंबाबरोबर आलेल्या क्षत्रियांतून तीन निरनिराळ्या ज्ञाती उद्भवल्या.

शके १७०१ (इ. स. १७७९) च्या महासभेच्या अटीमधें ही एक अट आहे, कीं जो दूध विकील तो अपंक्त. अर्थात् हे पुढें राहिलेल्या अटीनंतर दूधवाले क्षत्रिय म्हणून ती एक स्वतंत्र ज्ञात झाली असे. ज्यांना आपण मूळचे पांचकळशी मानतों त्या साष्टीकरांत एक वेळ अशी आली होती, कीं ह्या ज्ञातींत आणखी पांच दहा ज्ञाती झाल्या असत्या. 'वसईकर आपणास मुली देत नाहींत. तेव्हां आपण साष्टीकरांनींहि त्यांना मुली देऊं नये, असा ठराव शके १७०१ (इ. स. १७७९) च्या सभेंत झाला होता. म्हणजे साष्टीकर, वसईकर, कल्याणकर अशा निरनिराळ्या पांचकळशी ज्ञाती झाल्या असाव्यात. अष्टागरांतल्या पांचकळशी समाजानें 'मळेकर माळ्याचा धंदा करतात व त्यांच्या कांहीं चालीरीती निराळ्या आहेत व कामानिमित्त होडींतून प्रवास करतांना ते लोक जेवण बरोबर नेतात म्हणून त्यांना अपंक्त ठरविलें व त्यामुळें आज मळेकर पांचकळशी हा पोटभेद उत्पन्न झाला आहे. उरणकर हाहि भेद असाच भ्रममूलक होता. ह्या विवेचनावरून हें सिद्ध होते, कीं आपल्या ज्ञातीचें नांव बिंबकाळीं व तदनंतर पाठारे क्षत्रिय होतें. ह्या ज्ञातीच्या नांवाचा उद्‌भव नतरचा आहे.

बिंबाख्यानांतले बिंबाबद्दलचे सर्व उल्लेख बरोबर आहेत. हें मी वर सिद्ध केलें आहेच. १०७ पानावरला उल्लेख हा मात्र दुसऱ्या सर्व उल्लेखांपासून अगदीं निराळा पडत होता, व त्यामुळें हा बिंब किंवा तो बिंब, असा भ्रम उत्पन्न होत होता. पण १०७ पानांतला उल्लेख १४०–१४२ पानांत तसाच आहे. पण सदरच्या पानांत संवत् १२१० (इ. स. ११५४) असें बरोबर म्हटलें आहे, तेंच १०७ पानांतल्या उल्लेखांत शके १२१० (इ. स. १२८८) पडलेलें आहे ही एक चूक सुधारली, म्हणजे दुसऱ्या सर्वच उल्लेखांचें एकत्रीकरण होतें. ह्या उल्लेखांत दोन ठिकाणीं दुसरी कोणती तर मान, पान, टिळा, इत्यादिक हकिकतींची माहिती देतांना त्या ठिकाणीं पुन्हा बिंबाचा उल्लेख देतात. कुठें किंचित् स्थळ किंवा शके इकडेतिकडे झाला आहे. अर्थात् त्यामुळें ही विसंगती आहे, ती आपण समजून घेतली पाहिजे.

बिंबाच्या येण्याबद्दलचा काळ असा :—शके १०६० ते १०८५ पर्यंतचा ठरतो. इतका काळ त्याला निघाल्यानंतर कां लागला, हा एक प्रश्न आहे. कनोजला रामचंद्रदेव-रावाचा १०६० मधें पराभव झाल्यानंतर बिंब अनहिलवाडा पाटणास व बाळाराव चांपानेरास राहिले. त्या ठिकाणीं पुन्हां त्याच अल्लाउद्दिनानें त्यांचा पाठलाग करून पराभव केल्यानंतर बिंब पैठणास गेला. त्या ठिकाणींहि अल्लाउद्दिनानें पुन्हां स्वारी केल्यानंतर बिंब सालेर मारेल, वडनगर, दमण, नवसारी या रस्त्यानें कोंकणांत शके १०८५ चे सुमारास आला. इतका पंधरा वर्षांचा काळ येण्यास लागणें शक्य दिसतें.

आपण हें लक्षांत ठेवावें, कीं अल्लाउद्दिन म्हटलें म्हणजे देवगिरीच्या रामदेव यादवाचा पराभव करणारा अल्लाउद्दिन खिलजी हाच सर्वांचे मनांत येतो; मग त्यांना वाटतें, कीं

१७५ वर्षें अल्लाउद्दिन जगला कसा?

पण हा अल्लाउद्दिन खिलजी नसून, घोरी किंवा तघलक होता. १०७ (पानांतील) 'संवत्' बद्दल झालेल्या चुकीची दुरुस्ती केली, म्हणजे नागरशहाला १२५ वर्षें जगावें लागत नाहीं, किंवा दोन नागरशहा करावे लागत नाहींत; प्रो. ताकाखावांच्या लक्षांत हें येतें, तर त्यांना कुठेंच विसंगति दिसली नसती. ह्या बिंबानंतर दुसरा बिंब कोंकणांत आलेला नाहीं. यादवांचे बिंबास अल्लाउद्दिन खिलजीनें कोणती फुरसद ठेवलीच नव्हती. १२१६ शकांत (इ. स. १२९४त) रामदेव अल्लाउद्दिनाला शरण जातो व त्याच्या-बरोबर दिल्लीस जातो. त्यावेळीं त्याच शकात बिंबाला कोंकणांत येण्याचें फावलें कसें, हा प्रश्न मनापुढें उभा राहतो. शिवाय, शके १२१६ मधें रामदेवरावाचें राज्य खालसा झालें नव्हतें. तें इ. स. १३१६ किंवा त्याच्याहि पुढें चालू राहिलें होतें. पातशहानें रामदेवरावाला आपला मित्र केला होता. अशा वेळीं रामदेव हा अल्लाउद्दिनाला दक्षिणेंतलीं दुसरीं राज्यें बुडविण्यास मदत करीत असतांनाच त्याचे मुलाला परागंदा होण्याचें काहींच कारण नव्हतें. हा बिंब कोंकणांत आला नव्हता, असें धरून चाललें, तर शके १२०९ (इ. स. १२८७) वगैरे सालांतील ताम्रपटांतले उल्लेख व दिलेलीं फरमानें ह्यांची संगति लावावी. एक गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, ह्या उला-ढाल्यांत महिकावतीच स्वतंत्र झाली; राज्य स्थापन झालें होतें, तरी यादवाचें मोडकें तोडकें साम्राज्य चालू होतें; तेव्हां त्यांचा मुलगा बिंब ह्यानें साम्राज्याधिकारी म्हणूनहि महजर व निवाडे दिलेले असावेत, व ताम्रपटांतले बिंबाबद्दलचे हे उल्लेख यादवांचे साम्राज्याधिपति बिंबाचे असावेत. त्या ताम्रपटावरून व महजरावरून तो कोंकणांत आला होता व त्यानें महिकावतीचें राज्य स्वतंत्र स्थापिलें होतें, असें मानतां येत नाहीं. शके १२१६ (इ. स. १२९४) त मोंगलांनीं बिंबाचें राज्य नागरशहाकडून घेऊन त्याला मारलें, ही अगदीं सिद्ध हकीकत आहे. शके १२१६ त नागरशहाचा पराभव व वध गुजराथेंतले सुलतान करीत आहेत, व त्याच वेळीं हें राज्य बिंब हा उभारीत आहे, ही उघड विसंगति कोणालाहि सुसंगति म्हणून कधींच करतां येणार नाहीं.

अशा तऱ्हेनें प्रो. ताकाखावांच्या शंकास्थानाविषयीं माझा हा स्पष्ट खुलासा आहे. माझें स्वतःचें स्पष्ट मत आहे, कीं आपण सव कुळें, हीं शके १०६० (इ. स. ११३८) मध्यें कनोजहून निघालीं. तीं सर्व क्षत्रिय कुळेंच होतीं. आपल्या ज्ञातीचें नांव 'पाठारे'—त्याला उपपद 'क्षत्रिय' वर्णाचें लावून आपण आलों. पांचकळशी,

चौकळशी, वाडवळ, हे भेद नंतरचे आहेत. आपले तुकडे 'अपंक्त' ह्या शब्दानें आपणच केले व त्यामुळें त्या त्या समुदायानें आपला विभक्तपणा दाखविण्याकरतां व तो राखण्याकरतां केव्हां तरी पोर्तुगिजांचे अमलानंतर ज्ञातिवाचक हीं नांवें चालू केलीं. 'पाठारे प्रभू' व आपण तर एकच आहोंत, हें 'पाठारे' हा शब्दच आपणास स्पष्ट सांगत आहे. 'अपंक्त'पणामुळें उत्पन्न झालेला विभिन्नपणा दाखविण्याकरतां ह्या 'पाठारे'नीं लेखणीचें काम करणारे प्रभू म्हणून ह्या ज्ञातीचें नांवास भिन्नमतदर्शक उपपद जोडलें. मी वर उल्लेखिलेल्या सर्व ज्ञातींनीं 'आपण एक आहोंत' असें गृहीत धरून आतां एकत्र होण्याचा प्रयत्न करावा. चौकळशी, पांचकळशी यांचें एकीकरण 'क्षात्रैक्य-परिषद' ही करीतच आहे.

कै. प्रो. ताकखाव व कै. राजवाडे ह्यांनीं दोन बिंब झाले, असें अत्याग्रहानें प्रतिपादिलें आहे !

उपरोक्त लेखकांच्या लिखाणाचा विचार करतां असें दिसतें, कीं बहुतेक साऱ्याच लेखकांनीं व 'गॅझेटिअर'कारांनीं पहिला बिंब हा कोणत्यातरी एका मोठ्या राष्ट्रकुळांतला 'भीम' हा निश्चित म्हणून मानलेला आहे, व कांहीं थोड्या लेखकांनीं दुसरा बिंब हाच फक्त मानला आहे. म्हणजे अशा तऱ्हेचे तीन प्रवाह आपणास वरील लेखकांत दिसून येतात. त्यांतला पहिला प्रवाह व तिसरा प्रवाह हे दुसऱ्या बिंबाचें अस्तित्व मानतात. आतां प्रश्न असा आहे, कीं पहिला बिंब अथवा भीम प्रमाण म्हणून मानावा, कीं दुसरा बिंब हाच प्रमाण मानावा, येथपर्यंत आपण आतां आलों आहोंत. मुद्याची गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, सर्व देशी व विदेशी लेखकांनीं व बखरकारांनीं बिंबाख्यानाचा आधार घेतलेला आहे. बिंबाख्यानानंतरच ह्या दोन बिंबांचा उगम आहे. बिंबाख्यान पान १०७ मध्यें बिंबाबद्दलची जी हकिकत दिली आहे, तीच हकिकत बिंबाख्यान पान १४०-१४२ मध्यें दिलेली आहे. बिंबाख्यानाच्या १०७ पानांत शके १२१० (इ. स. १२८८) असा उल्लेख आहे व १४०-१४२ पानांत संवत् १२१० असा मजकूर आहे. १०७ पानांतल्या हकिकतींतील 'शके' शब्दाचे जागीं 'संवत्' घातला म्हणजे सर्व कालाची व घडलेल्या घटनांची संगति स्पष्ट जुळते. ही स्पष्ट नि सत्य अशी दुरुस्ती कोणाहि प्रामाणिक इतिहासज्ञाला पटल्याशिवाय राहणार नाहीं, अणि मग दुसरा बिंब हा कोणाच्याहि डोक्यांत भ्रमण करूं शकणार नाहीं.

डॉ. कुन्हा यांनीं ह्या पहिल्या उल्लेखाकडे न पाहिल्यामुळें त्यांनीं एकच बिंब धरला आहे. तेंच इतरांनींहि केलें आहे. त्यांना फक्त सन, येण्याचा काळ, वगैरेंचा

शोध करावा लागला, पण दोन बिंब समजणाऱ्या किंवा दुसरा बिंब मानणाऱ्या साऱ्याच लेखकांना बिंबाबद्दलची उलटापालट करावी लागली आहे, इतकेंच नव्हे, तर ऐतिहासिक प्रामाण्याची नि सत्यसंशोधनाची त्यांना गळचेपी करावी लागली आहे, हें माझ्या वरील विवेचनावरून व खुलाशावरून तज्ञ वाचकांच्या सहज ध्यानीं येईल.

इतिहासज्ञ म्हणविणाऱ्या अशा लेखकांनीं पूर्ण संशोधनाच्या अभावीं आपल्या मनांत जें आलें, त्यायोगें ह्या दुसऱ्या बिंबाचें स्थान कायम करण्यांत आपल्या बुद्धीची मोठीच कसरत केली. कै. प्रो. ताकखाव व कै. राजवाडे ह्यांना त्यासाठीं मोठीच कसरत करावी लागली. अर्थात् त्या सुमारास यादवांचा चालता काळ होता; तेव्हां सर्वांनीं यादवांचे बिंबाला पकडलें, व तोच बिंब मावळला. दुसरा एक भ्रम असा आहे कीं, हेमाद्रि हा बिंबाचा प्रधान होता. अर्थात् यादवांचे व बिंबाचे बापाजवळ हेमाद्रि हा होता, तेव्हां त्या हेमाद्रीच्या साह्यानें त्यांनीं यादवांचा बिंब कायम ठरविला. तसेंच आणखी एक भ्रम निर्माण झालेला आहे कीं, कोंकणांत आलेल्या खऱ्या बिंबाजवळ हेमाद्रि हा होता. हेमाद्रीच्या ह्या साम्यामुळें यादवांचा बिंब ह्या लेखकांनीं कायम ठरविला; तसेंच दुसरा बिंब नांवाचा मुलगा यादवांच्या रामचंद्रदेवाला होता व खऱ्या बिंबाचा बापहि रामदेवराजा आहे; तसेंच त्याला तीन मुलगे होते. यादवांच्या रामचंद्र यासहि तीन मुलगे होते, असें कांहींजण प्रतिपादितात. तसेंच त्या खऱ्या बिंबानें कनोजहून आल्यावर तो स्वतः उदेगिरीच्या राज्यावर बसला. केशवदेवास देवगिरीचे राज्यावर बसविलें व धाकटा प्रताप यास आळंदापूरला बसविलें व सोरटीस मुरारयाच्या बाळारामाला चांपानेर येथें गादीवर बसविलें. ह्या यादव राजानेंहि आपला मुलगा शंकर बल्लाळ व बिंब यास देवगिरी, पैठण, उदेपूर ह्या ठिकाणीं बसविलें. ह्या सादृश्यावरून हे सर्व लेखक फसले गेले, असें मला स्पष्ट म्हणावेसें वाटतें. बिंबाख्यानांतला 'संवत्' नि 'शकाचा' तेवढा दोष दुरुस्त करून घेतला, म्हणजे दुसऱ्या बिंबाचा उच्चार करण्याचें कारण मुळींच रहात नाहीं. आणि त्यामुळें उपरोक्त लेखकांचे आतांपर्यंतचे झालेले सर्व भ्रम दूर होऊं शकतात. बिंबानें इथें आल्यावर महिकावतीस राज्य निर्माण केलें. येतांना त्यानें निरनिराळ्या लहान लहान राजांचीं राज्यें जिंकून घेतलीं; व आपला अम्मल बसवीत बसवीत तो कोंकणांत आला व स्थिर झाला. ह्या सर्व खटपटींना कांहीं तरी काळ लोटावयास आवश्यक होतें; व स्थिरताहि असावी लागते. पण यादवांचा बिंब ह्याला शके १२१६ (इ. स. १२९४) मध्यें अशी स्थिरता नव्हती व शक्यताहि नव्हती. बापावर अल्लाउद्दिनाचें प्राणसंकट आलें असतां, त्याच्या मुलानें पळून जावें व दुसऱ्या ठिकाणीं राज्य स्थापून वसाहत करावी, हें शक्य

कोटींतलें मुळींच नाहीं. त्याच वेळीं कोंकणावर वजीर निकामलिकानें चढाई केली असतांना बिंब हा तेथें येणार तरी कोठून? शके १२१६ (इ. स. १२९४) मध्यें तर माहीम राजवटींतल्या नागरशहा राजाला मारून तें राज्य मुसलमान सुलतानानें घेतल्यावर ह्या यादवांच्या बिंबानें राज्य तरी कोठें केलें? अर्थात् यादवांचा बिंब ही एक निव्वळ कल्पित कथा आहे. बिंबाख्यानांतल्या एका शकाच्या चुकीमुळें दुसरा बिंब आमच्या इतिहास-लेखकांना दिसूं लागला, व त्यांनीं स्वतःला सोयीस्कर असे तर्क चालविले. त्यांत त्यांनीं एक मोठाच डोंगर पोखरला. अशा तऱ्हेचा ढळढळीत प्रमाद कै. प्रो. ताकखाव व कै. राजवाडे यांच्यासारख्या इतिहासज्ञांना सहज दिसून यावयास पाहिजे होता. ज्या ठिकाणीं महिकावतीचें राज्य बिंबानें स्थापिलें, त्या वेळची ह्या प्रांतांतली परिस्थिति सूक्ष्मपणानें पहावयास हवी होती. १२१६ शकांत यादवांची उतरती कळा सुरू झालेली होती. कोंकणांत सर्वत्र अराजक झालें होतें. यादवांना उगाच सार्वभौम समजत असत. बखरीचा पूर्णपणें अभ्यास केल्यावर त्यांच्या लक्षांत हें आलें असतें कीं, नागरशहानें ह्या यादवांच्या रामचंद्ररावाचा पराभव दोनदां केला. दुसऱ्या वेळीं अनहिलवाड्याचा आनंददेवहि पराभव पावला. हेमाद्रीलाहि त्रिपुरकरानें पराजित केलें होतें. अशा स्थितींत ह्या यादवांच्या बिंबाचा इथें काय पाड लागणार होता? शिवाय, बिंबाला आपल्या बापाच्या राज्याचा बंदोबस्त करावयाचा होता, हें आपण पाहिलें, म्हणजे बिंब यादव हा इथें आलाच नाहीं, हें अगदीं स्पष्ट होतें.

आतां एक गोष्ट अशी कीं, सिंही हें स्थळ उत्तर हिन्दुस्थानांत आहे. तसा त्या लेखांतहि उल्लेख आहे. गोरखपुरहि उत्तर हिंदुस्थानांत आहे व कनोजहि उत्तर हिंदुस्थानांतच आहे. यांतील अमकें स्थळ, हें अमक्याच ठिकाणीं आहे, असें जरी दाखविनां आलें नाहीं, तरी बिंब हा कनोजहून आलेला आहे, हें सिद्ध झाल्यामुळें सिंही इत्यादि स्थळें त्याच्याजवळ आसपासच असणार. अर्थात् सिंही गांवाचा पत्ता नाहीं. 'उदेपूर हा गांवच नाहीं.' (!) ह्या आक्षेपांत मुळींच अर्थ नाहीं. खरा बिंब हा कनोज अनहिलवाडा, चांपानेर, पैठण, वगैरे शहरांच्या रस्त्यानें अल्लाउद्दिनानें पराभूत केल्यामुळें दवणेच्या मार्गानें महिकावतीस आलेला आहे.

author

● ● ●

भाग चवथा

ज्ञातीचें नांव-उपजाति नि महासभा

"The caste is a social combination, the members of which are united by birth, not by enrolment."

—The late Hon. Mr. Justice Farran. 4-5-1891.

"Without social progress there should be no intellectual progress. Caste may have its imperfections. No one knows that better than myself, but there is much to commend itself in that much abused institution. At present it can be urged that it paralyses all progress. But the time is not distant when cured of all that is objectionable in its cast, will help instead of hindering the advancement of the nation."

—Babu Pratap Chander Muzumdar, 1891.

"Remember that the bond of caste possesses a magic power and rivets upon the heart of all its members a sacred and enduring tie. It links the present with the past, and will link the present with the future."

—Janardan Raghoba Vanamali, 1891.

"जगांतील इतर लोकांबरोबर आपणाला कांहीं कर्तव्य नाहीं. त्यांच्याशीं आपण अगदीं अलग आहोंत. नेहमीं आपसांत भांडावें, व प्रतिपक्षाचा पाडाव करून प्रतिष्ठा

मिळवावी, म्हणजे जन्माचें सार्थक झालें, अशा समजुतीचे दिवस आतां गेले. आपण एका मोठ्या राष्ट्रांतील अनेक ज्ञातींपैकीं एक होत; व आपल्या राष्ट्रास इतर राष्ट्रांबरोबर सुधारणेच्या मार्गांत टक्कर मारावयाची आहे, हें विसरतां कामा नये. आपल्या देशांत किंवा या सर्व भूतलावर सामाजिक व इतर बाबतींत होणाऱ्या उलाढालींत हळूहळू आपणास मन घातलें पाहिजे. आणि जेणेंकरून आपलें व आपल्या देशाचें कल्याण होईल व प्रतिष्ठा वाढेल, अशी कृति करण्याची उमेद बाळगली पाहिजे. ''

—प. वा. विनायक बळवंत परळकर, सन १८९५.

कांहीं काळापूर्वी आपल्या ज्ञातीला 'पांचकळशी', 'सोमवंशी क्षत्रिय पाठारे,' इत्यादि नांवांनीं संबोधिलें जात असे. 'इत्यादि' हा शब्द येथें लिहिण्याचें कारण हें कीं, 'सुतार', 'माळी', वगैरेसारख्या शब्दांचाहि उल्लेख कांहीं काळ आपल्या ज्ञातीचा निर्देश करतांना कांहीं लोकांकडून करण्यांत होऊं लागला होता. परंतु वरील तीन नांवांचा मात्र सरसहा उपयोग करण्यांत येत होता व अद्यापीहि कांहीं बांधव ह्या नांवांचा उपयोग करीत असून त्यांच्या मतें जें ज्ञातीचें नांव ते ठरविण्याचा प्रयत्न करतात, तेंच ज्ञातीचें खरें नांव असा ते हट्ट धरून बसले आहेत. अशा कांहीं ज्ञातिबांधवांचें म्हणणें **कै. रामचंद्र तुकाराम चेंबूरकर व श्री. बाळाभाई हरिश्चंद्र देव्हारे** यांनीं एक पुस्तिका प्रसिद्ध करून लोकांपुढें मांडलें आहे. ज्ञातींतील कांहीं विचारवंतांच्या मतें आपल्या ज्ञातीचें नांव **'पाठारे क्षत्रिय'** हेंच आहे, असें वाटल्यावरून त्या नांवाचा सर्वत्र प्रसार व्हावा म्हणून त्यांनीं आजवर नेटाचे प्रयत्न केले व तें नांव सर्वत्र रूढ केलें आहे. आतां ह्या नांवाला ऐतिहासिक परंपरा नाहीं, असें दुसऱ्या पक्षाचें म्हणणें आहे. अशा रीतीनें ज्या नांवाच्या मागें ऐतिहासिक परंपरा नाहीं, तें नांव रूढ झाल्यानें ज्ञातीच्या जुन्या नव्या सर्व व्यवहारांत गोंधळ होतील, असें त्या पक्षाचें म्हणणें आहे. त्यांचें हें मत तसेंच राहिल्यास ज्ञातीच्या नांवाबद्दल कायमचें दुमत राहून पुष्कळशा अडचणी उत्पन्न होतील. 'पाठारे क्षत्रिय' हें नांव रूढ झाल्यानें ऐतिहासिक परंपरा तुटत तर नाहींच, पण उलट तुटलेली किंवा तोडलेली परंपरा जोडली जाते. योग्य त्या संशोधनानंतर 'पाठारे क्षत्रिय' हें नांव सार्थ, अन्वर्थक व सहजसुंदर असें ठरतें, इतकेंच नव्हे, तर पूर्वीच्या इतिहासाची परंपरा आजच्या काळाला जोडते, असें सिद्ध होतें. हें खरें व जुनें नांव ज्ञातींत रूढ करण्यांत आलें नसतें, तर ह्या इतक्या काळांत आणखी एखादें नवीनच नांव उत्पन्न झालें असतें !

पूर्वकाळीं आपल्या ज्ञातीचें कोणतें नांव वापरण्यांत येत असे, त्याबद्दलचा पुरावा खालील प्रमाणें आहे.

'साष्टीची बखर' (पूर्वार्ध) पान ८ वरील मजकूर असा :—

"धाकटा कुवर कान्होजी ब्राम्हणाचे कुळीं जन्म जाले। मग ब्रह्मविधि संध्यासूत्र क्षेत्रियाची रुद्र गायत्री त्यास दिधली ॥ मग पाठारे-क्षत्रि त्यास समंध नोंदत. मग प्रभु कुळांत घातलें ॥ त्यांचे पाताणे जाहले ॥"

हा प्रसंग बिंबराजाच्या नंतरचा आहे. म्हणजे जवळ जवळ सहाशें वर्षांपूर्वीचें ज्ञातीचें नांव 'पाठारे क्षत्रिय' हेंच होतें.

इतिहासाचार्य कै. राजवाडे ह्यांनीं संशोधित केलेल्या 'महिकावतीची बखर' ह्या मूळ ग्रंथाच्या ८८ पानावर मजकूर असा आहे :—"श्रीगणेशायनमः ॥ स्वस्त श्रीनृप विक्रमार्क समयांति संवत् ५७४ माहे फाल्गुन शुद्ध ९ रविवार ते वर्तमानी माहाराज राजाधिराज सिंहासनमंडित सिंहि संग्रामातिल अरीराय विभांड श्रीसविता वंशभुपति पाठारा ज्ञाति संमधि मूळ पुरुष रामराजा ॥" शिवाय, हाच मजकूर 'बिंबाख्याना'च्या पान १०७ वर आहे. पान १४४ वर खालील उल्लेख आहे. "आतां ऐक बिंबरायाचे गोत्र असे बकदालभ्य पवित्र देवी जाण प्रभावती सूर्यवंशी पाठारे ज्ञाती पैं। ऐसा बिंबराया समागमें॥" पान १४५ वरील मजकूर असाः—"श्रीसविता वंश भूपती प्रभु, क्षत्री पाठारे ज्ञाती । उपनांव राणे म्हणती ।"

ह्या पुराव्यावरून स्पष्ट होतें, कीं ज्ञातीला 'पाठारे क्षत्रिय' ह्याच नांवानें संबोधण्यांत येत असे. 'पाठारे क्षत्रिय ज्ञात' किंवा 'पाठारे ज्ञात' हे दोन्ही उल्लेख एकच ठरतात. बखरीच्या पूर्वार्धांत वर सांगितल्याप्रमाणें स्पष्ट शब्दांत 'पाठारे क्षत्रिय' असा उल्लेख असून 'साष्टीच्या बखरीं'त सर्वत्र ज्ञातीचा उल्लेख 'पाठारे ज्ञात' किंवा 'ज्ञात पाठारे' असाच केला आहे. बखर पान ३३, ४१, ४७ व ५० वरील उल्लेख पाहतांना हेंच दिसून येतें, कीं ज्ञातीला 'पाठारे ज्ञात' असेंच म्हटलेलें आहे. पान ५० वर 'क्षत्रिय देसाया' असा एक उल्लेख 'पाठारे ज्ञात' ह्या शब्दाचे आधीं त्याच वाक्यांत आला आहे. ह्यावरून 'पाठारे ज्ञात' किंवा 'पाठारे क्षत्रिय ज्ञात' हेंच ज्ञातीचें जुनें व ऐतिहासिक परंपरेचें नांव सिद्ध होतें.

बिंबकालापासून तों पेशव्यांच्या अमदानीपर्यंत

तर खात्रीपूर्वक ज्ञातीचें उपरोक्त हेंच नांव सिद्ध झालेलें आहे. 'साष्टीच्या बखरीं'त पेशव्यांचीं दरबारांतील पत्रें, सनदा, वगैरे प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांत सर्वत्र 'ज्ञात पाठारे' असा उल्लेख पेशव्यांनीं केला आहे. पेशव्यांच्या कालानंतर ही परंपरा कोणी तरी तोडली असून, नंतर अनेकांनीं ज्ञातीस निरनिराळीं नांवें दिलीं आहेत. ही परंपरा

त्या काळांतहि अजिबात तुटलेली नव्हती. सन १८९१ मे ४ रोजीं जस्टिस फॅरन-साहेबांनीं हायकोर्टांत दिलेल्या ज्ञातिविषयक निकालांत पुढील वाक्य आहे. 'This Court has no power to compel the members of the Pathare Kshatriya Caste or any other castes.' जर त्या वेळीं 'पाठारे क्षत्रिय' हें नांव प्रचारांत नसतें, तर फॅरनसाहेबांच्या लिखाणांत तें कोठून येतें? अर्थात् भांडणाऱ्या लोकांनीं ज्ञातीचें हें नांव त्या वेळीं धारण केलें असलें पाहिजे. उ. को प्रां. गं. शु. यजुर्वेदीय ब्राह्मण ह्या ग्रंथांत पान २० वर म्हटलें आहे, कीं "इकडील ह्यांचे वंशज हल्लीं आपणास भिन्न समजून 'पाठारे क्षत्रिय', आणि 'पत्तन प्रभू' (पाताणे प्रभू) असें म्हणवितात." हा ग्रंथ शके १८०६ (इ. स. १८८४) मधें छापण्यांत आलेला आहे. कै. पारसनिसांच्या 'ब्रह्मेंद्र स्वामींचे चरित्रां'त पान ६२ वर उल्लेख आहे तो :—"त्या वेळीं **पाठारे ज्ञातीचे हिंदु लोक** पोर्तुगीज लोकांच्या उपद्रवामुळें त्रासून जाऊन कळव्यास येऊन राहिले." ह्या उल्लेखावरून स्पष्टपणें दिसून येतें, कीं ज्ञातीचें मूळ नांव **पाठारे क्षत्रिय** असून कांहींच्या कारवाईमुळें हें खरें व ऐतिहासिक परंपरा राखणारें नांव मागें पडत चाललें होतें व ऐतिहासिक नसलेलीं **नैतिहासिक** नांवें पुढें आलीं होतीं. कांहींना 'पाठारे क्षत्रिय' हें नांव अपरिचित होऊं लागल्यामुळें सन १८६० पासून 'पांचकळशी' किंवा इतर नांवांचा प्रसार वाढूं लागून तेंच जुनें नांव होय, असा भ्रम ज्ञातींतील कांहीं सद्‌गृहस्थांना होऊन त्या नांवाचाच ते अभिमान धरूं लागले, हें कै. प्रोफेसर ताकखावादि विद्वानांना आढळून येताच, त्यांनीं ती चूक सुधारण्याचा निश्चय केला व ती सुधारलीहि **'पांचकळशी'** हा ज्ञातिवाचक शब्द **नसून क्षत्रियांचें जेतेपणाचें श्रेष्ठत्व दाखविणारें उ प प द किंवा उ पा धि आहे**, हें मी 'साष्टीच्या बखरीं'त सिद्ध केलेलें आहे. कांहीं झालें तरी 'पांचकळशी' किंवा 'चौकळशी' हे शब्द अर्वाचीन काळीं मोठ्या प्रमाणांत रूढ झाल्याचें दिसून येतें. कै. राजाराम सखाराम भागवत हे आपल्या 'मराठ्यांच्या संबंधानें चार उद्गार' ह्या पुस्तकांत म्हणतात, "हीं नांवें फिरंग्यांचें राज्य स्थापन झाल्यापासून विशेष अमलांत आलीं. तरी **पांचकळशी** लोक अस्सल मराठे अर्थात् महाराष्ट्र–क्षत्रिय इतकें बिंबाख्यानावरून निर्विवाद ठरतें."

* * * *

'पांचकळशी' हें ज्ञातीचें नांव मुळींच नाहीं. इतर ज्ञातीहि आपणाला पांचकळशी म्हणवितात. केळवें माहीम, बोर्डी, डहाणू, इत्यादि ठिकाणीं 'पांचकळशी' असें म्हणविणारी 'पाठारे क्षत्रिय' ज्ञातिव्यतिरिक्त एक ज्ञाति आहे. **कांहीं क्रिश्चनहि स्वतःला पांचकळशी म्हणवितात.**

'पांचकळशी' हा क्षत्रियत्वाचा बहुमानदर्शक असा हुद्दा आहे. ह्या शब्दाचें मूळ 'पंचकळसे' ह्या शब्दांत आहे. याच खंडांत इतरत्र उल्लेखिलेलें 'बिंबाख्यान' पान ८ व 'महिकावतीची बखर' पान १० यांतील मजकुरावरून स्पष्टच दिसतें, कीं 'पांचकळशी' हा शब्द ज्ञातिवाचक नसून तो बहुमान दर्शवावयाचा शद्ब आहे. ज्या ज्या लोकांना हुद्दा व हक्क बिंबकाळीं मिळाला, ते सर्व 'पांचकळशी' होत. कालांतरानें मूळचा अर्थ नाहींसा होऊन मिळालेला तो हुद्दाच मुळीं ज्ञातिवाचक नांव होऊन बसला. लग्नसमारंभाचे वेळीं सिंहासनाचा मान पाठारे क्षत्रिय ज्ञातीला मिळालेला होता. क्षत्रियत्वाची परिसीमा करणाऱ्या ज्ञातींना हा मान त्या वेळीं देण्यांत येत असे. त्या सिंहासनाला पांच कळस असत. असें हें सिंहासन अधिकारानें वापरणारे पांचकळशी झाले. हें सिंहासन लग्नाचे वेळीं उपभोगांत आणलें जात असे. अशीं हीं सिंहासनें ज्ञातींत दोन ठिकाणीं असल्याचा मी या ग्रंथांत इतरत्र उल्लेख केलेला आहे.

एका समूहानें बिंबराज्याच्या कालीं त्यांना अशा तऱ्हेचें सिंहासन मिळावें म्हणून हट्ट धरला. त्या वेळीं राजा बिंबानें सिंहासनाचा त्यांना अधिकार दिला, पण एक कळस कमी केला म्हणून ते चौकळसे झाले. 'पांचकळशी' व 'चौकळशी' ह्या दोन्ही हुद्यांत क्षत्रियत्वाच्या दृष्टीनें कांहींच फरक नसून, 'जेते' व 'जित' ह्या फरकामुळें एका कलशाचा फरक दिलेल्या त्या बहुमानांत वापरण्यांत आलेला आहे. 'पाठारे क्षत्रिय' ज्ञात हीं त्या वेळीं जेत्यांपैकीं होती; अर्थात् राजा बिंब ह्यानें हा पंचकलशांचा हुद्दा पाठारे क्षत्रिय ज्ञातीला दिला.

'साष्टीच्या बखरीं'त ज्ञातीच्या नांवाचा उल्लेख आहे तो :—

पृष्ठ ४ ओळ ७—'त्यामध्यें पाठारे ज्ञातिचे मराठे लोक त्याची पाठ हात धुवून घेतली'.

पृष्ठ ४ ओळ १० व पृष्ठ ५ ओळ १ 'त्यामधून साळोंके या रायापैकीं बाळ नाईक देश नारगौडे व त्याचे भाऊ.'

पृष्ठ ३३ ओळी १३—१४ पृष्ठ ३४ ओळ १

'ठाणियास कोट बांधावयास वगट फार केला ते समई साष्टिचे पाठाऱ्या ज्ञातीचे या चातेना व पांचकलशे लोकास बिगार लाविली.'

पृष्ठ ४६ ओळ ३१–३२ व पृष्ठ ४७ ओळ १ 'व मुऱ्हारजी नाईक व कुकजी हैबतराव व नारायणजी नाईक व कृष्णाजि नाईक व जयवंतजि सुरवा व राजे लोक साष्टीचे पाठारे ज्ञातीचे सामीजाऊन फिरंगी मोडला.'

पृष्ठ ४९ ओळी ५ ते ८ '...अवधियाहि हिंमत धरून वसईस मोरचे लाविले. जमेदार साळोखे रायापैकीं राणे कुळाचे कार्य संमधि गंगाजी नाईक व गणेशजी नाईक व नामाजी देसाई व मानजी देसाई व कुकजी हैब्रतराव हे सर्व.'

पृष्ठ ५० ओळी १० ते १४ '...व साष्टिचे क्षत्रि देसाई पैकीं नेतोजी देसाई व त्याचे भाव वारिस गंगाजी देसाई व पद्मणजी देसाई व भाईंदरकर हैब्रतराव व सुरव्या-पैकीं जसवंतजी सारे पाठारे यातीचे साष्टीपैकीं व वसईपैकीं माराष्ट्र धर्मासाठीं जिवाची आशा सोडून कोटास लागले.'

वरीलपैकीं एकाहि उताऱ्यांत '**सोमवंशी क्षत्रिय पाठारे**' **असें ज्ञातीचें नांव दिलेलें नाहीं**. एका उताऱ्यांत 'पांचकलशे' हा शब्द आलेला आहे; पण त्या शब्दाचे आधीं 'पाठाऱ्याज्ञात' असा आपल्या ज्ञातीचा व 'पातेणा' असा पाताणे प्रभु ज्ञातीचा उल्लेख करून नंतर पांचकळशे हा शब्द वापरलेला आहे. त्या ठिकाणीं 'पांचकळशे लोकास' असें म्हटलें आहे. ह्यावरून पांचकळशे हा शब्द क्षत्रिय वर्णांतील विशिष्ट कार्य-कारी वर्गाबद्दल वापरण्यांत आलेला दिसतो. **'पांचकळशे' हा शब्द ज्ञातिवाचक नसून क्षत्रियत्वाची ती उपाधि होय.** तसें नसतें तर त्याच वाक्यांत एकदां ज्ञातीस 'पाठारे' हें नांव दिल्यानंतर लगेच 'पाताणे' नांवाच्यापुढें पुन्हां त्याच ज्ञातीला 'पांचकळशे' असें दुसरें नांव देण्याचा अनौपचारिक प्रसंग प्राप्त झाला, असें म्हणावें लागतें. एकंदरींत पहातां बखरींतील वरील सहाहि उताऱ्यांत ज्ञातीला जोड नांव किंवा पृथक् पृथक् अशीं नांवें दिलेलीं नाहींत. उलटपक्षीं 'ज्ञात पाठारे', 'पाठारे ज्ञात' असेंच सर्वत्र म्हटलेलें आहे. सहाव्या उताऱ्यांत तर 'क्षत्रि' असें म्हणून पुढें लगेच 'पाठारे यातिचे' असें म्हटलेलें आहे. ह्यावरून हेंच सिद्ध होतें, कीं 'पाठारे' हाच शब्द ज्ञातिवाचक असून ही ज्ञात क्षत्रिय वर्णांतील आहे, हें दर्शविण्याकरितां त्या ठिकाणीं 'क्षत्रि' हा शब्द वापरण्यांत आलेला आहे. अर्थात् आपल्या ज्ञातीला पूर्व बखरींत म्हटल्याप्रमाणें 'पाठारे क्षत्रि' हेंच नांव मिळालेलें आहे.

'क्षत्रिय' हा शब्द वर्णवाचक आहे; 'पाठारे' हा शब्द ज्ञातिवाचक आहे; ह्या शब्दांच्या मागें ९०० वर्षांचा इतिहास आहे, हें विसरतां नये.

* * *

पूर्वीं सरकारदरबारीं ह्या ज्ञातीचा उल्लेख कोणत्या शब्दानें करण्यांत आलेला आहे तें पाहूं.

'साष्टीच्या बखरीं'तील अणजूरकर नाईकांना पेशव्यांकडून आलेलीं पत्रें, आज्ञा-पत्रें, सनदा, सरकारी ठराव, वगैरे—

पृष्ठ १ ओळी ९ ते १३—'वेश्मी गंगाजी नाईक व बुवाजी नाईक व जनार्दनजी नाईक बिन मुरारजी नाईक व सिवाजी नाईक व नारायणजी नाईक बिन निंबाजी नाईक महिमान राऊ कुळी सोळंखी जात पाठारे पुरातन वास्तव्य कसबे बानरे (वांद्रा) तर्फ मरोळ परगणे साष्टी वतनदार मोकादम मौजे अणजूर ता०॥ आठगांव परगणे सायेवान प्रांत वसई...'

पृष्ठ ४ ओळी ११ ते १५—'वेश्मी (१७४१) गंगाजी नाईक व बुवाजी नाईक व मुरारजी नाईक याचे पुत्र जनार्दन नाईक व सिवजी नाईक व नारायणजी नाईक बिन निंबाजी नाईक महिमान राऊ कुळी सोळोंखी ज्ञात पाठारे देशनारगौडी उर्फ सरपाटीलकी परगणे साष्टी व ता। आठगाव परगणे सायेवान प्रांत वसई प्रांताचे मसलतेस जीवाभ्य श्रमसाहास करून सेवाधर्म संपादिला.'

पृष्ठ ७ ओळी १५ ते १८—'पेशजी गंगाजी नाईक व बुवाजी नाईक व जनार्दन नाईक बिन मुरारजी नाईक व शिवजी नाईक व नारायणजी नाईक बिन निंबाजी नाईक महिमान राऊ कुळी साळोंखी ज्ञात पाठारे पुरातन वास्तव्य कसबे वानरे तर्फ मरोळ परगणे साष्टी वतनदार मोकादम अणजूर तर्फ आठगांव परगणे, सायेवान प्रांत वसई—'

पृष्ठ १२ ओळी ५—११ 'शीका छमो अजम गंगाजी नाईक व बुवाजी नाईक व जनार्दन नाईक बिन मुरारजी नाईक व सिवजी नाईक व नारायणजी नाईक बिन निंबाजी नाईक महिमान राऊ कुळी साळोंखी ज्ञात पाठारे सरनाडगौड ऊर्फ सरपाटील पुरातन वास्तव्य वानरे ता। मरोळ प्रांत साष्टी व ता। आठगांव परगणे सायेवान प्रांत वसई.'

वरील चारहि उताऱ्यांत नाईकांची ज्ञात 'पाठारे' असाच उल्लेख केलेला आहे. सनदा हा नेहमीं एक अस्सल पुरावा म्हणून समजला जातो. ह्या सनदा सही-शिक्क्याच्या आहेत. वरील चारहि उताऱ्यांत 'सोमवंशी क्षत्रिय पाठारे', 'पांचकळशे', अथवा चौकळशे' यांपैकीं एकाहि नांवाचा कोठेंहि उल्लेख नाहीं. सन १७४० व त्यापूर्वींहि सरकार दरबारीं ज्ञातीचें नांव 'पाठारे' हेंच रूढ झालेलें होतें हें सिद्ध होतें. इ. स. ८४० पासून १७४० पर्यंत ज्ञातीचें जें नांव रूढ होतें, त्याचाच उल्लेख पेशवे सरकारनें स्पष्टपणें केलेला आहे. असें असतांना 'पाठारे क्षत्रिय' ह्या ज्ञातीच्या नांवाची ९०० वर्षांची ऐतिहासिक परंपरा सोडण्याची कारवाई मागें कांहीं मूठभर मंडळींनीं केल्याचें पाहून त्यांच्या नैतिहासिक ज्ञानाबद्दल कींव करावीशी वाटते.

'काव्येतिहास-संग्रह'कारांनीं सन १८८२ मध्यें छापलेल्या 'साष्टीच्या बखरीं'तील उल्लेख:—

पृष्ठ २ ओळ ५—त्यांत पाठारे ज्ञातिचे लोक होते त्यांस फार उपद्रव करीत.

पृष्ठ ९ ओळी १७–१८—'त्या वेळेस पाठारे ज्ञातीचे साष्टींतील व वसईतील लोकांस वेठीचे कामावर लावलें.'

सन १८८७ सालीं मालाड येथें नियम पसार करण्यांत आले होते, त्या बाबतींत हायकोर्टांत फिर्याद होऊन त्या फिर्यादीच्या निवाड्यांत न्यायाधीश फॅरनसाहेबांनीं '*Pathare Kshatriya Caste*' असे शब्द योजिले आहेत. 'The Indian Law Reporter', Bombay Series 1891 A. D. page 591. 'In the year 1887 some members of the *Pathare Kshatriya Caste*...... that the outlay in connection with the *Munj, Marriage and other ceremony*......'......'the Plaintiff and the members were the members of the *Pathare Kshatriya Caste*'......'the parties belong to the *Pathare Kshatriya Caste*'.

तसेंच कै. दत्तात्रय बळवंत पारसनीस ह्यांनीं लिहिलेल्या इतिहासांत पृष्ठ ५ पत्र ५ वें मधील मजकूर आहे तो :—'पेशमी गंगाजी नाईक व इतर महिमान राऊ कुळी सोळंखी ज्ञात पाठारे पुरातन वास्तव्य कसबे वानरें तर्फ मरोळ परगणे साष्टी वतनदार मोकादम मौजे अणजूर—'.

वरळी येथील धर्मादाय मिळकतीचें दत्तक पत्रक सन १८२६ मध्यें कै. विश्वनाथ धाकजी व इतर कौंडण्य गोत्रीय यांनीं केलेलें आहे व तें मुम्बईच्या रजिस्ट्रार कचेरींत नोंदलेलें आहे. त्यांत "मौजे मजकूर 'क्षेत्री पाठारे'" असेंच म्हटलेलें आहे. यथामति बारकाईनें संशोधिलेला ज्ञातीच्या नांवाबद्दलचा सर्व पुरावा मी वाचकांपुढें ठेवला आहे. आतां तरी ज्ञातीच्या नांवाबद्दल कोणी शंका घेईल, भ्रामक समजुतीला बळी पडेल, असें मला वाटत नाहीं.

'पाठारे क्षत्रिय' ह्या ज्ञातीच्या नांवाला कालपर्यंतची ११२० वर्षांची स्पष्ट अशी ऐतिहासिक परंपरा आहे, हें कोणीहि विसरून चालावयाचें नाहीं.

(१४) उपजाती ह्या कशा झाल्या ?

भारत हा आपला देश अनेक शतकें परकीयांच्या अमलाखालीं गुलामगिरींत खितपत पडलेला होता, ह्याचें एक कारण असें, कीं आपल्यांत पंथ, भेद अनावर झाले. आपल्या ह्या देशांत असंख्य जाती, त्या जातींच्या असंख्य उपजाती व पोटजाती झाल्या आहेत. आपल्या ह्या देशांतला एकसंघपणा हा निव्वळ नाममात्र राहिला आहे. जितक्या जाती व जितके भेद, पंथ, तितका परकेपणा अधिकच वाढला. आपला देश

आपणा सर्वांचा आहे अशी भावना आमच्यांत आजवर मुळींच डोकावली नाहीं. देशपरत्वें, स्थलपरत्वें, प्रांतापरत्वें—

कूपमंडूक-वृत्तीच्या दृष्टीनें

अनेक भाग पडलेले आहेत. त्यांतहि अनेक धर्मीयांचें अनेक भेद. जातिभेद तर विचारूंच नका. आपल्या ह्या देशांतले लोक परधर्मीयांस व ज्ञातीच्या माणसांना आपणांत विलीन करून घेण्यास तयारच नव्हते व आजहि तितकेसे नाहींत. किंबहुना विलिनीकरणाचें तत्त्व त्यांना मुळीं पटतच नाहीं. आपल्या देशांत असलेले बहुतेक मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध, वगैरे सारे भेद हेंच आज दाखवीत आहेत. हे सर्वजण मूळचे भारतवासी आर्यधर्मी व भारतीय असतांना आपल्यांतून बाहेर पडून विभक्त झाले व आपल्याशीं टक्कर घेणारे उलट आपले दुश्मन बनले. ह्याच न्यायानें पहातां आपल्या ज्ञातीची संख्या अगणित प्रमाणांत कमी झाली आहे. त्यामुळें दुजेपणा, एकलकोंडेपणा फारच वाढला असून, विशाल दृष्टीच नाहींशी झाली आहे. पंथ तितके भेद, भेद तितके दुराग्रह, दुराग्रह तितका परकेपणा, असा प्रकार सर्व ठिकाणीं झालेला आहे. म्हणून 'पाठारे' ज्ञातीचे लोक कनोजहून निघाले त्यावेळीं ते सर्व 'क्षत्रिय' म्हणून निघाले. पण आज त्यांच्यांत सूर्यवंशी पांचकळशी, सोमवंशी पांचकळशी, मळेकर पांचकळशी, साष्टीकर चौकळशी, अष्टागर चौकळशी[1] पाठारे प्रभू, वाडवळ, अशा

1. MAPGAON is in the Kolaba District in Kaukeshwar Block.

MALIS : Malis are returned as numbering 14,995 souls and are found over the whole district. Besides, by the name of Malis, they are known as *Pachkalashis, Sutars, and Marathas.* They speak Marathi and are hard-working, contended and well-behaved and living as husbandmen, gardeners, carpenters, and day-labours and a few as writers. About fifty Malis are village headmen, but most are cultivators. They live in one-storied houses with mud or brick-walls and with thatched or tiled roofs. They have cattle and a few have servants. They live on rice, rice-bread, vegetables, and fish. Their holiday dinners consist of pulse-bread and mutton, fowls and liquor. They dress like Brahmans, Prabhus, or Kunbis, wearing a loincloth, a coarse blanket, and a cap or a piece of cloth rolled round the head. On festive occasions they dress in silk-bordered waist-clothes, turban, and coat, and the women in the full Maratha robe and bodies. The wives of husbandmen and gardeners help their husbands by selling vegetables, butter and milk. They worship all the Hindu Gods and their priests are ordinary Brahmans. They wear the sacred thread, and do not forbid widow-marriage. They send their boys to school and are well-to-do.

HUSBANDMEN : The chief Kolaba husbandmen are Kunbis, Marathas, Musalmans, Mhars, and Brahmans, Bhandaris, Chowkalshis and Panchkalshis are gardeners rather than husbandmen. Very few Brahmans work in the fields with their own hands.

—*Kolaba Gazetteer*, pages 17, 63 & 99.

अनेक जाती—उपजाती झालेल्या आहेत. यामुळें 'पाठारे क्षत्रिय' ज्ञातीची लोकसंख्या न वाढतां दहा हजारापर्यंत आली आहे. शिवाय, फिरंग्यांच्या बाटवाबाटवीच्या प्रकारामुळें पाठारे क्षत्रिय ज्ञातीवर अगदीं नामशेष होण्याचा प्रसंग आला होता. 'साष्टीच्या बखरीं'त बखरकार म्हणतात, कीं फिरंग्यांचा डोळा पाठारे क्षत्रिय ज्ञातीवर फार. कारण, तेच लोक राजकारणांत पडून फिरंग्यांना सळो कीं पळो करीत होते. त्यांतहि साष्टीकर, उरणकर, वसईकर, कल्याणकर, असले भेद सुरू झाले होते; पण आतां या नसत्या भेदाबाबतच्या एकीकरणाचा काळप्रसंग आला असल्याकारणानें ते भेद नामशेष झाले आहेत. **क्षात्रैक्य परिषदेस** माझी सूचना आहे, कीं कांहीं काळानें ह्या विशाल एकीकरणाचा प्रयत्न त्या परिषदेनें करावा. कै. प्रो. ताकखावांचा हाच मतप्रवाह इतरत्र छापलेला आहेच. अशा अनेक ज्ञाती होण्याचें कारण म्हणजे जरा कांहीं ठराविक प्रघाताच्या बाहेर कोणी जातोसा दिसला, कीं त्याला शिक्षा म्हणजे अपंक्त करणें. तसेंच एखाद्याचे घरावर किंवा एखाद्या विहिरींत पावाचा तुकडा टाकला, कीं त्या घराला किंवा त्या विहिरीचें पाणी पिणाऱ्यास अपंक्त ठरविलें जाई. अशा स्थितींत त्या अपंक्त ठरविण्यांत आलेल्या लोकांना आपल्या ज्ञातींतून बाहेर जाण्याची इच्छा नसतांनाहि त्यांना परका धर्म व ज्ञात पत्करावी लागली. परदेशगमन करून आलेल्या नामवंत गृहस्थांना त्यांच्या बायकापोरांसकट ज्ञातीबाहेर वाळींत टाकण्याचे अनेक प्रकार आजवर घडलेले आहेत. अर्थात् अशा अपंक्त लोकांच्या निरनिराळ्या लोकांच्या अनेक ज्ञाती झालेल्या आहेत. **आपण प्रत्येकाला 'जा' म्हणण्यास फारच जागरूक आहोंत; पण 'या' म्हणण्याचा आमचा दरवाजा नेहमींच लावलेला होता व आजहि आहे. (या 'जा' मुळें)** आमची संख्या घटली, संघटना सुटली व 'या' न म्हटल्यामुळें आमची वाढ मुळींच झाली नाहीं. परकी धर्मांत, समाजांत राष्ट्रांत सर्वजण आमच्यांत 'या' असें मोठ्या दिलदारपणानें म्हणत असतात. परकी, परधर्मीय आपल्यांत येतील तितके पचवून आपण त्यांच्यासह हिन्दूच राहिलें पाहिजे, असें आजवर अनेक धुरिणांनीं कंठरवानें सांगितलें आहे.

* * *

(१५) महासभेचा उगम व तिचें कार्य :—

बखरीच्या संशोधनांत दिसून आलें, कीं कोणताहि राजा असला, कोणताहि पातशहा असला, कोणताहि दिवाण असला, तरी सामाजिक व धार्मिक प्रश्न सर्व ज्ञातीची जमात भरवून निकालांत काढले जात असत. बखरींतलीं मानपानाचीं प्रकरणें, वृत्तींचे कज्जे भानगडी, ह्या सर्व पंचायत करीत असे. ह्या न्यायाचा निकाल फक्त पादशहा,

राजा किंवा दिवाण आपल्या मुखांतून सांगत असे, इतकेंच नव्हे, तर त्या त्या जमातींतले जे सातआठजण न्यायासाठीं पंच म्हणून निवडले जात असत, ते दोघाहि पक्षकारांना पसंत आहेत, असें विचारूनच कायम केले जात, व तशी मान्यता लेखी घेतली जाई. अर्थात् सर्व कामें पंचायतीच्या तत्त्वानें चालत असत. हेंच लोकशाहीचें महान् तत्त्व आहे. ह्या जमातींतून ज्ञातींच्या सभांचा नि महासभांचा उगम झालेला आहे. ही जी मोठी जमात भरत असे, तिचें रूपांतर फिरंग्यांचे अमदानींत महासभेंत झालें. त्याप्रमाणें उत्तरेस असलेल्या पाठारे क्षत्रियांची सभा मालाडचे देसाई—भास्कररावाचे वंशज यांचे अधिपत्याखालीं भरली जात असे, व त्यांत अंकुशदेव राणेंना दुय्यम दर्जाची जागा ह्या महासभेच्या जमान्यांत दिलेली आहे. दुसरी महासभा चेऊलचे अधिकारी यांच्या आधिपत्याखालीं भरत आलेली आहे. इंग्रजांचे राजवटीपर्यंत ह्या सर्व सभांचा कारभार चालत आलेला आहे, व ज्ञातीचे सर्व प्रश्न, कज्जे, वगैरे प्रकरणें ह्याच सभांतून निकालीं निघत असत. अशा महासभांच्या अधिकाराखालीं निरनिराळ्या देश–सभा वगैरे होत्या. ह्या महासभेंत व निकालाच्या जमातीचे सभेंत एक मोठा असलेला फरक आपण विसरतां कामा नये. तो फरक म्हणजे राज्यकर्त्यांच्या आधिपत्याखालीं ह्या पंचायती भरून सामाजिक, धार्मिक, वगैरे कामांचा निकाल त्या राज्यकर्त्यांचेकडून निकालीं जात असे. पण पोर्तुगीज हे उपरे राज्यकर्ते असल्यानें जमातींचा व त्यांचा असा कोणताच संबंध राहिला नाहीं. ते राज्यकर्ते प्रजेच्या ह्या भानगडींत पडत नसत. अर्थात् ह्या जमातींना आपलीं कामें स्वतःच करावीं लागलीं व त्यामुळें साष्टींतल्या महासभेचा प्रमुख हा कायमचा मालाडचा प्रमुख देसाई ठरला गेला व अष्टागरांतल्या महासभेचा प्रमुख चेऊलचा अधिकारी ठरला गेला. ह्या महासभेची घटना, तिच्या हाताखालील सभा, तसेंच तिथलें कार्यक्षेत्र, वगैरेबद्दलच्या माहितीकरितां मी खालील उतारा देत आहें. हा उतारा

(१६) पुण्यश्लोक प. वा. जनार्दन राघोबा वनमाळी यांच्या १३ जुलै १८९० च्या सभेंतल्या भाषणाचा आहे—उद्धृत—

('गेल्या २५ वर्षांत क्षात्रैक्यसमाजांत झालेल्या **अध्यक्षांच्या भाषणांतील उतारे**, पान १५ ते १८) वरून.

"This Panchayat organization has existed in our community from time immemorial. It existed under our own Prince Raja Bimb, under the Portuguese Government and under the Maratha Sovereignty of Poona, and it has also continued

its existence under the British Goverment. You thus see no matter what King rules the land we live in, our organization has remained an unbombarded stronghold for our social and religious concerns.

It has also remained unimpaired during the migrations of the community from one place to another. Some of the earlier and older holdings such as Bassein, Ooran, Chewool, have nearly been deserted. Others are gradually following the same course, the centre of attraction being Bombay, the chief city of the Western Presidency.

The Panchayat constitution is not contained in a written code or book, but is traditionary, the heads and *Mankaries* being hereditary, but where heredity fails, nomination is resorted to. First in point of importance is *the High Assembly* or *the Maha Sabha,* which is convened by the *High Sheriff, the Desai of Malad,* with the previous consent of the local Desh Panchayat. At this Maha Sabha all the members of the Caste are requested to attend and have the privilege to attend, and a majority of votes decides all questions that are submitted to the meeting. This High Assembly disposes of all moral, social, and religious questions concerning the caste. I beg to draw your special attention to the fact that our caste Panchayats have been from time immemorial in the habit of giving relief in matters other than strictly religious. Several matters between man and man which are now taken cognizance of by the Civil and Criminal Courts, were adjudicated upon by our Panchayats, provided all the parties belonged to our caste. I give below a list of a few cases cognizable by the Panchayats :—

1st. For using abusive language.

2nd. For drunkenness.

3rd. For Vritti-bhanga.

4th. For mis-application and mis-appropriation of the public funds of the community.

5th. For breach of promise of marriage.

6th. For return by a re-married woman of the property of her deceased husband.

7th. For maintenance to a married woman.

8th. For restitution of conjugal rights.

9th. For defaming a Brahman; etc.

Of second rank is the provincial court, called the Desh Sabha. This is the special court of appeal. It is convened by *the Desai* with the consent of the local Desh Sabha and also held *at Malad.* At this meeting, as the case may require, all the Caste is invited or only the members of the particular District concerned, where the appeal or original action was heard. This assembly had both original and appellate jurisdiction.

The third is the District Panchayat. This is convened to hear appeals from the local Panchayat. At this meeting the members of the District attend. The principal Districts are the Desh, the Bhoregava, Vasai (Bassein) and the Chargava. The Desh District comprises Malad, Goregaum, Eksar, Bhaindar, Dysar, Andheri, Malowni, Vesava, Manori, etc. The Bhoregava comprises Thana, Anjore, Kallian, Bhiwandy, etc. The Bassein District comprises Bassein, Khetwady, Nabob's Mazgagaon, etc.; and the Chargava district comprises Girgaum including Gamdevi, Parel, Worlee, Mazagaon, Mahim etc.

The fourth is the local Panchayat or the court of first instance. This is constituted in each of the localities and villages named above. The executive business is performed by *mankaries*, but all persons of the community residing in the locality are invited to the meeting. And all questions, as in the other assemblies, are decided by a majority of votes.

I may also mention that half a century ago, H. H. The Shankaracharya, when on a visit to Malad, called together

all the Hindu population and confirmed under his seal the power exercised by the Desais over our community, from generation to generation. In *the sanad* then granted, the Shankaracharya expressly refers to and confirms the power to convene Panchayats, first for some Mahatkarya (great purpose), 2nd for the reception of the Shree Swami and 3rd for political purposes. These powers, he distinctly mentions, are exercised and exerciseable in addition to the powers possessed by the Desai to watch over the caste and religions usages.

It is for you now to say, whether such being the powers and constitution of the Panchayats, there is any danger to this organization and whether it serves a useful purpose and is worthy to be watched over and saved from destruction. The defendants deserve your sympathy for being made the individual martyrs on behalf of all your Caste and its constitutions."

भाग पांचवा

महिकावतीची बखर आणि

महिकावतींतील बिंब

(१)—पान ३३ ते ८८

संवत् ११९५ त शालिवाहन शके १०६० त दिनीं अहिनलवाडे पाटण तत् समीप चांपानेर पच्यासि तेथें राजा सूर्यवंशी प्रतापबिंब गोत्र भारद्वाज पंच प्रवर शाखा कात्यायनि कुळदेवता प्रभावति त्याणें जेष्ठ बंधुजवळून मुहिम आदरिली. जमा सेनापती नाईकराव व सरकोन रघुनाथपंत बोलाविलें तत्समईं राजगुरु हेमाद्रिपंडित यजुर्वेदी माध्यांनदिन वाजसेनीय शाखा भार्गव गोत्र त्रिप्रवरांकित कुळदैवत चंडिका सप्तशृंगि उपनांव चामरें समागमें सरसुभेदार केशव सोमवंशी गोत्र बकदालभ कुळदेवता पद्मावती सरसवतीश शेषवंशी आनंदराव गोत्र हरीत कुळदेवता हरिद्रादेवी सरचिटणीस गंभीरराव सूर्यवंशी गोत्र वशिष्ठ कुळदेवता काळिका. हवालदार सोमवंशी पुरुषोत्तम गोत्र गौतम कुळदेवता नारायणी मुजुमदार सोमवंशी गोत्र विद्यामित्र कुळदेवता ललिता कोतवाल पटवर्धन गंगाजी गोत्र रेणुका कुळदैवत भोगेश्वरी मुरक प्रधान बाळकृष्णराव सोमवंशी गोत्र कौंडिण्य कुळदेवता कुमाहिका राजा पैठणीं आला पैठणाहून दशल दरबाजी व विक्रम भोजाचा सरजमात २ वर्षांनंतर निघाले अहिनलवाड्यास पत्रें गेलीं तेव्हां बिंबदेव ६६ कुळें घेऊन पैठणहून ब्राह्मणसमुदाय यजुर्वेदी माध्यानदिन भेद वाजस्ती शाखेचे हा समुदाय निघाला. महिबिंब कोंकणी आला प्रतापबिंब मेला राणी सती गेली बिंब गादीवर बसला मग बिंबानें ६५ वर्षें राज्य केलें. संवत् १२४५ (इ. स. ११८८)त

बिंबाख्यान यांतील हकिकतींचें साम्य

बिंबाख्यानांतील राजा बिंब

(१) (पान ५१ ते ९४ पर्यंत वंशावळी ह्या वंशावळीवर दुसरा वृत्तांत चढविला तो पान ९४ ते १०१ नंतर त्यापुढें मझर सुरू झाला तें पान १०१ ते १०६ पर्यंत)

संवत् ११९५ शके १०६० अहिनलवाडे पाटण तत् समीप चांपानेर राजा सूर्यवंशी प्रतापबिंब गोत्र भारद्वाज पंचप्रवर शाखा कात्यायिनी कुळदेवता प्रभावति मोठ्या भ्रात्याच्या परवानगीनें प्रताप निघाला सेनाजमा सेनाधिपति नाईकराव सरकारकून रघुनाथपंत कोंकणांत चढाई. तत्समयीं राजगुरु हेमपंडीत यजुर्वेदी माध्यान्हदिन वाजसनी शाखा भार्गव गोत्र त्रिप्रवर कुळदैवत चंडिका सप्तशृंगी उपनांव चामरे समागमें सुभेदार केशवराव सोमवंशी गोत्र बकदालभ्य कुळदेवता पदमावती आणि सरसवतीस शेषवंशी आनंदराव 'गोत्र हरित कुळदेवी हिंग्लामा सरचिटणिस गंभीरराव सूर्यवंशी गोत्र वसिष्ठ कुळदेवता काळिका सरहवालदार सोमवंशी पुरुषोत्तम गोत्र गौतम कुळदेवता नारायणी व मुजुमदार माधवराव सोमवंशी गोत्र विश्वामित्र कुळदेवता ललिता. कोतवाल पटवर्धन गंगाजी गोत्र रेणुका कुळदेवता योगेश्वरी. मुख्य प्रधान बाळकृष्णराव सोमवंशी गोत्र कौंडिण्य. कुळदेवता कुमारीक ह्या सर्वांसह प्रतापबिंब पैठणीं आला विक्रम भोजाजवळ राहिला. पैठणाहून देशले हरबाजी राया व भोजाचा सरजमादार बाळाजी सिंघ २ वर्षेंनंतर निघाले. अहिनलवाड्यास पत्रें गेलीं त्यावरून बिंब ६६ कुळें घेऊन पैठणास आला. पैठणाहून यजुर्वेदी माध्यान्हदिन भेद वाजसनी शाखेची कुळें घेतलीं. ठाण्यास

महिकावतींतील बिंब

भोजराजा मारला राजा बिंब मेला राणी कमाईसेचा अभिलाष प्रधानानें धरला केशवदेवानें १२ वर्षें राज्य केल्यावर धारेचे भोजानें चाल केली. भोज राजा धरला १२ वर्षें झालीं नंतर ५ वर्षांनीं केशवदेव मेला जनार्दनप्रधान राज्यावर बसला ४ वर्षांनें घणदेवीचा नागरशा आला. संवत् १२९८ शालिवाहन शक ११६३ त नागरशा होता जनार्दन प्रधान मेला नागरशा राजा झाला भायखळ्याचे युद्धांत नागरशा व राणी मारली गेली मग निकामलिक राजा। आवु नाखवा, पाणी सावंत, हेवारखान, सुंगन, व नाशिलखां हंबारखां त्याचा पुत्र डफरखान नंतर मलिक मुरदार त्यावर मकसीदसी त्या वेळीं सुलतान पातशहाचा डफरखान आला.

* * *

(२) पान ८८

संवत् ५७४ महाराधिराज सिंहासनमंडीत सिंही संग्रामांतील अरिगया विभांड श्री सविता वंशि भूपति पाठार ज्ञातीसंबंधीं मूळ पुरुष रामराजा गोत्र भारद्वाज कुळदेवी प्रभावती उपनांव राणे पासोन त्रिपाळराज त्याचा भान राजा तयाचा त्रिपाळराजा तयाचा गोविंद राजा तयाचा कृष्णराजा त्याचा वंशिक राजा रामदेवराजा त्या रामदेवराजाचे राज्य अल्लाउद्दिनानें घेतलें रामदेवराजा आणिक देशोदेशीचे सूर्यवंशी तथा सोमवंशी पैठणीं आले. मोठा मुलगा केशवदेव देवगिरीस राहिला. द्वितीय पुत्र बिंब उदयपुरास राहिला तिसरा पुत्र अळंदापूर पाटणी राज्यावर बसविला तो शके १२१० पैठणावर अल्लाउद्दिनानें चाल केली युद्ध केले रामदेवाचा पराभव झाला केशवदेव स्वस्थ बसला बिंबानें गुजराथ काबीज केली व वडनगर येथें थोडा स्थिरावला प्रतापशा व हेमाद्रि अळंदापुरास राहीले. राजा बिंबानें शके १२१० त चाल केली सालेर मालेर ते कोंकणांत गेला त्याजबरोबर १२ सूर्यवंशी व २४ सोमवंशी कुळें होतीं. त्याला दोन मुलगे प्रतापशा व पुरशा बिंबानें शके १२२७ त गादी माहिमास नेली राज्याचे १२ भाग करून बिंबाने आपले वंशियास दिले मग राजा बिंब ८ वर्षे १ महिना २ दिवस राज्य करून मेला शके १२२५ त त्यानंतर राजाचा जेष्ठ पुत्र प्रतापशहा कारभार पाहूं लागला २८ वर्षे मास तीन राज्य केलें चंपावतीचा केशवदेव राणीचे नावे सुप्रभा प्रधान बुधसेन व राजपुत्र नागरशा सोहिरे. प्रतापशहा मेहुणा नागरशानें ऐडख मेथाळगड प्रतापजवळ मागितला न दिल्यामुळें युद्ध झालें प्रतापरावचे सांगण्यावरून देवगिरीहून बाळसेन वगैरे पांचजण पाठविले. रामचंद्ररायानें जीवन नाईक सांबखेडकर पाठविला माहोलीचे मैदानांत युद्ध झालें जीवन नाईक व हेमाद्रि ह्यांचा पराभव झाला

बिंबाख्यानांतील राजा बिंब

आला. इतक्यांत प्रतापबिंब मेला. बिंबदेवानें ६५ वर्षें राज्य केलें. संवत् १२४५ (इ. स. ११८८)त चंपावतीचा भोज लढाईत मारला राजा बिंब मेला राणी कमाईसे मुलगा केशव ५ वर्षांचा केशवदेव राजा झाला. १२ वर्षें राज्य झाल्यावर धारेचे भोजानें चाल केली. भोजराजा धरला १२ वर्षें झालीं नंतर ५ वर्षांनीं केशव मेला जनार्दन प्रधान राज्यावर बसविला ४ वर्षांनंतर घणदेवीचा नागरशा आला संवत् १२९८ शालिवाहन शके ११६३ त जनार्दन युद्धांत मेला. नागरशा राजा झाला भायखळ्याचे युद्धांत नागरशा मारला गेला कोणी नाहीं निकामलिक राजा झाला.

* * *

(२) पान १०७ ते १२८ पर्यंतची बिंबाची हकिकत.

संवत् ५७४ महाराधिराज सिंहासनमंडित सिंही ग्रामांतील अरिराय विभांड श्रीसवितावंश भूपति पाठार ज्ञातीसंबंधी मूळ पुरुष रामराजा गोत्र भारद्वाज कुळदेवी प्रभावती उपनांव राणे त्याचा पुत्र त्रिपाळराजा त्याचा पुत्र भानराज त्याचा पुत्र त्रिंबकराज त्याचा पुत्र गोविंदराज त्याचा पुत्र कृष्णराज त्याचा वंशिक राजा रामदेवराजा त्याचे राज्य अल्लाउद्दिनानें घेतले तो रामदेवराजा आणिक राजे देशोदेशींचे सूर्यवंशी तथा सोमवंशी रायासंगे पैठणी आले तेथें राहिले राजाचा मोठा मुलगा देवगिरीचे राज्यावर बसला दुसरा बिंब उदयपुरासी बसला तिसरा प्रतापस्या आळंदापुर पाटणी गादीवर बसला शके १२१० मध्यें पैठणास सुलतात अल्लाउद्दिनानें युद्ध केलें तेथें रामदेव व इतर राजे पराभव पावले. केशवदेव स्वस्थ बसला बिंबानें गुजराथेवर चाल केली रस्ता सातेरमुरेल नंदन बोरा दाहिले किशापूर वडनगर येथें स्थायिक झाला. प्रतापशहा कनिष्ठ बंधु राजगुरू हेमाडपत आळंदापूरास राहिले. राजा बिंबाने शालिवाहन शके १२१६ मध्यें चाल केली गुजराथ प्रांतांतून अहिनलवाडा पुरपाटणाहून दक्षिणेस विलायत नाईकापैकीं कोंकणांत ठाणे तो माहिमापर्यंत गेला बरोबर १२ राजे सूर्यवंशी २४ राजे सोमवंशी ९ शेषवंशी शालिवाहन शके १२२७ त राजा माहिम पहावयास गेला माहिमचे बारा भाग करून आपले वंशिकास दिले राजा बिंबाने ९ वर्षे १ मास ३ दिन राज्य करून मृत्यू पावला शके १२२५ त राजाचा मोठा मुलगा प्रतापशहा गादीवर आला त्याणे २८ वर्षे ३ मास राज्य केले चंपावतीचे केशवदेव राजा पुत्र नागरशाने पत्राने प्रतापशहाजवळ ऐडख मेशाळगड मागितला प्रतापशहाने देवगिरीस राया महादेवरायास पत्र पाठविले जीवन नाईक सांबखेडेकर मदत आला त्या वेळी नागरशाने त्रिपुरकराने शहापुरास हेमाडपंताचा मोड केला प्रतापशहास मदत म्हणून

महिकावतींतील बिंब

प्रतापशहानें पुन्हा सैन्य जमविले अहिनलवाड्याहून जयसिंगाने सैन्य मागविले बाळ सेनादिकांचा सूड घ्या म्हणून पंडितराव पाठविला तो पराभव पावला. जैतसिंग रामदेवराव वगैरेंचा पराभव अंधेरीस केला विनाकष्टी नागरशाने राज्य घेतले शके १२५४ ते शक १२६९ पर्यंत राज्य केले. पुढे लोकांनीं नागरशास बहिष्कृत केले नागरशाचा जमायतदार एकांगवीर सिधा वैमनस्य आहे म्हणून वडनगराहून निकामलिकास आणले शालिवाहन शके १२७० आंदेरीस युद्ध झाले नागरशा हरला.

* * *

(३) संवत् १५३५ अहिनलवाडा पाटण वक्त ठाणें कोंकण माहीम बिंबस्थान विलायत नाईकापैकीं मलीक महामद फौजदार व ठोंकखान प्रदशहा रोजी महजर लिहिला बिंबशा स्वामी ह्या प्रान्तांत संवत् ११९५ बाबरशा पातशहाचे भयाने ह्या परदेशी आले. त्यावेळीं समागमे आले ते अष्टप्रधान व बारा उमराव मुख्य राजगोत्र भारद्वाज कुळदेवता प्रभावती पूर्व राज गोरखपुर. त्याचे मुख्य प्रधान परशरामराव गोत्र वृद्ध विष्णु उपनांव बाणाध्व पूर्व राजकडे माणीकपूर. त्यांचे जामात शंकरराव सूर्यवंशी पूर्व राज मातापुर पाटण. पंडतराव राजपंडीत आणि रघुनाथपंत कावळे पैठणकर राजगुरु गोत्र भारद्वाज कुळदेवी एकविरा मातापुर यमाई वाजसनीय शाखा कात्यायनि शुक्रवाच वीशाखा माध्यंदिनभेद असे सोमवंशीयही आले त्याप्रमाणे सर्व माहालांत सर्वांना बसविले यानंतर पंचारत सोमवंशी कार्तवियोंद्भव जे आहेत त्यासी भिन्न गंधपात्र करोन गंधार्जन् करविलें. ते लक्ष्मीविष्णोद्भव आहेत म्हणून सूर्यवंश व सोमवंश या दुवांधीं समागमे सुखे गंधार्चन करावे. तेच संमति पांचाळ आले तरी त्याशीही बहुमान करावा आणीक सिधें शेषवंशी म्हणोन भांडारि आले तरी सुखें गंधार्चन करावे.

* * *

(४) 'साष्टी'चा पूर्वार्ध : पान १

पूर्वीं ठाणें कोंकण सिंधूतीर येथें राज्य वर्तलें त्याची संख्या कनोजदेशी विद्यापूर पाटणचा राजा शंकरदेव राणा सोळंखी सूर्यवंशी विद्यापूर पाटणीं राज्य करीत असतां पोटीं मुलगा नाहीं यज्ञयागानंतर दोन बायकांत दोन मुलगे झाले. दुसऱ्या बायकोस मुलगा झाला. नांव बिंबदेव व पहिल्या राणीस नंतर मुलगा झाला नांव महिपाळदेव. महिपाळदेव गादीवर बसविल्यामुळे लहान भावाचे हाताखाली राहणे अयोग्य वाटल्यावरून बिंबानें प्रयाण केले बरोबर सोरट देशचा माहिमानपुरराव

बिंबाख्यानांतील राजा बिंब

रामराजाने अहिनलवाड्याहून फौंजासह पंडीतरावास बोलाविलें पंडीतरावाचा पराभव झाला. नंतर अंधेरीस युद्ध झालें प्रतापशहाचा व जैतसिंगाचा पराभव झाला नागरशा राजा झाला नागरशाने विनकष्टी शके १२५४ ते १२६९ पर्यंत राज्य केलें पंधरा वर्षें केले मग हे राज्य निकामलिकाने घेतले फितुरीसिधा भंडाऱ्यानें वडनगराहून मलिकास आणलें शालिवाहन शके ११७० त तुरकाण झाले.

* * *

(३) पान १२९ ते १३३.

संवत् १५३५ चैत्र शुद्ध द्वितीयादिनीं अहिनलवाडा पाटणा प्रगण्यांत महमद फौजदार ठोंकखान पातशहापुढे महजर तयार करणेचा त्यावेळी वगैरेनी दिलेलीं हकिकत **संवत् १२०५ शालिवाहन शके १०३४** (?) स्वामी बिंब बाबरशा पातशहाभये हा देश प्राप्त झाला त्यांनीं ८ अष्टप्रधान १२ उमराव मुख्य राजगोत्र भारद्वाज कुळदेवता प्रभावती पूर्वगज गोरखपूर प्रधान परशुरामराव गोत्र वृद्ध विष्णु उपनांव बाणाध्व वगैरे १२ (सोमवंशी सासष्टपदे होती.) पूर्व राजेकडे माणिकपूर त्याचे जामात शंकरराव सूर्यवंशी पूर्वगजमाता पुर पाटण राजा पंडीतराव आणि रघुनाथपंत कावळे पैठणकर राजकुलगुरु गोत्र भारद्वाज कुळदेवता एकविरा मातापूर यमाई. वाजसनीय शुक्लयजुर्वेदी ब्राम्हण अंबाजी नाईक मुख्यसेनाधिपती यजुर्वेदी उपनाव सांडोरे सामक्षेत्र पूर्व ठिकाण. इत्यादी याहीनंतर सर्वांना सभेत भाग देण्याचा पट्टा दिला सूर्यवंशी व सोमवंशी याही वर्गीं समागमे सुखे गंधार्चन घ्यावे पांचाळ आले तर बहुमान करावा. भंडारी सीधे आले तर गंध द्यावें.

* * *

(४) बिंबाख्यान (चालू) पान १४० ते १५५.

सोरटदेश तक्ताधिपती पोटीं जन्मला राज सुक्षेमण त्याचा पुत्र यशवंत त्याचा मुगरराज राज्य करितांना मेंच्छानी चाल केली श्रीमहमद अल्लाउद्दिनानें ते राज्य घेऊन मुरारराजाला पळविले. विक्रमार्क संवत् ११८५ हें घडले. तो कनोजला येऊन राहिला. कनोजास राजा रामदेव राज्य करीत होता मुरारचा मुलगा बाळाराव होता तेव्हां अल्लाउद्दिन आला रामचंद्रदेवाचे राज्य घेतले. रामदेवाचा पुत्र बिंब निघला रामदेवरायाबरोबर चालला. सूर्यवंशी व सोमवंशी राजे रायासमागमे पैठणास आले तेथें राज्य सुरू केलें. मुरारचा मुलगा बाळाराव याने चांपानेर पट्टणी राज्य सुरू केलें. त्या वेळीं रामदेवाचा मोठा मुलगा केशव देवगिरीस ठेविला दुसरा मुलगा बिंब

महिकावतींतील बिंब

अंकुशदेव राणा साळोंखी सूर्यवंशी बिंबाबरोबर निघाला व बिंबाचे बायकोचा भाऊ भास्करशिंग हेदुरावही निघाला माडवगडाहून गोविंदराय रायप्रभु प्रधानही निघाले. तसेच गोपाळ नाईक व गोविंद नाईक यजुर्वेदीय ब्राह्मण कुळगुरु उपाध्याय निघाले. बिंबराजा १२००० सैन्य बोडणे पाईक यांचेसह पैठणास आला तेथोन तपास करून राजा बिंब कळव्यास आला त्या ठिकाणीं सोरटीचा अनुरोध राजा होता त्याचा नाहूर येथे पराभव संवत् ८६४ श्रीशालीवाहन शके सर्वजीत संवत्सरी वैशाख शु ॥ चौदशी पराभव करून विकाने त्याला जिवंत धरला माहिमास यज्ञ केला व समारंभानें राजा माहिमच्या राज्यावर बसला भैवारगावीं सोमयाग केला नंतर राजा बिंबाला मुलगा झाला त्याचे नांव महिनंदनु ठेवले. नंतर बिंबदेवराजा मृत्यू पावला. महिनंदनु राज्यावर बसला राजाने जहाजे बांधिली. नंतर महिनंदनुच्या मृत्यूनंतर एकदेवराणा राज्यावर बसला. त्यांच्या कारकिर्दींत हरबादेवीचे व जोगेश्वरी देवीचे ह्या दोन देवळांची कामे सुरु झाली. एकदेवानंतर रामदेवराणा गादीवर बसला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा जयदेवराणा गादीवर बसला त्याच्यानंतर त्याचा मुलगा सोमेश्वरदेव गादीवर बसला. सोमेश्वराचे राणीचे नांव कमाईसे तिचा मुलगा केशवदेव पांच वर्षांचा असतांना सोमेश्वर मेला. राणीचा अभिलाष धरणाऱ्या जानप्रधानास मारल्यावर केशवदेव राजा गादीवर बसला तो केशवदेवराणा निपुत्रिक वारल्यानंतर त्याचे गादीवर जनार्दन प्रधान यास सर्वांनी बसविले. जनार्दन गेल्यानंतर त्याचा मोठा मुलगा नागरशा हा गादीवर आला पण त्याचा पराभव निकाने शके १२१६ मधे संवत् १३५२ मध्ये भायखळीयावर केला त्यानंतर निकामलिकानें राज्य चालविलें त्यानंतर शके १३२५ (ह्या ठिकाणीं १४२५ असावयास पाहिजे), नकलकारानें ४ (चार आकड्याचे जागी ३ आकडा चुकीनें घेतलेला आहे.) सुभान संवत्सरी भाद्रपद शुद्ध १० दशमी आबुनाखवा माहिमचे गादीवर बसला. तुर्काण गेले. मोगलाण सुरू झाले. सावंताचे राज्य हिजरी सन ८३१ मध्यें थुंझारने घेतलें पण त्याच सालीं नरसिंगराव खान पातशहास आणून थुंजारला मारलें. पण डफरखानानें पुन्हां राज्य आपलेकडे घेतलें. त्या दिवशीं तुर्काण झाले. ह्यावेळीं पातशहा सुलतान अहमदशा हा राज्य करूं लागला. ह्या पातशहांचा वंशज सुलतान बहादुर वसईस असतांना वास्को-दि-गामा बंदरीं आला. त्यानें शके १४३४ (सन १५१२) त बहादुरशहास समुद्रांत बुडवून माहीमचें राज्य घेतलें.

* * *

बिंबाख्यानांतील राजा बिंब

उदेपुरास राहिला तिसरा पुत्र प्रतापशा आळंदापुरास राहिला असे आपले पुत्र रामदेवरावानें राज्यी बसविले व स्वतः पैठणास राहिला. संवत् १२१० मधे सुलतान अल्लाउद्दिनानें पैठणास हल्ला करून मोठें युद्ध केलें. बाळाराव पडला त्याचा मुलगा हैबतराव यानें मर्दुमकी केली सोमवंशी व सूर्यवंशी राजे मरण पावले. देवगिरीचे केशवानें कांहीं केलें नाहीं. उदेपूरचा बिंब यानें गुजराथवर स्वारी केली. गुजराथचें राज्य घेतलें साळेरमाळेरवरून वडनगरला आला. प्रतापशा कनिष्ठ बंधु त्याचेबरोबर होता. बिंब आळंदापुरास आला देवगिरीचा केशव मेला रामदेव गादीवर बसला संवत् १२१५ मधें सर्वांना बिंबानें बोलाविलें. गुजराथ अहिनलवाडा पुरपट्टण रस्त्यानें दक्षिणेंत आला. बिंबानें प्रभावती माहिमास स्थापिली तीस हल्ली प्रभादेवी म्हणतात. सूर्यवंशी पाठारे ज्ञातीपैकीं होते बिंबरायासमागमे महा रावो आले. बाळारावाचा मुलगा हैबतराव वाहिनळी माहोपाडा वस्तीस रानव पाखाडीस राहिला. हैबतरावाचें नांव राणे श्रीसवितावंश भूपति. प्रभूक्षत्री पाठारे ज्ञाती. उपनाव राणे म्हणती राऊतनाम ठकमताचे पाहियेले. स्वारांचा सरदार म्हणून राऊत तत्त देश मुगी पैठण चांपानेर धाम पूर्ण येथील तरी ठिकाण वांदरे रांजण पाखाडी. हा हैबतरावाचा वंश कंमाजी राजा त्याचा पुत्र बाळकोजी राजा त्याचा पुत्र वीरभद्र तेव्हा सोरटीच्या अनुराधानें संवत् १२०५ त त्याचें राज्य घेतलें. अनुरोध सोमवंशी होता. नंतर कनोज देशीचा राजा बिंब हें राज्य संवत् १२२० त घेतलें. त्याचा मुलगा महिदरणा त्यांचे पुत्राचें नांव रामदेव तयाचा मुलगा जईदेव त्याचा सोमेश्वर तयाचा केशव तस्य त्रिंबकेश्वर वंश संपला. जनार्दन राज्यावर बसला. अल्लाउद्दिनानें बिंबप्रधानाचें राज्य संवत् १३९१ त घेतलें. मग राज्य कोडीयानचें झालें. त्याचा मुलगा लाहूरिया (९ वर्षें) त्याच्यानंतर आबु नाखवास राज्य आलें. त्याचा मुलगा पाणीसावंत तयाचा कुमर हंबीरखला त्याचा सुरगेराव तयाचा हंबीरराव ऊर्फ नरसिंगराव. ह्या वेळीं थुंझार नावाच्या व्यापाऱ्यानें घाटाचे केशवरायाचे सैन्य आणले. हिजरी सन ८३१ त त्यानें हंबीररावाचे राज्य घेतलें. हैबतरावाचा त्रिंबक राऊत त्याचा भान राऊत त्याचा त्रिंबक राऊत बान राऊत तयाचा लक्ष्मण राऊत संवत् १३७२ वांदरेहून जुहू गांवांत आले. वस्तीस आले संवत् १३९१ त बिंबप्रधानाचे राज्य घेतले गेले. संवत् १४११ त कोंडीअन राज्य झाले नंतर १४२० त राज्य आऊ नाखवास आले संवत् १४६९ त तुरकाण झाले. इ. स. १५१२ शके १४३४ फिरंगी दवणेंत आला. इ. स. १४९९ शालिवाहन शके १३६५ त फिरंगी साष्टींत आला. वांद्रे येथील रांजण पाखाडींतून नाईक असे युक्तीनें गेले.

* * *

उपरोक्त मजकुरांत बिंबाख्यानांतल्या बिंबाच्या चार हकिकती दिल्या आहेत. महिकावतीच्या बखरींतल्या तीन हकिकती दिल्या आहेत; व पूर्वार्धांत एकच हकिकत दिली आहे. नंबर एकची बिंबाख्यानांतली हकिकत व महिकावतीच्या बखरींतली नंबर एकची हकिकत ह्या अगदीं एकच आहेत. नंतर तीनच्या हकिकती तशाच अगदीं एकच आहेत. बिंबाख्यानांतल्या ४ थ्या हकिकतीचा उगम वरील दोन ठिकाणच्या दोन्ही हकिकतींबरोबर जुळत आहे. ह्या तिन्ही हकिकती थोड्याशा फरकानें एकमेकांशीं जुळत आहेत. पहिल्या, तिसऱ्या व चवथ्या हकिकतींत बिंब येण्याचा काल एकच आहे. शके १०६० व त्याच्या आसपासचा तो काल आहे. तीन ठिकाणीं बिंबाच्या येण्याचीं स्थानें उत्तर हिन्दुस्थानांतील दिलीं आहेत. त्यामुळें ह्या तीनहि हकिकतींत बिंब हा एकच आहे. ह्या निर्णयापर्यंत मी आलों; पण दुसऱ्या हकिकतींत बिंबाचा काल निराळा पाहून मी गोंधळींत पडलों. अर्थात् ह्या हकिकतींतला बिंबराजा खरा मानावयाचा, कीं दोन बिंब मानावयाचे, हा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला. मला निश्चितपणें वाटलें, कीं ह्या हकिकतींत इकडेतिकडे कांहीं फरक असते, व सन हा एखाद्या वर्षानें मागेंपुढें असला, तरी तें शक्य होतें, पण दुसरा बिंब आला, असें मानण्यास माझें मन धजावे ना. तेव्हां कुठें तरी संवत्–शक ह्यांच्यांत फरक आहे काय, हें मी पाहूं लागलों असतांना मला खात्रीपूर्वक आठवलें, कीं ४ थ्या प्रकरणांतली (हकिकतींतली) हकिकत अनेक बाजूंनीं दुसऱ्या प्रकरणांतल्या हकिकतीशीं जुळत असतांना ह्या दुसऱ्या बिंबाचा भ्रम निर्माण होण्यासारखा पेचप्रसंग कशानें आला असावा? तेव्हां मला दिसलें, कीं ४ थ्या हकीकतींत बिंबाचा येण्याचा काल 'संवत् १२१०' हा आहे; पण दुसऱ्या हकिकतींत तो काल शके १२१० असा दिलेला आहे. ही चूक दुरुस्त केल्यामुळें बिंबाख्यानांतले ४ (चार) बिंब, महिकावतीच्या बखरींतले तीन बिंब एकच आहेत. ही मूळची चूक कोणाहि संशोधकाच्या लक्षांत न आल्यामुळें त्यांना दुसरा बिंब निर्माण करण्याशिवाय बखरीची संगती लावतां येत नव्हती. कै. राजवाडे ह्यानीं ही चूक चालू ठेवली व त्यामुळें कोणकोणते तर्क निर्माण केले, व खोटे भ्रम मानले, हें मी इतरत्र दिलेलेंच आहे.

यादवांचा ऊर्फ जाधवांचा बिंब झालाच नाहीं; कोंकणांत तो आलाच नाहीं; त्याचें महिकावतीच्या राज्याबरोबर कोणतेंहि सुहेर सुतक नव्हतें. हा उभा केलेला तिसरा नवा बिंब आतां नाहींसा होत आहे, व त्यामुळें उत्पन्न झालेले सर्व भ्रमहि जात आहेत. ह्यास्तव ही बिंबहकिकतीची संगती पूर्वार्धामुळें अगदीं बरोबर जुळत आहे. बिंबाख्यानाच्या चवथ्या हकिकतींत बिंबाची जी वंशावळ आहे तीच वंशावळ पूर्वार्धांत आहे. हें पाहिलें असतांना खात्री पटते, कीं या तोतया बिंबाचा ठावठिकाणा आला कोठें!

महिकावतीचें राज्य संवत् १२२० त किंवा शके १०८५ त बिंबानें स्थापन केलें, तें त्याच्या वंशजाकडून. केशवदेव निपुत्रिक जन्मल्यामुळें जनार्दन प्रधानास जनतेनें राज्य दिलें. त्याच्या नागरशा ह्या पुत्राकडून शके १२१६ संवत् १३५२ मध्यें त्याला मारून निकामलिकानें घेतलें म्हणजे बिंबाच्या वंशजाचा वारसा त्या काळीं संपला. पण पुढें हें महिकावतीचें राज्य म्हणून चालू राहिलें. संवत् १३९१ शके १२५६ मध्यें हें बिंब प्रधानाचें राज्य नाहींसें झालें. संवत् १४११ शके १२७६ त कोंडीयननें राज्य घेतलें. संवत् १४२० शके १२८५ मध्यें आऊ नाखवाचें भोगळाण सुरू झालें. हिजरी सन ८३१ म्हणजे शके १३४२ व ह्या भोगळाचे राज्याचा शेवट थुंजारनें केला व दहा (१०) महिन्यांचे आंतच त्याचें राज्य डफरखानानें घेतलें व गुजराथच्या राज्यास जोडलें. म्हणजे संवत् १४६९ (शके १३३४) त ह्या प्रांतीं पादशहाचें राज्य कायम झालें. महिकावतीचें राज्य हें नामाभिधान गेलें. इ. सन १४९९ (शके १४२१) फिरंगी वास्को दि गामा आला व इ. स. १५१२ शके १४३४ मध्यें फिरंग्यांनीं बहादूरशहाला बुडवून हें राज्य घेतलें. महिकावतीच्या राज्यास बिंबानें सुरुवात केली व त्या राज्याचा अंत नागरशाचे मृत्यूनें झाला.

*　　　*　　　*

भाषा मराठी पण अगदीं जुन्या जमान्यांतली, तसेंच लिपीहि त्याच पद्धतीप्रमाणें जुन्या वळणाची असलेली एक बखर माझ्या संग्रहीं आहे, हें मी इतरत्र लिहिलेंच आहे. त्या बखरीच्या पहिल्या पानावर बिंबाची वंशावळ दिलेली आहे, ती ४ थ्या नंबरच्या हकिकतीशीं अगदीं जुळती आहे. ती अशी:—

बिंबदेव त्याचा पुत्र महिंदरणा, त्याचा पुत्र विका, त्याचा पुत्र रामदेव, त्याचा पुत्र जयदेव, त्याचा पुत्र सोमेश्वर व त्याचा पुत्र केशवदेव पांच वर्षांचा असतांना सोमेश्वर वारला, त्याची बायको कमाईसे. हिचा अभिलाष जान प्रधानानें धरला ही पूर्वार्धाच्या हकिकतीशीं अगदीं बरोबर जमत आहे. त्या बखरींतला उतारा खालील-प्रमाणें आहे.

> "श्रीगणेशायनमः राजा वीरभद्र सोमवंशी। प्रधान प्रतापुं। राणी रुपाईसे। मग सारटीये अनुरोधें राज्य घेतलें। राजे अनुरोधे काठी भवंडिली स्थानें। ब्राह्मणासी विक्ता (वृत्ती) दिवलीया। सोळाश्या फरियाच्या। पळसवलीच्या ब्राह्मणाला चहुस्थाच्या (१) पाडकराला। वांदरकराला ब्राह्मणाला। वनीलजीकराला (१) व मालाडकराला व बोरीवलीच्या ब्राह्मणाला व वोळेंच्या (ओवळें) ब्राह्मणाला। सीवच्या ब्राह्मणाला न्येवाळीकराला व अंधेरीकराला।

कनोज देशीचा राजा बिंब। नेवाळें व्यापिला। तेन्हे नेवाळ्यास राज्य केले। तयाचा पुत्र महिदरणा। तेने नांव माहीम ठेवले। महिदरण्याचा पुत्र विका। तया व्येंवडल्या दल सोन्हें मिळाले। विका ह्याचा पुत्र रामदेवो। रामदेवाचा जयदेव। माहिमा न मेच्च म्हणोन ठाण्यास ठाण दिधलें। अरुकाया कोकना मोक्षे। जयदेव बळकाविलें। ठाणें नांव ठाणें कोंकण जयदेवाचा सोमेश्वर। रायासी राणी कमाईसे। त्याचा पुत्र केशवदेव। सोमेश्वर रायाचा प्रधानु जाननाईक। सोमेश्वर प्रमादला। केशवदेव वारस पाचाचा होता। कमाईसीचा अभिलाष केला। वरील (१) तपं कमाईसे आपले देशाला श्रन (शरण) गेली।”

● ● ●

भाग सहावा

इतिहास-तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें—

अंतःप्रामाण्याचा विचार

"History is something far more vital than the record of bygone events and the description of extinct institutions. To understand past is to understand ourselves, our possibilities of achievements."

—By Robinson.

आपण राजा बिंबासमवेत हल्लींच्या वस्तीच्या ठिकाणीं आलों, ही गोष्ट निर्विवादपणें गृहीत धरली जात आहे, व ती अगदीं सत्य आहे. हा बिंब कोणता आहे, याबद्दल निश्चितपणें कोणीहि एक विधान केलेलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर कांहींनीं त्या राजाला भीम म्हणून संबोधिलें. गुजराथपासून तों चौल रेवदंड्यापर्यंतच्या पट्ट्यांत जे अनेक वंशीय राजे झाले त्यांतल्या अमुक एका वंशांतला हा बिंब आहे, असें निर्णयपूर्वक एकहि लेखक म्हणत नाहीं. चावडा, शिलाहार, चालुक्य, चौलुक्य, सोळोंखी, यादव, इत्यादि वंशीय राजांनीं निरनिराळ्या वेळीं हल्लींच्या आपल्या वसतीस्थानीं राज्यें किंवा अधिराज्यें संवत् ५७४ (शके ४३९ व इ. स. ५१७) पासून तों नुकणि किंवा फिरंगाण होईपर्यंत केलीं आहेत. तसेंच

शके १०६० पासून शके १२१६ पर्यंतच्या म्हणजे १५६ वर्षांच्या काळामध्यें हा बिंब व आपण केव्हां आलों, हें कोणताहि लेखक निश्चितपणें सांगत नाहीं. आपण १०६० शकांत कोणत्या तरी बिंब आडनांवाच्या राजाबरोबर आलों असें कै. राजवाडे म्हणतात व पुढेंहि १२१६ शकांत आपण यादव बिंबाबरोबर आलों असेंहि म्हणतात. दोन वेळां आपण ह्या प्रांतीं वसाहत केली, असें त्यांचेंच म्हणणें श्री. हरि आचार्य ह्यांनीं आपल्या एका लेखांत पुनर्लिखित केलें आहे. रावबहाद्दूर जोशी व केशवराव हरींचें म्हणणें आहे, कीं १२१६ शकांत आपण यादव बिंबाबरोबर आलों. बाह्य प्रमाणावरून उपरोक्त अनुमानें निरनिराळ्या लेखकांनीं आजवर काढून बिंबाच्या आगमनाच्या काळाबद्दल, त्याच्या वंशाबद्दल व त्याच्या मूळच्या वस्तीस्थानाबद्दल आपापलीं मतें मांडलेलीं आहेत. ह्या ठिकाणीं मी बखरीच्या अंतःप्रमाणांचा विचार करून कोणता निश्चितार्थ निघतो, तो वाचकांपुढें ठेवीत आहें.

माझ्या हातीं असलेलीं मुख्य साधनें म्हणजे महिकावतीची बखर, बिंबाख्यान, साष्टीच्या बखरीचा पूर्वार्ध, अस्यश्रीवंशावळी प्रारंभः, ज्ञानेश्वरकालीनच्या भाषेंत व लिपींत लिहिलेली एक बखर, इत्यादींचीं अंतःप्रमाणें खालीलप्रमाणें आहेत.

महिकावतीची बखर मूळ धरून व कै. राजवाड्यांचे निर्णय मान्य करून त्यावर श्री. हरि आचार्य ह्यांनीं आपला लेख लिहिला आहे. अर्थात् महिकावतीच्या बखरीचा अंतरस्थ शोध केल्यानंतर जीं अनुमानें निघतील तींच अनुमानें आचार्यांच्या लिखाणांतील असल्यामुळें त्या लेखाचा स्वतंत्र विचार करावयास नको. श्रीवंशावळी प्रारंभः ही बखर वस्तुतः महिकावतीच्या बखरीचीच नक्कल आहे. तिचा विचार करण्याची जरुरीच नाहीं. बिंबाख्यान ५२ पानांतला व पुढें तें प्रकरण संपेपर्यंतचा वृत्तांत व महिकावतीच्या बखरींतल्या ७० पानापासून सुरू होणारा व तें प्रकरण संपेपर्यंतचा वृत्तांत हे दोन्ही एकच आहेत. ह्या ठिकाणीं बिंबाच्या आगमनकालाची व मूळच्या वस्तीस्थानाची व वंशाची दिलेली माहिती दोन्ही ठिकाणीं एकच आहे. याशिवाय, बिंबाख्यानांत पान १०७, ११८ व १२८ अशा तीन ठिकाणीं बिंबाचा वृत्तांत दिलेला आहे. साष्टीच्या बखरीच्या पूर्वार्धांत स्वतंत्र उपपत्ति दिलेली आहे. आतां ह्या सर्वांचें एकत्रीकरण व पृथक्करण करूं या.

साष्टीच्या बखरीच्या पूर्वार्धाचें इतिवृत्त—

हल्लींचें ठिकाण कोंकण सिंधूतीर. पूर्वीचा देश कनोज. पूर्वीचें ठिकाण विद्यापूर पाटण. ह्या पाटणचा राजा शंकरदेव राणा—सूर्यवंशी—सोळोंखी कुळी.

त्रिंबदेव	महिपाळदेव

महिंदरणा (महिनंदनु)	जहाजें बांधविलीं पांचाळांनीं.
एकदेवगणा (विका)	कृपाळ देसाईची मुलगी केली; चांचे आले.
रामदेवराणा	अनंत देसायानें जोगेश्वरीच्या देवळाचें काम चालू केलें. महादेव देशीयानें मढास इरबाई देवीच्या देवळाचें काम सुरू केलें.
जयदेव राणा	ठाणें येथें राज्यावर बसला. तळें व देवालयें बांधण्यास सुरुवात केली.
सोमेश्वर	याचे मृत्यूनंतर जान नाईक प्रधानानें राणी कमाईसे हिचा अभिलाष धरला; त्यास मारलें.
केशवदेवराणा	(हा निपुत्रिक म्हणून प्रधान राज्यावर बसला. त्यावेळीं गणपत देशायास नाईक व नारायण देशायास ठाकूर पदवी मिळाली. केशवदेवानें धारेचा भोजराजा म्हशाचा रामदेव राणा यांस कळवेच्या युद्धांत पकडलें. मैत्री झाली. भोजानें पाठविलेले आंबे जसगदेवानें देवगिरीच्या वाटेंत लुटले. केशवानें म्हशा दुर्ग घेतला. जसगदेवाचा पराभव सावरें गांवीं केला. ठाणें, वसईवरून येऊन सभवर गावीं लघुयाग केला. केशवदेव मेला.
(पुत्र) नागरशहा मृत्यु शके १२१६	

नागरशहास चेऊलच्या केशवदेवानें आपलें राज्य दिलें. नानोजी मेव्हण्यानें चेंभूर व मांडलें मिळत नाहीं, म्हणून देवगिरीच्या रामदेवाचें सैन्य आणविलें. माहीमीस युद्ध झालें. हेमाडपंत व रामदेवराजा पराभूत झाले. गणपतिदेश ह्यास महिमानराव व सोम ठाकूर ह्यांस 'राव' पदव्या मिळाल्या. रामदेवानें अहिनलपान्हेरच्या (अनहिलवाड्याच्या) जसगदेवास सैन्यासह बोलाविलें. अंधेरी येथें युद्ध झालें.

जसगरावाचा पराभव झाला. सुलतान अल्लाउद्दिन दिल्लीस राजा झाला. त्यानें सोरटी सोमनाथ व अहिनलवाडा, पैठण घेतलें. जसगदेवाचें राज्य घेतलें. देवगिरीस सुलतान आला, त्यानें निकामालिक वजीर कोंकणांत धाडला. प्रतापपुरीस हरनाईक पडला. शिवास त्रिपुरकुमार पडला. राणी (नागरशाची) युद्धीं प्रमादिली, नागरशहास भायखळ्याच्या युद्धांत मारलें. (संवत् १३५१ शके १२१६ म्हणजे इ. स. १२९४)—जय नाम संवत्सरे माघ शुद्ध प्रतिपदा रोजीं निकामलिक प्रतापपुरीं बसला. निकामालिकाचा भाऊ मलिक अल्लावद्दीन नवसरीस ठाणें मांडून बसला. सोम ठाकूर माधव व माधव देसाई नाईक चवदा महालांचे लोक आले. पादशहानें शिरपान वगैरे दिलें. मग निकामलिक वगैरे सर्वजण घरीं गेले. सोम ठाकूर पालवणकर प्रकरण; मृत्यु, भागडचुरी प्रकरण झालें. भागडचुरी मारला गेला. रामजी सुखा सीनागारचा क्षत्री पंक्तीस घेतला. अराजक झालें. अऊनाखवा शके १३२५ मध्यें सुभानु संवत्सरी भाद्रपद शुद्ध १० मीस राज्यावर बसला. माहिमास कोट बांधला.

आऊ नाखवा हबीसणा नाखवाची व शके १२१६ पासूनची पादशहांची वंशावळ:—

पणि सावंत १३ वर्षे राज्य केलें.

|

नरसिंगराव.

|

सुलतानराव.

|

नरसिंगराव—त्याचे कारकीर्दींत थुजार आली त्यानें घाटावरून केशवगवास माल देऊन सैन्य आणलें. शहाबाजेस राहिला. कोट बांधला. दुसऱ्या फौजेसह कळवणीचें ठाणें घेतलें. राज्य पालटलें. माहीम घेतलें. राज्यावर बसला.

हिजरी—संवत् ८३१ माहे तेरीख २१ भाद्रपद मास विरोधिया संवत्सरे. पुढें नरसिंगरावानें गुजराथेंतून सुल्तान महमदानें डफरखान पाठविला. त्यानें राज्य काबीज केलें.

शके १४११ सोमेश्वर संवत्सरे भोगलाण मोडलें. डफरखान राज्य करूं लागला.

अल्लाउद्दिन पादशहा

|

बेटा सुलतान मोंगल

|

(चुलता) फिरोजशहा

|

ग्याजदीन

|

सुलतान बहादूर

|

सुलतान महंमदशहा गजवी

|

सुलतान महंमद बेगडी

|

सुलतान मुदाफर ह्यास पांच मुलगे.

|

सिकंदर, बहादूर, महंमद, चांदखा, अहमदशहा.

म्हणजे १२१६ शकांत नागरशहाचे मृत्यूनंतर बिंबस्थानाचें राज्य गुजराथेचे मुसलमान ह्यांच्या ताब्यांत गेलें. निकामलिक पहिल्यांदां प्रतापपुरीस बसला. पुढें गुजराथचे सुलतान कोणा तरी करवीं ह्या प्रान्तावर सार्वभौम सत्ता ठेवीत; पण अराजक होऊन शके १३२५ मध्यें तुरकाण अजिबात सोडलें व आऊ नाखवा भोंगळे ह्याचें राज्य सुरू झालें. नरसिंगरावाचें राज्य थुंजार यानें केशवदेवरायाचे मदतीनें घेतलें; पण नरसिंगरावानें डफरखानास आणलें. त्यानें हें राज्य १४११ संवत्सरे (१३५४ शके–इ. स. १४३२) मध्यें घेतलें.

डफरखान (यास मारलें)
|
सुलतान बहादुर—चांदीखानानें आणला, पण त्याची भेटी झाली. चांदखान
| अहमदाबादेस गेला.
आमलहारखान आनम फरखान वसईस अंमल झाला. सर्व वसईखालीं चाललें.

पातशहा राज कबज सुलतान बेगडी अंमलदार शिराज मलिक ह्याचे कारकीर्दीत गणपत देसलानें म्हातारपणामुळें हरनाईकास देशाईपण दिलें. कडुपुरोनीं मलिकाकडे फिर्याद दिली. ती हरली. हरनाईक देसला झाला. मग पातशाही फिरली. शिराज मलिक मेले. त्याची वजिरी अमलखान खान अजम परवान याचे अमलांत आल्यावर मलबारी (चांचे येऊन) आगाशी व बऱ्हाणपूर हीं दोन गांवें जाळलीं. जमीनदारांनीं अमलदारास बोलून सांगितलें, कीं आम्ही हुजूर तुमचा कसूर लिहून पाठवूं. त्यानें कुफराण करून पातशहास लिहिलें, कीं गणपत देसाई व हरनाईक हे पातशहाची जमीन विकतात. मग सुलतानानें आगा मुऱ्हा वजीर पाठविला. त्यानें तपास करतांना हें सर्व खोटें ठरलें. चौदा महाले पाहिलीं. आगा मुऱ्हा आनंदित झाला. माहीमकरास पहिला विडा दिधला. बहादूर पातशहा वसईस आला. त्यावेळीं हरनाईक चौदा महालाचे सरदेश-पांडेगिरी एकटेच खातात. हरनाईक व गोपाळ यांनीं फिर्याद दिली. श्वान खानानें पादशहास समजाविलें. वांद्रेकरांनीं उपाध्या आणले तेव्हां हरनाईकदेश साळोंख्यापैकीं व गोपाळ व हरनाईक माहीमकर म्हातऱ्यांपैकीं ठरले. अनहिलवाड्याचा बहाद्दुर सुलनान हा वसईस राहिला. तेथें त्याला सात वर्षें झालीं. वास्को–दि–गामा नांवाचा फिरंगी आला. त्यानें आरमार बाहेर ठेवलें व जागा मागितली. पादशहानें व्यापाराकरतां थोडी जागा दिली; ती चेऊलचे दांड्यास दिली. तेथून वसई, ठाणें, माहिम, वगैरे ठिकाणीं तो माल आणूं लागला. अशीं तीन वर्षें गेलीं. पाण्यांत पादशहा बुडविला. विजुरले दांड्यास उतरला. बहादुरखानाची फौज पळाली. शके १४३४ आंगिरा नाम संवत्सरे तुर्कांचें राज्य बदललें. वास्को–दि–गामाला प्रजेनें ठाण्यास किंवा

माहिमास राजधानी करण्यास सांगितली. दांड्याचे बंदरास कोटाचें काम चालविलें. त्याच वर्षीं चेऊलचे कोटास काम चालविलें. चेऊलचा मोंगल सुलतानखान ह्यासी सलोखा करून कपतान देवलोप यानें काम चालविलें. तिसरे दिकोसब्रगास यानें दवणेस कोटाचें काम चालविलें. तेथें मीरमहंमद मोंगल आला. मिरमहंमद पळविला. कोट पुरा केला. जमिनदारांस बोलावून चाकर व्हा, असें बजाविलें. त्यांनीं तें नाकारलें. १५०० रेणोल पुरतकालाहून आणविली. मग बाळनाईक देश व पाल ठाकूर देसाई ह्यांनीं भांडण केलें. खटका मोठाच उडाला. पण फिरंग्यानें जमाव करून वांदरें प्रथम धरलें. नारगौडीयाचें घर प्रथम धरिलें. वेठीला १७०० माणूस होते. लहानमोठे मिळोन त्यांत तिघे भाऊ बाळ नाईक, भिव नाईक व पोस नाईक हे आपलीं हत्यारें घेऊन निघाले. ठाणें आदि ठिकाण धरलें. तेथें ४००० माणसांस बाटविलें. मग मरोळ मग मालाडावर गेले. मालाडचा देशला आपले लोक घेऊन डोंगरांत गेला. वसईपासून माझगांवपर्यंत तारवांचा वेढा घातला. धराधर केली. लोक बाटविले. चार महिने लोक डोंगरांत गेले.

* * *

साष्टीच्या बखरीच्या पूर्वार्धांत बिंबाच्या आगमन-प्रसंगाचें वर्णन सुरू करतांना दिलेला मायना एकच आहे. तो असा :—

"श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीगुरुभ्यो नमः। श्रीवेदव्यासाय नमः। पूर्वीं ठाणें कोंकण सिंधुतीर येथें राज्य वर्तलें त्याची संख्या. कनोज देश विद्यापूर पाटणचा राजा शंकरदेव राणा. सोळंखी सूर्यवंशी. विद्यापुरीं राज्य करीत असतां पोटीं पुत्र फल नाहीं."

उत्तर कोंकणांतलें बिंबाचें राज्य सिंधुतीरास होऊन गेलें. कोंकणांत महिकावतीस आपलें राज्य स्थापन करणारा बिंबदेव कनोज देशांतल्या विद्यापूर पाटणच्या राजा शंकरदेव राणा ह्याचा मोठा मुलगा होय. सोळंखी कुळांत तो जन्मला होता. तो सूर्यवंशी होता. त्याचा बाप विद्यापुरांत राज्य करीत होता. दुसऱ्या कोणत्याहि बखरींत असा मायना नाहीं. पूर्वार्धाकडे पाहतां हें आढळतें किंवा त्या मायन्यानें सिद्ध होत आहे, कीं **बिंबस्थान स्थापन करणारा बिंब हा उत्तर हिन्दुस्थानांतला होता**, असें स्पष्ट मत बखरीच्या पूर्वार्धांत शाबीत केलें आहे.

बिंबाख्यानांतले मायने पडताळून पहाणें जरूर आहे. बिंबाख्यान पान ५१ वर "स्वस्तिश्रीनृपति विक्रमार्क समयातीत संवत् ११९५ श्रीमत् चक्रचूडामणि शालिवाहन शके १०६० मासोत्तम माघमासे शुक्लपक्ष ५ मी सोमवासरे तद्दिनी अहिनळवाडे पाटण

तत्समीप चांपानेर ८५ माहाले राजा सूर्यवंशी प्रतापबिंब्र गोत्र भारद्वाज पंचप्रवर शाखा कात्यायिनी कुळदेवता प्रभावती मुहिम आदरीली." महिकावतीची बखर पान ३२ व १०५ अशा दोन ठिकाणीं हाच मायना आहे. इतकेंच नव्हे, तर पान ३२ ची सर्व कथा बिंबाख्यानांतल्या पान ५१ वरील कथेची प्रतिनक्कलच आहे. पान १०५ वर कथा तीच आहे; पण त्यांतला वृत्तांत अगदींच त्रोटक आहे. म्हणजे ह्या तिन्ही ठिकाणची कथा एकच आहे; मायनेहि एकच आहेत. अशा प्रकारें पूर्वार्धांतील हकिकतीची तुलना करतांना बिंबाख्यानांतल्या पान ५१ मध्यें सुरू होणाऱ्या हकिकतीशीं तुलना केली म्हणजे तिन्ही हकिकतींचा विचार करतां येईल. ह्या कथेंतील प्रतापबिंबानें कोंकणांत बिंबस्थान स्थापन केलें तो प्रतापबिंब सूर्यवंशी होता, त्याचें गोत्र भारद्वाज होतें, तो पंचप्रवर कात्ययिनी असून त्याची कुळदेवता प्रभावती होती. शके १०६० त अहिनलवाडा पाटणाच्या समीपच्या चांपानेरहून मोहिमेवर निघाला. म्हणजे हा बिंब दक्षिणेंतला नसून उत्तरेकडील चांपानेरचा होता, हें आतां निःसंशय स्पष्ट होत आहे.

बिंबाख्यान पान १०७ वर "स्वस्तिश्री—नृपति विक्रमार्कसमयातित संवत् ५७४ फाल्गुनमास शुक्लपक्ष ९ मी रविवार महाराज राजाधिराज सिंहासनमंडित सिंही ग्रामांतील अरिराय विभांडक श्रीसविता वंश भूपति **पाठार ज्ञातीसंबंधीं मूळ पुरुष रामराजा,** गोत्र भारद्वाज, कुळदेवता प्रभावती, **उपनांव राणे,**[1] महिकावतीची बखर पान ८८–८९

---

१. "२२, बिंबाचें घराणें सूर्यवंशी उदेपुराकडील स्थायिक रजपूत ह्यांतील होतें. **ह्यांचे मूळ पुरुष राणे** या उपनांवानें प्रसिद्ध होते. ह्यांचें गोत्र भारद्वाज आणि कुळदेवत प्रभावती.

२३, संवत् ५७४ त उदेपुरांतील सिंही येथें रामराजानें गादी स्थापन केली. हा बिंबाचा मूळ पुरुष होता. इ. स. च्या ११ व्या शतकांत गिझनीकडून मुसल्मान लोक हिंदुस्थानांत पुढें पाऊल टाकूं लागले. त्या वेळेपासून हिंदूंची निकृष्टावस्था आली. हिंदूंचे सूर्यवंशी व सोमवंशी राजे मुसलमानांनीं पादाक्रांत केले. आणि ते मुसल्मान उत्तरेकडे सत्ता चालवूं लागले. म्हणून रजपूत राजांस स्वराज्यें सोडून गांवोगांवीं देशत्याग करण्याचें अगत्य पडलें, हें इतिहासप्रसिद्धच आहे.

२४, त्या वेळीं सिंहीचा राजा रामदेव याजवर मुसल्मानांनीं गदा फिरविली; तेव्हां तो पैठणास आला आणि तेथें विक्रमभोजाच्या आश्रयानें राहिला. **ह्या रामदेवास तीन पुत्र होते.** वडील **केशव** यानें देवगिरी येथें राज्य स्थापिलें. दुसरा **बिंबदेव** हा उदेपुरास राहिला. तिसरा **प्रतापशा** यानें अहिनलवाडा (कडीपाटण) येथें राज्य स्थापिलें. ह्याप्रमाणें कांहीं वर्षें गेलीं असतां अल्लाउद्दिन खिलजी यानें देवगिरीवर हल्ला करून तें शहर स्वाधीन करून घेतलें.—"

—'उ. कों. प्रा. शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण ग्रंथ' हा नारायण विठ्ठल वैद्य पुरंदरे पुणतांबेकर यांचा ग्रंथ पान १३ सुरू.

मध्यें जी हकिकत आहे, तिचाहि मायना हाच आहे. इतकेंच नव्हे, तर ह्या दोन्ही ठिकाणच्या हकिकती सदृश व एकच आहेत. बिंबाख्यानांतील पान १०७ वरील हकिकत पूर्वार्धाबरोबर ताडली म्हणजे दोन्ही ठिकाणच्या हकीकतींची संगति लागते. ह्या मायन्यांत मूळ पुरुष रामराजा सांगितलेला आहे. पुढें एकंदर सहा नांवें देऊन सातवा वंशिक राजा म्हणून रामदेव राजाचें नांव दिलें आहे. मधली वंशावळ गाळलेली आहे. बिंबस्थान स्थापन करणाऱ्या रामदेव राजाचा मूळ रामराजा हा पाठार ज्ञातीसंबंधीचा मूळ पुरुष होता. तो महाराज राजाधिराज होता. तो सविता वंशाचा होता. त्याचें गोत्र भारद्वाज, कुळदेवता प्रभावती, व उपनांव राणे होतें. तो सिंही ग्रामांतील अरिराय विभांडक होता; अर्थात् उत्तर हिंदुस्थानांतून तो आलेला होता. तो सिंही ग्रामाचा राजा होता. दक्षिणेंतल्या कोणत्याहि ठिकाणाहून तो आलेला नव्हता, असें वरील मायन्यावरून कळून येतें. ह्या गटांतला बिंब शके १२१० मध्यें आला, इतकाच फरक आहे; त्याचा विचार नंतर करूं या.

बिंबाख्यान पान १२८ वरील मायना :—श्रीमंत प्रौढ प्रताप राजाधिराज राजश्री बिंबदेव ह्या प्रान्तीं आले संवत् १२०५ शालिवाहन शके १०३४ राज्य स्थापन केलें. (८) अष्ट प्रधान, (१२) बारा उमराव. त्यांचीं नांवें कोण कोण? मुख्य राजा गोत्र भारद्वाज, कुळदेवता प्रभावती, तसेंच त्यांचें मूळचें ठिकाण राजगोरखपूर एतावता." ह्यावरून सिद्ध होतें, कीं हाहि बिंब उत्तरेकडील प्रांतांतला राहणारा आहे. त्याच्या प्रधानांचीं वगैरे पूर्व ठिकाणें त्याच प्रान्तांतलीं दिलेलीं आहेत. त्यामुळें दक्षिणेचा कोणताहि संबंध ह्या बिंबस्थान स्थापकाबरोबर नाहीं.

पूर्वार्धांत मी (प्रस्तुत लेखकानें) शोधन केलेली हकिकत ह्या हकिकतींशीं जुळती आहे. कनोजहून (सिंही ग्रामाधिपति) रामदेव हा मुसलमानांच्या भयानें पैठणास पळाला. तीन मुलांना तीन ठिकाणीं ठेवलें. येथपर्यंत ही कथा बरोबर आहे. 'संवत्'च्या चुकीमुळें दुसरी हकिकत सुरू होते, त्या ठिकाणीं ग्रंथकार आल्यावर थकला. 'ह्याप्रमाणें कांहीं वर्षें व्यवस्था चालता' ह्या वाक्यानें १२५–१३० वर्षांचा काळ एकदम गडप करून चुकीच्या निर्णयावर **ग्रंथकार आला व मधल्या सर्व घडामोडी दृष्टिआड करून अल्लाउद्दिन खिलजीनें देवगिरीस रामराजाच्या केलेल्या पराभवावर तो आला.** शके १०८५ त रामराव राणे कनोजकर व शके १२१६ त रामराव जाधव ह्यांच्या नामसादृश्यावरून तोच कथासंबंध एकदम देवगिरीच्या जाधवाबरोबर त्यानें जुळविला. अर्थात् ही पुढली सर्व हकिकत मी मागें म्हटल्याप्रमाणें मृगजलवत् खोटी आहे! पहिला रामदेव हा रामदेव राणे सूर्यवंशी होता, त्यालाच जाधवाचा रामदेव समजण्याची चूक ग्रंथकारानें पदरांत घेऊन कशीतरी गाडी जोडून घेतली आहे. ती गाडी आपण जोडूं नये व आपले डबे पुढें चालवावेत, हाच उत्तम मार्ग आहे.

ह्या मायन्यावरून एक गोष्ट सिद्ध होत आहे, कीं ह्या मायन्यांतला कोणताहि बिंब दक्षिणेंतून कोंकणांत आलेला नाहीं. बिंबाख्यान व महिकावतीच्या कोणत्याहि कथेंतला बिंब दक्षिणेंतून म्हणजे देवगिरीहून आलेला नाहीं. बिंबस्थान स्थापकांपैकीं बिंबाच्या सर्व हकिकती साकल्यानें थोडक्यांत वर दिल्या आहेतच. येथें एक लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं बिंबस्थानस्थापक बिंबाचा शोध करण्याचा ज्यांनीं ज्यांनीं प्रयत्न केला आहे, त्यांची विचारसरणीच चुकलेली आहे. त्यांना बिंब कुठें सांपडेनासा झाल्यावर, शिलाहार, चावडा, चौलुक्य, राष्ट्रकूट, इत्यादि राजवटींतल्या राजांच्या वंशावळी त्यानीं तपासण्यास घेतल्या. त्यांत त्यांना सर्वत्र पहिला, दुसरा, तिसरा असे भीम आढळले. एका शिलालेखाचा पत्ता दुसऱ्यास लागत नाहीं. असे शिलालेख ताम्रपट शोधून शोधून थकल्यावर ह्या महाभागांनीं कोणत्या तरी भीमाला बिंबस्थान-स्थापक बिंब बनविण्याचा हट्ट धरला. पुन्हां त्या लेखकांत एकमेकाशीं मेळ मुळींच जमत नाहींसा दिसल्यावर 'मला असें दिसतें,' 'माझा हा तर्क खरा', 'मी म्हणतों तोच भीम मानला पाहिजे', अशा शब्दांनीं त्यांनीं कोणतातरी निर्णय हट्टानें घेतला व आग्रहपूर्वक प्रतिपादिला. ह्या सर्व बखरी, त्यांतील सर्व प्रकरणें व हकिकती, यांचा मनापासून शोध केला, तर आपणास 'सच्चा बिंब' सापडेल, अशी कल्पना कोणालाच आली नाहीं. वरील मायन्यांच्या आधारें खात्री पटते, कीं हा बिंब उत्तर भारतांतून अहनलवाडा पाटण, पैठण ह्या मार्गानें दवणे(दमण)हून समुद्रकिनाऱ्यानें नवसरीजवळून चिंचणी तारापुराहून कळवेंमाहिम करून मुंबई—वाळकेश्वर, ठाणें या ठिकाणीं आलेला आहे. हा बिंब भारद्वाज गोत्राचा, त्याची कुळदेवता प्रभावती, तो सूर्यवंशी असा आहे. एका ठिकाणीं त्याचें उपनांव राणे असें दिलें आहे. त्याच ठिकाणीं तो पाठारे ज्ञातीचा होता, असेंहि दर्शविलें आहे. नामसादृश्यानें तर्क करून भीम हाच बिंब असावा असा उत्पन्न करण्यांत आलेला भ्रम आपण सोडून देऊन आपल्यापुढल्या बिंबाचें आपण शोधन करूं शकतों. राज्यस्थापक बिंबाचा काल कोणता, हें आतां पाहूं. बिंबाख्यान पान ५१ च्या मथळ्यांत दिलेला काल 'शालिवाहन शके १०६० मासोत्तम माघमासे अकरा शुक्ल ५ मी सोमवासरे' हा आहे. बिंबाख्यान पान १०७ च्या मथळ्यांत काल दिलेला नाहीं. बिंबाख्यान पान १२८ मधील मथळ्यांत काल दिला आहे तो 'संवत् १२०५ शालि-वाहन शके १०३४ त आले. राज्य स्थापन केलें; पण संवताच्या गणितानें शके १०७० च येत आहे. पूर्वार्धाच्या मथळ्यांत काल दिलेला नाहीं.

आतां वंशावळीचा विचार करूं या.

बिंबाख्यान पान ५१ वरील मजकुरांतील वंशावळः—

प्रतापबिंब शके १०६० पैठणीं आला. १०६२ त तो निघाला; एकूण ९ वर्षें राज्य केलें.
|
बिंबदेव ६५ वर्षें राज्य केलें.
|
केशवदेव २५ वर्षें राज्य केलें.
|
प्रधान जनार्दन ४ वर्षें राज्य केलें.
|
नागरशहा शके ११६३ संवत् १२९८ राजेंद्र चक्रचूडामणि शके १२१६त मृत्यु पावला.
|
निकामलिक शके १२१६ संवत् १३५१ त राज्य मुसलमानांनीं घेतलें.

बिंबाख्यान पान १०७ मधील वंशावळः—

संवत् ५७४ शके ५१७
रामराजा
|
त्रिपाळराजा
|
भानराज
|
त्रिंबकराज
|
गोविंदराज
|
कृपाल
|
(वंशिकराजा) रामदेव
|
केशव — बिंबदेव — प्रतापशहा

बिंबदेव
|
प्रतापशहा — पुरशा

प्रतापशहा
|
नागरशा
|
निकामलिक

बिंबाख्यान पान १२८ची वंशावळ दिलेली नाहीं. बाब्रशहाच्या भयानें बिंबानें संवत् ११९५ (इ. स. ११३९)त माहिम येथें राज्य सुरू केलें. त्यातील मजकूर "श्रीमंत प्रौढप्रताप राजाधिराज राजश्री बिंबदेव या प्रान्तीं आले. संवत् १२०५ शके १०३४ स्वामी बाब्रशा याचें भयें हा देश प्राप्त झाला. स्वदेश सांडून परदेश काबीज करून माहिमास राजस्थान कायम केलें. तें समयीं समागमें आले, त्यांत अष्ट प्रधान, बारा उमराव, मुख्य राजा, गोत्र भारद्वाज, कुळदेवता प्रभावती, त्याचें पूर्व राज्य गोरखपूर"; ह्या उताऱ्यावरून हेंच सिद्ध होतें कीं, बिंबाचें गोत्र भारद्वाज, कुळदेवता प्रभावती आहे. शिवाय तो उत्तर प्रदेशांतल्या गोरखपूरचा राजा होता. परंतु ह्याच हकिकतीच्या महिकावतीच्या कथेंत हा काल निराळा दिला आहे. दोन्ही ठिकाणें सोडून बाब्रशहाचे म्हणजे मुसलमानांच्या भयानें नाइलाजानें व नाखुषीनें स्वदेश सोडून त्यांना परदेशांत माहिमास येणें प्राप्त झालें. महिकावतीच्या १०६ पानांत म्हटलें आहे, "राजश्री बिंबशा स्वामी ह्या प्रांतांत आले, संवत् ११९५. बाब्रशहा पातशहाचे भये करून. हा देश स्वामी बिंबास प्राप्त झाला." इत्यादि. सर्व मजकूर बिंबाख्यानांतील पान १०७ प्रमाणेंच आहे. कुळगोत्र तेंच आहे, व पूर्व ठिकाण गोरखपूर आहे.

अशा रीतीनें विचार करतां वरील तीन गटांच्या उल्लेखावरून बिंबाचा काल शके १०६० च ठरतो. ह्याशिवाय, एक उल्लेख बिंबाच्या वंशावळीसंबंधानें व त्याच्या येण्यासंबंधानें बिंबाख्यानाच्या पान १४० वर आढळतो त्यांतील हकिकत ह्या वरील तीन गटांना कितपत जुळत आहे, हें पाहिल्यानंतर निघणारीं प्रमेयें व अनुमानें पूर्वार्धावरून कितपत खरीं ठरतात तें पाहूं. त्या पानांत खालील वंशावळ आहे. बिंबाख्यानांत 'एक वंश' ह्या नांवाचें एक प्रकरण आहे; (पान १३४ व १४०) त्यांत मजकूर आहे तो:—
"तयाचा महाराजाधिराज (सोरठी देशीं राज्य करितां राजविग्रह जाहला तो राजा मुरारराज) सोरठ देश तक्ताधिपति सहज तयाचे वंशीं जन्मला. राजा सुक्षेमण राज प्रतापी. सुक्षेमण रायाचा कुमार यशवंत नामें महावीर. तयाचा मुरारराज सोरटीस राज्य करितसे. (संवत् ५६८ मध्यें मुसलमानांचा उत्कर्ष झाला. सन १००० इसवी पासून मुसलमान हिंदुस्थान घेऊं लागले. तेव्हां शालिवाहन शके ९२२ व संवत् १०५७ हा होता; व सन १३०० पासून दक्षिण देश ते जिंकूं लागले.) तव म्लेंच्छें चाल केली जाण श्रीमहंमद अल्लाउद्दिन राज्य काबिज करोन मुरारराज दवडिला. तो विक्रमादि संवत् ११८५ चंद्रवासर. तेथें संग्राम झाला. थोर रक्ताचे वाहिले पूर. सैन्य पडिलें अपार. म्लेंच्छ यश पावले. तव मुरारराज वहिला. कनोज येवोनी राहिला. सैन्याचा दळ दिला. विचार करी प्रधानासि. तेथें राजा रामदेव राज्य करी. तयातें मुरारराव भेटे सत्वरीं. रामदेव तयातें बहुतपरी बोधवचनें संवादिलीं. (मुरारराज सैन्यासुद्धां

रामदेवाचे आश्रयास राहिला.) मग रामदेवराय मुरारायातें सैन्यासहित राहविलें आपल्या जवळिकें. ऐसें असतां समागित एकचित्तें तव मुरारराज निमाले. तस्य सुत बाळाराव राजा रामदेवरायाजवळ सुखें असतां स्वयंएव परचक्र पावलें. रामदेवरायाचें (चौदा) घटिकामध्यें पणेऱ्याचे सुलतान अल्लावद्दीन नांव तयाचें घेतलें साचें समरांगणी. तेथें संग्राम तुंबळ झाला. राजा युद्धासी प्रवर्तला. रण-खांब होता तो स्थापिला. थाट भोंवता सैन्याचा. संग्रामाचा अंत आला. मग राजा कवच लेइला. महामारा मिसळला. पूर सुटला अशुद्धाचा. रामदेवराव पराभव पावला. तदुपरी समाधिस्त झाला. तया रामदेवरायाचा पुत्र वाहिला. बिंबदेव राजा निघाला. आणि रायासहवर्तमान चालिला. हत्येवरी आरुढला. देशोदेशींचे राजे परियेसी. सूर्यवंशी, सोमवंशी रायासमागमें आले. पैठणासी मग येवोनी त्या स्थानासीं राज्य करिता झाला. ऐसा मुगररायाचा कुमार मागें तो सांगितला बाळराव तो बिंबरायासमागमें महाराज पैठणीस पातला. तेथें राज्य करी बिंबासंगें. चांपानेर पट्टणी वस्ती जाणे. क्रमिलिया कांहीं वरुषामागें काय वर्तलें तें एकलें. तेथें कैसे वर्तलें तें पाहिजे परिसले. म्हणोनि असें कथिलें अनुक्रमें सकळीक. तया रामदेवरायाचा कुमर जेष्ठ देवगिरी किल्यावर सिंहासनारूढ केला. वेगवडनर तया स्थानीं दठावला. द्वितीय पुत्र रामाचा राजबिंब प्रतापाचा. उदयपुरीं राहिला. उदयपुरीं राजा ठाव. तयाचा राजस्थानीं बैसला. तृतीय पुत्र प्रतापशा प्रतापी अलंदापूर आटणीं (पटणीं) राज्याधिकार स्थापी. ऐसे तिघे पुत्र आपणा आपी आपण असतां बैसविले. ऐसे राज्याधिकार दिधले. तदनतर काय वर्तलें. संवत् १२१० मध्यें झालें. कीं सुलतान अल्लाउदीन आला पैठणीं.''

वरील लांबलचक उताऱ्यावरून कांहीं गोष्टी स्पष्ट होतात. सोरटीच्या मुरार राजाला श्रीमंत महंमद अलाउद्दिनानें विक्रमार्क संवत् ११८५ मध्यें सोरट देशांतून दवडिलें; म्हणजे जाण्यास लावलें. मुरारराज कनोजास सोरटीहून येऊन राहिला. कनोजास रामाराम-देव राजा होता. त्यानें मुरारला ठेऊन घेतलें. मुरार वारला. त्याचा पुत्र बाळाराव रामदेवाजवळ राहिला. इतक्यांत परचक्र आलें. रामदेवाचा पराभव झाला. त्यानंतर बिंबदेव राजा निघाला. त्याचेबरोबर देशोदेशीचे राजे, सोमवंशी व सूर्यवंशी पैठणास निघाले. मुराररायाचा पुत्र बाळारावहि निघाला. पैठणास राज्य करूं लागले. म्हणजे सोरटीहून आलेला बाळाराव व मूळचा कनोजचा राजा रामदेवराव आपल्या पुत्रासह पैठणास येऊन राज्य करूं लागले. बाळारावनें चांपानेरला राज्य चालविलें. कांहीं वर्षांनंतर रामदेवराजाचा मोठा मुलगा देवगिरीच्या किल्ल्यावर राज्यीं बसविला. दुसरा मुलगा बिंब उदयपुरीं अथवा उदेपुरास राज्यावर बसविला व तिसरा मुलगा प्रतापशहा आळंदापुरास म्हणजे अहमदाबादेस राज्यावर बसविला. अशा प्रकारें राज्याधिकारावर हे तिघे

रामदेवाचे पुत्र स्थापन झाले. इतक्यांत कनोजवर हल्ला करणाऱ्या अल्लाउद्दिनानें पैठणास संवत् १२१० मध्यें चाल केली. युद्ध भयंकर झालें. बाळाराव पडला. बिंब पराभव पावला. सोमवंशी – सूर्यवंशी लोकसहवर्तमान बिंब गुजराथेकडे निघाला. ही बातमी देवगिरीस कळली. परंतु केशवरावानें कांहीं केलें नाहीं. बिंबानें गुजराथ घेतली. सालोर मोरेल बारडा केशव नगर बडुनवगराहून प्रतापशहा बरोबर होता. हेमाडपंडितहि होता. देवगिरीचा राजा तितक्यांत मेला. त्याचा पुत्र रामदेवराव देवगिरी किल्ल्यावरच राहिला. बिंबानें संवत् १२१५ मध्यें गुजराथ घेतली. अहिनलवाडा घेतला. पुरपट्टण दक्षिण प्रांतांत आला. विलायतेस (माहिमास) आला. लहान लहान राजांचा पराभव करून राज्य स्थापन केलें. त्या वेळीं कोंकणांत खरें राज्य वीरभद्राचें होतें. त्याचा वंशवृक्ष मनोर परगण्यांतल्या माहिमचें ठाण्या–कोंकणापर्यंतचें राज्य कमालीचें होतें. तें राज्य बाळकोजी सोमवंशी यानें घेतलें. त्याचा पुत्र वीरभद्र राज्य करीत असतांना त्याच्यावर सोरटीच्या अनुरोधानें संवत् १२०५ मध्यें हल्ला करून तें राज्य घेतलें. त्यानंतर संवत् १२२० त कनोजच्या बिंबानें तें राज्य अनुरोधास मारून घेतलें व अशा तऱ्हेनें बिंब माहीमच्या राज्याचा मालक झाला. बिंबाचा वंशवृक्ष शके १०८५ पासूनचा आहे, तोः—

बिंब
|
महिदरणा (नेवाळेचें नांव माहिम ठेवलें)
|
विका
|
रामदेव
|
जयीदेव
|
सोमेश्वर
|
केशवराज
|
प्रधान जनार्दन
|
नागरशा

बखरीच्या पूर्वार्धांतील वंशावळ खालीलप्रमाणें आहे.

शंकरदेव राणा (कनोज देशाचा)
|
बिंबदेव
|
महिंद्रणा
|
एकदेव राणा
|
रामदेव राणा
|
जयदेव राणा (ठाण्यास आला)
|
सोमेश्वर
|
केशवदेव राणा
|
जनार्दन प्रधान (४ वर्षें राज्य केलें.)
|
नागरशा

पहिल्या वंशावळींत प्रतापबिंब आहे. त्याचा वडील बंधु गोवर्धन बिंब होता. चांपानेरच्या ह्या प्रतापबिंबाची मागली वंशावळ नाहीं. तो कोणाचा मुलगा हेंहि समजण्याचा मार्ग उपलब्ध नाहीं. दुसऱ्या वंशावळींत बिंबाचा बाप रामदेवराव होता, असें लिहिलें आहे. मागली वंशावळ दिलेली नसून संवत् ५७४ च्या पुढील सहा राजांचीं नावें दिलीं आहेत. पुढील वंशावळ रामदेवापर्यंत खंडित आहे. तिसऱ्या मथळ्यांत वंशावळ नाहीं. ह्या तीन मथळ्यांनंतर १४० पानांतील वंशावळ पुढें दिलेली आहे. त्या वंशावळींतला बिंबदेव कनोजच्या रामचंद्ररावाचा मुलगा आहे. रामचंद्ररावाची आधींची वंशावळ नाहीं. पूर्वार्धाच्या वंशावळींतल्या शंकरदेव राण्याच्या आधींची वंशावळ नाहीं. मात्र तो कनोजचा राहणारा होता; व त्या वेळीं अहिनलवाड्याच्या समीपच्या चांपानेरला रहात होता; राज्यहि करीत होता. बिंबाची पुढील वंशावळ दिलेली आहे. ह्या वंशावळीशीं पहिली वंशावळ ताडून पाहतां केशवदेव, जनार्दन, नागरशा, हीं तीनच नांवें जुळतात. ह्या पहिल्या वंशावळींत बिंबदेव हा केशवदेवाचा बाप होता, असें दिसून येतें. पूर्वार्धाच्या वंशावळींत बिंबदेव व केशवदेव ह्यांच्यांत सहा पिढ्यांचें अंतर आहे. दुसरी वंशावळ पूर्वार्धातल्या वंशावळीशीं मुळींच

जुळत नाहीं. बिंबाख्यान पान १४० मधील वंशावळ पूर्वार्धांतल्या वंशावळीबरोबर बहुतांशीं जुळते. ह्या बिंबदेवाचा बाप रामदेव हा होता; तो कनोजचा राहणारा राजा होता. बिंब कनोजवरून पैठणास आला व तेथें राहिला. पूर्वार्धातला बिंब कनोजच्या विद्यापूर पाटणाहून चांपानेरला आलेल्या राजघराण्यांतला होता; व १४० पानांत वर्णन केलेला बिंब हा कनोजहून चांपानेरला आलेल्या रामचंद्र राजाचा पुत्र होता. म्हणजे ह्या दोन्ही वंशावळींतले बिंब पैठण, अहिनलवाडा पाटण व कनोज ह्यांच्या संबंधांतले होते. दोन्ही वंशावळींत नांवें एकाच क्रमानें आलेलीं आहेत. फक्त एकींत एकदेवराण्याचें नांव व दुसरींत विका नांव आहे. दोघाहि बिंबांचा दक्षिणेंत येण्याचा कालहि एकच येत आहे. १४० पानांतला बिंब ह्यानें कोंकणांतलें राज्य शके १०८५ त अनुरोधाला मारून घेतलें.[1] पूर्वार्धांतल्या बिंबानेंहि अनुरोधाला मारून राज्य घेतलें. ह्या कथांच्या साम्यावरून असें म्हणतां येतें, कीं शके १०८५ त पूर्वार्धांतील बिंबानें अनुरोधाला मारलें असें सिद्ध होतें. त्या अनुरोधानें हिशेब केला, तर बखरींतल्या बिंबाचा कोंकणांतला आगमनकाल व १४० पानांतल्या बिंबाचाहि आगमनकाल तोच ठरतो. स्थल, काल, मुसलमानांचें भय, व येण्याचा मार्ग, मूळ ठिकाण, हीं अगदीं एकच ठरल्यामुळें ह्या बिंबांपैकीं एकच बिंब मान्य करावा लागतो. पूर्वार्धांत ८६४ संवत्सरांत बिंबानें अनुरोधाला मारलें, असें जें लिहिलें आहे, तें चूक आहे. कारण त्यामुळें बिंब-काल शके ७२९ ठरतो. इतर परिस्थितीच्या मानानें सर्व काल विसंगत ठरतील. १२१६ शके हा नागरशहाला गांठण्यास ५०० वर्षांचा काल धरावा लागणार

१. शके १०५० त सोरटीच्या (सौराष्ट्राच्या) मुरारचा पराभव अल्लाउद्दिनानें केला. त्यानंतर मुरार कनोजच्या रामचंद्राजवळ येऊन राहिला. शके १०६० त अल्लाउद्दिनानें कनोज येथें मुरारचा व रामचंद्र यांचा पराभव केल्यावर रामचंद्र व त्याचे पुत्र बिंब, प्रताप व केशव ह्यांनीं कनोज सोडलें व ते अहिनलवाडा पाटण, चांपानेर, पैठण, इत्यादि ठिकाणीं आले. शके १०७५ त पुन्हां अल्लाउद्दिनानें स्वारी करून बिंबादिकांचा पराभव केला. त्यावेळीं मुरारचा मुलगा बाळाराव पडला. त्याचा मुलगा हैबतराव लढूनहि पराभव पावला. सालेर मारेल, केशवपूर, वडनगर, वगैरे गुजराथहि घेतली. नंतर १०८० त बिंबानें दक्षिणेंत स्वारी केली. त्यावेळीं शके १०८५ त ठाण्याचा अनुरोध ह्याचा पराभव करून त्याला जिवंत धरलें. तो सोरटीहून उसनाच आला होता. यापूर्वीं शके १०५० त सोरटीचा राजा मुरार याचा पराभव केल्यानंतर तो कनोजला गेला. सोरटीस झालेल्या पळापळींत अनुरोध हा दक्षिणेंत ठाण्यास आला होता.

ज्या अर्थीं अनुरोध यास बिंबानें धरल्यानंतर त्याचें पुढें काय झालें, याबद्दलचा उल्लेख इतिहासांत नाहीं; त्या अर्थीं सोरटीच्या मुरार राजाचा पणतू हैबतराव हा बिंबासमवेत असल्यामुळें हैबतराव व अनुरोध एक झाले असावेत, असें म्हणतां येईल.

आहे. हें ५०० वर्षांचें अंतर सहा पिढ्यांच्या कालाच्या हिशेबानें मुळींच जमूं शकणार नाहीं. इतकी ही विसंगति सोडली, तर मायन्यांतल्या बाकीच्या सर्व बाबी बरोबर जुळतात. पूर्वार्धांत ८६४ संवत् हा कोठून आला, हें समजत नाहीं.

१४० पानांत सोरटीच्या राजाची लहानशी वंशावळ सांपडते. ती अशी :—

राजा मुरारराज सोरटीच्या राज्यावर बसला. त्याचे पूर्वज म्हणजे त्याचा बाप यशवंत महावीर. यशवंतचा बाप सुक्षेमण राजप्रतापी हा मुरारराजा संवत् ११८५ मध्यें सोरटीच्या राज्यावर राज्य करीत होता. श्री महंमद अलावदीन ह्यानें त्याच्यावर चाल केली. मुरारराज पराभव पावून कनोजास येऊन राहिला. हा शके १०५० हा होय. त्याला कनोजच्या रामदेवराजानें राहवून घेतलें, व समाधान दिलें. कांहीं दिवसांनीं मुरारराज मृत्यु पावला. त्याचा मुलगा बाळाराव हा रामदेवाजवळ राहिला. कनोजला असतांना त्याच सुलतान अलाउद्दिनानें रामदेवाचे राज्यावर हल्ला चढविला. त्यांत रामदेवाचा पराभव झाला. त्या रामदेव राजाचा पुत्र बिंबदेव प्रयाणास सिद्ध झाला. त्याच्याबरोबर देशोदेशीचे राजे सूर्यवंशी, सोमवंशी रायाचे बरोबर पैठणास आले. त्यांच्याबरोबर मुरारराजाचा मुलगा बाळाराव हादेखील निघाला. तो चांपानेर पट्टणांत राहिला. रामदेवराजाचा मोठा मुलगा देवगिरीस राज्यावर बसविला. दुसरा पुत्र प्रतापी बिंब उदेपूर ऊर्फ उदयपुरीस राज्यावर बसला, व तिसरा पुत्र प्रतापशा अळंदापुरास म्हणजे अहमदाबादेस राज्यावर बसला; पण संवत् १२१० मध्यें म्हणजे शके १०७० त सुलतान अलावदिनानें पैठणावर स्वारी केली. त्या युद्धांत बाळाराव पडला व अनेक सूर्यवंशी, सोमवंशी राजेहि मेले. त्यामुळें पैठणाहूनहि बिंब निघाला. बाळारावाचा मुलगा हैबतराव निघाला. त्यांत सूर्यवंशी, सोमवंशी होते. देवगिरीस असलेल्या केशवदेवानें कांहीं केलें नाहीं; किंवा उदयागिरीस रामदेव राजा होता, त्यानेंहि कांहीं हालचाल केली नाहीं. त्यानंतर व त्यामुळें बिंबदेवानें गुजराथेंत सैन्य पाठविलें. सालेर मोरेल प्रांत घेतला. बारडा हिटोहि मिळाला. केशवपूर वडनगरपर्यंत ठाणेदार बसविले. कनिष्ठ बंधु प्रतापशा तोहि बिंबासवें निघाला. केशवदेव मेल्यावर त्याचा मुलगा रामदेव राज्यावर बसला. बिंबासवें राजगुरु हेमाडपंतहि चालले. संवत् १२१५ म्हणजे शके १०७५ त बिंब निघाला. गुजराथ अनहिलवाडा घेऊन तो पुरपट्टण दक्षिण प्रांतांत आला. विलाभमध्यें आला.

महिकावतीच्या पान ३२ मधली व बिंबाख्यान पान ५१ मधली अशा दोन्ही हकिकती एकच आहेत व त्या दोन्हींत बिंबाच्या आगमनाचा काल शके १०६० हाच दिलेला आहे. बिंबाख्यान पान १२८ मधल्या हकिकतीचा काल संवत् १२०५ दिला

आहे; म्हणजे शके १०७० हाच येतो. तेथें शके १०३४ लिहिलें आहे; ही आकड्यांतल्या वजाबाकीची चूक आहे. पान १०७ च्या हकिकतींत व पान ८८–८९ च्या हकिकतींत हा काल शके १२१० असा दिलेला आहे. त्यामुळें बिंबाचे दोन काल आहेत, असा समज होतो. अर्थात् १२१० शके हा काल बरोबर आहे कीं काय ते पाहूं. खरी स्थिति अशी आहे, कीं बिंबाख्यान व महिकावतीची बखर ह्यांत १२१० हा एकच शक असल्यामुळें तो बरोबर असावा, असें मानणें युक्त वाटतें. बिंबाख्यान पान १०७ व पान १४१–१४२ मधील हकिकत एकच आहे. अक्षरशः तुलना केली असतां हें दिसून येतें. पण पान १४१–१४२ यांत १२१० च्या आधीं शक हा शब्द नसून संवत् हा शब्द आहे. याच्या पानांच्या पुढील पानांत पाहिलें, तर सर्वत्र संवत् सांगितलें असतांना ह्या ठिकाणीं शक हा शब्द एकट्याच काळापूर्वी येणें सयुक्तिक नाहीं; व त्याप्रमाणें खरोखरच १४१ पानांत १२१० च्या आधीं संवत् हा शब्द आहे. अर्थात् त्याच हकिकतींत एका ठिकाणीं संवत् व दुसऱ्या ठिकाणीं शक असणें शक्यच नाहीं. कोणता तरी एक निर्णय घेणें प्राप्त आहे. ज्या अर्थी पान १४२ च्या पुढें व मागें सर्वत्र हकिकतींतली कालगणना केलेली आहे. तेव्हां त्या लिखाणांत संवत् हाच शब्द मान्य करावा लागतो; व पान १०७ मधला 'शक' हा शब्द अमान्य केल्यानंतर त्या ठिकाणीं शके १०७० हा येतो. नकलकाराच्या चुकीमुळें संवत्–शकाचा फार मोठा गोंधळ झालेला आहे.

कै. राजवाडे यांना बिंबाच्या दोन कथा कराव्या लागल्या; व तें जुळणार नाहीं, म्हणून खऱ्या बिंबाला चांपनेरच्या बिंबवंशांतला आडनांवी बिंब ठरविला व दुसऱ्या बिंबाला यादवांचा बिंब ठरविला. त्याप्रमाणें सर्व हकिकती राजवाडे यांना दुबार पत्कराव्या लागल्या. त्यांनीं दोन नागरशा व दोन त्रिपूरकर तयार केले. दोनदां सूर्यवंशी व सोमवंशी हीं कुळें आलीं असें मानावें लागलें; व हेमाडपंताची देखील अशीच दोन ठिकाणीं अढाताण करणें त्यांना भाग पडलें. खऱ्या बिंबाचे आठ वंशज पुढें झाले असतांना शके १२१६ च्या बिंबाला तीन वंशजांत सर्व आटपावें लागलें. कनोजचा वंशीक राजा रामदेवराव हा होता; व त्याचाच पुत्र बिंबदेव कोंकणांत आला होता. त्याला मोठा भाऊ केशवदेव व धाकटा भाऊ प्रतापशा असे होते. ह्या सर्वांना देवगिरीच्या रामदेवाच्या मांडीवर दत्तक म्हणून बसविलें. खरें पाहतां रामदेवाला शंकर नांवाचा एक पुत्र होता व एक मुलगी होती; असें कै. डॉ. रामकृष्णपंत भांडारकर म्हणतात. तसेंच रामदेवरावाला भीम (बिंब) नांवाचा आणखी एक मुलगा होता, असें कै. केशवराव पाध्ये आपल्या हेमाद्रीच्या ग्रंथांत पान १३५ वर म्हणतात. पण भानुविलास नांवाच्या महानुभाव पंथाच्या एका ग्रंथांत म्हटलें आहे, तें असें:—

रामापासुनी । जन्मा आले पुत्र तीनी । वडिल शंकर प्रतापाभी । युद्धपटु ॥ तमा धारा ब्रह्माळ भुपु । जे यांचा वाणी नेणिजे । प्रतापु । जेयाची दिठी नस हाती रिपु । समरंगाणी । तयास बिंबदेवो । जेणें वैरियाचा फोडला ठावो । जेया नरुचे हार भावो । कामिकांचा ।

ह्यावरून स्पष्ट होतें, कीं यादवांच्या रामदेवाच्या मुलांचा प्रपंच निराळाच आहे. रामदेवाला किती मुलें होतीं, तेंच आधीं निश्चित नाहीं. तेव्हां त्यांचीं नांवें कोणतीं होतीं, हें कसें ठरवावें ? पण कनोजच्या ज्या रामदेवाचा पराभव अल्लाउद्दिनानें केला, त्याला केशवदेव, बिंब व प्रतापशा असे तीन मुलगे होते. त्यांतलाच बिंब हा दक्षिणेंत आला.

येणेंप्रमाणें बिंबाच्या येण्याबद्दल, त्याच्या मूळच्या ठिकाणाबद्दल, त्याच्या मार्गाबद्दल व कालाबद्दल जितक्या ठिकाणीं उल्लेख आहे, त्या त्या ठिकाणीं एकवाक्यता आहे. बिंब हा कनोजहून निघाला, व चांपानेर, अहिनलवाडा, पैठण ह्या मार्गानीं तो दक्षिणेंत आला. शके १०६० हाच त्याच्या निघण्याचा व येण्याचा काल ठरला आहे. पूर्वार्धात बिंबाच्या येण्याचा काल दिलेला नाहीं. पण अनुरोधाचा पराभव त्याच बिंबानें केला आहे; हा पराभव संवत् १२२० मध्यें बिंबानें केला होता व तो अनुरोध संवत् १२०५ मध्यें दक्षिणेंत आला होता, व त्याचवेळीं त्यानें तें राज्य वीरभद्राजवळून घेतलें होतें.

वरीलप्रमाणें बखरींतल्या निरनिराळ्या बिंबांसंबंधाच्या उल्लेखांचा शोध लावून पाहिल्यानंतर असें सिद्ध होत आहे, कीं चांपानेरहून आलेला बिंबच बिंबस्थान स्थापन करणारा ठरतो. त्याच्याबरोबर हेमाडपंत, सूर्यवंशी, सोमवंशी, शेषवंशी कुळें आलेलीं होतीं. निरनिराळ्या उल्लेखांचा रोख व कल एकच बिंब ठरवीत आहे. ह्या चांपानेरच्या बिंबाचे ठायीं सर्व बिंबकथांचें एकत्रीकरण झालेलें ठरतें. आतां हा बिंब चांपानेरला कोठून आला, ह्या संबंधानें विचार करतां पहिली गोष्ट ध्यानांत येते, कीं पूर्वार्धाच्या मथळ्यांत 'विद्यापूर पाटण कनोज' असा उल्लेख आढळतो. तसेंच पान १०७ मधल्या हकिकतीच्या मथळ्यांत खालील उल्लेख आढळतो. 'महाराज राजाधिराज सिंहासनमंडित सिंही ग्रामांतील अरिराय विभांडक श्रीसविता भूपति '**पाठार ज्ञातीसंबंधीं**' ह्यावरून हें उघड दिसतें, कीं सिंही ग्रामांतून बिंब आलेला आहे. म्हणजे तो उत्तर प्रांतांतून आलेला आहे. महिकावतीच्या बखरीच्या ८८–८९ पानावरहि हाच मथळा आहे. बिंबाख्यानाच्या पान १२८ मध्यें उल्लेख आहे, कीं "मुख्य राजगोत्र भारद्वाज, त्याचें पूर्वराज (पूर्वीचें ठिकाण) गोरखपूर," म्हणजे उत्तर हिंदुस्थानांतून हा बिंब चांपानेरला आला आहे. बिंबाख्यानाच्या १४०--१४२ पानांत मात्र ह्या सर्व चुटपुटत्या उल्लेखांची सविस्तर हकिकत दिलेली आहे. त्यांत म्हटलें आहे, कीं सोरटीच्या मुरारराजाला अल्लाउद्दिनानें

पराभूत करून सोरट सोडण्यास लावल्यानंतर तो मुरारराज कनोजच्या रामदेवाडे गेला व तिथेंच सैन्यासह राहिला. मुरारराजाचा मृत्यु कनोजास झाला. पण कनोज-वरहि अल्लाउद्दिनानें हल्ला करून वंशिक राजा रामदेवराव व मुरारराजाचा पुत्र बाळाराव ह्यांचा पराभव केला. त्यावेळीं बिंब हा आपल्या सर्व राजे, उपराजे, गुरु, उपाध्याय, यांच्यासह पैठणास व चांपानेरला आला. त्यांत स्पष्टपणें असें दाखवून दिलें आहे, कीं बिंबानें पैठणास म्हणजे अहिनल पाटणास राज्य स्थापिलें असतां बाळारावानें चांपानेरला राज्य स्थापिलें. ह्या पैठणावरहि त्याच अल्लाउद्दिनानें स्वारी करून बिंबाचा पराभव केला व बाळारावास मारलें. तेव्हा बिंबानें गुजराथ काबीज करून साळेर मारेळ ह्या रस्त्यानें कोकणांत महिकावती गांठली. वरील सर्व हकिकत एक स्थानांत दिसते, कीं कनोजच्या रामदेवराजाचा मुलगा बिंब हाच एक बिंब चांपानेरला आला व तेथून तो महिकावतीस आला. त्यानें आपला एक भाऊ केशवदेव देवगिरीस ठेवला. आपण स्वतः उदेपुरास राहिला; व प्रतापशा हा आळंदापुरास ठेवला; पण अल्लाउद्दिनानें चांपानेरला बिंबाला पराभूत केल्यानंतर बिंबानें उदेपूर सोडलें व प्रताप यानें आळंदापूर सोडलें; व ते दोघेहि बरोबर दक्षिण कोंकणांत आले. अशा रीतीनें निरनिराळ्या हकिकतींची सांगड एकत्र घातल्यावर आपणाला स्पष्ट असा निर्णय घेतां येईल, कीं हे सर्व बिंब एकच आहेत. पण निरनिराळ्या ठिकाणच्या उल्लेखांवरून आतांपर्यंत निरनिराळे बिंब दिसत होते. त्यांचें विलिनीकरण आज आपण कनोजच्या रामदेवरावाचे पुत्रांत–बिंबांत–करीत आहोंत. आतां पुढल्या निरनिराळ्या कथांतील हकिकतींची सुसंगती लावतां येणार आहे. रावबहादूर जोशी, हेमाद्रिकर्ते पाध्ये, महिकावतीच्या बखरीचे संशोधक त्याच बखरीवर आधारून दुसरा बिंब मानणारे हरि रामचंद्र आचार्य, व त्याप्रमाणें त्याच महिकावतीच्या बखरीवरील विवेचन आधारभूत ठरवून 'बिंबा-ख्याना'चे परिसारांत बिंबाचा निर्णय घेणाऱ्या श्री. रतन ठाकूर हे सर्व लटके पडतात. ह्या सत्यकथेच्या दृष्टीनें विचार करतांना स्पष्टच दिसून येतें, शके १२०० ते १२१६ पर्यंत रामचंद्रराव यादव व त्याचा वंशज जसवंद्या जाधव, तसेंच त्यांना अहिनल-वाड्याच्या आनंदराव व यादवांचा हेमाद्री पंडित ह्या सर्वांना झोडपणारा तुदानशा —मांडलिक-नागरशा हा त्यावेळीं इकडे असतांना बिंब नांवाच्या यादवानें इकडे महिकावतीचें राज्य स्थापन केलें;

ही हरिदासबोवांची निव्वळ थाप ठरते.

देवगिरीचा रामचंद्र जाधव ह्याच्यामागें खिलजी अल्लाउद्दिनानें इतके प्रसंग आणले होते, कीं त्यांच्या बिंबाला इकडेतिकडे हालचाल करण्यास अवसरच मुळीं नव्हता. शंकरदेव

राणा ह्याचा खून ह्या बिंबानें केला व हेमाद्रिपंडिताच्या कारस्थानावरून खिलजीनें रामचंद्राचा पराभव केला, असें 'भानुविजय' ह्या महानुभवीपंथाच्या ग्रंथांत आढळतें; त्याचाहि विचार ह्या ठिकाणीं केला, म्हणजे यादव–बिंबानें महिकावतीस राज्य स्थापिलें, अशी हकिकत निव्वळ कादंबरी—कथानकासारखी वाटते! कनोजच्या बिंबानें महिकावतीच्या राज्याची स्थापना शके १०८५ च्या सुमारास केलेली आहे.

पूर्वार्धांत दिलेली कनोजच्या वास्तव्याची हकिकत खरी मानण्यास सकृत्दर्शनीं एक गोष्ट दिसते. पूर्वार्धातल्या बिंबाच्या वंशावळीची व पान १४२ मधल्या वंशावळीची तुलना करतांना त्या दोन्ही वंशावळी अनुक्रमासह एकच आहेत. नागरशा हा महिकावतीचा शेवटला राजा व बिंब हा राज्यस्थापक राजा होता. ह्या दोन्ही हकिकतींत ही तफावत नाहीं. स्थापक व हारक दोन्ही तेच आहेत, व मधले सर्व राजेहि एकच व एकाच क्रमानें दिलेले आहेत. ह्यावरून दोन्ही कथांतील साम्य दिसल्यावर एका विभिन्न गोष्टीचा येथें उल्लेख करणें क्रमप्राप्तच आहे.

पूर्वार्धांत लिहिलें आहे, कीं हा बिंब शंकरदेव राणा ह्याचा मुलगा होता व १४२ पानावरल्या हकिकतींत आहे, कीं तो कनोजच्या रामदेव राण्याचा मुलगा होता. इतकें मात्र निश्चितपणें दिसतें, कीं शंकरदेव हा कनोजचा होता; तेव्हां शंकरदेव हा रामचंद्रदेवाचा एक कुटुंबी असावा व बिंब हा त्याचा कोणीतरी संबंधित असावा; रामदेव राणे किंवा शंकरदेव राणे हे एकाच कुटुंबांतले असून संवत् ५७४ पर्यंत त्यांच्या कुळांचा माग लागत आहे. संवत् ५७४ पासून पुढें पांच पिढ्यांच्या राजांची हकिकत बखरींत दिलेली आहे व पुढील पिढ्या दिलेल्या नसून एकदमच वंशीय रामदेव राणा ह्याच्यापासून पुढल्या पिढ्यांची हकिकत दिलेली आहे; आणि मधल्या पिढ्यांची हकिकत कोठेंच आढळत नसल्यामुळें शंकरदेव व रामदेव ह्यांचा संबंध निर्णित करतां येत नाहीं. तूर्त इतकेंच ठरवितां येईल, कीं उपरोक्त दोन्ही हकिकतींतील बिंब हा कनोजचा होता व त्यानेंच दक्षिणेंत येऊन महिकावतीचें राज्य स्थापन केलें. बिंबाच्या येण्याच्या कारणाचा थोडासा विचार करणें आवश्यक आहे. अल्लाउद्दिनानें ह्या मुरारराजाला सोरटीवरून दवडिल्यावर त्यानें पुन्हां त्यांच्यावर हल्ला करून कनोजच्या रामदेवराव, बिंबदेवराव व मुरारचा मुलगा बाळाराव यास कनोज सोडावयास लावलें. पैठण, अहिनलवाडा पाटण व चांपानेर ह्या ठिकाणीं स्थिर होण्याचा त्यांचा विचार चालू असतांना पैठणच्या लढाईत पुन्हां त्याच अल्लाउद्दिनानें त्यांचा पराभव केला व त्यामुळें बिंबास दक्षिण कोंकणचा रस्ता धरावा लागला. ह्याच सुमारास महंमद घोरीनें पृथ्वीराज चव्हाणास पराभूत केलें होतें. अशा अराजकतेच्या अस्थिर

स्थितींत राहण्यापेक्षां कोठें तरी निवांत ठिकाणीं राहण्यास मिळावें, म्हणून बिंबाचें हें प्रयाण झालेलें आहे. त्याचेबरोबर पाठारे ज्ञातीचे सूर्यवंशी व सोमवंशी राजे, उपराजे, गुरु, उपाध्ये, शेषवंशी कुळें थेट कनोजहून कोंकणांत आलीं. तसेंच चांपानेर, अहिनलवाडा पाटण, पैठण ह्या ठिकाणचीं कांहीं कुळें बिंबाबरोबर दक्षिणेंत आलीं.

ह्याप्रमाणें बिंब हा कोण होता, त्याचें मूळ ठिकाण कोणतें, तो कोणत्या मार्गांनीं व कां आला, त्याच्या येण्याचा काल, त्याच्याबरोबर कोणकोण होते, ह्या संबंधींच्या सर्व हकिकतींची वरीलप्रमाणें एकवाक्यता केली आहे. त्यानंतर आतां पूर्वार्धाच्या बखरीच्या आंतील भागांचें संशोधन क्रमप्राप्त ठरतें. म्हणजे बखरीच्या काळांतला प्रकाश प्रस्तुत इतिहासावर लख्ख पडूं शकेल. त्यापूर्वीं आणखी एका गोष्टीचा विचार करावा लागतो. राजवाडे यांनीं महिकावतीच्या प्रस्तावनेच्या १४ व्या पानांत कबूल केलें आहे, कीं त्यांच्या प्रतापबिंबानें शके १०६० त कोंकणावर स्वारी केली; त्यांच्या महिबिंबानें ६५ वर्षें राज्य केलें. केशवदेव राणा हा शके ११३४ त गादीवर आला. शके ११५९ त केशवदेव हा वारला. त्यानंतर जनार्दन प्रधानानें ४ वर्षें राज्य केलें. संवत् ११६३ त नागरशानें राज्य घेतलें. अशा रीतीनें राजवाडे यांनीं १०३ वर्षांची जंत्री दिली आहे. ह्याच वेळीं राजवाडे हे मान्य करतात, कीं महिबिंबानेंहि ६६ कुळें आपल्याबरोबर आणलीं होतीं. ह्या कुळांच्या येण्याबरोबर त्यांच्या १२१६ शकांतल्या बिंबाचा कोणत्याहि प्रकारें संबंध येत नाहीं. इतर सर्व ठिकाणच्या हकिकतींतल्या ६६ कुळांच्या ह्या प्रान्तीं येण्याचा काळ हाच ठरलेला आहे. पूर्वार्धांत शके ११६३ त नागरशानें राज्य घेतलें, तें वृत्त राजवाडे यांच्या वरील वृत्ताशीं जुळतें आहे. पुढें नागरशाचें राज्य सुरू झालें. नागरशावर देवगिरीच्या रामदेवरावानें अहिनल पाटणाच्या आनंददेवाच्या सैन्यासह स्वारी केली. अंधेरीस लढाई झाली. आनंददेवाच्या १२ राण्या सती गेल्या. इतक्यांत दिल्लीस जलालुद्दिन खिलजीचा पुतण्या अल्लाउद्दिन खिलजी गादीवर आला. त्यानें निकामलिक वजिरास दक्षिणेंत पाठविलें. त्यानें कोंकणांत येऊन नागरशाचेबरोबर भायखळ्यास युद्ध करून त्याला मारलें. संवत् १३५१ शके १२१६ मध्यें नागरशाचें राज्य निकानें घेतलें, असा वृत्तांत पूर्वार्धांत आहे. ह्याच ठिकाणीं राजवाडे म्हणतात, कीं १२१६ शतकांत बिंब आला; व त्यानें नागरशाचें राज्य घेतलें. बिंबाच्या ज्या इतर हकिकती प्रस्तुत लेखकानें तपासून पाहिल्या आहेत, त्यांत नागरशाचें राज्य निकानें घेतलें, असा मजकूर आहे. १४० पानांतल्या हकिकतींतहि हेंच सांगितलें आहे, कीं शके १२१६ त नागरशाचें राज्य निकानें घेतलें. पान ५१ च्या हकिकतींतहि हेंच सांगितलें आहे. अशा हकिकती एकच असतांना मध्येंच राजवाडे हे शके १२१६ त नागरशाचें राज्य घेण्यास यादवांच्या बिंबास कां आणतात! त्यांच्या प्रस्तावनेच्या १४

व्या पानावर राजवाडे म्हणतात, शके १२१६ त त्यांच्या बिंबानें कोंकणावर स्वारी केली, हें त्यांनीं महिकावतीच्या बखरीच्या ८९ पानावरून घेतलेलें आहे. म्हणजे बिंबाख्यान पान १०७ व महिकावतीची बखर पान ८९ वरील हकिकत बिंबाख्यानाच्या १४० पानांतील हकिकतीची नक्कल आहे. पण ह्या महिकावतीच्या बखरीच्या पानांतला १२१० हा शक नसून तो संवत् आहे, असें विधान मागील पृष्ठांत प्रस्तुत लेखकानें केलेलेंच आहे. राजवाडे यांनीं ही शक-संवत् संबंधींची दुरुस्ती केली असती, तर त्यांना, नसलेली गोष्ट झाली, असें आपल्या लिखाणांत दडपून द्यावें लागलें नसतें.

नागरशाचेबरोबर कोणत्याहि बिंबाचें युद्ध झालें नाहीं; उलटपक्षीं नागरशानें त्याचा मुलगा त्रिपुरकर ह्यानें दोन वेळां हा देवगिरीकर रामदेव राजास आनंददेवासुद्धां पराभूत केलेला आहे. नागरशानंतर तुर्काण (तुर्कांचें राज्य) झालें, असें सर्व हकिकतीवरून निश्चितपणें म्हणतां येतें; मात्र राजवाडे हे शक-संवतांच्या गोंधळांत सांपडल्यामुळें बिंबदेव यादवाला तेथें आणतात. त्यांच्या कथेंतल्या बिंबाचें राज्य पुन्हां मेलेल्या नागरशास घ्यावयास लावतात. १२५४ शकांत हें राज्य प्रतापशहाच्या नंतर नागरशानें घेतलें, असें राजवाडे म्हणतात. शके १२१६ ते १२७० हा काल कसा गेला, हें दाखविण्याकरितां ते नागरशाला शके १२६९ पर्यंत जगवितात! पण शके १२१६ मध्यें नागरशाच्या मृत्यूनंतर शके १२७० पर्यंत इकडे झालेल्या नाळते, भोगळे व आऊ नाखवा ह्यांच्या राज्यांचा ते आपल्या लिखाणांत उल्लेखच करीत नाहींत. १४० पानांतल्या हकिकतीकडे राजवाडे हे पहाते, तर त्यांना आढळून आलें असतें, कीं शके १२१६ त त्याच वेळीं निकानें हें राज्य लादूरशहास दिलें. त्याच्यापासून आऊसावंतानें हें राज्य घेतलें. त्याच्यानंतर चार (४) राजे झाले. त्यावेळीं थुंजारनें घाटावरून केशवदेवाची मदत आणून हंबीरराव ऊर्फ नरसिंगराव ह्याचेकडून हें राज्य घेतलें; पण नरसिंगरावानें गुजराथेंत सुलतानशहाकडे जाऊन मदत मागितली. सुलतानशहानें थुंजारकडून शके १२७० त राज्य घेतलें. ह्या हकिकतीवरून दिसतें, कीं शके १२१६ तच नागरशा जाऊन तुर्काण आलें होतें; पण गुजराथच्या सुलतानाच्या हलगर्जीपणामुळें शके १२७० पर्यंत ह्या माहिमच्या राज्याचे कांहीं राजे होऊन गेले. अर्थात् यादवांचा बिंब इकडे आलेला नाहीं व त्यानें इकडे राज्यहि घेतलेलें नाहीं. अर्थात् हें सर्व राजवाडे यांना त्यांच्या स्वतःच्या चुकीमुळें प्राप्त झालें. १०७ पानांतल्या हकिकती १४० पानांतल्यांना अक्षरशः बरोबर जुळत आहेत. फक्त ह्या पानांतला शके १२१० आहे, तेथें संवत् १२१० असें समजावें. तसें केल्यानंतर एकहि विसंगती शिल्लक रहात नाहीं. सर्व हकिकती एकच ठरतात. शके १२१० ते १२१६ पर्यंत अल्लाउद्दिनानें दुबळ्या केलेल्या रामदेव राजास नवीन स्वारी करणें शक्यच नव्हतें. शिवाय, राजवाडे यांनीं आणलेल्या

बिंबाबरोबर ६६ कुळें आल्याचा कोठेंच उल्लेख नाहीं. सर्व हकिकतींत शके १०६० त निघालेल्या व त्यानंतर १०८५ पर्यंत येऊन स्थायिक झालेल्या बिंबाबरोबरच हीं कुळें आलेलीं आहेत. इतकें मात्र म्हणतां येईल, कीं जो जो राजा गादीवर येई, तो तो न चुकतां हे चवदा महाल तपाशीत असे व आपल्या कुळांना दिलेलीं वतनें तपासून पहात असे.

महिकावतीचें राज्य म्हणजे तें एक फार मोठें राज्य होतें, अशा कल्पनेनें आपण पाहूं गेल्यास आपली दृष्टि फाकते. ज्या वेळीं बिंबानें इकडे आपलें वास्तव्य केलें त्याच वेळीं दवणेगासून तों माहिमपर्यंत लहान लहान पुंड राजांना त्यानें जिंकलें. कळवें व ठाणें यांत एक मैलाचें अंतर असतांना कळव्यास एक पुंड राजा व ठाण्यास अनुरोध राजा असे दोन राजे एक मैलाच्या अंतरानें नांदत होते. इथल्या ह्या पुंड राजांना नाहींसें करून राजा बिंबानें त्यांना एकछत्राखालीं आणलें. बिंब हा उत्तरेकडून कनोजहून आला असल्यामुळें त्याला त्या ठिकाणच्या राज्यांच्या कारभाराच्या रीती व पद्धती ह्या ठाऊक होत्या. त्याप्रमाणें त्यानें इकडे लहान लहान महाल केले व त्याजवर आपले सरदार प्रमुख ठरवून त्यांचे स्वाधीन हे महाल केले. म्हणून गादीवर येणारा प्रत्येक राजा हे महाल तपाशीत असे. ह्या राजांमध्यें केशवदेव फार प्रतापी होता. त्यानें वर नवसरीपर्यंत व खालीं चौल-चंपावतीपर्यंत आपलें माहिमचें अधिराज्य पसरविलें होतें. त्यानें त्याच वेळीं घाटावरील जुन्नर–देवगिरीपासून वरच्या धार–नवसरीपर्यंतच्या राजांना बोलावून एक मोठा यज्ञ केला होता. नागरशानें हेंहि राज्य अधिक वाढविलें. त्याच्या पराक्रमी त्रिपुरकर पुत्रानें आजुबाजूच्या सर्व राजांना आपले मांडलीक केले. पण दुर्दैवानें गुजराथच्या सुलतानानें दक्षिणेंत आपला वझीर पाठवून नागरशाचें राज्य शके १२१६ त त्यानें घेतलें व नंतर कांहीं पुंड राजाच्या राजवटीनंतर शके १२७० पासून ह्या महिकावतीच्या राज्याचा शेवट झाला; व त्याजवर गुजराथचे पादशहा हे पोर्तुगीज येई-पर्यंत आपला अम्मल करीत होते. ह्याच सुमारास धरमपूरचे राजे, जव्हारचे राजे, रामनगरचे राजे, पटेकर राजे, असे अनेक राजवटींचे राजे ठाणें जिल्ह्यांत प्रबळ झाले. पण महिकावतीचें राज्य गुजराथच्या सुलतानाकडे गेलें, तें त्याच्याकडेच राहिलें.

बिंबाबरोबर इकडे आलेल्या कुळांचा विचार खालीलप्रमाणें करतां येईल :— पूर्वार्धांत लिहिलें आहे, कीं बिंबाच्या बायकोचा भाऊ भास्करशिंग हेदुराव, सोरटदेशचा महिमानपुरचा राव अंकुशदेव सोळंखी सूर्यवंशी राणा हे त्याच्याबरोबर निघाले, तेव्हां सत्तावीस कुळींचे सासष्ट सरदार क्षेत्रि राजपुत्र आपल्या साहित्येशी निघाले. मांडव (माडो) गडाचा गोविंदराव प्रभू प्रधान व गोपाळ नाईक व गोविंद नाईक यजुर्वेदी

ब्राह्मण कुळगुरु उपाध्याय हेहि निघाले. हीं सासष्ट कुळें क्षत्रिय होतीं. तीं सरदारांचीं कुळें होतीं. तसेंच सोळा यजुर्वेदी ब्राह्मण होते. (हैब्रतराव) भास्करराव, अंकुशदेव राणे, गोविंदराव प्रधान, पंडीत, उपाध्ये गुरु, पुरोहित, ह्यांच्याव्यतिरिक्त हे सासष्ट सरदार होते. म्हणजे हे क्षत्रिय वर्णाचे सासष्ट सरदार होते. ह्या क्षत्रिय कुळांत इतर कुळांतले किंवा जातीचे कोणी नव्हते. पण ह्या कुळांची विल्हेवारी बिंबाख्यान पान ५४ मध्यें दिली आहे, कीं सोमवंशी कुळें २७, सूर्यवंशी कुळें १२, शेषवंशी कुळें ९, पंचाळ कुळें ५, घोडेल कुळें ७, गुर्जर कुळें ६, पान १०८ वर दिलें आहे, कीं १२ राजे सूर्यवंशी, २४ राजे सोमवंशी कुळें होतीं. पान १४१ वर दिलें आहे, कीं देशोदशीचे राजे सूर्यवंशी व सोमवंशी हे बिंबासमवेत चालले. असा हा फरक कां, हें तूर्त तरी उकलतां येत नाहीं. मात्र हें खरें, कीं बिंबाबरोबर आलेल्या कुळांत सर्व प्रकारचे लोक होते. अधिक भरणा सोमवंशी, सूर्यवंशी व शेषवंशी क्षत्रियांचाच होता. ह्या क्षत्रियांच्या ज्ञातीचा उल्लेख कोठेंच केलेला नाहीं. हीं तीनहि कुळें क्षत्रिय म्हणून आलेलीं आहेत.

बिंबाबरोबर कनोजहून निघालेल्या परिवारांत सूर्यवंशी, सोमवंशी, शेषवंशी, अशीं वंशीय घराणीं होतीं. त्यांतल्या सूर्यवंशी व सोमवंशी घराण्यांतल्या बहुतेक घराण्यांतील पुरुषाच्या नांवापुढें 'राजे' किंवा 'राणा' हें उपपद लावलें जात होतें. म्हणजे बहुतेक लोक राजे, उपराजे, मांडलीक व सरदार असे होते. त्या परिवारांत अहिनलवाडा, चांपानेर ह्या ठिकाणीं आणखी कांहीं कुळांची किंवा घराण्यांची भरती झाली. पैठणास तर यजुर्वेदी ब्राह्मणांचीं बरींच घराणीं त्यांना येऊन मिळालीं. त्यांत कांहीं घराण्यांतल्या लोकांच्यापुढें 'प्रभू' हें उपपद जोडल्याचें आढळून येतें. शेषवंशीयांच्या घराण्यांत असा कांहीं प्रसंग प्राप्त झालेला नाहीं. अर्थात् त्यांना भंडारी हेंच एक उपपद मिळालेलें आहे.

साष्टींतले, अष्टागरांतले, पालघर–डहाणू–उंबरगांवचे **पांचकळी** असे भेद आजहि दिसून येत आहेत. 'साष्टीकर पांचकळशी' हे 'पाठारे क्षत्रिय' ज्ञातीचे आहेत, असें ठरल्यानंतर दुसरे पांचकळशी नामधारी हे 'पाठारे क्षत्रिय' ज्ञातीचेच लोक आहेत, हें सिद्धच आहे. चौकळशी हें नामाभिधान त्यांना कसें प्राप्त झालें, हें प्रस्तुत खंडांत ज्ञातीचें नांव या भागांत स्पष्टच केलेलें आहे. पण वस्तुतः ते मूळचेच पांचकळशी म्हणून 'पाठारे क्षत्रिय' ज्ञातीचेच ठरतात. पण ह्यांच्या कुळांपैकीं कांहींनीं विभिन्न असा धंदा–वाडी करण्याचें पत्करल्यामुळें 'वाडवळ' हें नांव त्यांना पडलें. विभिन्न धंद्यामुळें त्यांना अपंक्त ठरविलें. खरें पाहतां चौकळशी—वाडवळ—हे मूलतः 'पाठारे क्षत्रिय' ज्ञातीचेच म्हणून त्यांना सर्व प्रकारें 'आपले' म्हणून जवळ करणें हेंच योग्य ठरेल.

आतां राहिले पाताणे किंवा पाठारे प्रभु. हे लोकदेखील 'पाठारे क्षत्रिय' ह्यांच ज्ञातीचे आहेत. फरक इतकाच, कीं लेखणीच्या प्रभुत्वामुळें त्यांनीं आपल्या 'पाठारे' ह्या ज्ञातीवाचक शब्दापुढें व्यवसायदर्शक असा 'प्रभू' हा शब्द जोडला. 'पाठारे क्षत्रिय' आणि 'पाठारे प्रभू' हे मूळच्या 'पाठारे' ज्ञातीचेच होत. व्यावसायिक भिन्नत्वामुळें ज्ञातींच्या नांवांत वरीलप्रमाणें फरक पडला. दोन्ही ज्ञातींचीं कुळें हीं अस्सल क्षत्रियच होत. त्यांनीं क्षात्रधर्माचें निष्ठेनें पालन केल्यामुळें ऐतिहासिक परंपरेच्या दृष्टीनें दोन्ही ज्ञाती 'पाठारे क्षत्रिय'च होत, असें मानणें क्रमप्राप्तच ठरतें.

* * *

शुद्धिकरणः—गोम तांडेलाला किंवा रामजी सुख्याला ज्ञातींत घेऊन, पंक्तिपावन केल्यामुळें चवदा कुळांना त्यांचीं जानवीं तोडून नागरशानें ज्ञातिबहिष्कृत केलें, असे अपंक्तवाचे अनेक प्रसंग वेळोवेळीं उत्पन्न होऊन इकडलीं कुळें तिकडे गेलेलीं दिसतात. अशा ह्या विभिन्न झालेल्या कुळांचे गट झाले, किंवा वाडवळ गटानें अथवा पाठारे प्रभु गटानें तशा त्या अपंक्तांना आपल्यांत समाविष्ट करून ठेवावें असेंच कोणी म्हणेल.

* * *

पूर्वार्धांत एक हकिकत अशी आहे, कीं आपल्याला (महिनंदनुला) आरमार असावें म्हणून पडाव बांधण्याचा उपक्रम करण्यांत आला. त्यावेळीं ह्या ६६ कुळांपैकीं ८ माणसें निवडून काढलीं व त्यांना शिल्पकामाचा धंदा शिकण्यास सांगितलें. तेव्हां त्यांनीं तें नाकारलें. कारण त्यामुळें आपल्या क्षत्रियत्वाला बट्टा लागेल. त्यांना राजाचें आश्वासन मिळाल्यावर ते काम करण्यास तयार झाले. त्यानंतर साहजिकच लोक त्यांना 'सुतार' म्हणूं लागले. ज्ञातीच्या विशिष्ट गटास सुतार असेंहि नांव संबोधण्यांत येऊं लागलें. अलिबागेस आपल्या ज्ञातिगृहस्थांची ज्ञात 'माळी' लागलेली आहे. कारण ते माळ्याचा धंदा करतात. आपल्या ज्ञातीला क्षत्रिय म्हणून लग्नाच्या वेळच्या सिंहासनास पांच कळस लावण्याचा मान होता, म्हणून आपण 'पांचकळशी' संबोधिले आहोंत. ज्यांचा एक कळस अमान्य केला, त्यांना 'चौकळशी' म्हटलें जाऊं लागलें. अशा रीतीनें ह्या सासष्ट–कुळी–क्षत्रियांना सोमवंशी, सूर्यवंशी, सुतार, माळी, पांचकळशी, चौकळशी, अशीं ज्ञातिवाचक नावें दिलीं गेलीं ह्या ६६ कुळांपैकीं कांहींना जमीन सुधारण्याकरतां वाड्या करण्याचा धंदा पत्करण्यास बिंबाच्या वंशजांनीं सांगितलें. त्या प्रसंगाचें वर्णन पूर्वार्धांत एके ठिकाणीं आहे. अशीं तीं कुळें 'वाडवळ ठरलीं गेलीं,' व त्यांची एक निराळीच जात संबोधिली गेली. एकंदर विचार करतां हल्लींच्या चौकळशी, पांचकळशी, वाडवळ, ह्या ज्ञाती वरील ६६ कुळांतूनच उत्पन्न झालेल्या आहेत. ह्या कुळांतच 'पाठारे प्रभू'चा अंतर्भाव आहे. कारण, ज्ञातीचें नांव 'पाठारे' असा

उल्लेख पूर्वार्धांत आहे. आपण क्षत्रिय म्हणून 'पाठारे' ह्याला 'क्षत्रिय' हें उपपद जोडून आपणांस 'पाठारे क्षत्रिय' असें नांव घेतलें. तसेंच 'पाठारे' ह्या शब्दाला 'प्रभू' हें उपपद जोडून कांहींनीं आपल्या ज्ञातीचें नांव 'पाठारे प्रभू' ठेवल्याचें दिसतें. आतां कांहीं लोक आपणांस 'पाठारे क्षत्रिय' म्हणवितात व दुसरे आपणांस 'पाठारे प्रभू' म्हणवितात. हा भिन्नभाव कां? असा प्रश्न मनापुढें उभा राहतो. त्याचा खुलासा असा, कीं कांहीं 'पाठारे' कुळांनीं वाडीचा धंदा पत्करल्यानें ते 'वाडवळ' झाले; त्याचप्रमाणें ज्यांनीं क्षत्रियत्वाचें धोरण नि वृत्ति हमखास चालू ठेवली, ते 'पाठारे क्षत्रिय' झाले; ज्यांनीं आपला धंदा लेखणीचा चालू ठेवला, ते 'पाठारे प्रभू' झाले. पांचकळशी, चौकळशी, वाडवळ व प्रभू अशा चार ज्ञातींत आज आपण विभागलों आहोंत. पांचकळशी व चौकळशी ह्यांनीं हें उमगून 'पाठारे क्षत्रिय' हेंच नांव मान्य केलें आहे. ह्या दोन्ही ज्ञातींतील पुढाऱ्यांनीं गेलीं ९–१० वर्षें एकत्रीकरणाचा मोठा प्रयत्न चालू ठेवला आहे.[1] 'पाठारे प्रभू' व 'वाडवळ' ह्यांनींहि आतां त्याच एकत्रीकरणांत मिसळावें व सर्व 'पाठारे ज्ञात' एक व्हावी, हें अगदीं युक्त दिसतें. ह्या सर्व एकीकरणानंतर ह्या चारहि ज्ञातींचें नांव 'पाठारे क्षत्रिय' असें चालवावें. 'प्रभु' लोक हे धुरंधर असे क्षत्रिय आहेत. तेव्हां त्यांच्याहि ज्ञातीच्या नांवांत 'पाठारे' हा ज्ञातिवाचक शब्द व 'क्षत्रिय' हा वर्णवाचक शब्द असणें रास्तच होईल.[2]

कोणतीहि बखर आपण उघडली, कीं तिच्या मजकुरांत आपणांस राजकारण दिसतें, पूर्वार्धहि ह्या प्रथेस अपवाद नाहीं. 'साष्टीची बखर' व तिचा हा पूर्वार्ध ह्यांत

1. "Those reformers who are in the habit of describing caste as the root of all evils in the Hindu Society, forget that the attempt to abolish caste, if successful, *would be attended with the most dangerous consequences*, unless some powerful religious influence, were brought to bear upon the people in its place."

—'*New India*', by H. J. S. Cotton.

२. "ह्या सूर्यवंशी व सोमवंशी कुळांपैकीं पैठणाकडेस तीन-चार घरें आहेत. मागें पांचपन्नास घरें होतीं. परंतु सुमारें ४०० वर्षांपूर्वीं गोदेस मोठा पूर येऊन अर्धें शहर बुडून गेलें. ५००–६०० वर्षांमागें तेथून बहुतेक लोक उत्तर कोंकणांत गेले, असें तिकडील लोक म्हणतात. ह्यांच्या उपनांवादिकांवरून असें दिसतें, कीं सर्व क्षत्रिय मूळ एकाच ज्ञातीचे असावेत. इकडील ह्यांचे वंशज हल्लीं आपणांस भिन्न समजून पाठारे क्षत्रिय आणि पत्तन प्रभू (पाठार प्रभू) असें म्हणवितात." उ. कों. मां. शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण ग्रंथ, नारायण विठ्ठल वैद्य पुरंदरे पुणतांबेकर-कृत पान २०. हा उतारा हेंच दर्शवितो, कीं बिंबाबरोबर आलेलीं सर्व सूर्यवंशी व सोमवंशी कुळें एकाच ज्ञातीचीं होतीं. अशाच तऱ्हेच्या मीं केलेल्या विधानास हा पुरावा पुष्टीच देत आहे. —(ग्रंथकर्ता.)

राजकीय उलाढाल्यांच्या कथा आहेत. 'साष्टीच्या बखरीं'तली हकिकत म्हणजे त्यावेळीं फिरंग्यांनीं केलेल्या अत्याचाराचा प्रतिकार होय. हें जेव्हां आपणांस दिसलें, कीं अनंत खटपटी करूनहि जनतेचें जीवित, धर्म हीं अगदीं धोक्यांत आहेत, तेव्हां अणजूरकर नाईकांनीं एक मोठी संघटना तयार केली. बावीस वर्षें ती संघटना त्यांनीं चालविली, व शेवटीं चिमाजी आप्पाच्या मदतीनें त्या प्रांतावरलें प्राणसंकट घालविलें. त्याचप्रमाणें उत्तरेस मुसलमानांचे हल्ले एकसारखे सुरू झाले, तेव्हां आपली ज्ञात व बंधु यांना वांचविण्याकरतां कनोजहून पराभव खात खात आलेल्या ह्या ६६ कुळांनीं कोंकणचा रस्ता धरला. त्यांच्या त्या प्रयाणाचा व पुढील उलाढाल्यांचा इतिहास ह्या पूर्वार्धांत आहे. म्हणजे ही बखर राजकारणाचा एक इतिहासच ठरते. अर्थात् ह्या राजकारणाच्या इतिहासांत सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, वगैरेसंबंधीं कांहीं सांपडतें कीं काय, तें पाहूं. ही जंत्री देतांना त्या ठिकाणीं काय काय घडलें तें समजून घेतां येईल.

शके १०८५ मध्यें बिंबानें महिकावतीचें राज्य काबीज केलें होतें. त्यावेळीं राज्यव्यवस्थेसाठीं त्यानें राज्याचे १४ महाल केले; व ते आपल्या सरदारांना वांटून दिले. त्याचप्रमाणें त्यानें निरनिराळ्या वृत्ती व बहुमानपदें आपल्या लोकांना दिलीं. सरकारभाग ठरवून हे महाल त्यांना वांटून दिले. सर्वांना आनंदित केलें.

बिंबाच्या आगमनानंतर त्यानें महिकावतीच्या राज्याची बनविलेली घडण वर दिलेलीच आहे. अशा तऱ्हेची घडण महाराष्ट्रांत तरी नवीनच आहे. बिंबानें केलेले आपल्या राज्याचे १४ महाल आपल्या आश्रितांना वांटून दिले. त्यांनीं आपापल्या महालांची व्यवस्था पाहून ठरलेला करभार सरकारांत भरावा. आपापल्या भागांतील न्यायमनसुबे वांद्याचे देशगौडी नाईक किंवा मालाडचे देसले ठाकूर यांच्या मदतीनें व संमतीनें करून घ्यावेत. दर महालकऱ्याला मदतनीस म्हणून चार अधिकारी व कारकून दिलेले होते. अशा तऱ्हेची गट-स्वतंत्रता महाराष्ट्रांत असल्याचा इतिहासाचा दाखला नाहीं. महाराष्ट्रांत कोठें कोठें जहागिऱ्या दिलेल्या दिसतात; राज्याचा कांहीं भाग मुखत्यारीनें चालविण्यास दिला जाई; पण सर्व राज्यच महाल–पद्धतीनें करण्याची रीत महाराष्ट्रांत नव्हती.

फिरंगी सत्ताधीश झाल्यावर व त्यांच्या छळानंतर ही पद्धत मोडली व रयतवारी पद्धत सुरू झाली.

आपल्याला महालांत सर्व व्यवस्था महालकरी करीत. त्यांत राजा हात घालीत नसे. भागड चुरीला मारण्याकरतां ज्यावेळीं प्रजेनें उठाव करून व सशस्त्र होऊन त्याचा पराभव केला व त्याला पुढें मारलें, तरी नागरशहानें आपल्या एवढ्या मोठ्या

सरदारास प्रजा व महालकरी मारीत असतांना त्यांना मुळींच हटकलें नाहीं; प्रतिकार केला नाहीं; किंवा राजानें ठपकाहि दिला नाहीं; उलट अशा बदफैली अंमलदारास मरणाची शिक्षा प्रजेनें दिल्याबद्दल तिचें अभिनंदनच केलें. ही महालकरी पद्धत उत्तर हिंदुस्थानांतून आलेली आहे. ज्यानें त्यानें आपापल्या महालांत जरी स्वतंत्रपणें राज्य करावयाचें, तरी संकटाचे वेळीं राजानें 'हंकारा' ऊर्फ 'पुकारा' करतांच सर्व महालकरी सैन्य घेऊन धांवत. उत्तर हिंदुस्थानांतून आलेल्या बिंबानें ही तिकडली पद्धत येथें आपल्या राजवटींत अमलांत आणली हें वाचकाला पटलें, म्हणजे येथें आलेला बिंब हा कनोज विद्यापूर पाटणहून आलेला होता हें निश्चित ठरतें.

वैतरणीजवळच्या भयवार गांवीं सिंधु मध्यभागीं बिंबानें सोमयाग केला. मग भार्गवचे महानिकते यास आश्वासन दिलें, कीं तुम्ही नारळीं, फोपळीं, केळीं, ऊंस, वगैरे संपूर्ण करावें. म्हणजे तुम्हांपासून दहावा भाग घेऊं. बिंबानें हा प्रयोग वसती राहण्याकरतां व लोकांना शेतीवाडी याची आवड उत्पन्न व्हावी, म्हणून केला.

राज्य स्थिर झाल्यावर चतुर व प्रजाप्रेमी राजे अशाच योजना करीत आलेले आहेत. राज्याच्या बळकटीकरितां त्यानें निरनिराळे किल्ले व गड बांधले. त्या प्रत्येक ठिकाणीं एक एक इसम ठेवला. उदाहरणार्थ :—निळकंठराव कनोजे यास काळदुर्गास ठेविलें. मग राजधानीस आले. माणकाईसे राणीस मुलगा झाला. नांव महिनंदनु ठेविलें. मग बिंबराजा वारला. महिनंदनु राज्यावर बसला.

बिंबानें शेतीलागवडीचा प्रयत्न केला, हें वर दिलेंच आहे. तसेंच महिनंदनु यानें आग्मार बांधण्याची योजना ठरविली. त्याचें महिकावतीचें राज्य म्हणजे सर्व समुद्र किनारा. केव्हां चांचे येतील, याचा नेम नव्हता, म्हणून त्यानें तारवें बांधण्याचें ठरविलें. जसगदेव ह्या चेऊलच्या राजानें त्याजकडे दोन कारागीर पाठविले. परंतु त्यांना आणखी ८–१० माणसें पाहिजे होतीं. तेव्हां ह्या ६६ कुळांपैकींच ८ माणसें निवडून काढलीं; पण त्यांनीं सांगितलें, कीं आम्ही पांचाळाचें काम केलें, तर आम्हांला ज्ञातींत कोणीहि घेणार नाहीं. त्या वेळीं राजानें त्यांना आश्वासन दिलें, कीं राज्याचे संरक्षणाकरतां शिल्पकामाची जरूरी आहे. तुम्हास कोणीहि जातीबाहेर टाकणार नाहीं, असें आश्वासन देऊन सर्व सरदार कुळांना त्याप्रमाणें ताकीद दिली. तेव्हां ते कामास लागले. अशा रीतीनें एका धंद्याची उठावणी व बळकटी राजा महिनंदनु यानें केली. महिनंदनूच्या मृत्यूनंतर एकदेव राणा गादीवर आला. कनोजचे हे बिंबादि राजे व त्यांचे अंकुशदेव राणे किंवा भास्करशिंग राणे हे एकाच जातीचे असले पाहिजेत, हें दोन हकिकतीवरून सिद्ध होत आहे. बिंबाची राणी माणकाईसे ही भास्करशिंग

हेदुराव याची बहीण होय. आतां एकदेव राणे ह्याला कृपाळदेश नारगौडी याची कन्या सगुणाबाई ही दिली होती. अर्थात् हीं ६६ कुळें किंवा त्यांतलीं कांहीं कुळें 'पाठारे' ज्ञातीचीं आहेत, असें निश्चित होत आहे. कारण, मथळ्यांत लिहिलें आहे, कीं 'श्रीसवितावंशभूपति पाठार ज्ञातीसंबंधीं मूळ पुरुष रामराजा' अर्थात् हा रामराजा संवत् ५७४ मध्यें होता. त्या अर्थी हें 'पाठारे' ज्ञात असें राणे लोकांचें मूळचें म्हणजे संवत् ५७४ च्या आधीचें जातीचें नांव आहे. राणे तितके पाठारे आहेत. अर्थात् ६६ कुळांपैकीं ज्यांच्या सोयरिका आपापसांत झाल्या, ते सर्व 'पाठारे' ज्ञातीचे लोक होते. ह्या एकदेव राणेचे काळीं चांचे लोक आले होते. अर्थात् महिनंदनु यानें आरमार (तारवांचा धंदा) सुरूं केला होता, तो योग्यच होता. ह्या चांच्यांना कृपाळदेशनें हाकललें; पण कृपाळदेश हा पडला. महाराजानें महाकाळीस काम लाविलें. अनंतराव देसाई यानें जोगेश्वरीचें देवळाचें काम सुरू केलें, व महादेवदेश यानें महाडी (मढास) हरबा देवीचें देवळास काम लाविलें. एकदेवानंतर रामदेव गादीवर बसला. रामदेवानंतर जयदेव राज्यावर बसला. ठाणें येथें राज्यावर जयदेव बसला; त्यानें ठाण्यास तळें बांधण्यास व शिवालय बांधण्यास आरंभ केला. त्याच्यानंतर सोमेश्वर राज्यावर बसला. त्याची कमावीस राणी होती, व केशवदेव राणा पांच वर्षांचा होता. राणीचा अभिलाष प्रधानानें धरला. देश, देशाई, राऊत ह्यांनीं प्रधानाचें घर वेढलें. युद्धांत हा जाननाईक प्रधान मारला गेला. केशवदेव राज्यावर बसला. केशवदेवाच्या भाटानें 'पितामह' असें बिरुद धारेच्या भोजाजवळ गायिलें. भोजानें सैन्य कळव्यास आणलें. कळव्यास युद्ध झालें. भोज हरला. म्हशीया दुर्गाचा रामराव हाहि हरला. सहा महिन्यांनंतर भोज मेला. नंतर भोजानें पाठविलेले आंबे देवगिरीचे जसगदेवानें धरून नेले. त्यामुळें केशवदेवानें म्हशास वेढा दिला व तो गड घेतला. केशवदेवानें सर्व लहान राजांना हरविल्यानंतर सिंधुतीरास वैतरणा संगमावर सभवार गांवीं लघुयाग केला. सर्व राजे आले. याग समाप्त झाला. नंतर केशवदेव मेला. राज्यास वारस नाहीं. मग सर्वांनीं प्रधान जनार्दन ह्यास राज्यावर बसविलें. त्याचा मोठा मुलगा नागरशा हा माहिमास गादीवर बसला. नागरशास त्रिपुरकर पुत्र झाला. केशवदेव हा बडेलीचा राणा यानें चेऊलचें राज्य चेऊलास नागरशास दिलें, व मुलगीहि दिली. नागरशाचे दासीपुत्र त्याचेजवळ चेंभूर,

१. ठाणें येथील एक जुनें साप्ताहिक 'अरुणोदय' ह्याचे संपादक कै. फडके ह्यांनीं इकडल्या तिकडल्या हकिकती देऊन देवगिरीच्या रामचंद्राचा पुत्र भीम होता. १३ व्या शतकांत त्यानें कोंकणप्रांत घेतला. त्यास एकदां परभू, एकदां क्षत्रिय, एकदां शूद्र म्हणून म्हटलें आहे. त्यास भीमाचा भाऊ म्हणून हरपाळदेवाचें नांव दिलें. पण हरपाळदेव हा रामदेवराजाचा

मांडालें मागत होते. ते नागरशानें न दिल्यामुळें देवगिरीहून रामदेवरायाची मदत आणली. माहोली येथें युद्ध झालें. रामदेवाचा प्रधान हेमाद्रिपंत ह्याचा पराभव झाला.

रामदेवानें अहिनलवाड्याहून मदत मागितली. अहिनलवाड्याच्या सैन्याचा व रामदेवाच्या सैन्याचा पराभव नागशाचे सैन्यानें केला. ह्या अवधींत दिल्लीला अल्लाउद्दिन पादशहा झाला. त्यानें अहिनलवाडा व सोरटी सोमनाथ हीं राज्यें घेतलीं. त्यानें दोन वजीर कोंकणांत पाठविले. कलवणी हें ठाणें घेतलें. प्रतापपुरीस युद्ध झालें. हरनाईकदेश पडला. माहिम घेतलें. त्या युद्धांत त्रिपुरकर पडला. नागरसेन वालकेश्वरीं होता. तेव्हां भायखळा येथें युद्ध झालें. नागरशा पडला. संवत् १३५२ शके १२१६ जयनाम संवत्सर होतें. माघ शु. प्रतिपदा होती. निकामलिक प्रतापपुरीं बसला. महाराष्ट्र भंगलें. तुर्काण झालें. गोराईसे राणी सती गेली. मलिक अल्लाउद्दीन मोंगल बादशहा झाला. त्याची कारकीर्द असतांना **नामदेव शिंपी** ह्यास गोमांस दिलें. पण त्याचीं फुलें झालीं ! ह्या वेळीं निकामलीकानें देशलिकी भागडचुरीस दिली. सोमठाकूर व पोईसरकर पालवण ह्यांना निकानें मारलें. मग सर्वांनीं भागडचुरी पाचवा देवीस गेला असतांना मारलें, तें एका कोळ्यानें मारलें. त्याला त्याबद्दल जातींत घेतलें. सर्वजण स्वतंत्र झाले. इतक्यांत अवुनाखवास शके १३२५ त सुभानु संवत्सरीं भाद्रपद शु. ॥ १० स राज्यावर बसविलें. अवुनाखवाचा वंशज पणी सावंत त्याचा नरसिंगराव वारस त्याचा वारस सुलतानराव व त्याचा वारस नरसिंगराव ऊर्फ हंबीरराव शके १२१६ त निकानें नागरशास मारल्यावर राज्य त्याचे हातीं आलें. पण राज्यावर बरेच दिवस कोणी नव्हता. कोंडीयेन व लाहुरशहास राज्य दिलें होतें, असा मजकूर १४५ पानावर आहे. ह्या अराजक स्थितींतून १३२५ शकांत अवुनाखवास राज्य मिळालें. नंतर वर दिल्याप्रमाणें त्याच बखरींत अवुनाखवाचे ६ जण वंशज गादीवर आले असें आहे. शेवटला नरसिंगराव हा गादीवर असतांना मलीक थुंजारनें घाटावरून सैन्य आणून हिजरी सन ८३१ किंवा थुंजारनें राज्य घेतलें तेव्हां नरसिंगरावानें गुजराथेंतून सैन्य आणून शके १४११ त थुंजार यास हाकललें. भोंगळान मोडलें. मग गुजराथेच्या

जावई होता व त्यानें रामदेवराजाचें राज्यहि घेतलें होतें. तेव्हां सर्व वावड्या (थापा) आपण सोडून देऊं या. यांत म्हटलें आहे, कीं चौलचा राजा नागरशा यानें आपला मेहुणा प्रतापशा याचा परावभव करून त्याचें राज्य घेतलें. पुढें (मुसलमानांनीं नागरशाचा पराभव केला) पराभव पावण्याची नागरशाची पाळी आली, तेव्हां मुसलमानांनीं त्याचा पराभव केला." ह्या उल्लेखा वरून मागें वर्णन केलेल्या नागरशाच्या तीन अवस्थांपैकीं एकीस येथें पाठिंबा आहे. कांहीं असलें, तरी ह्यांत एकच निश्चितपणें सांगितलें आहे, कीं नागरशाचा पराभव मुसलमानांनीं केलेला आहे,—ठाणें, 'अरुणोदय', ता. १२ ऑगस्ट १८८३.

सुल्तानाची राजवट चालू झाली. त्याच्या कारकिर्दीत हरदेशला व कुंड पुरो यांचें वितुष्ट आलें. हरदेशल्यानें आपली देशलीक गणपत यास दिली. त्याबद्दल कुंड पुरो यानें शिगजमलिकाकडे फिर्याद दिली. हरदेशल्याचें वृद्धपण झालें म्हणून त्यानें गणपत देशलास देशलिकी दिली, ही गोष्ट मलिकनें मान्य केली. कुंड पुरोची फिर्याद काढून टाकली.

नंतर अमलखाजखान परवान याचे अमलांत मलबारचे चांचे आले त्यावेळीं गणपत देसाई व हरनाईक यांजवर अमलखानानें गुजराथेच्या पादशहाकडे तक्रार केली. हे दोघेजण आपली जमीन विकतात. पादशहानें स्वतः येऊन चौकशी केली. त्यावेळीं गणपत देसाई व हरनाईक यांनीं सांगितलें, कीं आम्ही जमीन विकीत नाहीं. शेतें लावण्यास लोकांना देतों, व दस्तक करून घेतों. उजाड जमिनीचा कर देतां येणार नाहीं. म्हणून लोकांकडून जमीन लावतों. त्यानंतर पादशहानें त्यांचें तें म्हणणें मान्य केलें. त्या परवान्यावर आमचाहि शिक्का असावा, असें पादशहानें त्यांना सांगितलें. त्याच मजलसीमधें विडाप्रकरण निघालें. आगाशीच्या नाचण साव्यानें प्रथम विड्यास हात घातला. विवाद सुरू झाला. दप्तरें पाहिलीं. मग माहिमकरास पहिला विडा दिला व दुसरा आगाशीच्या साव्यास दिला. बहादुरशहा वसईस गेले. रयत आपापले गांवीं गेली.

पुढें वेसाव्याचे गोपाळ नाईक व हरनाईक ह्यांनीं फिर्याद दिली, कीं हरनाईक देश हे चवदा महालांचे देश नारगौडीचें वतन एकटे खातात; आम्हांस कांहीं देत नाहींत. पादशहानें पंचायत जमविली. वेसावेंकर नाईकास व वांद्रेकर नाईकास आगाशीचे वर्तकानीं सांगितलें, कीं आपण आपल्या उपाध्यायाकडून आपले कुळाचे पुरुषाचा उच्चार करावा. त्याप्रमाणें करतांना वेसावेंकर नाईकाच्या पूर्वजाचा कोणताच संबंध वांद्रेकराचे पूर्वजाबरोबर जुळेना, तेव्हां वेसावकराची फिर्याद काढून टाकली. ह्या पंचायतीचें वैशिष्ट्य हें आहे, कीं लोकशाहीच्या पद्धतीनें ह्या पंचायतीचें काम चालत असे. राजा किंवा पातशहा हा जमलेल्या जमातींतून कांहीं इसम पंचायतदार म्हणून निवडतो. मग दोन्ही पक्षांची त्यांना मान्यता घेऊन कागदावर लवादाचें मान्यतेचें लिहून घेतलें जात असे. मग साक्षीदार घेतले जात. साक्षीप्रमाणें पंचायतदार निकाल देत. तो निकाल राजा किंवा पातशहा जाहीर करी. अशा रीतीनें सुलता-नानें आणखी सात वर्षे वसईस राहून राज्य चालविलें. त्यावेळीं वास्को-दि-गामा यानें आरमार आणलें व बहादूरशहाजवळ वखार घालण्यास जागा मागितली. त्याला चेहुलचे दांड्यावर जागा देण्यांत आली. मग लहान पडावांतून मरोळ, वसई, ठाणें येथें व्यापार सुरू झाला. तीन वर्षे अशा तऱ्हेनें गेलीं. त्यानंतर फिरंग्यानें पुन्हां आर-मार आणलें. पोर्तुगालचा पातशहा तारवांत आला आहे, म्हणून बहादूरशहास त्यांनीं

सांगितलें. फिरंगी पादशहा हा जमिनीला पाय लावीत नाहीं, म्हणून बहादूरशहानें फिरंगी पादशहाची भेट तारवावर घेण्याचें ठरविलें. तारवावर जातांच दोन लहान तारवें बुडविलीं व दोन्ही बादशहाहि बुडविले. नंतर फिरंग्यांनीं सैन्य जमिनीवर उतरून बहादूरशहाच्या सैन्याचा पराभव केला व राज्य घेतलें. शके १४३४ (इ. स. १५१२) त राज्य बदललें.

फिरंगी राज्य चालू झालें. सर्व रयत मंडपेश्वराजवळ जमविली. मनवेललोप ह्यानें लोकांस गोळा केलें. विजरेल यानें लोकांस सांगितलें, कीं तुमची जमीन तुम्ही करा. आम्ही गनीम आला तर त्याला हाकलूं. तुमची अमिरी तुम्ही करा. लोकांनीं तें मान्य केलें नाहीं. त्यांनीं सांगितलें, कीं आमची जमीन आम्ही लावूं. देवानें आपणास दिलेलें राज्य आपण चालवावें. आमच्या मायभुईवर आम्ही साहेबी न करूं. वास्को–दि–गामा राजी झाला. मग पंचायत खलास झाली. मग दांडे, चेऊल येथें कोट बांधण्यास सुरवात केली. दवणेस कोटाचें काम चाललें असतांना मीर महंमद मोंगल आला. युद्धांत मीर महंमद हा पळाला. हे कोट बांधल्यानंतर फिरंग्यानें लोक जमविले. त्यांस सांगितलें, कीं आपण नोकर व्हावें. लोकांनीं नाकारलें. मग फिरंग्यांनीं १४०० आरमार आणलें. कोंडो रामजी प्रभू हा ठाणें येथें फितूर झाला. देसाई व देशास त्रास दिला. त्याचें भांडण झालें. फिरंग्यानें पहिलें वांदरेकराचें घर वेढलें. तेथें चार हजार माणसें बाटविलीं. बाळ नाईक, भिव नाईक, पोस नाईक हे १७०० माणसें हत्यारें धरोन निघाले. मग मालाड, मरोळ धरलें. लोक बाटविले. मग लोक चार महिने डोंगरांत राहिले. ते कोळी, आग्री, कुणबी होऊन आले. यांच्यावर फिरंग्यांनीं सत्ता केली. त्यामुळें लोक जानवीं तोडून कुणबी होऊन आले. फिरंग्यांनीं अशा तऱ्हेची वहिवाट सुरू केली.

* * *

राजवाडे, पाध्ये यांच्या भ्रामक दृष्टीमुळें विश्वसनीय आधारांचा उडालेला गोंधळ !

बखरींत लिहिलें आहे, कीं रामचंद्रदेवानें नागरशावर दोन वेळां सैन्य पाठविलें. पहिल्या वेळीं हेमाद्रि पाठविला व दुसऱ्या वेळीं पंडितराव हा पाठविला; इतकेंच नव्हे, तर दुसऱ्या प्रसंगीं रामचंद्रदेवानें अनहिलवाड्याहून पत्रानें आळंदपूरच्या आनंद राण्याला मदतीस बोलाविलें. पहिल्या प्रसंगीं त्रिपुरकरानें हेमाद्रीचा पराभव केला; पण लगेच ह्या दुसऱ्या प्रसंगीं पंडितराव व प्रतापशहा ह्यांनीं आनंद राणा ह्याचा पराभव केला. आनंदराव युद्धांत पडला. अशा ह्या हकिकतीचा इन्कार कै. पाध्ये करतात,

कीं ही कथा म्हणजे ती बखरींतली कथा म्हणून खोटी आहे (?) हें त्यांचें म्हणणें कै. राजवाडे यांनीं पळशे ब्राह्मण हे मगध देशांतले राहणारे, असें म्हटल्याबरोबर कै. पाध्ये यांना अनावर राग आला, व त्या रागाच्या तंद्रींत त्यांनीं खोडसाळ व बिनबुडाचें विधान ठोकून दिलें आहे, कीं कै. राजवाड्यांच्या त्या विधानामुळें ही बखर अविश्वसनीय वगैरे तऱ्हेनें खोटी आहे! वडाची साल पिंपळाला लावण्याच्या खोडीमुळें कै. पाध्येंना यजुर्वेदीय सव्यापसव्य करावें लागलें आहे!

रामचंद्र जाधवाचे हेमाद्रि, प्रतापशहा, पंडितराव व आळंदपुरचा आनंदराव यांनीं अशा दोन्ही वेळच्या युद्धांत देवगिरीच्या रामचंद्रदेवाच्या सेनापतींची त्रिपुरकरांनीं दोन्ही युद्धांत रेवडी उडविली असल्यानें त्याबाबत कै. पाध्ये हे आपल्या रागाच्या भरांत म्हणतात, कीं अशी गोष्ट घडलेली नाहीं; ही हकिकत बनावट आहे. हें त्यांनीं गृहीत धरून निष्कर्ष काढला, कीं बखरच मुळीं खोटी आहे!

बिंबाख्यानांतल्या 'बखरींतल्या कथांचा संदर्भ संशोधनपूर्वक लावल्यानंतर शके १२१६ त कोणता नि कुठलाहि बिंब झालेलाच नाहीं, व तो महिकावतीच्या गादीवरहि बसलेला नाहीं, हें सिद्ध झालें, म्हणजे यादवांचा बिंब महिकावतीस आला होता असें खोटेंच मनाशीं ठरवून त्यामुळें ५०–६० वर्षांत उभारलेला पत्त्यांचा बंगला कोसळला आहे. बिंबाख्यानांतल्या पान १०७ वरील हकिकतींत एक लहानशी जी चूक झालेली आहे, ती म्हणजे त्या ठिकाणीं 'संवत् १२१०' असें लिहावयाच्या ऐवजीं 'शक १२१०' असें लिहिलें गेल्यामुळें कै. राजवाडे यांना पहिला चांपानेरच्या बिंबनामक कल्पिलेल्या बिंब वंशांतला मानावा लागला व दुसरा बिंब जाधवांचा बिंब शके १२१६ तला म्हणून मानावा लागला. ह्या वेळीं रामचंद्र देवाची स्थिति अस्थिर व बेभरंवशाची होती. त्याचा मुलगा शंकरदेव बाहेर देशीं गेला होता व बल्लाळहि जवळ नव्हता. तेव्हां या वेळीं दुबळ्या झालेल्या रामचंद्र देवावर शके १२१६ त अल्लाउद्दिनाचा हल्ला आल्यामुळें दुबळा व पराजित अशा रामचंद्राला बिंब पाठवून कोंकण घेणें शक्यच नव्हतें. त्याच शतकांत निकामलिकानें नागरशा याचेपासून माहिम घेतलें होतें. अशा स्थितींतच त्या शकाचे आधीं रामदेवाचा पराभव दोनदां पराक्रमी त्रिपुरकरानें केला, हेंच खरें ठरतें.

'हेमाद्री'च्या पान २५९ पासून तों पान २६१ पर्यंतच्या मजकुरांत जे तारे कै. पाध्ये यांनीं तोडले आहेत, ते सर्व खोटे आहेत. बखरीच्या एकजात खरेपणाबद्दल मी अंतःप्रामाण्याच्या दृष्टीनें वर सिद्धच केलेलें आहे. आतां तरी जाधवांच्या बिंबाचा आग्रह धरणें हें हास्यास्पद ठरेल! बिंब हा शके १०८५ त कनोजहून आला. त्यानंतर केव्हांहि आणि कोणताहि बिंब कोंकणांत मुळींच आलेला नाहीं.

नागरशाचा पराभव करून निकामलिकानें शके १२१६ त कोंकणचें राज्य घेतलें असें पूर्वार्धांत सांगितलें आहे. त्या वेळीं त्रिपुरकर व नागरशा हे दोघे लढाईंत मारले गेले. नागरशानें घणदेवीहून येऊन जनार्दन प्रधानाचें राज्य घेतलें, असें बिंबाख्यान व महिकावतीच्या बखरींत सांगितलें आहे. नागरशा हा घणदेवीचा वैश्य राजा नसून जनार्दन प्रधानाचा तो मोठा मुलगा होता, व त्यामुळें पूर्वार्धांत म्हटलें आहे, कीं प्रधान जनार्दनाच्या मृत्यूनंतर तो गादीवर आला. लढाईचा प्रसंग उत्पन्न होऊं शकला नाहीं पण त्याच वेळीं चेऊलच्या केशवदेवानें नागरशास आपलें राज्य दिलें, इतकेंच नव्हे, तर केशवानें त्रिपुरकरास आपली मुलगी व काशीयात्रेस जातांना आपला बुद्धिसेन हा प्रधानहि दिला. पण बिंबाख्यानांत व महिकावतीच्या बखरींत 'संवत्'च्या ठिकाणीं 'शक' चुकीनें घातल्यानें जी हकिकत यापूर्वीं दिली आहे, तींत हा नागरशा त्या चेऊलच्या निपुत्रिक केशवदेव राजाचा मुलगा बनविला आहे. प्रधान व राजाची राणी हीं तशींच ठेवलेलीं आहेत. **नागरशा हा घणदेवीहून आलेला नव्हता. तो जनार्दनचा मुलगा होता, असें मान्य केल्यामुळें लढाईचा प्रसंगच उद्भवत नाहीं.** पण नागरशाबद्दलची ही तिसरी हकिकत उपलब्ध झाल्यामुळें कोणता नागरशा पत्करावा, हें एक कोडेंच ठरतें. ह्या नव्या नागरशानें यादवांच्या बिंबाचा मुलगा प्रतापशहा ह्यास पत्र लिहून त्याचेकडे जे **एडाखमेढाळगड** किल्याची मागणी केली व तिचा इन्कार प्रतापशहानें केला. प्रतापशहानें देवगिरीच्या रामचंद्ररावाकडून सैन्य मागविलें. त्या सैन्याचे **सरदारजी जीवन नाईक सांबखेडकर** व राजगुरु हेमाद्रि या उभयतांचा पराभव त्रिपूरकरानें केला. पुन्हां प्रतापशहानें सैन्य जमविलें. गुजराथच्या आळंदपूरच्या आनंददेवाला रामचंद्रानें बोलाविलें व तेथून पंडितरावास पाठविलें. अशा ह्या सर्वांचा पराभव त्रिपूरकरानें केला. पूर्वार्धाच्या हकीकतींत व या हकीकतींत फरक आहे. नागरशा हा केशवाचा मुलगा नसून तो जनार्दन प्रधानाचा मुलगा महिकावतीचा राजा होता. बिंब हा कोंकणांत त्यावेळीं आला नसल्यामुळें प्रतापचें राज्य महिकावतीस नव्हतें; पण ह्या दोन्ही लढाया मात्र झाल्या व त्यांत त्रिपूरकरच विजयी झाला, ही हकिकत अशी आहे. नागरशहाचे मेहुणे व त्याचा दासीपुत्र यांनीं नागरशाजवळ ठाणें, मरोळ, मालाड ह्या ठिकाणांची मागणी केली, ती नागरशानें झिट्कारल्यामुळें ते तिघेजण देवगिरीस गेले व त्यांनीं रामदेजाजवळ कुमक मागितली. जीवन नाईक सांबखेडकर व हेमाद्रि यांना रामचंद्रदेवानें पाठविलें; पण त्यांचा पराभव त्रिपूरकरानें केला. तेव्हां रामचंद्ररावानें आळंदापुराहून मदत मागविली. त्यावेळीं त्यानें अहिनलवाडयास लिहिलें, कीं शरण आलेल्या **नागोजी, बाळसेन व विकाजी** ह्या तिघांच्याबद्दलचा सूड उगविण्याकरतां आपण लढाई देत आहोंत; पण ह्या वेळींहि त्रिपुरकरच विजयी झाला. ह्या हकिकती अगदीं

विभिन्न आहेत. सार्वभौमत्वाचा टेंभा मिरविणाऱ्या रामचंद्र जाधवाचा पराभव दोनदां
एका मांडलिक राजानें केला, ह्यावरून हें सिद्ध होतें, कीं रामचंद्ररावाचें राज्य अगदीं
मोडकळीस आलें होतें. चुकीच्या 'शक' ह्या शब्दानें हा इतका गोंधळ केला, कीं नागर-
शाचें राज्य सुलतानानें घेतलें असतांना तें शके १२१६ त व पुढें कांहीं वर्षें चालूच
होतें; असें कांहीं न घडलेलें घ्यावें, असें मानावें लागत आहे. निकामलिकाचे राज्यावर
कांहीं काळ यादवांना बसवावें लागतें त्यामुळें पुढची सर्वच घडी बिघडते. तेव्हां पूर्वार्धांतलाच
नागरशा हा सत्य मानून येथेंच महिकावतीच्या राज्याचा शेवट शके १२१६ तच
झाला, असें मानावें लागतें; कारण शके १२५६ पर्यंत कोंडीअननें व लाहूरशानें राज्य
केलें आहे. त्यानंतर भोगळे म्हणजे आऊनाखवाचें राज्य सुरू झालेलें आहे; व त्याचा
शेवट सुल्तान अहंमदशहानें शके १३४२ मध्यें केला. तरी नागरशाच्या ह्या हकिकती-
पैकीं घणदेवीचा वैश्य राजा, ही हकिकत खरी नाहीं. तसेंच नागरशा हा चेऊलचा
राजा केशवदेव याचाहि मुलगा नाहीं. पूर्वार्धांत म्हटल्याप्रमाणें तो जनार्दन प्रधानाचा
मुलगा होता, असें म्हटलेलेंच खरें मानावें लागतें; तर रामदेवरावाबरोबरच्या दोन
लढाया, निकामालिकाची त्याच वेळची कोंकणांतली चढाई, महिकावतीच्या राज्याची
इतिश्री, इत्यादि सर्व हकिकतींची सुसंगति लागत आहे. वर दिलेल्या तिसऱ्या पर्यां-
याची भूमिका अशी दाखविण्यांत येते, कीं नागरशानें एक गट मागितल्यामुळें प्रताप-
शहानें रामचंद्राकडून मागितली, पण दाखविण्यांत आलेली ही सबब खोटी असून,
रामचंद्ररावाला नागोजी, बाळसेन, विकाजी यांच्याबद्दलचा सूड नागशावर उगवावयाचा
होता, हें आंतलें बिंग रामदेवाचेकडूनच बाहेर पडलें. तो अहिनलवाड्यास पाठविलेल्या
आपल्या निरोपांत म्हणतो, कीं वरील तिघा जणांच्याबद्दलचा सूड ते शरण आले आहेत
म्हणून उगविण्याकरतां मी पुनः सैन्य पाठवितो व आळंदापुराहून आपण यावें. सूड
उगविण्याचें हें कारस्थान बाहेर पडल्यामुळें पहिलें सैन्य जीवन नाईकाबरोबर पाठवितांना
केलेला कांगावा असा, कीं आम्ही हें सर्व प्रतापशहास मदत करण्याकरतां करीत
आहोंत, हा खोटा ठरतो; म्हणजे हा तिसरा पर्याय अगदीं खोटा व काल्पनिक ठरतो.
एवंच नागरशा हा जनार्दनचा मुलगा होता व त्याजवर रामचंद्राला सूड घ्यावयाचा
होता; म्हणजे हा बिंब व हा त्याचा मुलगा प्रताप हें सर्व थोतांड ठरतें.

* * *

अंतःप्रामाण्याचें माझें हें संशोधन मी येथें थोडक्यांत पुरें करीत आहें. माझ्या ह्या
संशोधनानें साष्टीच्या बखरीचा पूर्वार्ध अगदीं विश्वसनीय व खरा ठरतो. आतांच्या
इतिहाससंशोधकांची त्यांच्या मनांत खोल मूळें धरलेली एक समजूत अशी आहे, कीं
बखरी ह्या भाकडकथा आहेत; त्यांत एकसूत्रता नसते; त्यांना इतिहासाचें स्थान नसतें;

ज्याला जें दिसलें, तें त्यानें लिहून एकत्र केलेला तो एक गलांठा आहे. अर्थात् ऐतिहासिक सिद्धांत कायम करतांना त्यांचा आधार किंवा पुरावा म्हणून घेत नाहींत. ह्याच समजुतीनें कै. पाध्ये यांनीं महिकावतीची बखर व बिंबाख्यान ह्या ग्रंथांना खोटें मानून एकाच रांगेनें त्या ग्रंथांना इतिहासाच्या प्रांगणांतून दूर फेकून दिलें. माझें म्हणणें हें आहे, कीं बखरी ह्या इतिहाससंशोधनाच्या प्रसंगीं पहिल्या प्रतीचा पुरावा म्हणून ठरतात. पण कधीं कधीं त्यांचें संशोधन करून, छाननी करून पाहिल्यानंतर मगच इतिहासाचा धागा अगदीं स्पष्ट दिसतो. डोंगर दुरून पाहिला, म्हणजे तो फार साजिरा गोजिरा असा दिसत असतो; पण त्याच्याजवळ जसजसें जावें, तसें त्याचें खरें स्वरूप दिसूं लागतें. हाच न्याय बखरींच्या बाबतींत लागूं होतो. कै. पाध्येसारख्या इतिहास-संशोधकांना आणखी एक विलक्षण खोड जडलेली आहे. शिलापट, ताम्रपट, तवारिखा, वगैरे साधनें म्हणजे मोठें ब्रह्मांड वाटतें. एकमेकांच्या अगदीं विरुद्ध असे हे पट असले, अगदीं त्रोटक हकिकतीनें ते भरलेले असले, तरी हे संशोधक त्यांचा एक मोठाच बाऊ करून कांहीं तरी हकिकती व सिद्धांत त्यांत चांचपडूं लागतात.

एकजण त्याच पटांतून एक अर्थ व एक हकिकत काढतो, तर लागलीच दुसरा पुढें सरसावून म्हणतो, कीं त्या पहिल्या संशोधकाला त्या लेखांचा अर्थ उमगला नाहीं, असें म्हणून त्याच पटांतून अगदीं विरोधी असा अर्थ तो काढीत असतो. हे काढलेले विरोधी विचार एकमेकांवर लादीत असतात, किंवा हताश होऊन स्वस्थ बसतात. पटांत सुसंगती कांहीं नसली, तरी मला ठांसून हेंच सांगावयाचें आहे, कीं बखरी हाच **पहिल्या प्रतीचा व अस्सल पुरावा आहे**. बखरींत कांहीं कथा किंवा हकिकत सारखीच दिलेली असली, तरी तिचा आरंभ व शेवट त्यांत असतोच. लिहिण्यांत विचारांचा सखोलपणा व ताळेबंदपणा नसला, म्हणजे त्यांत बाहेरचेंच कांहीं शिरलेलें असलें पाहिजे, हें हमखास समजावें. पण प्रामाणिक नि सत्य संशोधनानें तें आपणास पहावें लागतें. पण इतकीच एक गोष्ट मान्य करावी लागते, कीं बखरींतला इतिहास एकसंघ असा असतो. हाच बखरींचा विशिष्ट फायदा; पण तो केव्हां ? त्यांचें संपूर्णपणें संशोधन करून पाहील त्याला. 'साष्टीची बखर' (उत्तरार्ध) संशोधून मी ती सन १९३५ सालीं छापली आहे. कोणाहि संशोधकाला किंवा टीकाकाराला तिच्यांत विसंगति दिसून आली नाहीं. आज तिचाच पूर्वार्ध मी संशोधिला आहे. माझी खात्री झाली आहे कीं, बखरी ह्या **स्वयंपूर्ण अशा सत्यकथा आहेत**; हें मी अंतःप्रामाण्यानें ठरविलें आहे. माझ्या सिद्धान्तास मी बाहेरचा पुरावाहि जोडलेला आहे. अशा रीतीनें सर्व बखरी आपण संशोधल्यानंतर विश्वसनीय असा ठणठणीत इतिहास आपणाला उजेडांत आणतां येतो. अंतर्मन करून शोधण्याच्या पद्धतीमुळें मला बिंब हा ह्या बखरींतच सांपडला व माझ्या

मतीप्रमाणें व माहितीप्रमाणें मी वाचकांपुढें त्याला आज ठेवीत आहें. सांगावयाचा सुद्दा इतकाच, कीं

'तुझें आहे तुजपाशीं। परि तूं जागा चुकलासी।'

* * * *

आतांपर्यंत जें संशोधन मी केलें आहे, तें राजकीय बाजूचें आहे. तेवढ्यानेंच संशोधन हें पुरें होऊं शकत नाहीं. आणखी कांहीं भाग संशोधणें अत्यंत आवश्यक आहे.

आतां इतर बाबींचा विचार :—विचार करून हें यथामति मी केलेलें संपूर्ण संशोधन सादर करीत आहें.

ज्ञातीची, समाजाची वा राष्ट्राची संपूर्ण, सर्वांगीण व सविस्तर माहिती मिळविण्याची इच्छा व ईर्ष्या धरणाऱ्या माणसानें निव्वळ राजकीय संशोधनावरच थांबून चालणार नाहीं. कारण, राजकीय संशोधनांत ज्ञातीचें नांव, मूळ ठिकाण, इकडल्या वास्तव्याचा प्रदेश, येण्याचा काल व मार्ग आपण निश्चित करूं शकलों. ज्ञातीच्या इतिहासाच्या सर्व काल–खंडांत जीं राजकीय स्थित्यंतरें झालीं, निरनिराळे राजे आले व गेले, राज्यक्रान्त्या झाल्या, त्यांचा साद्यंत असा उहापोह आपण या ग्रंथांत केलेलाच आहे. ह्या क्रान्त्या, हीं स्थित्यंतरें, ह्यांनीं ज्ञातीच्या एकजिनसी जीवनाच्या ओघावर परिणाम होऊन इतर स्थित्यंतरेंहि घडून आलीं आहेत. हा बदल व फरक आपण लक्षांत घेऊन पुढें पावलें टाकावयास हवींत. ज्ञातीस, राष्ट्रास, व्यक्तीस राजकीय बाजूप्रमाणें दुसऱ्याहि बाजू आहेत. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, व्यावसायिक, सांस्कृतिक, अशा अनेक बाजू आपण पडताळल्याशिवाय 'पाठारे क्षत्रिय' ज्ञातीचें सर्वांगीण संशोधन एका पूर्वार्धानेंच केलें, तर तें अगदीं अपुरें पडेल. ह्या सर्वंकष संशोधनाकरितां 'बिंबाख्यान,' 'महिकावतीची बखर' व पूर्वार्ध ह्यांचें संशोधन एकसमयावच्छेदेंकरून केलें पाहिजे. तुलनात्मक दृष्टीनें हें सर्व करणें अगदीं युक्तच आहे. तसेंच त्याकरितां ह्या ज्ञातीच्या मूलभूत पंचायती, सभा व महासभा यांचा पूर्णपणें अभ्यासहि केला पाहिजे.

पूर्वींच्या न्यायदान पद्धती

पंचायतीच्या स्वरूपानें म्हणजे लोकशाहीच्या पद्धतीनें ह्या सर्व कालीं लोक वागत होते. कोणताहि सामाजिक अथवा धार्मिक प्रश्न निघाला, कीं सर्व जमात एकत्र येई. दोन्ही पक्षांना पंचायत किंवा लवाद मान्य किंवा अमान्य करण्याचा हक्क असे. त्यानंतर साक्षीदारांना त्या लवादानें प्रश्न विचारून त्यांतून कोणतें सार निघतें, हें त्या लवादानें सर्व जमातीला सांगावयाचें व नंतर जमातीनें निर्णय दिल्यावर तो निर्णय

सभाप्रमुख म्हणजेच राजप्रमुखानें त्या दोन्ही पक्षांना सांगावयाचा व दंड, शिक्षा ठरविली असल्यास ती सांगावयाची. ही शिक्षा बहुतेक ज्ञातिबहिष्कृताची असावयाची.

ह्या रिवाजांतच लोकशाहीचीं बीजें होतीं; व त्यांतून पुढें ज्ञातीच्या सभा, महासभा उद्‌भवल्या.

राजधोरण असें होतें, कीं प्रगण्या प्रगण्याचे अधिकारी यांनीं आपापल्या क्षेत्रांतून सरकारी वसूल जनतेकडून घ्यावयाचा व नंतर आपल्या वृत्तीचा भाग आपण ठेवून बाकीचा सरकारभाग सरकारांत भरावयाचा. हल्लींची ही रयतवारी पद्धत त्या वेळीं अशी मुळींच नसे. खोती पद्धतीनें सर्व चाले. त्यामुळें सर्व खेडीं हीं प्रगणाधिकाऱ्याच्या ताब्यांत असत. प्रत्येक खेडें हें स्वतंत्र राज्यच असे व आपला कारभार आपणच चालवीत असे; बलुते पद्धत ह्या राज्यकारभाराला पोषक असल्यामुळें ती गांवांतच चाले. कामें वाटलीं जात. गांवकीचीं कामें वाटणीच्या पद्धतीनें, सामुदायिक रीतीनें, प्रत्येक खेडें करी. न्याय देणें हेंहि गांवांतच होत असे. सार्वजनिक कामेंहि त्याच पद्धतीनें केलीं जात. ह्याचें प्रत्यंतर आपणास बखरीच्या मजकुरांत जिथें तिथें पहावयास मिळतें. इतकेंच नव्हे तर आपणास म्हणजे जमातींत किंवा खेड्यांतल्या प्रतिनिधींना आपला राजा आपणालाच निवडतां येई. जनार्दन प्रधानाच्या राज्याधिकाराचे वेळीं ही गोष्ट अगदीं स्पष्ट झालेली आहे. प्रत्येक राजाच्या अधिकारग्रहणप्रसंगीं जमातीनें म्हणजे प्रजेनें त्यास सम्मति दिलेली आहे. मुसलमानांनीं किंवा फिरंग्यांनीं राज्य काबीज केलें तेव्हां जमातीला बोलावून सर्वांचे मतानें व सम्मतीनें राज्यकारभार हातीं घेतला होता, हें बखरींत स्पष्ट केलें आहे. ह्याच पद्धतीचें रूपांतर हे प्रगणाधिकारी किंवा राव, राणे, राजे नाहींसे झाल्यानंतर ग्रामपंचायतीमध्यें झालें. प्रत्येक गांवास त्या गांवचा राज्यकारभार चालविणारी ही पंचायत स्थापन झालेली आपणास दिसते. तसेंच ह्याच धोरणानें ज्ञातीच्या सभा, देशसभा, जमातसभा किंवा महासभा निर्माण करण्यांत आल्या. गांवचा कारभार स्वतंत्रपणें गांवची पंचायत चालवी. त्याचप्रमाणें ज्ञातीच्या सभा खेड्यापासून तों शहरापर्यंत आपापल्या ज्ञातीचा सामाजिक, धार्मिक, आर्थिक, व्यावसायिक व सांस्कृतिक संसार चालवूं लागल्या. ग्रीस देशांतल्या स्पार्टा, ॲथेन्स ह्या ठिकाणीं अशाच पद्धतीनें अनेक शतकें राज्यकारभार व जमातकारभार चालत असे. पण फिरंग्यांच्या धोरणानें मात्र त्यावेळीं जमातींना बराचसा उपसर्ग पोहोंचला होता.

* * * *

धंद्यांतील बदललेल्या व्यवसायाचा व पेशाचा विचार अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. साधनें तर अगदीं अपुरीं आहेत. हें संशोधन आपणास इ. सन १५०० पर्यंत

करावयाचें आहे. १५०० पर्यंत आपला पूर्वार्ध आहे; व संशोधिलेल्या खंडाचाहि शेवट त्याच सनांत होत आहे.

शके १०५०–६० मध्यें 'पाठारे क्षत्रिय' हे इकडे येऊन स्थायिक झाले. म्हणजे ८०० (आठशें) वर्षें ते येथें रहात आहेत. 'पाठारे क्षत्रिय' ह्यांनीं आपली ज्ञात ही आजवर सांभाळून ठेविली आहे, हें मोठेंच भूषणावह आहे. खरें पाहिलें, तर 'ज्ञात पाठारे' असा ज्ञातिवाचक उल्लेख संवत् ५७४ म्हणजे इ. सन ५१८ मधें आढळून येतो. म्हणजे आणखी ३४५ वर्षें हा काळ मागें जात आहे; म्हणजे दीड हजार वर्षांची ही ज्ञात आपण कोंकणांत येऊन टिकविली आहे! आपण राहणारे उत्तर हिंदुस्थानांतले आहोंत. शके १०८५ पर्यंत आम्ही उत्तरेस होतों. त्या ठिकाणीं आपल्या ज्ञातीचा ठावठिकाणा लागणें आज तरी शक्य नाहीं. पण ह्या 'पाठारे ज्ञाती'नें कोंकणांत आल्यावर आपलें मूळचें वैशिष्ट्य मात्र कायम ठेवलेलें आहे.

उत्तरेकडून येतांना आपण पाठारे ज्ञातींतलीं क्षत्रिय कुळें म्हणून इकडे दक्षिणेंत आलों. आलेल्या कुळांत भेदभाव वगैरे निर्माण होऊन आपणांत चौकळशे, पांचकळशे, वाडवळ, पाठारे प्रभू असे पंथभेद झाले व तितकीं एकगटाच्या ज्ञातीसमाजाचीं अनेक शकलें होऊन त्याच्या निरनिराळ्या ज्ञाती बनल्या. पण ह्या सर्व ज्ञातींनीं येथें कोणामध्येंहि विलीन न होतां, आपला सवता सुभा आणि विशिष्टपणा आजवर राखला, हें फारच अभिमानास्पद व भूषणावह आहे. अशा ह्या ज्ञातींचें एकीकरण व्हावें, हें उचितच आहे. आतां अशा ह्या ज्ञातींची सर्वांगीण माहिती उपलब्ध व्हावी, म्हणून मी राजकीय संशोधनाबरोबर वरील लिखाणाप्रमाणें सर्व बाजूंनीं संशोधन करण्यास घेत आहें.

शके १०६० मधें कनोजहून निघून आपण १०८५ मध्यें महिकावतीचें राज्य स्थापन केलें. ह्याच राज्यास बिंबस्थानाचें राज्य म्हणतात. ठाणें गांवास बिंबस्थान व भिवंडीस बिंबस्थान म्हणत असत. अशा ह्या बिंबस्थानांचें राज्याच्या स्थापनकालीं या प्रदेशांत काय होतें, तें पाहूं. पूर्वार्धांत म्हटलें आहे, कीं "ठाणें कोंकण सिंधुतीर राज्य थोडेसें आहे अरण्य आहे." राज्य स्थापन केल्यावर मुलूख न्याहाळल्यानंतर दिसलें, कीं चवदा प्रगणे विलाथ असे; परंतु उजाड झालें असें. भास्करराव देसाई व अंकुशदेव राणा नारगौडी यांना वृत्ती चौदा प्रगण्यात दिली. राजभागांत प्रत्येक १०० (शंभर) दामांत पांच दाम यथाविभाग दोघांना दिले. चौदा प्रगण्यांत भात दर मुडा फरे दोन दोघांनीं विभागून घ्यावें. उपाध्यायांना चौदा प्रगण्यांत अंतरपाट वृत्ती दिली. अनंत नाईक व विठ्ठल नाईक यांनाहि मुड्याचें शेत दिलें.

देशाची व्यवस्था करण्यासाठीं देश व देसाई यांना प्रमुख नेमलें. त्याचप्रमाणें चौदा प्रगण्यांत चौदा अधिकारी नेमले व त्या प्रत्येक अधिकाऱ्यावर चारचारजण असे कर्णिक दिले. आपापल्या प्रगण्यांत हा अधिकारी व कर्णिक ह्यांनीं राज्याची व्यवस्था करावी व ठेवावी. तिच्यावर उभयता देशदेशाई यांनीं आपला अम्मल चालवावा. ह्या राज्याचा कारभार **अंकुशदेव राणा** व **भास्करशिंग** ह्यांनीं वंशपरंपरेनें चालवावा. वृत्तीवेतन भोगावें. सर्वांनीं त्यांचे ताब्यांत रहावें. १६ (सोळा) शाखांच्या ब्राह्मणांनाहि वृत्ती दिल्या. अशी ही राज्यव्यवस्था झाली.

वर सांगितलेंच आहे, कीं देश उजाड व अरण्यमय आहे; करतां त्यांत लोकांची वस्ती व्हावी, म्हणून फरमान काढून व्यवस्था केली. ती अशी, कीं लोकांनीं प्रजा आणाव्या. त्यांनीं शेतें करावीं; म्हणून त्यांना अभयें दिलीं. अभय असें, कीं नवीन वसाहत केलेल्या प्रजेनें **१२ (बारा) वर्षें करभार सरकारला मुळींच देऊं नये.** क्षत्रिय वृत्तीचे लोकांस आश्वासन दिलें, कीं त्यांनीं नारळी, पोफळी, केळीं, ऊंस, वगैरे सर्व वस्तू पूर्णपणें कराव्यात. ह्या ठिकाणीं आम्ही पांचवा भाग घेतों; पण आपण जर हा व्यवसाय करून वाड्या स्थापिल्या, तर तुमच्याकडून दहावा भाग करभार म्हणून घेऊं. असें वचन दिलें. ह्याच हेतूनें बिंबानें प्रत्येक ठिकाणीं एक एक अधिकारी बसविला. त्याकरतां त्यानें कांहीं किल्लेहि बांधले. अशा रीतीनें राजा बिंबानें **शेतीवाडी सुधारण्याला लोकांना सवलती देऊन प्रारंभ केला.**

हा प्रदेश समुद्रकांठचा असल्यामुळें **पडावांचें (तारवांचें) आरमार** जरूर असलें पाहिजे, व तोहि एक धंदा होऊन राज्यास मदत व स्थैर्य मिळेल, असें जाणून सुतारकी, **व पडाव बांधण्याचा उपक्रम महिनंदनु राजानें केला.** त्यानें शृंगारपुराहून २ दोन कारागीर आणविले. आपल्या राज्यांतले ८ आठ कारागीर दिले, व हा पडावांचा धंदा चालू केला. ह्या ठिकाणीं एक बिकट प्रश्न उपस्थित झाला, कीं **क्षत्रियानें पांचाळाचा धंदा केला, तर त्याचें क्षत्रियत्व लोपतें; पण राजानें जाहीर केलें, कीं कोणाचेंहि क्षत्रियत्व अशा तऱ्हेच्या धंद्याच्या बदलानें लोपत नाहीं.** समाजास पुढें जाण्यास ह्या रूढी समजून त्या दूर करण्याच्या कामीं मोठेंच साहस राजानें केलें. ह्यावरून त्या वेळीं ज्ञातीनें किती कठोर बंधनें ठेविलीं होतीं, व तीं प्रगतीच्या आड कशीं होतीं, हें दिसून येतें. तीं दूर केल्यामुळें समाजाची प्रगति पुढें जाऊं शकली.

श्वानखानानें बादशहास फरमान दिलें, कीं **हरनाईक**, इत्यादि **लोक पातशहाची** जमीन विकतात. पादशहानें आगामुऱ्हाला पाठविलें. त्यानें हरनाईकास विचारलें, कीं तुम्ही पादशहाची जमीन कां विकतां? हरनाईक म्हणाला, कीं **उजाड जमिनीचा**

करभार कोणी देत नाहीं. लागवडीस आलेल्या जमिनीचा खंड मिळतो. आम्ही आमचा भाग घेतों व बाकीचा पादशहाला देत असतों. आम्ही जमिनी पट्ट्यानें लागवडीस दिल्या नाहींत तर सर्व जमिनी उजाड (ओस) पडतील, म्हणून आम्ही करारानें जमिनी लागवडीस देतों. हें त्याचें बोलणें आगामुऱ्हास पटलें. त्यानें सर्वांना सोडून दिलें, इतकेंच नव्हे, तर आगामुऱ्हानें सांगितलें, कीं अशा करारावर तुम्ही आमची मुद्रा घ्यावी. याचा अर्थ हाच, कीं सर्व जमिनी चौदा महालांत वाटून ते महाल चौदाजणांना दिले आहेत. पादशहा करभार मागणार तेव्हां खोतीप्रमाणें हे अधिकारी ह्या जमिनी ओसिक जाऊं नयेत म्हणून खेडुतांना आपल्या आंतून पट्ट्यानें देत होते. अशी ही व्यवस्था चौदा महालांत होती.

या काळीं सतीची चाल फार प्रमाणांत होती. अनहिलवाड्याचा आनंददेव राणा ह्याचा (वेसावें) अंधेरी येथें नागरशा व त्रिपुरकर यांनीं पराभव केला. त्या लढाईत तो मेला. त्याच्या बारा राण्या अंधेरी येथें सती गेल्याचा वृत्तांत मागील भागांत दिलेला आहेच.

भागडचुरीला रामजी सुखा यानें पाल कोयत्यानें ठार मारल्यानंतर समारंभ करून त्याला ज्ञातींत घेतलें. याचा अर्थ असा, कीं शुद्धिसमारंभ करून कोणालाहि ज्ञातींत घेतां येत असे. अपंक्त ठेवण्याचे, ज्ञातीबाहेर वाळींत टाकण्याचे भ्रामक व खुळे प्रकार त्या काळीं राजसत्तेच्या धोरणामुळें घडत नसत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

बिंबकालीं पुनर्विवाहाला नि मिश्रविवाहाला विधिनिषेध मुळींच नव्हता !

वे. शा. सं. कोकजेशास्त्री यांच्या 'धर्मनिर्णय मंडळा'च्या परिषदेंत ठराव करण्यांत आला आहे, तो असा. आंतरज्ञातीय विवाह झाल्यास त्या वधूला व तिच्या संततीला पुरुषाच्या ज्ञातीचा दर्जा मिळावा. क्षात्रैक्यसमाजानें ठराव केला आहे, कीं आंतरजातीय विवाहानें जी वधू आपल्या ज्ञातींत येईल तिला व तिच्या संततीला ज्ञातीचा दर्जा देऊन क्षा. समाजाचा सभासद होतां येईल. असें हें लिहिण्याचें कारण कीं प्राचीन काळची ही शुद्धीकरणाची प्रथा अगदीं सर्वत्र नामशेष झाली होती. आंतरजातीय विवाह झाला, म्हणजे त्या पुरुषानें वा स्त्रीनें आपल्या ज्ञातीला मुकावें व संततीनें वाऱ्यावर उधळावें. त्यामुळें संकरज्ञाती होऊन समाजाचीं अनेक शकलें झालीं आहेत. आमच्यांतून निघून 'जा' ही वृत्ति बंद व्हावी व सर्वांना कोणता तरी एक मार्ग असावा, आंतरजातीय विवाहांचीं कुटुंबें वटवाघळासारखीं केवळ लटकून जाऊं नयेत, म्हणून धर्मनिर्णय मंडळानें हा ठराव केला. ही सन्माननीय प्रथा बिंबकालीं चालू

होती, ही मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे. बिंबाख्यानांतल्या पुरुषाच्या मूळ पुरुषाचीं गोत्रें वगैरे दिलेला एक भाग त्या ग्रंथांत आहे. त्याचीच एक हस्तलिखित प्रत माझ्याजवळ आहे. त्यांतल्या एका पानाचा ठसा प्रस्तुत ग्रंथांत दिला आहे. त्यांतल्या हकिकतीवरून दिसून येतें, कीं आगळे (ह्या ज्ञातीस हल्लीं आग्री म्हणतात. पण ज्ञातीचें खरें नांव आगळेच आहे.) तिल्हेर ज्ञातीच्या जातीला कुणबी म्हणतात; ह्या ज्ञातीबरोबर, सोनार ज्ञातीच्या कांहीं स्त्रियांबरोबर लग्न किंवा पुनर्विवाह केल्यापासून झालेल्या संततीला जमातीच्या परवानगीनें ज्ञातींत समाविष्ट करून घेऊन ज्ञातीचा दर्जा त्या संततीला दिला आहे. इतकेंच नव्हे तर संततीच्या वडिलांच्या ज्या वृत्ति होत्या, किंवा जे मानपान होते, त्यांतला वांटा त्या संततीला देण्यांत येत असे.

दुसरी एक उत्तम प्रथा त्यावेळेपासून 'पाठारे क्षत्रिय' ज्ञातींत आहे. ती प्रथा म्हणजे गतधवा स्त्रियांचा पुनर्विवाह करणें. असा विवाह केल्यानें कितीतरी टक्क्यांनीं नीतिमत्तेचें संरक्षण होतें व अनाचार आणि त्यानंतरचे ज्ञातीय खटले वाचतात. मात्र असा हा विवाह गौण मानला जातो. म्हणून फारसा गाजावाजा न करतां नुसत्या धार्मिक विधीनें तो विवाह पूर्ण करीत. ह्या विवाहाला पाट म्हणत.

मी म्हटल्याप्रमाणें उपरोक्त प्राचीन ग्रंथांत पान ८ वर उल्लेख आहे तो असा:—
"ज्ञातीचा तिलेरा उतीम करून ठेवला. राजा बिंब." माण. "चोघळेपण दिधलें होतें. तेवा आगळयाचा दासीपुत्र नीपजला." पान १४ "केशवराव प्रभू यास चोघळेपण खापणें, मड, दुसरे चोघळेपण दिधले ते सोनारणीचे पोटीचे रामजी दिसले ते बैसले" मुहूलीचा रामपुरो व त्याही बायको केली पाटाची वांदरे यातीचे राणा नाव तेनकाई तिचे संगती मुल भाऊराव तो मुहिलीचे दादण—सेव याचे पदामध्यें वर्तला"। "कृष्णाजीत याहीं बायको केली पाटाची तिचें नांव राणाई तुंगवेकराची तिचें मूळ पदम मापेला. तो काळीणकर जाहाला. कासारणीचे सवे दारमोजी कासार वोढया (पहिल्या नवऱ्याचा मुलगा) त्याला ठिकाण दिले वीरखोपामध्वी" पान १५ सोनारणीचे सवे धाकजी सोनार यासी ठिकाण दिले तुळेरामध्यें गोत्र वैईराक्षमुनी कुळदेवता त्यागाबाई." "गणपत देसल्याची बाईल केली नाऊ तिचे केमाई तिचेसवे मुल नाग म्हात्रा त्याला ठिकाण दिले प्रभोवाडी." "सोम देशले याही बाईल केली उतणीची तिचे नांव येश्वदी तिचे संगाती गोगा राऊत आणिली त्यास ठिकाग दिले तुरळामधे यास शेत शिलोतर दिले."

ह्यावरून दिसून येतें, कीं पुनर्विवाहाच्या पहिल्या नवऱ्याच्या पोटच्या मुलांनाहि मानानें बसविलें जात होतें. पान १३ राज्याणें दवणेस जावुन बाईका

कासारीन, सोनारीण, कुंभारीण : कृष्ण देसले याही त्यास संगाते पाट केले. कृस्न देशलेचे लग्नाचे बायकोचे लेक सडूण बसले वीरखोपामध्यें. सीव देसले मूल सोमदेस त्याचे ते बसले तुरेलामदे. कासारणीचे पोटचे हरदेसले त्याचे भाऊ पिठोजी देसले त्याचे मूल वासेलीमधें." जातीचा तिलेरा दासीपुत्र राज्याणे उतीम करून वर्तइला."

ह्यावरून वाचकांना हेंच दिसून येईल, कीं आज आपल्यांतल्या रूढ कल्पना आणि पुराणमतवाद मावळत चालला आहे ही गोष्ट कितीहि कौतुकाची आणि अभिनंदनाची असली, तरी हे प्रकार आजच्या विसाव्या शतकाच्या मध्यांतले आहेत; त्यांत मोठेसें नवल नाहीं ! पण उपरोक्त प्रकार ६ व्या ७ व्या शतकांत व त्यानंतरहि घडून येत हें लक्षांत घेण्यासारखें आहे. मध्यंतरीचा काळ म्हणजे भिक्षुकशाहीच्या बंडाचा आणि प्रखर पुराणमतवादाचा. यामुळें अपंक्तपणाचे, वाळींत टाकण्याचे, जमातीच्या दंडाचे प्रकार घडत होते यांत नवल नाहीं. प्राचीन म्हणजे 'पाठारे क्षत्रिय' ज्ञातिकालीन प्रागतिक आणि नवमतवादाचे जे विचार समाजाचें स्थैर्य, नीतिमत्ता यांना टिकवून धरीत, त्यांची होळी पुराणमतवाद्यांनीं केली, समाज-स्थैर्यवादाला लुळेंपांगळें करून टाकलें !

आज घडत असलेले प्रकार बिंबकालींहि घडत होते. समाज त्यांना नाकें मुळींच मुरडीत नसे. पण मध्यंतरीच्या कोणत्या कालांत नि कोणत्या स्थलांत 'पाठारे क्षत्रियां'त अप्रगतीचें पिसाट सैरावैरा धावूं लागलें, ह्याचा अंदाज निश्चितपणें आज तरी घेतां येत नाहीं. तरी तें १४ वें शतक असावें. कांहींहि असो; पण आतां तरी आपल्या प्राचीन वंशजांची प्रागतिक विचारांची, आचारांची, सामाजिक धोरणांची आठवण करून आपलीं पावलें झपाट्यानें पुढें टाकल्यास तें अखिल पाठारे क्षत्रियांना मोठें भूषणास्पदच ठरेल, असें प्रस्तुत लेखकाला खात्रीनें वाटतें.

नागरशाच्या बटिक पुत्रास मादपुरोनें आपली कन्या दिली; तसेंच नागरशास ब्राह्मण स्त्रीपासून झालेल्या दोघा पुत्रांना धर्मदीक्षा देऊन व क्षात्रधर्म शिकवून त्यांना एका स्वतंत्र ज्ञातींत घातलें.

शेतीवाडीच्या कामाकरतां किंवा मजुरीकरतां पाण्यांत होडींतून जातांना आपली खायची शिदोरी बरोबर घेतली, तर त्या इसमांना बाटगे म्हणून पंक्तीस घेत नसत; अशा या खुळचट कल्पनांमुळें 'पाठारे क्षत्रियां'चीं अनेक ज्ञातींत शकलें पडलीं. एक रक्त, एक धर्म, एक संस्कृति अशा पुरातन वंशाच्या विशाल कुटुंबांत भोळ्या नि भ्रामक समजुतींमुळें "आम्ही निराळे; आमची जात वेगळी; त्यांच्या व आमच्या ज्ञातीचा असा कांहींएक संबंध नाहीं; ज्ञातीच्या शिक्क्याचा अधुवट पितांबर

नेसल्याकारणानें आम्ही फारच सोवळे आहोंत;" अशा तऱ्हेच्या कल्पना उरापोटाशीं बाळगून, पडलेल्या आणि पाडलेल्या निरनिराळ्या ज्ञातींनीं आपलें मूळ स्थान, स्वकीय अशा हिंदूंचीं तसेंच परधर्मीयांचीं आपल्यावर गिधाडी आक्रमणें आल्यामुळें स्थलांतराच्या आव्यापाव्या खेळण्याचा प्रसंग कां व तो कसा येत गेला, याचा विचार आतांपर्यंत त्यांनीं केला असता, तर बिंब राजाबरोबर आलेल्या 'पाठारे क्षत्रिय ह्या नांवाच्या विराट जातीसंघांतून उपजाती (Sister Communities) कधींहि निर्माण झाल्या नसत्या. क्षुल्लक कारणांनीं निर्माण झालेल्या जातिभेदांच्या प्रकरणांत विचारवंताला हेंच दिसून येईल, कीं कूपमंडूक वृत्ति आणि मतलबी मनोरचना हेच स्वभावधर्म जातिभेदांचे अभेद्य किल्ले शाबूत ठेवण्याला कारणीभूत झाले असावेत. 'आमचा सवता सुभा' असें धोरण उरापोटाशीं घट्ट बाळगल्यामुळें आतांपर्यंत ह्या उपजातींचें एकीकरण होऊं शकलें नाहीं.

"राष्ट्राचें जीवित असो किंवा व्यक्तीचें जीवित असो, त्याला अचेतन अशी स्थिरावस्था प्राप्त झाली, कीं त्याचा सत्यानाश झाल्याशिवाय रहात नाहीं." यामुळेंच हिंदुजनांचा ऱ्हास नि अधःपात जो झालेला आहे, त्याला कारण पुराणमतवादाच्या पिशाच्चानें झपाटल्यामुळें नि भ्रामक कल्पना, भोळ्याखुळ्या समजुती रूढ होत गेल्यामुळेंच हिंदुसमाजांत जातीजातींचीं असंख्य शकलें झालीं; आणि त्यामुळेंच परकीयांना आमच्या मांसाचे हवे तसे लचके तोडतां आले.

गतेतिहास आणि आपलें मूलस्थान यांचा पुराव्यानिशीं विचार करतां कोणीहि विचारवंत म्हणेल, कीं आज काल हा बदललेला आहे, इतिहासाची प्राचीन परंपरा तुमच्या पाठीशीं उघड्या डोळ्यांनीं उभी असतां व ती बजावीत असतां, दीड हजार वर्षांपूर्वीं कर्तृत्ववान् अशा आपल्या पूर्वजांनीं चिरस्मरणीय असा इतिहास घडवून हिन्दुजनांच्या शेंडीमुण्डीचें संरक्षण आत्मबलिदानानें करून, प्रागतिक विचारांच्या ज्या नौबती झडविल्या, त्यांच्या निनादांची दखल आजच्या अखिल 'पाठारे क्षत्रियां'नीं घेतल्यास, ती महाराष्ट्राच्याच नव्हे, तर अखिल हिंदुजनांच्या इतिहासाच्या नव्या दालनांत वज्रलेप होऊन बसेल, यांत शंकाच नाहीं. चौदाशें वर्षांची ऐतिहासिक परंपरा परकीयांच्या डुकरमुसंड्यांना बेधडक तोंड देऊन ती टिकविली, याबद्दल अखिल पाठारे क्षत्रियांना कोणीहि धन्यवादच देईल !

॥ वन्दे मातरम् ॥

परिशिष्ट (१)

चेऊलच्या दप्तरांतील कागद

पुणें येथील श्री. शांताराम विष्णु आवळसकर यांच्या कृपेनें चेऊलचे अधिकारी यांच्या दप्तरांतला कागद येथें उद्धृत करीत आहें, तो :—

श्री गनाधीस प्रशन

श्री संवत् १३५३ तेरासे त्रीपन. त्यामध्यें राज्ये नीरोपीत रामदेवरायाचे हेदुस्थानि ठीकान अहिनल वाडा ....कोकन रामखडी ठानें ठीकानी आला. चईत्र सुद्द प्रातपदेस गुरुवारीं आला त्याचे समागमी ब्रह्माक्षेत्री कुले सुर्यवंसी व सोमवंसी तळ कोकनास आले त्याची ठीकाने गोत्र कुळस्वामीनी मानपानटीला वीडा येनेप्रमानें.

१. राजा रामदेव ठीकान अहिनलवाडा येथे ठीकान माहींम गोत्र बगदाळ, कुलस्वामीनी प्रभावती.

२. प्रधान केसवदासप्रभु सुर्यवेंसी ठीकान देवगिरी येथे ठीकान. मुळे माहीम गोत्र कोडने कुलस्वामीनि माहालक्षेमी सोमवंसी कुळे सासस्ट त्याची उत्पती ठीकाने ६.

३. देसले माधवदेसले बुक्षे ठीकान मालवाड येथें ठीकान मरोल गोत्र पद्माक्षे कुळदेवता जोगेश्वरी.

४. कृस्णाजीत ठुरोचै (चौ) घले ठीकान सौहास येथे ठीकान साहार सारचज कुळदेवता महालक्षुमी.

५. सीत्रपास चौधुले ठीकान पैठन येथें ठीकान पोहीसर गोत्र भद्ररासी कुळदेवता वज्राई.

६. दाममत ठीकान पैठन येथें ठीकान प्रदापूर गोत्र क्षौनिकमुनी कुळदेवता पद्मावती.

७. दामोदर केसवराव दुरो ठीकान पैठन येथें ठीकान नसरापुर गोत्र गौतम कुळदेवता येकवीरा.

८. नाम साहानी ठीकान नाम्रावान येथे ठीकान कोडीवठें गोत्र वैर्दुमुनी कुळदेवता बापादेव.

९. अनंतवर चौधुले पदराउत ठीकान चापानेर येथे ठीकान आकुळीं गोत्र पारस्वत्तमुनी कुळदेवता हरबाई.

१०. नामदीत ठीकान चापानेर येथे ठिकान काळीने गोत्र वचीस्टमुनी कुलदेवता हरबाई.

११. दाममहत ठुरो ठीकान चापानेर येथे ठीकान येकसार गोत्र श्रीपतमुनी कुळदेवता चंडीका. हे आठज (ण) कडु पाळवनचे (चौ) घले सर्वासमाने देसाई चै (चौ) धुले कडु पाळवन यास सर्वांही मान द्यावा.

१२. क्रुस्ग रगतीक ठीकान देव्हेरी येथे ठीकान वादरे राजनपूर गोत्र कोडने कुळदेवता कुमारीका. पद म्हातारे.

१३. नामरुत ठीकान पेठन येथे ठीकान तळवद गोत्र नागेस्वररूसी कुळदेवता भाहाबाई.

१४. नामराउत दाडी मे उरू ठीकान चापानेर येथे ठीकान वोझीवरे गोत्र दाळवमुनी कुळदेवता कालीका.

१५. त्रीव्रकरुत पूर्व ठीकान पैठन येथे ठीकान वोझोवरे गोत्र वसे कुळदेवता नारायेनी.

१६. दामुसीग ठीकान पैठन येथे ठीकान इडे—पाडले गोत्र वीस्वा मरंत्र कुळदेवता लळीताई.

१७. नामराज ठीकान चापानेर येथे ठीकान मुहिलीपद म्हातारे गोत्र त्रीकब्ररुषी कुळदेवता हरडाई.

१८. दादसीळ ठूरो ठीकान पैठन येथे ठीकान मुहीलीपद म्हातारे गोत्र अगीरास कुळदेवता म (मा) घेस्वरी.

१९. जीवन स्त्रीत ठीकान चापानेर येथे ठीकान माहीम पद म्हातारे गोत्र श्रीचदेळ कुळदेवता चंदनदेवी.

२०. दाममहत ठीरु टीकान चापानेर येथे ठीकान तुराळेपद म्हातारे गोत्र त्रीबकमुनी कुळदेवता ताकालीक.

२१. चाद्रिस राउत ठीकान पैठन येथे ठीकान राजनपुर गोत्र जनाजन कुळदेवता रतुदतिका.

२२. हर्रब्र राउत ठारु ठीकान दवेरतेरे येथे ठीकान वादरे गोत्र भारद्वाज कुळदेवता माहेस्वरी.

२३. जनीकराउत ठीकान नाळे येथे ठीकान नीळापुर गोत्र भुरगाळ रुसो कुळदेवता तवरीत.

२४ नाम चोधरी ठीकाण पैठन येथे ठीकान काधवली गोत्र व्रक्षे कुळदे(व)ता चंद्रायेनी.

२५ नाम नीर ठरु ठीकान पैठन येथे ठीकान अनीक पद म्हातारे गोत्र कासेस्वररुसी कुळदेवता रुद्रावंती.

मथळ्यावर लिहिल्याप्रमाणें वरील कागदांत कनोजहून निघालेल्या रामदेवाच्याबरोबर आलेल्या कांहीं माणसांची यादी कुळदेवता व गोत्र ह्यांसह दिली आहे; तसेंच प्रत्येकाचें इकडलें स्थान व मूळचें स्थान हीं दिलीं आहेत. अशाच दोन याद्या बिंबाख्यानाच्या १६८ ते १८३ ह्या पानांवर आहेत. त्यांतल्या पहिल्या यादीच्यामधें उपरोक्त यादींतल्या माणसांचीं नांवें व माहिती आलेली आहे.

ही यादी संवत् १३५३ (म्हणजे शके १२१८) त नकल केलेली आहे. ह्या यादींत प्रथमतः म्हटलें आहे, "त्यामध्यें राज्ये नीरोपीत रामदेवरायाचे हेदुस्थानि ठिकाण अहिनलवाडा कोकन रामखडी ठाणें ठीकानी आला चईत्र (चैत्र) सुद्ध प्रतीपदेस गुरुवारी आला. त्याचे समागमी ब्रह्मक्षेत्री कुलें सूर्यवंशी व सोमवंशी तळ कोकनास आले." ह्यावरून आपल्या विधानास पुरावा मिळतो. हीं सासष्ट कुळें घेऊन येणारा रामदेव हा उत्तर हिन्दुस्थानांतला आहे. तो अहिनलवाड्याहून निघाला. हीं कुळें निघालीं तीं प्रथमतः रामदेवरायाचा अल्लाउद्दिनानें कनोजास पराभव केल्यानंतर. बिंबाख्यानांत हें स्पष्ट आहे. त्यांत असें आहे, कीं हा रामचंद्रराव आपल्या तीन मुलांसह व ह्या कुळांना घेऊन कनोजहून निघाला व तो पैठणास आला व आपले तीन मुलगे तीन ठिकाणीं ठेवले. तेथेंहि अल्लाउद्दिनानें पराभव केल्यावर तो अहिनलवाड्याहून पुढें निघाला. हीं कुळें बिंबानें घेऊन तो गुजराथेंत गेला व त्यानें तो प्रान्त घेतला. रामदेवराणा त्यावेळीं दक्षिणेंत देवगिरीस गेलेला असावा किंवा लढाईत मारला गेला असावा. म्हणजे हीं कुळें कोणत्याहि यादव राजाबरोबर आलेलीं नाहींत.

श्री. आवळसकर यांचे दप्तरांत चेऊलच्या महासभेचीं अनेक पत्रें व प्रकरणें आहेत. अणजूरकर नाईक घराण्यांतले पूर्वज चेऊल, किहीम, वगैरे ठिकाणीं फिरंग्यांच्या जुलमाचे वेळीं व त्याच्याहि आधीं गेलेले आहेत. त्याबाबतींत एक अगदीं लोकविलक्षण कथा प्रचलित आहे व ती कायद्याच्या पुराव्यानिशीं सिद्ध करतां येण्यासारखी आहे, असें श्री. आवळसकरांचें म्हणणें आहे.

परिशिष्ट (२)

Worli Gopchar & Bhoye Samsthan Resolution dated 29th July 1934.

Read letter received on 1st July 1934 from Bro. G. G. Naik making various suggestions.

Further resolved that the Samsthan do undertake the work of collecting and preserving all the materials relevant to the history of the Caste and also of writing the History of the Caste. Further resolved that Bro. G. G. Naik be and he is hereby appointed the sole collector of the said Historical records and documents and he be paid all his costs, charges and exapenses for the aforesaid work.

परिशिष्ट (३)

प्राचीन स्थलांचीं अर्वाचीन भौगोलिक नांवें

प्राचीन नांव	अर्वाचीन नांव	निश्चित ठिकाणाचा उल्लेख
अ		
अंधेरी	अंधेरी	मुंबई उपनगर जिल्हा
आगाशी	आगाशी	,, ,, ,,
अहिनलवाडा	अहिनलवाडा	उत्तर हिन्दुस्थान
आळंदापूर	अहमदाबाद	गुजराथ प्रांत.
आंबवली		
उ		
उसाळें	उतन	मुंबई उपनगर जिल्हा
उतन	उतन	,, ,, ,,
उलितन		
ए		
एकसार	एकसार	
क		
कलवणी	कलवणी	साष्टी प्रांत
कांढोली	कांदिवली	मुं. उ. जिल्हा
कांदवल	,,	,, ,, ,,
कांधोली	,,	,, ,, ,,
कनोज देश	कनोज	उत्तर हिन्दुस्थान
कामणदुर्ग	कामणदुर्ग	पालघरजवळ, जि. ठाणें.
काळदुर्ग	काळदुर्ग	
काळीन		

प्राचीन नांव	अर्वाचीन नांव	निश्चित ठिकाणाचा उल्लेख
ख		
खदीर तीर्थ		
ग		
गोराई	गोराई	मुं. उ. जिल्हा
घ		
घणदेवी		
च		
चरई	चरई	चेंबूर–मुं. उ. जिल्हा
चांदवड		
चेऊल	चेऊल	अष्टागर, जि. कुलाबा
चेंभूर	चेंबूर	मुं. उ. जिल्हा
ज		
जुगरी		
जुनरी	जुन्नर	जि. पुणें
ट		
टेंभी	टेंभी	ठाणें शहरांतील एक भाग.
ठ		
ठाणीया	ठाणें	जि. ठाणें
त		
ताम्रतीर्थ		
तारकापूर	तारकेश्वर	
द		
देवगिरी	देवगिरी	उत्तर प्रदेश
देवनेर	देवनेर	
दिधिपाली	दिधिपाली	
ध		
धार	धार	

प्राचीन नांव	अर्वाचीन नांव	निश्चित ठिकाणाचा उल्लेख
न		
नवसरी	नवसरी	जि. सुरत
नाऊर	नाऊर	
नादरें	नादरें	
नामगिरी	नामगिरी	
प		
पहाडी	पहाडी	
पाचपाली	पाचपाली	
पाली	पाली	
पाटण	पाटण (विद्यापूर)	
पिलवणगड	पिलवणगड	
प्रतापपूर	प्रतापपूर	
पैठण	पैठण	
पोसपाळी		
पोवसर	पोईसर	जि. ठाणें
ब		
बडेली	बडेली	
बराणपूर	बऱ्हाणपूर	मुं. उ. जिल्हा
बांदर	बांद्रे	
बारडियादुर्ग	बारडियादुर्ग	
बोरलें	बोरलें	
भ		
भाईंदर	भाईंदर	मुं. उ. जिल्हा
भायखळा	भायखळा	मुंबई शहराचा भाग
भैवार	भैवार	वैतरणी तीरीं
भोळा बंदर	भोळा बंदर	
म		
मंडपेश्वर	मंडपेश्वर	मुं. उ. बोरिवली
मढ	मढ	मुं. उ. जिल्हा
मरोळ	मरोळ	,, ,, ,,
महाकापूर		
महिमानपूर		
म्हसियादुर्ग	म्हशाचा किल्ला	जि. ठाणें

प्राचीन नांव	अर्वाचीन नांव	निश्चित ठिकाणाचा उल्लेख
माडोगड	माडोगड	
मांडली	मांडलें (चेंबूर)	मुं. उ. जिल्हा
माजगांव	मांजगांव	मुंबई शहर
मालाड	मालाड	मुं. उ. जिल्हा
माहोली	माहोली	
य		
येकसार	एकसार	
र		
रामखंड	रामखंड	सिंधुतीरीं
व		
वाविसा	वेसावें	मुं. उ. जिल्हा
वालकेश्वर	वाळकेश्वर	मुंबई शहर
विद्यापूर पाटण	विद्यापूर पाटण	
विलाथ (त)	माहीम	मुं. उ. जिल्हा
वेलवली	वेलवली	
वेसावें	वेसावें	मुं. उ. जिल्हा
वैतरणी	वैतरणी	वसईजवळ, जि. ठाणें
श		
शृंगारपुरी	शृंगारपुरी	
स		
सप्तशृंग	सप्तशृंग	
सहारहर		
सावदें	सावदें	
सिंगणापूर		
सिंधुतीर	सिंधुतीर	ता. वसई, जि. ठाणें
सुरपार क्षेत्र		
सोरटी सोमनाथ	सोरटी सोमनाथ	उत्तरप्रदेश
सोपाल	सोपारें	मुं. उ. जिल्हा

परिशिष्ट (४)

साष्टीच्या बखरीच्या पूर्वार्धांत उल्लेखिलेल्या व्यक्ती.

अ

अऊ (वू) नाग्वा
अंकुशदेव राणा
अंब नाईक
अनंत देसाई
अल्लाउद्दिन
अहमद
आगामुन्हा
आनंदराव (अहमदाबादेचा)
अमलखान
आसीबाई राणी
आंकुशराव (कल्याणचा)

उ

उत्तानचंद (उतन येथील)
उद्धव देसला देसाई

ए

एकदेव राणा

क

कड्डु पालवणकर
कमळ चुरी
कमळाईसे राणी
कर्णराव (वाईचा)
कृष्ण नाईक
कृपाळदेश नारगौडी
कमाविसे राणी
कान ठाकूर देशला
कान्होजी
कुबेर कान्होजी
कुशदेव हैबतराव
केशव नाईक
केशवदेव राणा

ग

गणपत देश

द

दादरुत—अधिकारी
देव नाईक
देवलोप—फिरंगी कप्तान

न

नरसिंगराव
नागरशा

● ● ●

श्री. गजानन गोविंद तथा काका नाईक
यांचा साहित्य-संसार

प्रकाशित :

१. करमणुकीचे प्रकार
२. अव्यापारेषु व्यापार
३. पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या इतिहासाचें दिग्दर्शन व समालोचन
४. साष्टीची बखर अर्थात् वसईचा दुर्धर संग्राम
५. पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या इतिहासाची रूपरेखा
६. वीर गंगाजी नाईक ह्यांचें चरित्र
७. वसईच्या धर्मयुद्धाची पार्श्वभूमि व त्यांत पा. क्ष. ज्ञातीचें स्थान
८. ठाणें जिल्हा लोकलबोर्डाचा इतिहास

अप्रकाशित :

१. ज्ञातीचें नांव (सारांश ह्या खंडांत समाविष्ट)
२. राजा बिंब, बिंबाख्यान व बखरी (—,,—)

क्षात्रैक्य समाजानें मागविलेले निबंध :—

१. क्षात्रैक्य समाजाच्या तीस वर्षांच्या कार्याचें समालोचन व पुढील वाटचालीची दिशा (अप्रकाशित)
२. ज्ञातीचा ५० वर्षांचा इतिहास (,,)
३. कै. जनार्दन राघोबा वनमाळी ह्यांचें चरित्र (,,)
४. ग. गो. उर्फ काका नाईक यांचें चरित्र (ले. : श्री. वि. आ. पाठारे)